
जानेवारी २०२३ / पाने ७६ / किंमत ₹१०

# लोकराज्य



## मराठी तितुका मेळवावा

## विश्व मराठी संमेलन २०२३



॥ भाषा, साहित्य, संस्कृतीचा सुगंधी पारिजात,
विश्ववंद्य मराठी अमुची परंपरा अभिजात... ॥



# मऱ्हाटी भाषासुंदरी

जैसी दीपांमाझि दिवटी। कां तिर्थींमाझि पूर्णिमा गोमटी।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी। सर्वोत्तम।।१।।

जैसी सरितांमध्ये गोदावरी। कां पूर्वतांमध्ये रत्नागिरी।
तैसी भाषांमध्ये साजरी। मऱ्हाटी पैं. ।।२।।

हरळांमध्ये रत्नकिळा। पुष्पांमध्ये कमळ।
तैसी भाषा सोज्वळ। शोभिवंत दिसे।।३।।

दुर्गावरि शोभे चरी। कां मुक्ताफळें शोभती हारी।
तैसी शोभे भाषांमाझारी मऱ्हाटी पैं।।४।।

तीर्थांमध्ये काशी। व्रतांमध्ये एकादशी ।।
भाषांमध्ये तैशी। मऱ्हाटी शोभिवंत।।५।।

परिमळांमध्ये कस्तुरी। कां अंबरामध्ये शंबरारी।
तैसी मऱ्हाटी सुंदरी। भाषांमध्ये।।६।।

ऐसी मऱ्हाटी सुंदरी। ते संस्कृता शोधु करी।
शटिक बैसवी हृदयमंदिरी । अज्ञानाची।।७।।

मूर्ख हृदयातें बोधी। विविध अर्थातें शोधी।
अज्ञानाची बोधी। मऱ्हाटी पैं।।८।।

मूर्खांशि चतुरा करी। साधु दावी सारासारी।
ज्ञातव्य वाखाणी संसारी। मऱ्हाटी हे।।९।।

बहुत संस्कृती अनुरागु । सर्वशास्त्री विचारु चांगु।
परि मऱ्हाटी वाचूनी पांगु। कवण फेडी।।१०।।

मऱ्हाटी बोलतां बरवी। सर्वत्र जाणीव मिरवी।
दूर्जनांकरवी सांडवी। पाषांड हे।।११।।

ऐसिया मऱ्हाटिया पवित्रा । लेणें करीत अध्यात्मशास्त्रा।
बहुतां लोकांसि पवित्रा । करविया ।।१२।।

– संत ज्ञानेश्वर
योगवासिष्ठ (१–२९४ ते ३०७)

वर्ष ७४ वे | अंक ४ | जानेवारी २०२३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य


- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, राहुल तिडके
- विशेष साहाय्य — प्रल्हाद जाधव
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- संपादन साहाय्य — काशीबाई थोरात, संध्या गरवारे, शैलजा देशमुख
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in


या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| भाषा आणि शिक्षण | वसंत आबाजी डहाके | ६ |
| महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित | डॉ. सुनीलकुमार लवटे | ८ |
| भाषेची जडणघडण | रामदास भटकळ | ११ |
| भाषेचा खेळ आणि घोळ | राजन खान | १४ |
| मराठी बोलती ठेवली पाहिजे | अरुण साधू | १७ |
| मराठी अभिजात कशी? | प्रा. हरी नरके | २० |
| नव्या परिमाणाची अपेक्षा... | डॉ. आनंद यादव | २४ |
| अमेरिकेतील मऱ्हाटमोळी अनुभूती | दीपक करंजीकर | २५ |
| समूहाचा चैतन्यशाली आविष्कार | महेश एलकुंचवार | २७ |
| मराठीच्या संवर्धनासाठी... | भाषा संचालनालय | ३० |
| व्यवहारक्षेत्रांतील मराठी | डॉ. प्रकाश परब | ३८ |
| लोकशाहीतील भाषाकारण | भाषा संचालनालय | ४५ |
| उत्सव नको, कृतीची गरज | डॉ. गंगाधर पानतावणे | ४६ |
| भाषा सर्वेक्षण आणि सामंजस्य | अरुण जाखडे | ४७ |
| अद्‌भुत आणि अद्वितीय | डॉ. चारुशीला ओक | ४९ |
| उत्सवाकडून देखाव्याकडे.... | दिनकर गांगल | ५१ |
| तेव्हा आणि आता... | डॉ. श्रीपाद जोशी | ५४ |
| विश्व मराठी साहित्य संमेलन | कौतिकराव ठाले-पाटील | ५९ |
| साहित्य संमेलनाचे औचित्य | प्रा. रा. ग. जाधव | ६२ |
| महाराष्ट्राची 'समृद्धी' | प्रवीण टाके | ६४ |
| राष्ट्रीय मतदार दिन | श्रीकांत देशपांडे | ६७ |
| मंत्रिमंडळात ठरले! | टीम लोकराज्य | ६९-७४ |

# उद्योग उभारण्यात महाराष्ट्र अव्वल

भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये डुइंग बिझनेस मूल्यांकनात महाराष्ट्र अव्वल आहे; असे यूके इंडिया बिझनेस कौन्सिलने अहवालात (नोव्हेंबर २०२२) प्रकाशित केले आहे.

'डुईंग बिझनेस इन इंडिया: द यूके पर्स्पेक्टिव्ह (२०२२ एडिशन)' हा यूके इंडिया बिझनेस कौन्सिलचा आठवा वार्षिक अहवाल आहे, ज्यामध्ये भारतातील व्यावसायिक वातावरणाविषयी यूके व्यवसाय आणि उच्च शिक्षण संस्थांची मते आणि अनुभव मांडले. या अहवालात व्यवसाय चालवण्यासाठी आवश्यक पोषक वातावरणाच्या बाबतीत महाराष्ट्र सर्वोच्च गुणांकन केलेले राज्य होते, त्यानंतर गुजरात, चंदीगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, आंध्र प्रदेश आणि उत्तर प्रदेश यांचा क्रमांक लागतो. पुढे, अहवालात ५ पैकी ३.३३ गुणांसह भारतातील राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे, त्यानंतर गुजरात, चंदीगड, हरियाणा (आणि हिमाचल प्रदेश) यांचा क्रमांक लागतो.



यूके इंडिया बिझनेस कौन्सिल ही एक सदस्यत्व-आधारित, ना-नफा संस्था आहे, ज्याची स्थापना २००७ मध्ये युनायटेड किंगडम आणि भारत यांच्यातील व्यापार आणि व्यावसायिक संबंध वाढवण्यासाठी करण्यात आली आहे. द्विपक्षीय व्यापाराला चालना देण्यासाठी आणि वाढवण्यासाठी ही संस्था दोन्ही देशांतील व्यवसायांसोबत, तसेच यूके आणि भारत सरकारांसोबत काम करते. यूके इंडिया बिझनेस कौन्सिल यूके आणि भारतात यशस्वी होण्यासाठी आवश्यक (insight) अंतर्दृष्टी, नेटवर्क, धोरण निश्चिती, सेवा आणि सुविधांसह व्यवसायांना समर्थन देते.

हा अहवाल ब्रिटनच्या व्यवसायांना भारतात प्रवेश करताना आणि काम करताना येणाऱ्या आव्हानांची चर्चा करतो, त्यांच्या सुधारणांचे प्राधान्यक्रम आणि भारताच्या व्यावसायिक वातावरणातील विविध पैलूंच्या मानांकनास विचारात घेतले जाते. यूके व्यवसाय आणि उच्च शिक्षण संस्थांच्या विस्तृत सर्वेक्षणातून या अहवालाचे निष्कर्ष प्राप्त झाले आहेत. हे सर्वेक्षण ऑगस्ट आणि सप्टेंबर २०२२ मध्ये एकूण ६०० हून अधिक प्रतिसादकर्त्यांनी पूर्ण केले आणि असे आढळून आले की, भारतात व्यवसाय करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सर्वोत्तम आहे.

या सर्वेक्षणाच्या निकालांवरून गुंतवणूकदारांना व्यवसायासाठी अनुकूल वातावरण प्रदान करण्याच्या बाबतीत महाराष्ट्राने सर्वच राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना मागे टाकले आहे. व्यवसायाच्या आकारानुसार आणि क्षेत्रानुसार विविध कंपन्यांचा या सर्वेक्षणामध्ये समावेश होता, यात प्रगत अभियांत्रिकी आणि उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांपासून ते डिजिटल आणि डेटा सेवा, व्यावसायिक सेवा, आरोग्य सेवा आणि जीवन विज्ञान आणि इतर याचा समावेश आहे.

यूके इंडिया बिझनेस कौन्सिल (UKIBC) ने भारतात उद्योग कार्यरत राहण्यासाठी आवश्यक वातावरणाची माहिती घेण्यासाठी सर्वेक्षणाने विविध कालावधीत गोळा केलेल्या विशाल डेटाचे विश्लेषण युके व्यवसायाच्या दृष्टिकोनातून केले आहे. हे भारत सरकार आणि राज्य सरकारांसोबत भागीदारी पुढे चालू ठेवण्याच्या उद्देशाने केले गेले आहे. उद्योग जगताकडून मिळालेल्या प्रतिसादानुसार महाराष्ट्र विजेता असल्याचे आढळून आले आणि त्यामुळे राज्याने अव्वल स्थान मिळवले आहे.



# प्रज्ञा-प्रतिभा-प्रगतीचे वैश्विक सिंहावलोकन!

मराठी भाषेचा वैश्विक स्तरावर प्रचार-प्रसार व्हावा, सर्वत्र मराठीतून संवाद करण्याची गोडी निर्माण व्हावी, दैनंदिन व्यवहारांमध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी सर्वांनाच प्रोत्साहन मिळावे, या हेतूने 'विश्व मराठी संमेलन' मुंबईत आयोजित करण्याचा अभिनव निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला.

अभिजात मराठी साहित्याचे श्रवण, पारंपरिक कलांची नवी अभिव्यक्ती, नावीन्यपूर्ण उद्योग-कल्पनांचे आदान-प्रदान असा व्यापक उद्देश नजरेसमोर ठेवून भारतातील आणि भारताबाहेरील मराठी भाषकांचे हे विश्वसंमेलन मुंबईत ४, ५ व ६ जानेवारी २०२३ रोजी भरवण्यात येत आहे.

मराठी विभागाच्या अधीनस्थ असणारे भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्था या संस्थांनी एकत्रितपणे या नव्या विश्वसंमेलनाची पालखी खांद्यावर घेतली आहे.




मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला यांना एक प्रदीर्घ अशी परंपरा असून जगभर सर्वत्र मराठी संस्कृतीची आगळीवेगळी ओळख आहे. या पार्श्वभूमीवर या प्रदीर्घ परंपरेचा गौरव करत, मराठी संस्कृतीचे माहात्म्य जगभर नव्याने अधोरेखित करण्यासाठी शासनाने उचललेले हे एक अनोखे पाऊल ठरले आहे.

जग सतत बदलत आहे. विज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाच्या अंगाने नवनवे बदल झपाट्याने घडत आहेत. ते आत्मसात करून, नव्या युगाच्या हाका ऐकतच आपल्याला पुढे जावे लागणार आहे. 'सावध ऐका पुढल्या हाका, खांद्यास चला खांदा भिडवून' असे केशवसुतांनी 'तुतारी' या सुप्रसिद्ध कवितेत म्हटलेलेच आहे. या पार्श्वभूमीवर या संमेलनाला एक ऐतिहासिक परिमाण लाभले आहे.

यानिमित्ताने जगभरची मराठी प्रज्ञा-प्रतिभा एकत्र येत असून या संमेलनात घडणाऱ्या सृजनशील विचार मंथनातून आणि चैतन्यशाली अभिसरणातून मराठी आणि महाराष्ट्राच्या नव्या वाटचालीच्या दिशेचा शोधही लागणार आहे. मराठी साहित्य कला संगीत यांच्या विविधांगी दर्शनाबरोबरच लोककला, वाद्यसंस्कृती, खाद्यसंस्कृती, वस्त्रसंस्कृती, मराठी बहराचे दर्शन यातून सर्वांनाच घडणार आहे. मराठी साहित्यातील निवडक कृतींवर आधारित ग्रंथप्रदर्शन हाही या संमेलनाचा एक मानदंड ठरला आहे. त्या पातळीवर हा केवळ एक शासकीय उपक्रम न राहता जागतिक पातळीवरील एक संस्मरणीय घटना ठरली आहे.

प्रज्ञा, प्रतिभा, प्रगतीचा नवा अविष्कार घडवणाऱ्या या संमेलनात मराठी उद्योजकांच्या उद्यमशीलतेचेही दर्शन घडत आहे. त्यांनी महाराष्ट्रात यावे येथील उद्योजकविश्वाचे नेतृत्व करावे, येथील उद्योजकांना मार्गदर्शन करावे यासाठी त्यांना प्रोत्साहन आणि आवश्यक ती सारी मदत देण्यासाठी शासन कर्तव्यभावनेने पुढे आले आहे.

मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती ही काळाच्या ओघात चहुअंगाने सदैव बहरून येणारी वृत्ती आहे. एकत्र येणे, विचारविनिमय करणे, यशकथांचे आदान-प्रदान करणे आणि त्या आधारे नवी क्षितिजे गाठण्यासाठी नव्या जोमाने पुढे जाणे हे मराठी माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. हे सारे मनाशी निश्चित करून या साऱ्यांना एकत्र आणण्यासाठी शासनाने उपलब्ध करून दिलेले हे नवे व्यासपीठ ही आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक अपूर्व अशी घटना आहे.

या संमेलनात होणाऱ्या विचारमंथनातून मराठी संस्कृती अधिक वृद्धिंगत करणारी, मराठी माणसाला जागतिक पातळीवर पुढे नेणारी नवनिर्माणाची नवी सूत्रे हाती येतील आणि ती महाराष्ट्राच्या आणि एकूणच मराठी माणसाच्या विकासाचा मूलमंत्र ठरतील, असा आम्हाला विश्वास आहे. शिवाय अशा प्रकारच्या आदानप्रदानामुळे जगभरातील मराठी माणसांचे परस्परांशी नवे ऋणानुबंध निर्माण होऊन सर्वंकष निर्माणाचे नवे क्षितीज सर्वांसमोर उजळून निघेल, अशी खात्री आहे.

आम्ही यापूर्वी मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने वेळोवेळी अनेक 'लोकराज्य'चे अनेक विशेषांक प्रसिद्ध केले आहेत. या संमेलनाच्या निमित्ताने त्यातील काही निवडक अंकातील म्हणजेच ऑक्टोबर २०११, जानेवारी-फेब्रुवारी २०१२, फेब्रुवारी २०१३ आणि फेब्रुवारी २०१४ या अंकातील काही निवडक लेख येथे संकलित करून पुनर्मुद्रित केले आहेत. हे संकलन परिपूर्ण आहे, असा आमचा दावा नाही; पण मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या अनुषंगाने काही मूलभूत सूत्रांची मांडणी करणारे हे लेख आजही वाचकाला नवा आनंद आणि नवी उमेद देऊन जातील, अशी आम्हाला खात्री आहे. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीचा आणि प्रज्ञा-प्रतिभेचा हा सुगंधी पारिजात सदैव बहरत राहो आणि आमच्या विश्ववंद्य मराठी भाषेची अभिजात परंपरा 'आ चंद्र सूर्य' सर्व जगाला मार्गदर्शन करत राहील, असा विश्वास या संमेलनाला शुभेच्छा देताना आम्ही व्यक्त करत आहोत.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

*(टिप : 'लोकराज्य'मध्ये यापूर्वी प्रसिद्ध झालेल्या मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीविषयक काही लेखांचे या अंकात संकलन आहे. निवडलेल्या लेखांतील लेखकांचे विचार, मते किंवा त्यांनी केलेले प्रतिपादन त्या त्या कालखंडातील असल्यामुळे असा मजकूर त्या काळाच्या संदर्भातच समजून घेणे आवश्यक आहे. पुनर्मुद्रण करताना आम्ही काही लेखात कोणतेही संदर्भ किंवा तारखा अद्ययावत केलेल्या नाहीत, हे स्पष्ट करत आहोत.– संपादक)*

**वेगवेगळ्या ज्ञानशाखांमधले ज्ञान इंग्रजीतून मराठीत आणताना पारिभाषिक संज्ञा घडवाव्या लागतात. सामाजिक विज्ञाने असोत की भौतिक विज्ञाने, सर्वच विषयांत नवनव्या ज्ञानाची भर पडत असते. हे ज्ञान इंग्रजी भाषेत ज्या वेगाने, सक्षमतेने आणि समर्थपणे येते तो वेग, ती सक्षमता, ती समर्थता हे ज्ञान मराठीत आणण्याच्या दृष्टीने असणे आवश्यक आहे. भाषेचे शिक्षण म्हणजे कवितांचे, कथांचे शिक्षण नव्हे. व्यवहारात भाषा कशी वापरली जात असते, शास्त्रीय लेखनात भाषेचे रूप कसे असते, विविध व्यवसायांत भाषा कशी वापरली जाते, साहित्यकृतींमध्ये भाषेची अभिव्यक्ती कशी असते हे क्रमाक्रमाने शिकायचे.**

# भाषा आणि शिक्षण

**वसंत आबाजी डहाके**

आपली भाषा आपल्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांत कार्य करीत असते. उदा. व्यवहार, शास्त्र, कला. कृषिक्षेत्राची भाषा असते, निरनिराळ्या व्यवसायांची भाषा असते, वर्षानुवर्षे अनेक पिढ्यांचे व्यवहार त्या भाषेच्या आधारे चाललेले असतात. दुसऱ्या समाजाशी, दुसऱ्या संस्कृतीशी संपर्क होतो तेव्हा भाषेत भर पडत असते. ब्रिटिश राजवटीत रेल्वे, पोस्ट, टेलिग्राम, अकाउंट्स इत्यादी क्षेत्रातली भाषा आली. जीवनात नवी क्षेत्रे निर्माण होतात तेव्हा आपल्या भाषेतही परिवर्तन घडत असते. काल आणि परिस्थिती यानुसार भाषेत बदल होतात.

यादवकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन, अव्वल इंग्रजीतील भाषेत बदल होत आजची, आताची भाषा तयार झालेली आहे. या भाषेवर प्राकृत, संस्कृत, पर्शियन, अरेबिक, इंग्रजी, पोर्तुगीज इत्यादी भाषांचे संस्कार झाले. आताच्या भाषेत कॉम्प्युटर, इंटरनेट, मोबाइल फोन अशा नव्या गोष्टी आलेल्या आहेत. नव्या ज्ञानशाखा आलेल्या आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये नवे विचार आलेले आहेत, नव्या संकल्पना आलेल्या आहेत.

व्यवहाराच्या आणि ज्ञानाच्या नवनव्या क्षेत्रांमध्ये आपल्या भाषेने संचार केला पाहिजे असे आपल्याला वाटत असते. त्यासाठी नवी शब्दरूपे घडवली जाणे आवश्यक ठरते. भाषा समृद्ध होत असते. मराठी भाषेचा विचार करताना आपल्याला मराठी बोलींचा विचार करावा लागतो. मराठीच्या अनेक बोली आहेत. वेगवेगळ्या भागांतल्या जनजीवनातील व्यवहारांच्या त्या वाहक आहेत. त्या रोजच्या संभाषणातल्या आहेत, तशाच त्या लग्नादी विधीत वापरल्या जाणाऱ्या आहेत, त्या बोलींमध्ये खेळ, स्वयंपाकाचे पदार्थ, भिन्नभिन्न वनस्पती यासाठीदेखील शब्दभांडार आहेत.

***एक मध्यवर्ती भाषा असावी, ज्ञानाच्या-विचाराच्या क्षेत्रात सर्वांना ती वापरता यावी, यासाठी प्रमाण भाषेचा आग्रह धरला जातो. प्रमाण भाषा हे भाषेचे एक सर्वमान्य असे रूप असते. ते अनेक वर्षांतून घडत आलेले असते. प्रमाण भाषा ही कोणत्याही एका भूभागातल्या, कोणत्या एका गटाची भाषा नसते. कोणत्याही एका भाषक गटाची ती भाषा नसूनही सर्वच भाषक गटांची ती भाषा असते.***




प्रत्येक समाज गटाची स्वत:ची अशी बोली असते. बोली ही अज्ञानी, निरक्षर लोकांची भाषा असते हाही गैरसमजच आहे. बोलींमध्ये अनेक पिढ्यांच्या ज्ञानाचा आणि शहाणपणाचा साठा असतो.

बोलींमुळे प्रमाण भाषा समृद्ध होत असते, त्यामुळे बोली नष्ट होता कामा नये असे भाषेच्या हितचिंतकांना वाटत असते. शेतीमध्ये या वर्षीच्या पिकांमधून पुढच्या वर्षात पेरण्यासाठी बी-बियाणे निघू नयेत अशी बियाणी आलेली आहेत. परंपरेने चालत आलेली उत्कृष्ट बियाणी त्यामुळे नष्ट झालेली आहेत. बोली अशाच नष्ट झाल्या तर आपली प्रमाण भाषा नि:सत्त्व होईल. शिक्षणक्षेत्रात भाषा तीन प्रकारे येते. भाषेचे शिक्षण, साहित्याचे शिक्षण आणि विषयांचे माध्यम.

विषयाचे माध्यम म्हणून एखाद्या भाषेचा स्वीकार करताना मुख्य अडचण पारिभाषिक संज्ञांची असते. आधुनिक काळात सर्वच विषयांतील ज्ञानाचा स्रोत

युरोप व अमेरिका येथील ज्ञानाचा साठा हा आहे. युरोपमध्ये वेगवेगळ्या भाषा आहेत. त्यातले ज्ञान इंग्रजी भाषेत येत असते. आपल्यासाठी इंग्रजी हाच खरा स्रोत आहे. इंग्रजी विद्या म्हणजे इंग्रजी भाषेतील विद्या. इंग्रजी भाषा आणि साहित्य हा वेगळा ज्ञानविषय आहे.

वेगवेगळ्या ज्ञानशाखांमधले ज्ञान इंग्रजीतून मराठीत आणताना पारिभाषिक संज्ञा घडवाव्या लागतात. सामाजिक विज्ञाने असोत की भौतिक विज्ञाने, सर्वच विषयांत नवनव्या ज्ञानाची भर पडत असते. हे ज्ञान इंग्रजी भाषेत ज्या वेगाने, सक्षमतेने आणि समर्थपणे येते तो वेग, ती सक्षमता, ती समर्थता हे ज्ञान मराठीत आणण्याच्या दृष्टीने असणे आवश्यक आहे. या संदर्भात काही उपक्रम सुरू केले होते. पुढे ते मंद झाले, अथवा बंद पडले. सर्व विषयांसाठी मराठी माध्यमाचा आग्रह अवश्य करावा. त्याच वेळी तो विषय मराठीतून शिकण्यासाठी चांगली पाठ्यपुस्तके असली पाहिजेत, इतर पूरक साहित्य मराठीतून असले पाहिजे आणि अधिक पुढचे ज्ञान देणारी पुस्तकेही मराठीतून असली पाहिजेत याचाही आग्रह धरला पाहिजे. अन्यथा पुस्तके नाहीत म्हणून माध्यमाचा विचार करता येत नाही अशी स्थिती कायमच असणार.

भाषेच्या संदर्भात साहित्याचे शिक्षण हाही एक महत्त्वाचा भाग आहे. तेराव्या शतकापासून आजतागायत मराठी साहित्य लिहिले जात आहे. मराठी साहित्याची अतिशय समृद्ध परंपरा आहे. हा वारसा आपल्याला लाभलेला आहे. याची जाणीव मराठी भाषकांना व्हावी, या साहित्याचा त्यांनी सूक्ष्म अभ्यास करावा यासाठी शिक्षणात साहित्याचा अंतर्भाव करण्यात येतो. कविता, कथा, ललित लेख, एकांकिका, कादंबरी, नाटक, निबंध हे रूपबंध कसे विकसित होत गेले. तेराव्या शतकापासून आजपर्यंत भाषेमध्ये कसेकसे बदल होत गेले, जाणिवांचे वेगवेगळे प्रवाह कसे आले. आविष्काराचे वेगवेगळे प्रयोग कसे झाले हे अभ्यासकांना समजावे हा साहित्याच्या शिक्षणामागचा उद्देश असतो. त्याचप्रमाणे साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनभानाचा, मूल्यांचा संस्कार व्हावा हेही उद्दिष्ट असते. साहित्यामुळे भाषेचे संस्कार होतात. शब्दसंपत्ती वाढते, अभिव्यक्तीच्या निरनिराळ्या रीती कळतात. त्यामुळे भाषा शिकवायची तर त्यासाठी कविता, कथा, ललितगद्य इत्यादी प्रकारांतील वेच्यांचा पाठ्यपुस्तकात समावेश केला पाहिजे अशी समजूत आहे. मराठी विषयाची पाठ्यपुस्तके याचा अर्थ निरनिराळ्या लेखकांच्या वेच्यांचा संग्रह असे समीकरण झालेले आहे. मात्र इयत्ता बारावीपर्यंतच भाषेचे-साहित्याचे हे शिक्षण सार्वत्रिक स्वरूपाचे असते. त्यानंतर केवळ बीएला जाणाऱ्या विद्यार्थ्यांना ते खुले असते. वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकविद्या, व्यवस्थापनविद्या इत्यादी ज्ञानशाखांकडे जाणाऱ्यांना साहित्यशिक्षणापासून वंचित ठेवले जाते.






मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

बीएला जाणारे विद्यार्थी साहित्याचा साहित्य : एक कला या दृष्टीने अभ्यास करतात असे मानले तर ते बारावीपर्यंत भाषा शिकत होते की साहित्य शिकत होते की साहित्यकृतींच्या माध्यमातून भाषा शिकत होते? असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचप्रमाणे जीवनभान, मूल्यसंस्कार इत्यादी गोष्टी बारावीपर्यंत ठीक आहेत, पुढे त्यांची काही गरज नाही. विशेषतः वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकविद्या, व्यवस्थापनविद्या इत्यादी ज्ञानशास्त्रांकडे जाणाऱ्यांना तर काही गरजच नाही असे समजायचे काय?

भाषेचे शिक्षण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वभाषेचे शिक्षण आणि परभाषेचे शिक्षण असे दोन विषय आहेत. स्वभाषेचे, उदा.मराठीचे. ही भाषा मुलांना अवगत असते. मुले बोलत असतात. लिहिणे शिकायचे असते. त्याचप्रमाणे टप्प्याटप्प्याने जीवनाच्या विविध क्षेत्रांत वापरली जाणारी भाषा शिकायची असते. स्वभाषेचे शिक्षण येत असतानाच स्वभाषेच्या बोलींचीही ओळख व्हायला हवी, खरेतर विविध बोली बोलणारी मुले प्रमाण भाषा आणि बोली यांत उच्च-नीचतेचा भेदभाव न करता त्या दोन्हींमध्ये सांधा जोडला पाहिजे.

(लोकराज्य फेब्रुवारी–२०१३ मधून पुनर्मुद्रित)

**मराठी भाषा, संस्कृती व इतिहासाच्या संशोधनार्थ प्रकल्प हाती घेणे, मराठी ग्रंथ, चरित्रे, नियतकालिके, शब्दकोश इ. संदर्भ ग्रंथ प्रकाशित करणे, विश्वभाषांतील श्रेष्ठ ग्रंथांची मराठी भाषांतरे प्रकाशित करणे, मराठी साहित्य विकासाच्या नवनवीन ज्ञान–विज्ञान शाखांचा शोध घेणे, महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि साहित्यिक जडणघडणीचा इतिहास लिहिणे आणि इतर वाङ्मयीन उपक्रम राबवून महाराष्ट्रातील साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांना चालना देण्यासाठी राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. मंडळाने स्थापनेपासून या अनुषंगाने मोठे कार्य केले आहे.**

# महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

मराठी भाषा आणि संस्कृती विकासासाठी स्वतंत्र राज्याची मागणी करून महाराष्ट्राच्या जनतेने दीर्घकाळ लढा दिला. त्यानंतर १ मे १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते स्वतंत्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. नामदार यशवंतराव चव्हाण मराठी भाषक राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्र राज्याच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या विकासाचे स्वप्न स्पष्ट करताना मुख्यमंत्री म्हणून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात यशवंतराव चव्हाण म्हणाले होते, ‘महाराष्ट्र ही भूमी अनेक संत, पराक्रमी वीर, त्यागी समाजसुधारक व विद्वान देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रातिनिधिक प्रतिके आहेत. त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अनमोल ठेवा आपल्या हृदयात जपून ठेवणे व त्याचा विकास करणे, हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते. आज आपले मराठी भाषी राज्य स्थापन होत असताना आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ती दिगंत पसरवण्यास आपले शक्तिसर्वस्व देऊ,’ अशी आपल्यापैकी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे. या प्रतिज्ञेनुसार महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर १९६० रोजी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ स्थापन केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली. त्यात सर्वश्री महामहोपाध्याय वा. वि. मिराशी, डॉ. ए. एम. घाटगे, प्राचार्य दिनकर कर्वे, प्रा. गोवर्धन परीख, डॉ. पी. एम. जोशी, प्रा. न. र. फाटक, प्रा. वा. ल. कुलकर्णी प्रभृती मान्यवरांचा समावेश होता.



## ग्रंथ प्रकाशन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने अनेक मौलिक ग्रंथांचे प्रकाशन करून महाराष्ट्राच्या साहित्य विकासात मोठे योगदान दिले आहे. प्रा.अशोक रानडे लिखित ‘स्टॅविन्स्कीचे सांगीतिक सौंदर्यशास्त्र’, डॉ. वा.वि.मिराशी लिखित ‘कालिदास’ ‘शेक्सपिअर परिचय ग्रंथ’, ‘महात्मा फुले समग्र वाङ्मय’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ’, डॉ.सं.ग.मालशे लिखित ‘साहित्य सिद्धान्त’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’ स्वातंत्र्यवीर ‘सावरकरांचे भाषाशुद्धी’ ‘संपूर्ण गडकरी’ (भाग १, २), ‘आगरकर वाङ्मय खंड’, ‘महात्मा गांधी-रवींद्रनाथ ठाकूर’, ‘भारतीय लिपीचे मौलिक एकरूप’, ‘सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय ग्रीक शोकनाट्ये कलेची मूलतत्त्वे, बुद्धलीला सारसंग्रह फारसी-मराठी अनुबंध केशवसुतांची कविता (यशामूल आवृत्ती) सारखे ग्रंथ मराठी सारस्वतातील दीपस्तंभ म्हणून ओळखले जातात.

## कोश प्रकाशन

एकविसावे शतक हे ज्ञान-विज्ञानाच्या विस्फोटाचे शतक म्हणून ओळखले जाते. ज्या भाषेतील संदर्भ वाङ्मय श्रेष्ठ ती समृद्ध ज्ञानभाषा. या दृष्टीने मंडळाने स्थापनेपासूनच विविध प्रकारच्या कोश निर्मितीवर भर दिला आहे. स्वतंत्र मराठी विश्वकोश मंडळ स्थापन करून महाराष्ट्र शासनाने मराठी विश्वकोशाचे अनेक खंड प्रसिद्ध करून हिंदीनंतर विश्वकोश असलेली राज्यभाषा म्हणून गौरव प्राप्त केला आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाने आयुर्वेद, मराठी वाङ्मय, शब्द इ. कोशांची निर्मिती करून कोशवाङ्मय क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

## भाषांतराचे प्रकाशन

देवाणघेवाणीतून संस्कृती विकसित होत असते तशी भाषाही. स्वभाषेत परभाषी वाङ्मय अनुवादित होऊन आले की अनुभव, शैली वैचित्र्य, भाषा प्रयोग इत्यादींच्या कक्षा रुंदावतात. जगभर इंग्रजी भाषेतून स्वभाषेत भाषांतरांची मोठी परंपरा आहे. साहित्य आणि संस्कृती मंडळाने इतिहास, साहित्य, नाटक, कादंबरी, काव्य इ. विविध प्रकारचे अभिजात साहित्य मराठीत भाषांतरित करून घेऊन प्रकाशित केले आहे. न्यायमूर्ती रानडे यांच्या Rise of Maratha Power, आनंद मिश्रा यांच्या Nanasaheb Peshwa and Fight for Freedom, निकालाओ मनुक्कीच्या Storia Do Mogar ची मराठी भाषांतरे प्रकाशित केली आहेत. संस्कृतमधून 'भरतमुनीचे नाट्यशास्त्र', 'मुद्राराक्षस', रशियनमधून सुर्गनेवच्या 'Father and Son' कादंबरीचा अनुवाद, उर्दूमधून जाफर शरीफच्या 'कानून-इ-इस्लाम' चे भाषांतर अशी मोठी परंपरा आहे. मराठी साहित्यात आज इंग्रजी ललित साहित्यकृतींच्या अनुवादाची मोठी लाट आली आहे. या भाषांतर युगाचा पाया साहित्य आणि संस्कृती मंडळाने घातला. आज केवळ इंग्रजी भाषांतरे होतात. या पार्श्वभूमीवर मंडळाचे भाषा वैभव व वैविध्य लक्षात घेण्यासारखे आहे.



## ऐतिहासिक ग्रंथांचे प्रकाशन

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर हे मंडळ स्थापन करण्याच्या अनेक उद्देशांपैकी एक उद्देश संस्कृती व इतिहासाचे संशोधन व प्रकाशन होता. त्यानुसार मंडळाने दुर्मीळ इंग्रजी, उर्दू, इतिहास ग्रंथांची भाषांतरे जशी प्रकाशित केली तसेच मौलिक ग्रंथही प्रकाशित केलेत. 'धर्मशास्त्राचा इतिहास', 'औरंगजेबचा इतिहास', 'दुसरे महायुद्ध', 'सातवाहन आणि पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास व कोरीव लेख', 'सम्राट अकबर' सारखे ग्रंथ या संदर्भात उल्लेखनीय म्हणून सांगता येतील.


मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

## वैज्ञानिक ग्रंथ प्रकाशन

मूलभूत वैज्ञानिक ग्रंथ प्रकाशनाची मराठीतील क्षीण परंपरा लक्षात घेता, साहित्य आणि संस्कृती मंडळाने या संदर्भात घेतलेला पुढाकार व केलेले प्रयत्न अनुकरणीयच म्हटले पाहिजे. 'वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय' सारख्या ग्रंथापासून ते 'वैज्ञानिक पारिभाषिक संज्ञा' स्थापत्यशास्त्र, भूगोल, 'विज्ञान व तंत्रज्ञान'सारखे ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

## नवलेखन प्रोत्साहन

ग्रंथ प्रकाशनाबरोबर हे मंडळ सतत नवलेखक शिबिरे, नवलेखक प्रकाशन, नवलेखन पुरस्कार अशा विविध पद्धतीने मराठी साहित्याची मशागत करीत आले आहे. मंडळाच्या या शिबिरांतून मार्गदर्शन घेतलेले अनुदान व पुरस्कार मिळवणारे कितीतरी साहित्यिक आज प्रथितयश झाले आहेत. भारतातल्या फार कमी राज्यांत अशा प्रकारचे प्रयत्न सातत्याने व जाणीवपूर्वकपणे होताना दिसतात. यशवंतराव चव्हाण व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची यातून दूरदृष्टी दिसून येते. आजवर मंडळाने नवलेखकांची अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत. यावरूनही या योजनेचा आवाका ध्यानी येतो. मंडळ नवलेखक तयार करून त्यांच्या ग्रंथांना अनुदान देऊन थांबत नाही, तर नवलेखकांच्या ग्रंथांना पुरस्कार देऊन प्रोत्साहन देत असते.




## साहित्य संस्थांना अर्थसाहाय्य

महाराष्ट्रात आठ महसूल विभाग असले तरी विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण व पश्चिम, दक्षिण महाराष्ट्र हे त्यांचे पारंपरिक सांस्कृतिक विभाग होत. या विभागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साहित्यिक संस्था आहेत. या संस्थांमार्फत साहित्य संमेलने, व्याख्यानमाला, पुस्तक प्रकाशन, साहित्यिक गौरव, मुखपत्र प्रकाशन, ग्रंथालय संचालन, वाचक मेळावे, चर्चासत्रे इ. उपक्रम आयोजित केले जात असतात. अशा उपक्रमांना प्रोत्साहन व आर्थिक बळ मिळावे म्हणून महाराष्ट्र शासन वा मंडळामार्फत प्रतिवर्षी प्रत्येक संस्थेला अनुदान दिले जाते.

अखिल भारतीय साहित्य महामंडळ, विदर्भ मराठी साहित्य संघ, नागपूर, मराठवाडा, साहित्य परिषद, औरंगाबाद, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, मुंबई मराठी साहित्य संघ, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर, कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी या संस्थांचा यात अंतर्भाव आहे.

## साहित्यिक पुरस्कार व गौरववृत्ती

मराठीतील उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती, श्रेष्ठ प्रकाशक, श्रेष्ठ लेखक व कलावंत गौरववृत्ती अशातून साहित्य व साहित्यिक सन्मानाची परंपरा मंडळाने स्थापनेपासून जपली आहे. प्रतिवर्षी १० हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह स्वरूपात दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारामध्ये महाराष्ट्र शासनाने घसघशीत वाढ जाहीर करून अवघ्या महाराष्ट्राचे साहित्यप्रेम सिद्ध केले आहे. साहित्यिक जीवन गौरवाच्या रूपात अशा स्वरूपाचा पुरस्कार दिला जातो. हा पुरस्कार साहित्यिक व लोक कलावंतांचा गौरव म्हणजे महाराष्ट्राचा सन्मानच होता. आजवर गौरवल्या गेलेल्या या सन्मानसूचीत भाई माधवराव बागल, कवी नारायण सुर्वे, आनंदीबाई शिर्के, कुसुमाग्रज, शाहीर वामनदादा कर्डक, भाऊ पाध्ये, इंदिरा संत, शंकरराव खरात, शांता शेळके, राम नगरकर, कवी ग्रेस, प्रा.म.द.हातकणंगलेकर, यमुनाबाई वाईकर, डॉ. भालचंद्र नेमाडे प्रभृती मान्यवरांचा समावेश आहे.

या उपक्रमांशिवाय मंडळाने सुवर्णमहोत्सवी उपक्रम म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक महोत्सव, जिल्हा ग्रंथ महोत्सव, सीमा भागातील साहित्य संमेलनांना अर्थसाहाय्य, जागतिक मराठी संमेलनास अर्थसाहाय्य, ई-बुक्स, संकेतस्थळ निर्मिती अशा बहुविध उपक्रमांतून कार्यविस्तार केला आहे. महाराष्ट्र राज्याचे नवे सांस्कृतिक धोरण, भाषा संचालनालय, मराठी भाषा विभाग इ. माध्यमातून मराठी भाषा, साहित्य व संस्कृती विकासाचा समन्वित प्रयत्न सुरू केला असून विविध योजना व उपक्रमांचे एकीकरण आरंभिले आहे. त्यातून मराठी राजभाषा वापरात वाढ, शासकीय व न्यायालयीन कामकाजात मराठीचा उपयोग, बृहन्महाराष्ट्रातील मराठी संस्थांना साहाय्य असे धोरण अंगीकारल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांच्या नेतृत्वाखाली (विविध शब्दकोशांच्या सीडी तयार करणे) (बोलीभाषा प्रकल्प), मराठी प्रमाणभाषा कोश, ग्रामीण जीवन कोश, दुर्मीळ ग्रंथ संकेतस्थळांवर प्रकाशित करणे, रंगभूमी, वेषभूषा हस्तकला, इतिहास लेखन, युवक अभ्यासवृत्ती अशा कालसंगत नव्या योजना, उपक्रम, प्रकाशनांचा संकल्प सोडला असून या योजना अमलात येऊन मराठी भाषा, साहित्य, संस्कृती विकासास गती येईल. दुर्मीळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण, महाराष्ट्र शिल्पकार मालिका प्रकाशन, इत्यादींतूनही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र समाज विकास व उत्थानाचे महत्त्वाचे कार्य करत आहे. या मंडळाचे आजवरचे अध्यक्ष व सदस्य यांनी या कार्यात वेळोवेळी केलेल्या साहाय्य व मार्गदर्शनातून हे मंडळ राज्यातील कार्यक्षम व गतिमान मंडळ म्हणून लोकादरास निरंतर पात्र राहिले आहे.

(लोकराज्य फेब्रुवारी २०१३ मधून पुनर्मुद्रित)

**मराठी भाषेच्या संदर्भात बोलायचं झालं तर अव्वल इंग्रजीच्या काळात समाज प्रबोधनाचा एक उपाय म्हणून अनेकांनी संस्कृत आणि इंग्रजी भाषांतून अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचा मराठीत अनुवाद केला. त्यात कालिदास, शेक्सपीयरच्या नाटकांपासून तो अनेक शास्त्रीय ग्रंथांचाही समावेश होता. आज त्यापैकी अनेक पुस्तकांकडे आपले दुर्लक्ष झाले असले तरी मराठी भाषेला आजचे स्वरूप प्राप्त होण्यात या अनुवादकांनी हातभार लावला आहे. मुद्रणकलेचा मराठीला उपयोग होता होता एकोणिसावे शतक उजाडले. त्या पूर्वी ग्रंथनिर्मिती होत असली तरी त्यातील काव्यरूप ग्रंथ फक्त मौखिक परंपरेतून जिवंत राहिले. ग्रंथलेखन अपवादभूतच राहिले. ते काहीसे बखरींतून किंवा काही कागदपत्रांतून. गेल्या दोन शतकांत निरनिराळ्या विषयांतील ग्रंथरचना आणि पत्रकारिता या दोन मार्गांनी आपली भाषा घडत आली आहे.**

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

# भाषेची जडणघडण

**रामदास भटकळ**

मराठी भाषेबद्दल काळजी करण्याची आपल्याला सवय जडली आहे. कोणाला इंग्रजी किंवा हिंदी या भाषांच्या आक्रमणाची भीती वाटते तर काहींना भाषेत बाळबोधपलीकडे शिरणाऱ्या आणि परकीय वाटणाऱ्या शब्दांचे काटे बोचतात. नवीन पिढी दिवसेंदिवस मराठीपेक्षा इंग्रजी माध्यमाकडे वळते आहे हे एक काळजी करण्याचे कारण, तर दैनंदिन व्यवहारातदेखील आपण मातृभाषेचा उपयोग करत नाही, हे दुसरे.

वास्तविक गरज आहे ती काळजी करण्याची नव्हे तर काळजी घेण्याची. तीही पथ्य करण्याची नव्हे तर कवाडे उघडून मराठी भाषा, मराठी साहित्य आणि आपली विचारपद्धती पुष्ट करण्याची. एका बाजूने इंग्रजीचे महत्त्व व्यावहारिक पातळीवर वाढत असले तरी मराठी बोलणाऱ्यांचीच नव्हे तर मराठीतून व्यवहार करणाऱ्यांची संख्याही प्रचंड आहे, हे आपण विसरतो. मराठी वर्तमानपत्रांचे वाचक, मराठी वाहिन्यांचे प्रेक्षक यांची आकडेवारी लक्षात घेतली तर मराठी भाषा अधिक समृद्ध करण्याची शक्यता आहे हे सहज लक्षात येते.

## भाषेची अनेक रूपे

तसे पाहिले तर भाषेची अनेक रूपे आहेत. हावभाव, नेत्रपल्लवी, खाणाखुणा यातूनही माणसे एकमेकांशी संवाद साधू शकतात. परंतु इतर जीवांपासून माणसाने आपले वेगळेपण सिद्ध केले त्यात 'भाषा' या साधनाला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक भाषा बदलत असते. आजवरच्या ज्ञात इतिहासात हजारो भाषा कधी ना कधी वापरात आल्या. आपण आपल्यापुरता विचार करायचा म्हटले तर आपण संस्कृत किंवा गीर्वाण भाषा ही मूळ मानतो. या भाषेलाही वेगवेगळी रूपे पाप्त झाली असणार. आपण संस्कृत नाटके वाचतो तेव्हा लक्षात येते की, ब्राह्मण आणि राजघराण्यातील पुरुष वगळता इतर पात्रे ही प्राकृतात बोलत. या काही गोष्टींचा ओझरता उल्लेख करण्याचे कारण भाषा त्या काळातदेखील आणि काळाच्या ओघात बदलत असते. बदलणे हा भाषेचा एक चिरंतन गुण आहे. जीवन बदलते, समाज बदलतो तशी भाषाही बदलणारच.

मानवाच्या इतिहासात मुद्रणकला त्या मानाने अलीकडे आली. त्यापूर्वी ज्ञानाची किंवा विचारांची देवघेव ही प्रामुख्याने



मौखिक परंपरेने आणि अत्यल्प प्रमाणात होती. साहजिकच भाषेच्या जडणघडणीत संवाद, संभाषण, व्यावहारिक देवघेव यांनाच अधिक महत्त्व प्राप्त झाले. लोकांतील या देवघेवीला लिखित भाषेत निर्बंध नसल्यामुळे त्यांना एक स्वाभाविक वळण लागले. या अभिसरणातून कोणते शब्द, वाक्प्रचार, म्हणी या तरतील आणि रूळतील यावर एखाद्या व्यक्तीचा किंवा संस्थेचा वचक राहत नाही. या मुक्त भाषिक व्यवहारात अशिक्षित समजली जाणारी किंवा अजाण अशी मुलेबाळे किंवा वृद्ध माणसे ही आपापल्या परीने भर घालत असतात. हे सारे लिखित साहित्यात उतरते असे नाही.

पूर्वीच्या काळी काशी-रामेश्वर यात्रेला पायी प्रवास होत असे. त्या वेळी भाषेची अडचण त्यांना भासत नसे का? विचार करता असे लक्षात येते की, भाषा दर दहा कोसांवर बदलते असे म्हणतात. आपल्या परिसरातील माणसांशी बोलता बोलता त्या भूप्रदेशातील जरुरीनुसार भाषेचे स्वरूप बदलते. अशा पद्धतीने धिम्या प्रवासात दुभाषांशिवाय प्रवास जमत असावा. आज आपण दोन टोकाच्या सर्वस्वी भिन्न भाषांत अशा प्रकारचा संवाद करू शकत नाही. भाषांत काळानुसार जसा बदल होतो तसाच प्रदेशानुसार होतो ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. भाषेच्या वृद्धीत बोली भाषांचे विशेष महत्त्व का ते यामुळे लक्षात येईल. भाषा वाढते म्हणजे मुख्यतः तिच्यातील शब्द वाढतात. स्थलकाल भेदांमुळे जे शब्द भाषेत मिसळू पाहतात त्यांचा स्वीकार होतो की नाही, यावर भाषेची समृद्धी अवलंबून असते. अनेक वर्षांपूर्वी श्री. म. माटे यांनी सोप्या शब्दांत या प्रक्रियेचे वर्णन केले आहे. 'शब्द हे मनात उद्भवलेल्या कल्पनांची व गोचर पदार्थांची नावे असतात. हे शब्द जास्त होत जातात तो तो भाषेची समृद्धी होत जाते.'

जोवर भाषेची धाटणी बदलण्याची जबाबदारी प्रामुख्याने सुशिक्षित वर्गावर होती तोवर ही प्रक्रिया काहीशा काव्यात्म रूपकांचा आश्रय घेऊन नवीन शब्द कसे येत किंवा शब्दांचे संदर्भ कसे बदलत याची काही उदाहरणे माट्यांनी दिली आहेत. 'ताणणे', 'हडकणे', 'आवळणे' असे अनेक शब्द त्यांच्या व्यंगार्थासह जाणवत नाहीत. या काहीशा उच्चभ्रू पद्धतीत भाषेला 'फॉसिल पोएट्री' किंवा दैनंदिन व्यवहारात गोठलेले काव्यात्म असे समजावे लागेल.

जसजसे शिक्षण हे समाजाच्या वेगळ्या घटकांत पसरू लागले आणि निरनिराळे व्यावसायिक हे वाङ्मय व्यवहारात गुंतू लागले तसतशी त्या त्या व्यवसायातील शब्दसंपत्ती भाषेत समाविष्ट होऊ लागली. संत तुकारामांप्रमाणे निरनिराळ्या व्यवसायातील संतांची रचना लोक गुणगुणू लागले आणि नरहरी सोनार, सावता माळी, सेना न्हावी अशा व्यावसायिकांचे नेहमीचे शब्द साहित्यात रुळू लागले. 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' या लेखात माट्यांनी ह्या महत्त्वाच्या घटनेकडे लक्ष वेधले. त्यानंतरच्या विसाव्या शतकाच्या दशकांत, आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात या प्रक्रियेला फार मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली.

## भाषेच्या जडणघडणीसाठी दोन सामाजिक बदल

भाषेच्या जडणघडणीच्या दृष्टीने दोन महत्त्वाच्या सामाजिक बदलांकडे लक्ष वेधले पाहिजे. वागण्याची पद्धत असेल किंवा भाषेची जोडणी असेल त्यात काहीएक 'प्रमाण' आणि या प्रमाणाशी न जुळणारे ते चुकीचे असा समज होता तो सर्वच बाबतीत बदलू लागला. पूर्वी 'ऑक्सफर्ड इंग्रजी' ही प्रमाण आणि आपल्या देशात बोलली जाणारी ही 'देशी इंग्रजी' असा समज होता. गेल्या काही दशकांत अमेरिकन, इंडियन, ऑस्ट्रेलियन अशा कितीतरी प्रकारच्या भाषांना स्वतःचे असे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. काही प्रमाणात हेच नीती-अनीती किंवा श्लील-अश्लील याबाबतीतही लागू आहे. एके काळी इंग्रजीतदेखील काही शब्द लिहिले न जाता फुल्यांचा वापर होत असे. 'फोर लेटर वर्ड' अशी त्यांची संभावना होत असे. हे निर्बंध हळूहळू काही वेळा कोर्टात खडाजंगी होऊन सैल होत गेले तेव्हा भाषा अधिक मोकळी आणि अनेक भावना नेमकेपणाने व्यक्त करायला समर्थ होत गेली. एके काळी गांवढळ, ग्राम्य अश्लाघ्य समजले जाणारे शब्द भाषेत सर्रास वापरले गेले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य यांमुळे साहित्यात नवीन अनुभवांबरोबरच नवीन शब्द स्वीकारले गेले.

महाराष्ट्रावर गेल्या काही शतकांत राजकीय आणि सांस्कृतिक आक्रमणे झाली. ही अनेक प्रकारे दुर्भाग्याची गोष्ट आहे. परंतु या आक्रमणातून जर भाषेच्या दृष्टीने श्रेयस्कर गोष्ट झाली असेल तर ती अधिक समृद्ध झाली. राष्ट्रीय पातळीवर उर्दू भाषा किंवा अलीकडच्या काळातील बम्बैया हिंदी हा भाषा परदेशातून आलेल्या भाषा नव्हेत. तर देशी भाषांच्या काही प्रमाणात फारसी, अरेबिक अशा भाषांशी असलेल्या संकरातून निर्माण झालेल्या त्या भाषा आहेत. मराठीत आलेले अनेक शब्द हे परकी समजल्या गेलेल्या भाषांतून स्वीकारले गेले आहेत. आपण रोज 'भारत माता की जय पुकारतो किंवा 'बे एके बे' पाढे म्हणतो. त्यांवरील इतर भाषांचे संस्कार लक्षातसुद्धा येत नाहीत. मराठेशाहीच्या काळात प्रशासकीय कारभार बराचसा फारसी भाषेतून होत असे.

## इंग्रजी शब्दांचा मराठीत शिरकाव

इंग्रजीचा प्रभाव पडल्यानंतर आणि राज्यकारभार इंग्रजीतून व्हायला लागल्यावर अनेक इंग्रजी शब्दांनी मराठीत शिरकाव केला. कोणते शब्द रुळतील आणि कोणते नाही यावर काही नियम नाही. भाषाशुद्धीच्या नावाखाली प्रयत्नपूर्वक तयार केलेले संस्कृतशी नाते सांगणारे शब्द काही रूळले तर काही हास्यास्पद ठरले. कप, फॅन, टेबलसारखे मूळ इंग्रजी शब्द आपलेच झाले पण त्यांचे जोडीदार सॉसर, लाइट, चेअर दूर राहिले. शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न करूनही देयकापेक्षा आचार्य अत्रे यांच्या 'दिनूचे बिल' मधील शब्द सोपा वाटतो. इंग्रजी भाषेतदेखील वनस्पतिशास्त्र, शरीरशास्त्र किंवा कायदा अशा विषयांत मूळ लॅटिन शब्दच टिकले. तेव्हा क्रिकेट, टेनिससारख्या खेळांत किंवा कॉम्प्युटरसारख्या नवीन ज्ञानक्षेत्रात इंग्रजी शब्दांचा भरणा साहजिकच समजावा लागेल.

भाषेच्या जडणघडणीसंबंधी ही पार्श्वभूमी अशासाठी लक्षात घेणे जरुरीचे आहे की, अनुवाद या प्रक्रियेचे भाषिक संदर्भ लक्षात येण्यास मदत होईल. भाषेचे प्रयोजन मुळी आपले विचार इतरांपर्यंत पोहोचवणे. ते करत असताना भाषेचाच अडथळा निर्माण झाला तर तो दूर करण्यासाठी भाषांतर किंवा अनुवाद यांची आवश्यकता भासू लागली. रूपांतर, भावानुवाद अशी निरनिराळी रूपे ह्या प्रक्रियेची आपण पाहतो. संस्कृत भगवद्‌गीता ही प्रत्येकाने समजून घेणे तर आवश्यक. परंतु काळानुसार भाषेचा अडसर. तेव्हा अनेक संतकवींनी ही अडचण दूर करण्याचा आपापल्या पद्धतीने पयत्न केला. 'ज्ञानेश्वरी' किंवा 'गीताई' ही वेगवेगळ्या पातळीवरची उदाहरणे आपल्या नित्यपरिचयाची आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपला परिचय हा प्रामुख्याने इंग्रजी भाषेशी होता. इंग्रजी भाषेने युरोपीय आणि त्यांच्या साम्राज्यातील अनेक भाषांशी संपर्क ठेवून त्या भाषांतील पुस्तके इंग्रजी अनुवादांतून आपल्याला उपलब्ध करून दिली. फ्रेंच, पोर्तुगीज अशा काही भाषांशी राजकीय कारणांसाठी आपला अल्पसा परिचय होता. परंतु इतर अनेक मराठी भाषांतील श्रेष्ठ दर्जाच्या साहित्याशी आपला परिचय झाला तो इंग्रजीतूनच. ग्रीक किंवा रशियन भाषांतील उत्तमोत्तम पुस्तकांचा या मार्गाने आपला परिचय झाला नसता तर आपण अडाणीच राहिलो असतो.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

मल्याळम अशा भाषांतून जर साहित्य भेट भाषांतरांद्वारे मराठीत आले तर कितीतरी नवीन दिशांनी भाषा विस्तार पावेल. आपल्या भाषाभगिनींत साधर्म्य आहे तसेच भेदही महत्त्वाचे आहेत. काही शब्दांचे अर्थ निरनिराळ्या भाषांत वेगळे आहेत. संशोधन, शिक्षा अशा शब्दांचे मराठीत आणि हिंदीत अर्थ वेगळे आहेत. सत्कारचा बंगाली अर्थ उत्तरक्रिया असे मामा वरेरकर नेहमी सांगायचे.

अनुवादांमुळे भाषेला व्यापक स्वरूप जसे येते तसे त्यातील शब्दांचा सूक्ष्म विचार करावा लागतो. काही शब्दांना निरनिराळे अर्थ असतात. संदर्भानुसार अर्थ समजून घ्यावा लागतो. इंग्रजीतील 'कॅटरॅक्ट' या शब्दाचा एक अर्थ मोतिबिंदू, तर दुसरा धबधबा यांत गल्लत होता कामा नये. उलट मराठीतील संस्कृतीला एक पर्याय 'कल्चर' तर दुसरा 'सिव्हिलायझेशन' अशी अगणित उदाहरणे देता येतील.

## अनुवादाचे महत्त्व

दुर्दैवाची गोष्ट अशी की परदेशीच नव्हे, तर आपल्याच देशातील इतर प्रदेशांतील भाषांशीसुद्धा आपला परिचय हा बऱ्याच वेळा त्यांच्या इंग्रजी अनुवादातून होतो. अनुवादाचे महत्त्व जाणता अजाणता आपण स्वीकारतो. परंतु त्यासाठी विशेष प्रयत्न करताना दिसत नाही. गेल्या दहाएक वर्षांत मराठीत अनुवादित साहित्याची लाट आली आहे. तीसुद्धा मुख्यतः इंग्रजीतून केलेल्या अनुवादांची. वास्तविक भाषा समृद्ध होण्याच्या दृष्टीने भारतातील प्रत्येक भाषेशी भेट देवघेव शक्य झाली पाहिजे. अनुवादामुळे निरनिराळ्या प्रदेशांतील निरनिराळ्या संस्कृतीचे संदर्भ असलेले साहित्य जवळ येताना ते भाषेत नवीन संकल्पना, विचार व्यक्त करण्यासाठी नवीन शब्दही घेऊन येते. आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्ध, समाज व्यवस्था, वांशिक संकट अशा अनेक अनुभवांचा परिचय आपल्याला अनुवादातूनच होतो आणि ते अपरिचित अनुभव व्यक्त करण्यासाठी आपली भाषा वळवावी लागते. हेच इतर भारतीय भाषांच्या बाबतीतही लागू आहे. मराठी प्रदेशातील निरनिराळ्या समाजांविषयीचे मूळ लेखन त्या प्रादेशिक किंवा ग्रामीण भाषेत असेल तर ते समजून घ्यायला वाचकांना वेळ लागला. वऱ्हाडी, कोकणी, खानदेशी तावडी अशा भाषांतील लेखन काही काळ परके वाटले तरी त्यामुळे भाषेला अधिक व्यापक स्वरूप आले. बंगाली, पंजाबी,



## अनुवादामुळे ज्ञानाच्या क्षेत्रांत होणारे फायदे

अनुवादामुळे ज्ञानाच्या क्षेत्रांत होणारे फायदे तर आहेतच. मराठी किंवा इतर कोणतीही प्रादेशिक भाषा जर ज्ञानभाषा व्हायला हवी असेल तर निरनिराळ्या क्षेत्रात स्वतंत्र साहित्यनिर्मिती जशी हवी तसेच इतर भाषांतील सृजनशील साहित्य आणि ज्ञान हे शक्यतो लवकर त्या भाषेत येणे आवश्यक आहे. साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी हे कार्य हाती घेतले. मध्यंतरी इतर भाषांचा, विशेषतः त्या भाषांतील शब्दांचा संपर्क निषिद्ध मानून आपापल्या भाषेला संकुचित रूप देण्याचे प्रयत्न होत असत. आजकाल निरनिराळ्या माध्यमांचा प्रभाव, जागतिक संपर्क या क्षेत्रांतील सुविधा यामुळे हे अडसर दूर होत आहेत. पण या कृत्रिम उपायांनी नव्हे तर स्वेच्छेने इतर भाषांतील साहित्याकडे ममत्वाने पाहून त्यातील विचार, शब्दसंपत्ती, निवेदन पद्धती ही सारी आत्मसात करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर लगेच या प्रकियेला प्राधान्य दिले असते तर एव्हाना प्रत्येक दोन भाषांत सेतू बांधणारे अनेक अनुवादक निर्माण झाले असते आणि आपण अधिक समृद्ध देश पाहिला असता.

(लोकराज्य फेब्रुवारी-२०१४ मधून पुनर्मुद्रित)

**कोणतीही भाषा एका रात्रीत जन्माला येत नाही. मानवसमूहांच्या हजारो पिढ्या त्यासाठी खपलेल्या असतात. आधी माणूस बोलण्याची भाषा शोधतो. अनेक स्वर, व्यंजनं शोधतो. ती स्वर, व्यंजनं बोलीभाषेत तयार होत राहतात. पिढ्यान्‌पिढ्यांचा प्रवास करत बोलीतलेच हवेतले आकार घेत राहतात. त्यांचे नेमके अर्थ प्रचलित होण्यासाठी अनेक पिढ्या खपतात. त्या अर्थाचे शब्द तयार होऊन ते रुजतात. पुढच्या पिढ्या स्वर, व्यंजनांचा लेखी आकार रचण्यासाठी खपतात. त्यानंतरच्या पिढ्या लेखी शब्दांची रचना करतात. लेखी शब्द रुळण्यासाठी काही पिढ्या राबतात. अशा रीतीने भाषा आकाराला येते. मराठीसारखी भाषा रचायला अजूनच मेहनत लागते. ही भाषा इंग्रजीसारखी नुसती अक्षरांची नाही, तर या भाषेत शब्द नेमकेपणाने उच्चारले जाणे आणि दुसऱ्यापर्यंत पोहोचवता येणं यासाठी काना, मात्रा, उकार, वेलांट्या, विसर्ग, अवतरण चिन्हं, खुणा, संकेत यांचा अवाढव्य खेळ आहे. त्यासाठी आपल्या पूर्वजांच्या कितीतरी पिढ्या राबल्या असतील. त्याचं ते राबणं वाया जाऊ द्यायचं का?**

# भाषेचा खेळ आणि घोळ

**राजन खान**

ज्या भाषेमुळं माणसाचं मन चालतं, मेंदू चालतो आणि पोट चालतं, ती भाषा माणसाला आपली वाटते. त्यात मन, मेंदू चालण्यासाठी पुन्हा आधी पोट चालणं आवश्यक असतं. म्हणजे मुख्यतः माणसाचं पोट भरू शकणारीच भाषा, ही त्याची आणि त्याच्या समाजाची भाषा असते. कोणत्याही प्रदेशातल्या समाजाचं पोटाचं मुख्य साधन असतं ते, तिथली शेती. तिथली कृषिव्यवस्था. कोणत्याही प्रदेशातल्या शेतीची जी भाषा असेल, तीच तिथल्या समाजाची भाषा असते. महाराष्ट्र प्रदेशाची भाषा मराठी आहे, कारण ती इथल्या शेतीची, शेतीवर आधारलेल्या तमाम उद्यमांची भाषा आहे. कोणत्याही प्रदेशातील शेतीच ठरवते, आपल्या प्रदेशातली भाषा जगू द्यायची, वाढू द्यायची की मरू द्यायची ते. शेती तरली, जगली तरच त्या प्रदेशाची भाषाही जगते, तरते हेच खरं कोणत्याही भाषेचं ऐतिहासिक सत्य असतं. शेती खपली की त्या प्रदेशाची भाषाही मरते.




आणखी एक सत्य सांगायचं तर, आजचा जगभरातला मानवी समाज हा मुख्यतः शेतीवरच जगू शकतो. शेती हेच माणसाच्या जगण्याचं मुख्य साधन आहे न् ते तसंच राहणार आहे. कारखानदारी आणि शेतीशिवायचे उद्योगधंदे हा माणसाच्या जगण्याचा दुय्यम मार्ग आहे न् तो भाषा टिकवणं, मारणं किंवा भाषेत फार मोठ्या उलथापालथी करणं असे प्रकार करू शकत नाही. ज्या प्रदेशातली शेती मरते त्या प्रदेशाची भाषाही मरते. आपण जगातल्या लुप्त झालेल्या भाषांचा इतिहास तपासून पाहिला तर हेच सत्य आढळून येईल. भारत हा शेतीवरच जगणारा देश आहे आणि शेसव्वाशे वर्षांपूर्वीपर्यंत या देशातल्या माणसांच्या जगण्याचा मुख्य आधार शेती हाच होता. आज आपण जी भीती बाळगतो आहोत, मराठी भाषा मरेल की काय, त्या भीतीलाही सुरुवात शेसव्वाशे वर्षांपूर्वी झालेली आहे. मराठी साहित्याची संमेलनं, मेळावे, आधिवेशनं घेण्याची पद्धतही नेमकी शेसव्वाशे वर्षांपूर्वीच सुरू झाली आणि आजवर या संमेलनांचे जेवढे अध्यक्ष झाले, त्यातल्या बहुतेकांनी मराठी भाषा वाचवली पाहिजे, टिकवली पाहिजे असा सूर लावलेला आपल्याला दिसून येतो. त्याआधीच्या काळात महाराष्ट्रात किंवा मराठी भाषिक प्रांतात अरबी, फार्सी, उर्दू, हिंदू या राजकीय भाषा नांदून गेल्या. त्यांचा हजार-पंधराशे वर्षांचा काळ गेला, पण त्या काळात कुणीही मराठी भाषा मरतेय, तिला वाचवलं पाहिजे असा हुंकारही काढलेला आढळत नाही. याचं कारण असं की, त्या काळात या प्रांताचा जगण्याचा मुख्य आणि पहिला आधार शेती हाच होता न उद्योगांची क्रांती तोवर झालेली नव्हती. साक्षरांचं प्रमाण तेव्हा कमी असेल पण भाषा भक्कम होती. मग इंग्रज आले. त्यांच्या नख्या या देशात नीट रोवून होईपर्यंतही मराठी भाषेला काही डग नव्हता. पण त्यांनी नख्या रोवल्या आणि इथं कारखानदारी आणली, कारकुनांच्या न् नोकरदारांच्या फौजा तयार होतील अशी शिक्षणपद्धती आणली. हळूहळू इथल्या समाजाला शेतीचा कंटाळा करण्याची सवय लागत गेली. त्याच वेळेपासून मराठी भाषा वाचवली पाहिजे अशी हाकाटी सुरू झाली. इंग्रज आल्यानंतर आणि त्यांनी सुधारणेच्या नावाखाली आणलेल्या गोष्टींनंतर मराठी प्रांतातली शेती मोडत निघाली. शेतीचा विकास होण्याऐवजी मागास होत निघाली. मग इंग्रज गेले आणि आपल्या लोकांच्या हातात सत्ता आली, मग तर शेती

आणखीनच खालावत निघाली. उद्योगधंदे, नोकऱ्याचाकऱ्या, राजकीय व्यवस्था, देवधर्म यांना बहर आला. माणसं जमिनीत राबण्याऐवजी कामगार, नोकरदार, शारीरिक कष्टांची तोशिस नसलेली राजकारणी आणि देवाधर्मांच्या नावानं फुकट जगणारी झाली आणि जगण्याचं मुख्य साधन असलेली शेती दुय्यम झाली. गेल्या शेसव्वाशे वर्षाच्या काळात तिथं अधिकाधिक वाटोळं झालं आणि जी भाषा टिकवून धरते, सकस करते, तीही खालावत गेली. महाराष्ट्रातली शेती आणि तिच्यातलं मनुष्यबळ जसजसं संपत जाईल, तसतशी मराठी भाषाही संपत जाईल.

## मराठी भाषा संपण्याचं दुःख बाळगावं का?

या प्रश्नाला आजच्या घडीला दोन्ही उत्तरं देता येतील. बाळगावं आणि बाळगू नयेसुद्धा. बाळगू नये, यासाठी की, कसं का होईना माणसं जगतायंत ना, मग त्यात भाषेची फिकीर कशाला करायची? भाषा मरणारच असेल तर मरेल. जी भाषा माणसांना जगवू शकत नसेल. ती मेली काय न् जगली काय माणसं जगवण्याचा मराठी भाषेचा दम हळूहळू संपत चाललाय, हे तर आपण पाहतोच आहोत. माणसांची पोट भरायला, मन चालवायला, मेंदु घालवायला मराठी भाषा कमकुवत पडू लागली आहे. तर मग ती जगणार कशी ? तर मग खुशाल तिला मरू द्यावं. तिची काळजी करू नये.

माणसं जगणं महत्त्वाचं, भाषा नव्हे. माणसांच्या पिढ्या नांदणं महत्त्वाचं त्या कोणत्या भाषेच्या जिवावर नांदतायंत हे महत्त्वाचं नाही. पण थोड भावनाशील होऊन बोलायचं, तर, मराठी भाषा मरणं ही माझ्या पिढीला तरी दुःख वाटावं अशीच बाब आहे.

## भाषेपासून फारकत

कोणताही समाज स्वतःच्या भाषेपासून मुद्दाम फारकत घेतो असं मला वाटत नाही. एका भाषेतली त्याची जगण्याची व्यवस्था बिघडली. समाजाच्या मनाची, मेंदूची न् पोटाची व्यवहारी गणितं बिघडू लागली की समाज त्या भाषेचा तिटकारा करायला लागतो न् जी भाषा पोटाचा आधार होईल तिकडं वळायला लागतो. कुठल्याही समाजाच्या भाषेची ठेकेदारी ही त्या समाजाच्या राजसत्तेकडं किंवा साहित्याकडं नसते. भाषेची ठेकेदारी ही त्या समाजाकडूच असते. साहित्य त्या समाजाकडूनच ती भाषा उचलतं. राजसत्ता जर परकी असेल तर ती त्या समाजाचीच भाषा घेईल याची खात्री नसते, पण राजसत्ता त्याच समाजातून निर्माण झाली असेल तर आपसूकच त्याच समाजाची भाषा अंगीकारते. भारतावर रोमन, अरबी, फार्सी या भाषेतल्या राजसत्तांनी दीर्घ काळ राज्य केलं. पण त्यांच्या काळात भारतातल्या प्रादेशिक भाषा मेल्याचं किंवा खचल्याचं अजिबात दिसत नाही. उलट अरबी, फार्सी राजसत्तांच्या काळात भारतातल्या प्रादेशिक वाङ्मयीन परंपरांना सुरुवात झाल्याचं न् बहराचंच चित्र दिसतं. प्रादेशिक भाषांना नेमका आकारउकार आल्याचंच दिसून येतं. दुसऱ्या बाजूला अरबी, फार्सी आणि भारतातल्या प्रादेशिक भाषा यांच्या समन्वयातून संपूर्ण देशात पसरलेली एकमेव आणि सुंदर अशी उर्दू नावाची नवीनच भाषा तयार झाल्याचं दिसून येतं. याच गेल्या हजारभर वर्षात मराठी कशी कशी वळणं घेत तयार होत आली याचे लेखी पुरावेसुद्धा मिळतात. त्या राजसत्तांच्या काळात भारतातल्या प्रदेशांचा जगण्याचा, पोट भरण्याचा मुख्य उद्योग शेती आणि शेतीशी संबंधित असाच राहिला न् शेतीमुळेच प्रादेशिक भाषा टिकून राहिल्या, विकसित होत राहिल्या. इंग्रजांच्या काळात मात्र भारतातल्या भाषांवर परिणाम होऊ लागला. मराठीही त्यास अपवाद राहिली नाही. इंग्रजांनी अनेक सुधारणा आणल्या असं म्हटलं जातं. (ते किती खरं कुणास ठाऊक. कारण इंग्रज नसते तर कधी ना कधी त्या सुधारणा भारतात आल्याच असत्या.) त्या सुधारणांनी स्वतःचीच भाषा इथं आणली. सुधारणा काही भाषांतरित होऊन भारतातल्या प्रदेशांमध्ये आल्या नाही. सुधारणांनी नोकऱ्याचाकऱ्या वाढल्या न् त्यांची मुख्य भाषा इंग्रजी राहिली. माणसे शेती सोडून त्या सुधारणांमध्ये सामील होऊ लागले मग आपोआपच इथल्या समाजाचंही भाषांतर होऊ लागले. महत्त्वाचे म्हणजे या सुधारणांबरोबर शेतीही टिकवून धरली पाहिजे, विकसित केली पाहिजे याकडे समाज आणि राजसत्ता यांचं दुर्लक्ष होत गेलं भाषेचा बाटगेपणा वाढत निघाला. समाज शेतीत उखडला जाऊ लागला. त्यामुळे मातीची मूळ भाषाही खिळखिळी होऊ लागली.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

यात साहित्यसृष्टीच्या बाबतीतली एक गमतीची गोष्ट मला सापडली. १९४७ साली इंग्रज या देशाला पिळण्यासारखं काही नाही राहिलं हे लक्षात आल्यावर निघून गेले. त्याच्या ६०-७० वर्ष आधीपासूनच मराठी साहित्यसृष्टीत संमेलनं परिषदा, मेळावे, अधिवेशन अशा गोष्टी सुरू झाल्या. साहित्याच्या संस्थासुद्धा निघत चालल्या. या सर्वांचे अध्यक्ष आणि वक्ते मराठी भाषा वाचवली पाहिजे असं सांगू लागले. ती चांगली गोष्ट झाली. पण गेल्या शतकभरात मराठीत जी पुस्तकं आली ती पाहिल्यावर एक गंमत लक्षात येते की, इंग्रज असेपर्यंत मराठीतले लेखक मराठी पुस्तकांमध्ये फक्त मराठी भाषेचा वापर करत पण इंग्रज इथून गेले आणि असंख्य मराठी लेखकांमध्ये इंग्रजीचा कली संचारला. मराठी लेखक आपल्या पुस्तकांमध्ये इंग्रजी भाषेचा मुक्तहस्तानं वापर करू लागले. इंग्रजी शब्दांची तर भरमारच, पण परिच्छेदच्या परिच्छेद इंग्रजीत, तेही पुन्हा इंग्रजी परिच्छेद देवनागरी मराठीत नाही, तर सरळ सरळ इंग्रजी लिपीतच. इंग्रज जाऊन जसजसा काळ उलटू लागला, तसतसे मराठीत इंग्रजीचा हा रोग जास्तच बळावत चालला. गेल्या २५-३० वर्षांत तर मराठी लेखक म्हणून मिरवणाऱ्यांमध्ये अशा लोकांचा भरणा विपुल झालेला दिसून येतो. आज अवस्था अशी आहे की, फक्त मराठी भाषा वापरून मराठी

भारतावर रोमन, अरबी, फार्सी या भाषेतल्या राजसत्तांनी दीर्घ काळ राज्य केले. त्यांच्या काळात भारतातल्या प्रादेशिक वाङ्मयीन परंपरांना सुरुवात झाली. प्रादेशिक भाषांना नेमका आकारउकार देऊ लागला. दुसऱ्या बाजूला अरबी, फार्सी आणि भारतातल्या प्रादेशिक भाषा यांच्या समन्वयातून संपूर्ण देशात पसरलेली एकमेव आणि सुंदर अशी उर्दू नावाची नवीन भाषा तयार झाली. याच कालावधीत मराठी कशी कशी वळणं येत तयार झाली याचे लेखी पुरावेसुद्धा मिळतात. त्या राजसत्तांच्या काळात भारतातल्या प्रदेशांचा जगण्याचा, मुख्य उद्योग शेती आणि शेतीधी संबंधित राहिला आणि शेतीमुळेच प्रादेशिक भाषा टिकल्या आणि विकसित झाल्या.

पुस्तकं लिहिणारा लेखक सापडणं वाळूत मोहरीचा दाणा सापडण्याइतकं दुर्मीळ आहे. अशी मंडळी आपल्या मराठी अधिक इंग्रजी अशा संकरित भाषेच असं समर्थन करू लागली आहेत की, असं लिहिणं ही सध्याच्या काळाची गरज आहे. जेव्हा आपलं अपयश झाकायची पाळी येते, तेव्हा त्याचा दोष काळाला द्यायची जुनीच प्रथा आहे. हे सर्व लेखक त्या प्रथेचंच उत्पादन आहेत.

## पुस्तकांमधूनच भाषा सुरक्षित

कोणतीही भाषा सुरक्षित राहते, रुजते, वाढते, विकसित होत जाते ती तिच्यातल्या पुस्तकांमधूनच. पुस्तकं जेव्हा स्वतःच्या भाषेशी बेइमानी करू लागतात, तेव्हा त्या भाषेची संस्कृती गोत्यात येते. गेल्या ५०-६० वर्षांत अशा बेइमान पुस्तकांचं रान मराठी प्रांतात अफाट वाढलेलं आहे. हेच लोक मराठी भाषेचे मारेकरी आहेत. लेखकांवर आणि मराठी साहित्यावर जबाबदारी असते ती. आजकाल महाराष्ट्रात मराठी भाषेवर इंग्रजी आणि हिंदी भाषेच आपली भाषा टिकवून धरण्याची आणि तिची वृद्धी करण्याची. भाषिक आणि बौद्धिक बाजून समाजाचं नेतृत्व करण्याची. पण ही गोष्ट आता विसरली गेली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात तर मराठी वाचवण्याचा विषय हमखास चर्चिला जातो. तिथे लेखक मराठी भाषेबद्दलची भाषणं करतात. मात्र प्रत्यक्षात मराठी लेखक, प्रकाशक संपादक मराठी भाषेबद्दल दुतोंडी वागतात असं दिसून येतं. शेती उखडल्यामुळे मराठी भाषा उखडली जातेय असं आपण म्हणालो, तसंच आजच्या मराठी साहित्यसृष्टीमुळेसुद्धा मराठी भाषा जातेय, हे उघडपणे दिसतं.

## भाषेबद्दल वृथा बडबड

आपण भाषेबद्दल वृथा बडबड करणारे लोक आहोत. प्रत्यक्षात भाषेबद्दल आपण कृतिशून्य लोक आहोत, हे गेल्या ५० वर्षांत सिद्ध झालं आहे. जी भाषा पोट भरू शकते तीच टिकते आणि तीच माणसाचं मन आणि मेंदू चालवते हे नैसर्गिक सत्य असूनही आपण त्या दृष्टीनं आजवर काहीच केलं नाही. आपण काळ आणि भाषेवरच तिचा भार सोपवून आळशी झालो आहोत. भाषेबद्दल निव्वळ गळा काढून रडत बसतो. पोट भरायचं ज्ञान माणसाला मराठी भाषेतून देण्याची तजवीज गेल्या ५० वर्षांत केली नाही. ते काही फार अवघड काम होतं, त्यासाठीची बुद्धी, पैसा आपल्याकडं नव्हता असं अजिबात नाही. पण आपल्याला प्रत्यक्ष काम करण्यापेक्षा गप्पा मारण्याचा छंद आहे. आज आपल्या शेतीची भाषा नुसती मराठी राहिलेली नाही. कारखानदारी, व्यापारउदीम, उद्योगधंदे यांची भाषा मराठी राहिलेली नाही. जगण्याचं ज्ञान आणि कौशल्य शिकवणाऱ्या जेवढ्या ज्ञानशाखा आहेत, त्यांची भाषा तर अजिबातच मराठी राहिलेली नाही. कला व्यवस्थापन, वास्तुरचना, वैद्यकीय, अभियांत्रिकी, कायदा, संगणक, अवकाश, विज्ञान अशा कोणत्याही ज्ञानशाखेची भाषा मराठी नाहीच. ते सर्व ज्ञान आपण गेल्या पन्नास वर्षांत मराठीत आणू शकलो नसतो का? का आणलं नाही? आजतरी आपण त्यासाठी काय करतो आहोत? काहीच नाही. नुसती भाषामंडळं तयार करून आणि साहित्य संमेलनं घेऊन काहीच होणार नाही. जगाचं आणि जगण्याचं सगळं नवजुनं ज्ञान मराठीत आणल्याशिवाय आणि त्या ज्ञानावर माणसाच्या पोटाची, मनाची मेंदूची सोय झाल्याशिवाय मराठी भाषा अजिबात टिकणार नाही.

## मराठी भाषेवर आक्रमण

आजकाल महाराष्ट्रात मराठी भाषेवर इंग्रजी आणि हिंदी भाषेचं आक्रमण चालू आहे असं ओरडायचाही एक रिवाज पडून गेलाय. त्यातल्या हिंदी भाषेच्या आक्रमणाचा मुद्दा मला द्वेषमूलक वाटतो. इंग्रजीचा द्वेष करणारे न् तिचं मराठीवर आक्रमण चालू आहे असं म्हणणारे लोकही मला योग्य वाटत नाहीत. ऐतिहासिक सत्य असं आहे की कोणतीही एक भाषा, कोणत्याही दुसऱ्या भाषेवर कधीच आक्रमण करत नाही. आक्रमण करणं ही कोणत्याही भाषेची प्रवृत्ती नसते. तर एखाद्या भाषेचे अनुयायी स्वतःच्या भाषेवरची निष्ठा सोडून दुसऱ्या भाषेशी म्होतूर लावतात, तेव्हाच ती दुसरी भाषा त्या समाजात आणि प्रांतात पाझरत जाते. इंग्रजी भाषेचं तसंच झालंय. तिनं कधीही मराठीवर चढाई केलेली नाही. तर मराठी भाषेतल्याच लोकांनी इंग्रजीचा अंगीकार केलाय. या लोकांमुळंच मराठी भाषेचा जीव घुसमटू लागलेला आहे. आज कोणताही इंग्रज आपल्याकडं येऊन इंग्रजीचे गोडवे गात नाही, तर इथलेच असंख्य लोक तिचे गोडवे गातात, मराठीची भीती घालतात आणि इंग्रजीचा बागुलबुवा करतात हे सत्य आहे. या लोकांनी मराठीला ज्ञानभाषा होऊ देण्यापासून रोखलेलं आहे. त्यामुळे इंग्रजी किंवा हिंदीच्या नावानं खडे फोडण्यापेक्षा मराठीतल्याच या लोकांचा बंदोबस्त कसा करता येईल, मराठी भाषा ज्ञानभाषा कशी होईल, यासाठी प्रत्यक्ष राबणं आणि सर्वांनी मिळून राबणं मला आवश्यक वाटतं. पण ती आशा आता मला कमीच वाटते. जे लोक स्वतःच्या स्वाक्षऱ्यासुद्धा इंग्रजीत करतात आणि आपल्या घरांची, घरांच्या वसाहतींची नावंसुद्धा इंग्रजी ठेवतात आणि ज्यांना आपणच इतरांपेक्षा शहाणे आणि सुधारलेले आहोत असं दाखवण्यासाठी मराठी लेखनात इंग्रजी पेरावंसं वाटतं, अशा लोकांकडून ती आशा बाळगणं व्यर्थच आहे.

(लोकराज्य फेब्रुवारी–२०१४ मधून पुनर्मुद्रित)

**जगातील कित्येक भाषांचे (मराठीही) शब्द पोटात घेऊन आधुनिक इंग्रजी समृद्ध झाली. मात्र तसे करताना इंग्रजीने आपला स्वभाव, व्याकरण क्रियापदे, विशेषणे कायम ठेवली. हिंदी, बंगाली, फ्रेंच, जर्मन सर्वच भाषा आपली वैशिष्ट्ये राखून संक्रमणाला स्वीकारतात. मराठीबद्दल खंत ही की मराठी लोक मातृभाषेचा स्वभाव, तिची सुंदर विशेषणे, क्रियाविशेषणे, व्याकरण, वाक्प्रचार एवढेच तर साधीसुधी क्रियापदे यांनाही तिलांजली द्यायला निघाले आहेत. प्रवाही, जिवंत भाषा बदलत असतातच. मात्र बदलताना आपले संचित व वैशिष्ट्ये कटाक्षाने जोपासतात. दुर्दैवाने मराठी भाषक अंमळ बेफिकीर या आणि डिजिटल युगाच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी मराठीतील जागृत समाज गट, साहित्य व भाषेला वाहिलेल्या संघटना, विद्यापीठांचे मराठी विभाग व शासन यांच्या समन्वयाने जे संघटित प्रयत्न व्हायला हवेत तसे होताना दिसत नाहीत.**

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

# मराठी बोलती ठेवली पाहिजे

**अरुण साधू**

मराठी भाषा उर्जितावस्थेस येत असल्याचे उत्साही वातावरण असतांना ती मरणासन्न असल्याचे सूर निघत असतात त्याला कारण आहे. आज ग्रांथिक मराठीचे सौष्ठव आणि विषयांची उपलब्धी वाढते आहे. पण वापरातील वाचिक-लिखित मराठी दिवसेंदिवस खंगते आहे. मराठी माणसाचे मातृभाषेवर अपार प्रेम आहे. पण भाषेच्या बोलघेवड्या भक्तीने भागत नाही. कोशवाङ्मयाचे ग्रंथ छापून, साहित्य संमेलनांमध्ये आरत्या ओवाळीत भाषा वृद्धिंगत होते असे नाही. भाषा मूलतः संवाद साधण्यासाठी, बोलण्यासाठी निर्माण होते. व्यावहारिक क्रिया व मूर्त-अमूर्त संकल्पना यांचे ध्वनीत रूपांतर करणे ही मनुष्यप्राण्याच्या बौद्धिक विकासातील मोठी प्रगती होती. हे प्रातिनिधिक ध्वनी चिन्हांकित करून लिपिबद्ध करणे ही त्यापुढची क्रांतिकारक झेप. तेव्हा, मौखिक आदानप्रदान ही कोणत्याही भाषेची पायाभूत प्राथमिक पायरी आहे, हे विसरता कामा नये. संस्कृतसारखी समृद्ध, प्रगल्भ, कोणत्याही विषयाला विचारांना आविष्कृत करू शकणारी, डझनावारी आधुनिक भाषांना सामर्थ्य देण्याची क्षमता असणारी अभिजात भाषा मौखिक माध्यमातूनच विकास पावली. लोकांच्या बोलण्यातून गेल्याने ती ग्रंथ विद्वतचर्चा, कर्मकांडे यांच्यात संकोचली. भाषेचा प्रमुख जीवनरस लोकांच्या वापरावर अवलंबून असतो. या बाजारात कचेऱ्यात, घरात माणसे कशी बोलतात, यावर भाषेचा टिकाऊपणा, सामर्थ्य भवितव्य, सौंदर्य अवलंबून असते. तेथेच मराठी माणूस कच खातो.

## वरवर उत्साही परिस्थिती

तशी वरवर उत्साही परिस्थिती दिसते. मराठीत १२५ च्यावर दैनिके, पाचशेवर नियतकालिके, अगणित दिवाळी अंक, वर्षभरात शैक्षणिक पाठ्यपुस्तके धरून दहा हजार पुस्तके प्रसिद्ध होतात. गावपातळीपासून, जातीय, अ.भा. व वैश्विक साहित्य संमेलने, वर्षाला तीन-साडेतीनशे संमेलनांची झुंबड, शासकीय, कामगार, शालेय, महाविद्यालयीन नाट्यस्पर्धा अशी हौशी नाटकांची धमाल. रोजची व्यावसायिक नाटके... नाट्यप्रेमी कोलकत्यातदेखील रोज व्यावसायिक प्रयोग होत नाहीत. फार काय एवढ्या प्रचंड संख्येन हौशी नाट्यप्रयोग जगात कोणत्याच भाषेत होत नाहीत. वर्षाला २०-२२ नवे चित्रपट! तपापूर्वी सायंकाळी मराठी मंडळी चित्रवाणीवर हिंदी मालिकांत गर्क दिसायची. आता मराठी मालिकांशिवाय बात नाही. सध्या डझनभर मराठी चित्रवाहिन्या आहेत. संख्या वाढते आहे. मराठीतील कोशवाङ्मय समृद्ध होत आहे. शिवाय अमृताशी स्पर्धा करणारी आपली प्रिय मराठी बोलणांची संख्या आहे नऊ कोटींवर जगात दहावा क्रमांक अशी तुफान घोडदौड असताना भवितव्याची चिंता कशाला?

## भाषेचा ऱ्हास

मात्र भाषापंडित म्हणतात बोलणे, वाचणे शिकवणे यात शिस्त नसेल तर मराठीचे ग्रांथिक संचित वाया जाऊन भाषेचा ऱ्हास होत ती मृत्युपंथास लागेल. रस्त्यावर बाजारात व्यापार उदिमांमध्ये न रुळणाऱ्या भाषेचे कोशवाङ्मय समृद्ध झाले तरी भवितव्य अनिश्चित असते. मराठीला अभिजात दर्जा देण्याचे प्रयत्न स्तुत्यच, पण तेवढ्याने भाषेचे भवितव्य उजळणार नाही. तेथे पाहिजेत बाजारात बोलणारे. भारतातील इतर भाषक मातृभाषेच्या प्रेमाचे पोकळ



डिंडीम न वाजवता तिला व्यवहारात खेळती ठेवतात. मराठीप्रेमी मायभाषेला कसे वागवतात?

## भाषाभिमानाचा अभाव

विदर्भ-मराठवाडा, पूर्व-खानदेश आणि मुंबई येथील बाजारांची भाषा हिंदीच आहे. हळूहळू पुण्यातही ती शिरते आहे. पुण्याच्या उपनगरी वर्तुळातील रिक्षाचालक किंवा इंद्रायणी एक्सप्रेसमधील सेवक धमकावून सांगतात. हिंदी में बात करो, मराठी समजता नय..... चेन्नईत हे चालेल? पुण्याची आपली सुसंस्कृत, समजूतदार मराठी माणसे दबूनच आज्ञा पाळतात. 'हां भाऊ तुळशीबाग जानेका हय... केवढा हा समजूतदारपणा... (सच्च्या भाषाभिमानाचा अभाव?) सर्वत्र अशी गोड मराठी माणसे. येथील नेते, कार्यकर्तेदेखील महाराष्ट्रात महाराष्ट्रीयांनी सार्वजनिक ठिकाणी मराठीत बोलण्याचा आग्रह धरत नाहीत. मराठी वृत्तपत्रांतील बातम्यांच्या लेखांच्या मथळ्या उप-मथळ्यांपासून स्तंभांच्या शीर्षकांपर्यंत इंग्रजी, हिंदी शब्दांची बेसुमार पेरणी, कधी संपूर्ण शीर्षकच इंग्रजी वा हिंदीत. पुण्याची नावे चक्क इंग्रजीत मजकुरातही बेपर्वाई.

## अक्षम्य बेपर्वाई

तेच सिनेमा-नाटकांतील भाषेचे. चित्रवाणीवरील खाद्यपदार्थ कार्यक्रमात ऐकलेले एक वाक्य मराठी-प्रेमिकाने हृदयावर कोरून ठेवण्यासारखे - '...चिप्स मीडियम फ्राय करून लाइट रेड कलर आला की त्यात ग्रीन चिलीचे बारीक पिसेस मिक्स करायचे, कोरियान्डर किंवा दुसऱ्या कोणत्याही ग्रीन व्हेजिटेबलचे टेंडर लीव्ज टॉपवर डेकोरेशनसाठी जेन्टली स्प्रेड करायचे आणि थोडा म्हणजे हाफ-स्पून फुल-लाइम ज्यूस स्प्रिंकल करून सर्व्हिंग बाऊलमधून सर्व्ह करायचे...' एक भाषाप्रेमी म्हणाले, या लोकांनी मराठी भाषेला मानहानी/अपमानित करण्याचा कट केला आहे की काय... वाचक-प्रेक्षकांची तक्रार नाही. कारण सुसंस्कृत मध्यमवर्गीय घरांमधे अशीच 'मराठी' फॅशनेबल आहे. खेड्यांच्या एसटी स्टँडवरील संवादात हायब्रीड फर्टिलायझर, लोन, क्रेडिट, इरिगेशन, एसटीची स्पीड, एक्स्प्रेस, फॅमिली प्लॅनिंग, इलेक्शन, वोटिंग, करप्शन इत्यादी विषयांचे शेकडो शब्द व क्रियापदे सर्रास इंग्रजीतच.

## भाषेचे हायब्रीडीकरण

आज भाषेचे हायब्रीडीकरण अपरिहार्य आहे हेही खरे. दोष मराठी समाजाच्या कचखाऊ स्वभावात असला तरी भाषा पर्यावरणाचे जागतिक परिमाणही लक्षात घेतले पाहिजेत. पूर्वी वेगवेगळ्या भाषिकांचा संपर्क मर्यादित असे. १५व्या शतकापासून दर्यावदी व्यापारी जगभर फिरू लागले. रेलरस्ते आले. संपर्क वाढला. भाषांमधील परस्पर घर्षण वाढले. बलिष्ठ, हुन्नरी भाषा इतरांवर प्रभाव टाकू लागल्या. अशा भाषा ज्ञानसंपन्न व जेत्याही असतील तर त्यांचा प्रभाव जित गुलामांच्या भाषांवर पडणारच.



छत्रपती शिवाजी महाराजांची दूरदृष्टी कशी बहुपरिमितीयुक्त होती ते त्यांच्या भाषा धोरणावरून दिसते. साडे-तीनशे वर्षांपूर्वी मराठीवरील फार्सी अरबी भाषांची मगरमिठी सोडण्यासाठी मराठी राज्यव्यवहार कोश करवून घेणे हा त्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचाच भाग होता. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांनी मराठीसाठी उत्कृष्ट शासनव्यवहार कोश करविले. अग्रणी लोकप्रिय साहित्यिकांनी कोशांची यथेच्छ टवाळी केली. ही मराठी वृत्ती.

तेव्हा आज अंतरे आक्रसून असंख्य भाषांचे घर्षण चालू असल्याने हायब्रीडीकरण घडते आहे. भारतीय भाषांची समस्या आहे इंग्रजीच्या वर्चस्वाची इंग्रजीशिवाय उच्च करिअर कठीण, नोकरी, उच्च विद्याभ्यास असो की व्यापार-उद्योग जगाच्या बाजारात इंग्रजीशिवाय गत्यंतर नाही. जागतिक राजनीती, लष्कर, व्यापारी नौकानयन यांच्यातील संवाद, शास्त्र-तंत्र-विज्ञान यांची जागतिक देवाणघेवाण यांचे माध्यम इंग्रजीच. आंतरराष्ट्रीय करारांचे मसुदे इंग्रजीत. जगात महत्त्वाचा शास्त्रीय शोधनिबंध कोणत्याही भाषेत प्रसिद्ध झाला की, तो लगेचच इंग्रजीतील जागतिक विज्ञान पत्रिकेत प्रसिद्ध झालाच पाहिजे. या पार्श्वभूमीवर मारून मुटकून मराठी प्रेमिकांनी अट्टहासाने स्वभाषेला ज्ञानभाषा, अभिजात भाषा करतो म्हटले तरी इंग्रजीची बरोबरी करणे अवघड आहे. स्वभाषांचा कडवा अभिमान बाळगणारे चिनी, फ्रेंच, जर्मन वगैरे लोकही आता मोठ्या प्रमाणावर इंग्रजी शिकू लागले आहेत.

## सकारात्मक नोंदी

मराठी भाषकाबद्दल सकारात्मक नोंदीही (कडू-गोड) केल्या पाहिजेत. अर्वाचीन इतिहासातील काही विचित्र राजकीय व सांस्कृतिक प्रकरणांमुळे राज्याबाहेर मराठी भाषकांची प्रतिमा कशी झाली आहे? मराठी लोक भांडखोर, असहिष्णू, आपली भाषा व संस्कृती इतरांवर लादणारे, परभाषकांचा द्वेष करत त्यांना दुय्यम वागणूक देणारे वगैरे. वस्तुनिष्ठपणे पाहिले तरी वास्तव उलट दिसते. महाराष्ट्राने परभाषकांना ज्या संख्येने आणि प्रेमादराने सामावून घेतले तसे जगात क्वचितच कोण्या भाषक समूहाने केले असेल. गुजरात-मारवाड, राजस्थान, तेलंगण कर्नाटक, पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, महाकोशल-माळवा, सिंध, सरहद्द प्रांत, अफगाणिस्तान... कित्येक शतकांपासून या प्रांतांतून आलेले विविध व्यावसायिकांचे समूह महाराष्ट्रात येऊन गुण्यागोविंदाने उद्यम व्यवसाय चालवीत आहेत. काही व्यापारी समूहांनी मराठी अवगत केली. पण गावा-शहरांमध्ये पिढ्यान्पिढ्या राहणाऱ्या परभाषकांना मराठी शिकण्याची गरज भासत नाही. सहवासाने भाषा आली, तर बरेच मराठी माणूस एवढा समजूतदार की, त्यांना वाईट वाटू नये म्हणून प्रेमाने त्यांच्याशी हिंदीत बोलतो. स्वातंत्र्योत्तर काळात तर केरळ-तामीळनाडूपासून तो अरुणाचल-नागालँड, आसाम वगैरे भागातून असंख्य लोक शिक्षणासाठी किंवा उदरनिर्वाहासाठी महाराष्ट्राच्या आश्रयास आले. केवळ मुंबई-पुण्यात नव्हे, तर राज्यात सर्वत्र विखुरले. त्यांच्यावर कधीही मराठीची सक्ती झाली नाही.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

## मराठी माणसाचे भाषा सौहार्द

विदर्भ-मराठवाड्यातील परभाषिक दिसणाऱ्याशी हिंदीत बोलण्याच्या उदार प्रथेचे आता पश्चिम महाराष्ट्रदेखील अनुकरण करतोय. घरी आलेला परभाषक मराठीत बोलण्याचा प्रयत्न करतो आहे तुम्ही हिंदीत असे विनोदी दृश्य महाराष्ट्रात दिसू शकते. अशा सहिष्णुतेला परभाषक बावळटपणा समजतात. बहुभाषक उच्चभ्रू मेळाव्यामध्ये मराठी माणसांना एकमेकांशी मायबोलीत बोलायची शरम वाटते. बंगाली, गुजराथी, तामीळी वगैरे मात्र बिनधास्त आपापल्या भाषांमध्ये अभिमानाने संवाद करतात. याला मराठ्यांचे भाषिक औदार्य, समजूतदारपणा (एटिकेट्स) म्हणावे की, फाजील भिडस्तपणा न्यूनगंड की कचखाऊपणा? कोलकता, अहमदाबाद, चेन्नई अशा नगरांमध्ये किंवा त्या-त्या राज्याच्या जिल्हा, तालुका ठिकाणी महिना-पंधरा दिवस राहिलात की, तुम्ही आपोआप स्थानिक भाषा शिकता. महाराष्ट्रात परभाषक मुंबई-नाशिक सोडा, अगदी खेर्डे (खुर्द) ला राहिला तरी आपण त्याला मराठी शिकण्याची संधी देत नाही. किंबहुना त्यांनी मराठी शिकूच नये अशी आपण व्यवस्था करून ठेवतो. भारतातील इतर भाषकांसारखा कणखरपणा, मातृभाषेचे सच्चे प्रेम मराठी भर बांधवांमधे सापडत नाही हेच खरे. त्यांचे मातृभाषाप्रेम ढोंगी पोकळ वाटावाशी परिस्थिती. ज्या भाषेत ज्ञानेश्वर-तुकारामांसारख्या महाप्रतिभाशाली कवींनी शेकडो वर्षांपासून अक्षरवाङ्मयाची परंपरा निर्माण करून ठेवली ती भाषा परक्यांसमोर बोलण्यात शरम वाटणाऱ्या कर्मदरिद्रींना दुसरे काय म्हणायचे? शरमेची दोन स्पष्टीकरणे संभावतात. फाटक्या वस्त्रातील अडाणी आईची शिष्ट जनांमध्ये ओळख देण्याने आपली इज्जत जायची असा मूर्ख विचार. किंवा मराठी माणूस आपल्या भाषेला इतकी मौल्यवान मानतो की, बाहेर काढली तर कोणी चोरून न्यायची भीती. मराठी माणसाचे भाषा सौहार्द हे समूह स्वभाव म्हणून इतके टोकाला जाते की, तेच त्याचे न्यून ठरते. भाषेला हानिकारक होते.

महाराष्ट्राच्या अपार औदार्याचे आणखी उदाहरण. जेवढे परभाषिक येथील विधिमंडळांवर, नगर-महानगरपालिकांवर, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायतींवर निवडून जातात, मंत्री बनवतात, तेवढे दुसऱ्या कोणत्याच राज्यात नाही. भाषा, संस्कृती आणि सत्तेची भागीदारी याबाबतीत एवढे औदार्य जगात कोठे सापडेल? असे असूनही महाराष्ट्राबाहेर मराठी माणसाची वर दिल्याप्रमाणे विकृत प्रतिमा का आहे, याचा गंभीर शोध मराठी समाजाने घेतला नाही. हाही बेफिकिरीचा कळस. मात्र ही मराठी भाषकांची कलांकित प्रतिमा फक्त देशातील राजकिय व प्रस्थापित सांस्कृतिक वर्तुळांमध्ये भारताच्या सामान्य नागरिकांना मनोमन माहीत असते. की मराठी माणूस महाराष्ट्र शासन उदार असून भाषा व संस्कृती याबाबतीत अनाग्रही व सहिष्णू आहे. म्हणून तर देशाच्या सर्व भागातून दरवर्षी लक्षावधी लोक पोटापाण्यासाठी, घर करून राहण्यासाठी निःशंक मनाने महाराष्ट्रात धाव घेतात.

## बोलण्या–लिहिण्यामध्ये ढिसाळपणा

केवळ इंग्रजी-शिक्षित नव्हे, तर सर्वसाधारण लोकांच्या बोलण्या-लिहिण्यामध्ये किती ढिसाळपणा असतो हे आपण पाहिले. नेहमीच्या वापरातील सहजसुंदर शब्द, क्रियापदे सोडून तिथे इंग्रजी-हिंदी वापरण्याची आपली हौस वाढत चालली आहे. साधारणतः अर्धशतकापूर्वी मराठी वृत्तपत्रातील उपसंपादक, वार्ताहर विज्ञान-तंत्रज्ञानासंबंधी बातम्या भाषांतरित करताना इंग्रजीला प्रतिशब्द शोधण्यासाठी आटापिटा करीत, शब्दकोश पालथे घालीत, एकमेकांशी, भाषातज्ज्ञांशी विचारविनिमय करत. ते टिळक-आगरकरांसारखे विद्वान नव्हते. पण चांगली मराठी वापरण्याची, चपखल प्रतिशब्द शोधून काढण्याची, नवे शब्द घडवण्याची त्यांना जिद्द होती. आधुनिक मराठी भाषेला त्यांचे भरीव योगदान आहे. तो चौकसपणा आता उरला नाही. पत्रकारच नव्हे तर सर्व मराठी लोक बेपर्वा आहेत. प्राथमिक-माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या लेखन-वाचन क्षमतेच्या पाहण्यांचे अहवाल धक्कादायक असतात. विद्यापीठांमधून मराठी भाषेत पीएच. डी. करणाऱ्यांचे थिल्लर विषय पाहिले की रडू येते.

## अडाणी भाषाप्रेम

कूपमंडूक राजकारण करीत ऐश्वर्यसंपन्न वैश्विक साहित्य संमेलनांचा माहोल उडवला, की झालीच मराठी जागतिक भाषा हा भ्रम अनिष्ट. असे अडाणी भाषाप्रेम काय कामाचे? मुद्दा असा की, या भाषा आधुनिक पर्वाची आव्हाने पेलण्यात कमी पडतात त्या अधिकाधिक आक्रसून घरापुरत्या उरतील. झेक, हंगेरियन, पोलिश, स्वीडीश अशा छोट्या युरोपियन देशांच्या भाषा प्रगल्भ असूनही का मार्गावर आहेत. म्हणूनच मराठीला ज्ञानभाषा, अभिजात भाषा वगैरे पदाला नेण्याचे ध्येय न सोडता मराठी जनांनी मातृभाषेला सर्व प्रकारच्या व्यवहारात निःसंकोच बोलती ठेवली पाहिजे.

(लोकराज्य फेब्रुवारी–२०१४ मधून पुनर्मुद्रित)


### मराठी भाषेला खच्ची करणारे नकारात्मक घटक

- मराठी समाजाचा न्यूनगंड- आपल्याच राज्यात सार्वजनिक ठिकाणी मातृभाषेत बोलण्याचा संकोच.
- अतिरिक्त भाषिक सहिष्णुता, फाजील आत्मविश्वास.
- व्यापार- उद्योग व संपती विषयी उदासीनता.
- परभाषक व्यावसायिकांचे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्थलांतर...त्यांच्याशी मराठीत बोलण्यात होत असलेली कुचराई.
- इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचा वाढता कल.
- जागतिकीकरणाची वेगवान प्रक्रिया, डिजिटल तंत्रज्ञान, महाजालातील जागतिक संगणकीय संवाद. इतर इलेक्ट्रॉनिक गॅजेटांमध्ये इंग्रजीचा वापर.
- निर्भेळ मराठी वापरणे, आधुनिक विषयांसाठी मराठीची शब्दसंपदा वाढवणे याविषयीची अक्षम्य बेपर्वाई व आळस.

# मराठी अभिजात कशी?

**प्रा. हरी नरके**

मराठी भाषा सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री यांनी मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' मिळवण्याचा शासन प्रयत्न करणार असल्याची घोषणा केली. त्याबाबतच्या चर्चेत या संदर्भातील पुढील निकषांकडे लक्ष वेधले गेले. ''High antiquity of its early texts/recorded history over a period of 1500-2000 years, A body of ancient literature/texts, which is considered a valuable heritage by generations of speakers. The literary tradition be original and not borrowed from another speech community. The classical language and literature being distinct from modern, there may be a discontinuity between the classical language and its later forms of its offshoots.''





मराठी ही जगातील १० व्या क्रमाकांची भाषा असली तरी तिचा जन्म २००० वर्षापूर्वीचा नसल्याने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकत नसल्याचा मुद्दा पुढे आला. मराठी भाषेचा जन्म नेमका केव्हा झाला, याबाबत कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, संचालक-मराठी संशोधन मंदिर, यांचा मराठी भाषा उद्‍गम व विकास हा १९३३ साली प्रकाशित झालेला ग्रंथ अतिशय मोलाचा समजला जातो. त्यात ते म्हणतात, सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्या परीने मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळी वरून आर्यावर्तातून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात उतरले आणि तेथे स्थायिक झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश त्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुंतल, विदर्भ, कोकण इत्यादी लहान लहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत निरनिराळ्या लोकघटकांनी मिळून झाली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या मिश्रणाने बनली. महाराष्ट्र देश, मराठा समय व मराठी भाषा यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोत्तर ६००-७०० च्या सुमारास झाली. (पृ.१६८)

कृ.पां.कुलकर्णी यांनी आपल्या ४९६ पृष्ठांच्या या शोधग्रंथात या विषयाचा सांगोपांग वेध घेतला आहे. विषयाचे सर्व पैलू मांडण्यासाठी त्यांनी या संदर्भातील तज्ज्ञांच्या ३२ मौलिक संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे. कुलकर्णींच्या मते मराठी भाषेचे वयोमान १३००-१४०० वर्षांचे ठरते. असे असेल तर मग मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळू शकणार नाही. याबाबत (१) डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर लिखित 'प्राचीन महाराष्ट्र' 'खंड १ व २', (२) हाल सातवाहनाची 'गाथा सप्तशती' - संपादक, स. आ. जोगळेकर, (३) गुणाढ्याचे 'बृहत्कथा' हे व राजारामशास्त्री भागवत, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, वि. का. राजवाडे, वि. ल. भावे, रा. भी. जोशी आदींचे ग्रंथ तपासून काय चित्र समोर येते त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करू या.

'कथा सरित्सागर' या महाग्रंथाचे मराठी भाषांतर श्री. ह. अ. भावे यांनी केले असून, यांच्या पाचही खंडांना ख्यातनाम विदुषी दुर्गा भागवत यांच्या पाच प्रदीर्घ आणि विवेचक प्रस्तावना आहेत. त्या प्रस्तावनेत म्हणतात, गुणाढ्याच्या बृहत्कथेची तुलना रामायण आणि महाभारताशी करण्यात येते. प्राचीन भारतातल्या साहित्याचा एक विशेष असा आहे की, पुष्कळ ग्रंथ लुप्त झाले आहेत आणि असंख्य ग्रंथ केवळ खंडावस्थेतच आढळतात. अशा विलुप्त ग्रंथांत गुण्याढ्याच्या बृहत्कथेचा समावेश होतो. बृहत्कथेसंबंधी उल्लेख अनेक जुन्या ग्रंथात आढळून येतील. बृहत्कथेचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ संस्कृतात व प्राकृतात आहेत. हे ग्रंथ शैव व वैष्णव मतातून निघालेले आहेत आणि जैन मतातही ग्रंथ उपलब्ध आहे. तेव्हा भिन्न परंपरांना मान्य असलेला बृहत्कथा हा एक प्राचीन लोकप्रिय ग्रंथ होता, यात संशय नाही.


बृहत्कथेशी प्रत्यक्ष संबंध असलेले ग्रंथ दोन आहेत. ते दोन्ही काश्मीरचे असून, अकराव्या शतकात उपलब्ध झालेले आहेत. दोहोंची भाषा संस्कृत व मते शैव आहेत. पहिला जागतिक ख्याती पावलेला ग्रंथ हा सोमदेवाचा 'कथा सरित्सागर' आणि




दुसरा क्षेमेद्रांची 'बृहत्कथा मंजिरी' हे दोन्ही ग्रंथ श्लोकबद्ध असून, ते वृत्त अनुष्टुभ आहे. कथा सरित्सागरची भाषांतरे युरोपिय भाषांमध्येही उपलब्ध आहेत. परंतु 'बृहत्कथा मंजिरी'चे इंग्रजीत एकच व तेही काही भागांचेच भाषांतर झालेले आहे. ११व्या शतकात सोमदेव शर्मा या काश्मीरचा राजा अनंत याच्या पदरी असलेल्या कवी पंडिताने अनंत राजाची राणी सूर्यवती हिला रिझवण्यासाठी

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३


पैशाची भाषेत त्या काळी उपलब्ध असलेल्या बृहत्कथेवरून संस्कृतात कथासरित्सागराची रचना केली. आपण हा ग्रंथ गुणाढ्याच्या बृहत्कथेवरून रचला आहे ही गोष्ट सोमदेवाने ग्रंथारंभीच सांगून गुणाढ्याचे चरित्रही सांगितले आहे, असे दुर्गा भागवत म्हणतात.




डॉ. श्री. व्यं. केतकर या ग्रंथाबाबत आपल्या प्राचीन महाराष्ट्र' या ग्रंथात म्हणतात, पैशाचीतील मुख्य विश्रुत ग्रंथ म्हटला म्हणजे बृहत्कथा होय. तो कुरू युद्धोत्तर इतिहासाचा संरक्षक आणि त्याबरोबरच इतिहास विपर्यासाचा संरक्षक आहे. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात बृहत्कथेपासून इतिहास निष्कर्षणाचा पद्धतशीर प्रयत्न केलेला आढळेल. ऐतिहासिक कथासूत्राच्या शोधाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न विवेचनास घेतले गेले आहेत. त्यापैकी एक प्रश्न म्हटला म्हणजे बृहत्कथेच्या कालासंबंधीचा होय. बृहत्कथा अखिल भारतीय कथांचा संग्रह असल्यामुळे आणि त्यामध्ये प्रतिष्ठानकथा व दक्षिणापथकथा, कुंडीनपूर कथा येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासास त्या संग्रहाचा उपयोग करणे प्राप्त झाले. हा संग्रह तयार करण्यात वररुचीचा हात असल्यामुळे आणि वररुची हा महाराष्ट्राच्या भाषेचा आद्य वय्याकरण असल्यामुळे वररुचीविषयक अधिक विधाने करणे प्राप्त झाले. वररुचीची माहाराष्ट्री बुद्धपूर्व आहे आणि वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे, असे आमचे मत आहे, आणि पैशाची भाषेचे प्रामुख्य ज्या काळात होते तो काळ वररुचीच्या व्याकरणाने दिग्दर्शित होत आहे. वररुचीच्या काळापूर्वी काही पिढ्या पैशाची ही वाङ्मयाची भाषा होती. त्या काळात माहाराष्ट्री भाषा प्रगल्भ झाली होती. आणि प्राकृत भाषांत तीच प्रमुख होती हे स्पष्ट आहे. या प्रगल्भतेचा काळ अर्थात वररुचीच्या पूर्वी दोनतीनशे वर्षे इतका तरी होता असे म्हणण्यास हरकत नाही. त्यावरून 'प्राकृत प्रकाशाच्या उत्पत्तीच्या काळी चारही प्राकृत भाषांचे व्याकरण असणे आणि 'महाराष्ट्र' हा शब्दही अस्तित्वात असणे हे पूर्ण संभवनीय वाटते. एवंच महाराष्ट्राच्या इतिहासाचा एक मोठा उजेडाचा कालविभाग म्हटला म्हणजे वररुचीचा पाणिनीचा काल होय. या वररुचीचे अस्तित्व पाणिनीच्या कालाहून दूर नसावे आणि वररुची व पाणिनी हे दोघेही जवळजवळ समकालीन असल्यामुळे ते दोघेही एका गुरूचेच शिष्य होते ही कल्पना उद्‌धृत होऊन आणि विद्वान वर्गाच्या आख्यायिका संग्रहात शिरून ती कथापीठ लंबकात समाविष्ट झाली असावी. कथापीठलंबक रचनेचा काल मौर्य राज्याच्या प्रारंभाचा असावा, असे आमचे मत आहे. (पृ.११, १२)


ते पुढे म्हणतात, महाराष्ट्र हा शब्द व भाषा वररुचीच्या काळी होती आणि वररुचीच्या काळी ही भाषा संवर्धित झाली होती आणि वररुचीचा काल ख्रिस्तपूर्व ८०० पासून ६०० पर्यंत केव्हातरी असा धरला, तर महाराष्ट्राची स्वतंत्र भाषा अगोदर दोनतीनशे वर्षे तरी विकसित होत असली पाहिजे म्हणजे ख्रिस्तपूर्व पहिल्या सहस्रकांच्या पूर्वीच म्हणजे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात महाराष्ट्राचा आद्यविकासाचा काल जातो आणि या भाषेच्या नावास कारण झालेले जे महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण जे ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात झाले असावे असे दिसते. अश्मक राजा कुरू युद्धात पडला आणि कुरू युद्धापासून अश्मकांचे सातत्य आहे, तर महार आणि रठ्ठ यांचे एकराष्ट्रीकरण आणि अश्मक राजाचे सातत्य याची संगती लावण्याचा प्रयत्न अवश्य होतो. अश्मक राज्य सुरू होण्यापूर्वीच महारांच्या देशात रठ्ठांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनले असावे आणि त्यांच्या संयुक्त जनतेत अश्मक राजकुल उत्पन्न झाले असावे असाच इतिहास असावा असे दिसते. (पृ.१३)

डॉ. केतकर हालांच्या सप्तशतीबद्दल म्हणतात, महाराष्ट्रातील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे हालांची सप्तशती होय. तीवरून असे दिसते की, त्या वेळेस प्रमुख जानपद हलिक होते. गोदातट आणि विंध्य पर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयात येत होते. भाषेला नाव प्राकृत हेच अधिक प्रिय होते. (पृ. २९) केतकरांचे अनुमान आहे की, शातवाहनांच्या काळात भाषेचा उदय झाला असेल, कारण शातवाहनांच्या काळी अपभ्रंशाचे अस्तित्व होते अशी साक्ष बृहत्कथा देते.




'राजारामशास्त्री भागवत यांचे निवडक साहित्य' दुर्गा भागवत यांनी संपादित केले असून, त्याचा पहिला खंड मऱ्हाठ्यासंबंधाने चार उद्‌गार हा या विषयावर महत्त्वाचा प्रकाशझोत टाकतो. राजारामशास्त्री भागवत म्हणतात, महाराष्ट्र हा शब्द बराच जुनाट आहे. नंदाचे राज्य मगध देशावर असता म्हणजे शालिवाहन शकांचे पूर्वी सुमारे सव्वा चारशे वर्षे वररुची नावाचा विद्वान झाला. त्याने 'प्राकृत प्रकाश' नावाचे प्राकृत भाषेचे म्हणजे संस्कृत नाटकातील बालभाषेचे व्याकरण केले आहे. त्या व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र

'शेषं महाराष्ट्रीवत्' हे होय. अशोकाने महाराष्ट्र देशात धर्मोपदेश करण्यासाठी काही बौद्ध भिक्षूंस पाठविले, अशी बौद्ध लोकांतही दंतकथा आहे. नंदाच्या नंतर चंद्रगुप्ताने राज्य केले. चंद्रगुप्ताच्या पाठीमागे त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर बसला व बिंदुसाराच्या मागून त्याचा मुलगा प्रियदर्शी किंवा अशोक यांस गादी मिळाली. तेव्हा चांगला २२०० वर्षांचा 'मरहठ्ठ' किंवा 'महाराष्ट्र' शब्द आहे असे म्हणण्यास हरकत नाही. (पृ. ७ व ८) ते पुढे म्हणतात, बाकी सर्व मऱ्हाठी भाषेप्रमाणे शौरसेनी भाषेचे नियम आहेत असे समजावे. हा सूत्राचा अर्थ ज्यास आपण बालभाषा म्हणतो त्यात पूर्वीच्या काळी शौरसेनीही होती. शूरसेना म्हणजे मथुरामंडळ या प्रांताची जी पूर्वीची भाषा शौरसेनी. उंच जातीच्या व कुलीन बायका जी भाषा प्राचीन काळी नाटकात बोलत ती हीच, 'शौरसेनी' नाटक म्हटले म्हणजे लोकस्थितीचे हुबेहूब चित्र होय. तेव्हा संस्कृतात नाटके ज्या वेळी होऊ लागली त्या वेळी कुलीन व वरिष्ठ जातीच्या बायकांची भाषा 'शौरसेनी' होती, याविषयी काही संशय नको. या 'शौरसेनी' भाषेची एक प्रकृती जशी संस्कृत तशीच दुसरी प्रकृती महाराष्ट्री अतिप्राचीन मऱ्हाठी, असे कात्यायन म्हणतो. शौरसेनीपासून मागधी व पैशाची नावाच्या बालभाषा निघाल्या. मगध म्हणजे गयेच्या व पाटणाच्या आसपासचा मुलूख या देशाची जी पूर्वीची भाषा ती मागधी. पंजाब वगैरे प्रांतातील राहणाऱ्या लोकांचे 'पिशाच' हे प्राचीन नाव दिसते. बाल्हीक म्हणजे बल्क, बुखारा व समरकंद वगैरे ठिकाणचे लोक सर्व पिशाचांची संतती, असे कर्णपर्वात लिहिले आहे. या लोकांची पूर्वीची भाषा पैशाची. शौरसेनीपासून मागधी व पैशाची निघाल्या व शौरसेनेची प्रकृती जशी संस्कृत तशीच मराठी असे कात्यायन म्हणतो, तर सर्व बालभाषांचे मूळ प्राचीन मराठी असा सिद्धान्त केल्यास काहीच प्रत्यवाय नाही. 'गाथांची भाषा महाराष्ट्री' असे अलंकारिक म्हणतात. गाथा शब्द आलेला 'गै' धातूपासू. 'गाथा' शब्दाने प्रायः आर्या किंवा गीति संस्कृतात समजली जाते. या अलंकारिकांच्या नियमावरून गाण्याची भाषा प्राचीन काळी 'माहाराष्टीयच' होती असे म्हणावे लागते. तेव्हा सर्व बालभाषांची प्रकृती व गाणी प्राचीन काळची ज्या भाषेत, अशी एक प्राचीन 'मऱ्हाठी' भाषा होय... शौरसेनीची प्रकृती संस्कृत तर कात्यायनाने प्रकरणाच्या आरंभीच सांगितले आहे. असे असता अखेरीस 'शेषं महाराष्ट्रीयवत्' असे कात्यायन पुनः म्हणतो, त्यापक्षी 'महाराष्ट्री' व संस्कृत या दोहोंची परस्परनिरपेक्षता त्यास इष्ट होती असे दिसते. मूळचा शब्द पाहू गेले असता 'पाअड' होय. 'पाअड' शब्दाच्या जवळजवळ संस्कृतात 'प्रकट' हा शब्द येतो. 'पाअड' भाषा = 'प्रकट' भाषा. महणजे अर्थात सर्व लोकांचा व्यवहार व दळवळण जीत चालते ती. संस्कृत भाषा पडती धर्माची, अर्थात धर्मप्रसार करणे ज्यांच्या हातात असल्या ब्राह्मणांची. ती काही सर्वसाधारण भाषा नव्हती. पण, 'पाअड' भाषा पढली वाहत्या पाण्याप्रमाणे. ते सर्वांचे जीवन




तेव्हा सर्वांचाच संबंध तिच्याबरोबर. सहजच तीस 'पाअड' म्हणजे सर्वांस समजण्यासारखी असे अन्वर्थक नाव मिळाले व धर्मभाषेचे 'संस्कृत' म्हणजे थोड्याशा विद्वान ब्राम्हणांनी मिळून आपल्या बुद्धिप्रभावने 'तकतकी आणलेली' असे ब्राम्हणांनीच नाव पाडले. काही काळाने 'संस्कृत' या शब्दाबरोबरच मेळ दिसावा म्हणून 'पाअड' शब्दाचे विद्वान ब्राह्मणांनी मिळून आपल्या बुद्धिप्रभावाने 'प्राकृते संस्कृते चापि (प्राकृत भाषेत व संस्कृत भाषेत) असा लेख आला आहे. त्यापक्षी प्राचीन काळीही 'प्राकृत' ही स्वतंत्र भाषा समजण्याचा संप्रदाय पुष्कळ दिवसापासून होता हे उघड होय. तेव्हा 'माहाराष्ट्री', शौरसेनी, मागधी व पैशाची या सर्व जितक्या 'पाअड' भाषा होत्या तितक्या 'प्राकृत' झाल्या व या प्राकृत भाषांचे 'प्राकृतप्रकाश' नावाचे सूत्रमय व्याकरण कात्यायनाने पहिल्याने लिहिले. वर लिहिलेल्या पाचही भाषा 'पाअड' भाषा इतकेच की सर्वांत प्राचीन व सर्वांची प्रकृती 'महाराष्ट्री' ऊर्फ प्राचीन मऱ्हाठी. महाराष्ट्रीपासून निघाली शौरसेनी व शौरसेनीपासून कालांतराने मागधी व पैशाची या दोन भाषा निघाल्या, तेव्हा मागधी व पैशाची ही दोन्ही प्राचीन मराठीची नातवंडे होत. शौरसेनीची खरी आई म्हटले म्हणजे एकटी प्राचीन मऱ्हाठी भाषा (पृ. १२, १३)

प्राचीन मराठीतील १) गाथा सप्तशती, २) प्रवरसेनाचे 'सेतुकाव्य', ३) गौडवध, ४) राजशेखराची 'कर्पूरमंजिरी' हे ग्रंथ आणि गुणाढ्याचे पैशाची भाषेतील बृहत्कथा ग्रंथ हे फारच महत्त्वाचा पुरावा होत. नंदाच्या वेळच्या शालिवाहनाचा गुणाढ्य हा प्रधान होता. त्या ग्रंथाची हल्ली संस्कृतात दोन श्लोकमय भाषांतरे विद्यमान आहेत. श्रीलंकेतील महावंश या पाली भाषेतील सिंहली लिपीतील ग्रंथात अशोकाने बौद्ध भिक्षू महाराष्ट्रात पाठविल्याचा उल्लेख आहे. भवभूतीच्यानंतर २०० वर्षांनी राजशेखर झाला. तो महेंद्रपाल राजाकडे आश्रयाला होता. तो स्वतःला 'महाराष्ट्र चुडीमणी' म्हणवून घेत असे.

इरावती कर्वे आपल्या 'मराठी लोकांची संस्कृती' या ग्रंथात म्हणतात, पश्चिमेकडील शक व महाराष्ट्रातील शातवाहन येण्याचे आधीच महाराष्ट्राच्या भूमीत संस्कृत वा संस्कृतोद्‌भव भाषा दृढमूल झाली होती व म्हणून बाहेरून आलल्या राजांनी द्राविड भाषा व न उचलता महाराष्ट्री (संस्कृत प्राकृत अवतार) आत्मसात केली. (पृ. २०३) त्या पुढे म्हणतात, सर्व भारताची संस्कृती ज्या काव्यामध्ये साकारली ते वैदर्भी रीतीत होते, म्हणजे विदर्भाचे संस्कृत परंपरेमधील स्थान लक्षात येते. जसा अपरान्त त्याचप्रमाणे विदर्भ ही अति प्राचीन आर्य (संस्कृत बोलणाराची) वसाहत होती. दोन्हीही वसाहती वन्यांच्या प्रदेशात झाल्या. संस्कृत द्राविडांशी लढा करून नव्हे. पहिल्या प्रख्यात वैदर्भीचे नाव लोपमुद्रा आहे. हे नाव आर्य नव्हे. ते लोपामुंडा याचे तर रूप नव्हे ना? मुंड लोकांची राजकन्या लोपा असा त्याचा अर्थ होईल. मुंडांचा नागांशी संबंध होता, त्याबद्दल बौद्ध वाङ्मयात

**मराठी तितुका मेळवावा**
**विश्व मराठी संमेलन २०२३**

पुरावा सापडतो. कोसलाचा राजा पसेनदी याचे मनात गौतम बुद्धांच्या घराण्यात लग्न करून बुद्धाचे नातेवाईक व्हावे असे होते. वासभखत्तिया यांच्या विवाहातून जन्मलेल्या विदुडभ याने सर्व शाक्य कुळाचा नाश केला. ही कथा पाली वाङ्मयात सांगितली आहे. इ.स.पूर्व ५०० ते ६०० वर्षांची ती कथा आहे. म्हणजे त्या वेळी नाग व मुंड एक असावेत असे दिसते. (पृ.२१३ व १४)

इरावती कर्वे यांनी पुढे या संदर्भात अधिक माहिती देताना म्हटले आहे की, महाराष्ट्राचे राजे सातवाहन यांनी प्रतिष्ठान ऊर्फ पैठण येथे राज्य केले. प्राकृत भाषेला उत्तेजन दिले व पर्यायाने मराठीच्या जन्माला मदत केली. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व संतकवीचा जन्म मध्य महाराष्ट्रात झाला व हल्लीच्या मराठीचे स्वरूप त्यांनी निश्चित केले. या प्रदेशाला जुने नाव अश्मक असे आहे. ...अश्मकाचे सर्वांत प्रसिद्ध राजे म्हणजे प्रतिष्ठानचे शतवाहन. त्यांचे अधी प्रतिष्ठानला नरसिंह नावाचा राजा होता. असा उल्लेख सोमस्वामीच्या कथा सरित्सागरात सापडतो. त्या कथेबद्दल कै.श्री.व्यं.केतकरांनी प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात लिहिले आहे. शतवाहनांना संस्कृत माहीत नव्हते, त्यांनी प्राकृताला आश्रय दिला, महारठी नावाच्या मांडलिक राजांशी लग्नसंबंध जोडला असे दंतकथा व शिलालेखांवरून दिसते. शतवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ह्या घराण्यांनी महाराष्ट्रावर एकामागून एक राज्य केले. महाराष्ट्रातील बुद्ध लेणी शतवाहनांच्या व वाकाटक आणि चालुक्यांच्या कारकिर्दीतील आहेत. त्यातील सर्व लेख प्राकृतातील आहेत. 'लिलावती' या अपभ्रंश भाषेत लिहिलेल्या काव्यात सुप्रसिद्ध बौद्ध पंडित नागार्जुन हा हालाचा मित्र व हितोपदेशक होता असे म्हटले आहे. त्यांच्या संबंधी रठ्ठ आणि महारठ यांची नावे शिलालेखात येतात. यांचे प्रमुख शिलालेख पश्चिम महाराष्ट्रात आहेत. आंध्र व कर्नाटक दोन संस्कृतिसंपन्न राष्ट्रांशी बरोबरी करून मराठीने आपल्या दक्षिण सीमा पक्क्या केल्या; एवढेच नाही, तर मराठी भाषा कर्नाटकाच्या गाभ्यापर्यंत पोहोचली, याला अनेक सांस्कृतिक कारणे आहेत. प्रख्यात सूत्रकार बौद्धायन व आपस्तंभ दाक्षिणात्य होते. बृहत्कथेत अपाणिनीय अशा ऐन्द्रादी व्याकरणांचा उल्लेख येतो ती दक्षिणात्यांनी रचिलेली होती असे दिसते. चालुक्य व राष्ट्रकूट दोघेही जैनानुयायी होते, व त्यांच्या आश्रयाखली पुष्कळ महत्त्वाचे जैन ग्रंथ महाराष्ट्रात लिहिले गेले. पुष्पदंताचे 'हरिवंशपुराण' राष्ट्रकूट राजांच्या अमदानीत मान्यखेड (मालखेड) येथे रचले गेले. कर्नाटकाच्या गाभ्यात महाराष्ट्री भाषेत ग्रंथनिष्पती राजाश्रयाने होत होती असे स्पष्ट दिसते. श्रवणबेळगोळचा हा शिलालेख मराठ्यांच्या आक्रमक राजसत्तेचे प्रतीक नसून जैनांच्या धर्मप्रसाराचे आहे. मध्ययुगातही भाषेच्या बाबतीत मराठीची आई जी महाराष्ट्री, तिचे वर्चस्व दक्षिणेत होते व तीत उत्तम ग्रंथांची उत्पत्ती होत होती. कोऊहल कवीने रचलेल्या 'लिलावती' काव्यात तो स्वत:चे काव्य 'मरहठ्ठ देशी' लिहिल्याचे सांगतो.




काव्याचा काळ सुमारे ख्रिस्ताब्द ८०० असावा असे तज्ज्ञांचे मत आहे. शातवाहन हे राजाचे नाव ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकापासून तो थेट सप्तशती हालापर्यंत आढळते. यातील एका शातवाहनाची (ख्रिस्तपूर्वीचा शतवाहनाची) राणी पंडिता होती. ती राजाजवळ विनोदाने जे संस्कृत बोलली ते राजाला कळले नाही. म्हणून ती हसली व राजा अपमानित होऊन निघून गेला. राजाने सहा महिन्यांत भाषा शिकण्याचा निश्चत केला व तो जी भाषा शिकला ती प्राकृत, हा कथाभाग बृहत्कथेच्या आरंभी येतो. व त्यात वररुचीचे नाव प्रामुख्याने येते. मराठी वाङ्मयाच्या प्रौढत्त्वाची, स्वयंसिद्धतेची बीजे ही या प्राकृत वाङ्मयात आहेत. बृहत्कथेला जगातील कथावाङ्मयात तोड नाही. ...हालाच्या सप्तशतीतील काव्यही लोकवाङ्मय आहे. कुठल्यातरी राज्याच्या राजकवीने केलेले ते काव्य नसून महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या लोकप्रिय काव्याचे ते संकलन आहे. त्यात राज्यांच्या दरबाराचे चित्रण नसून गावगाड्याचे, पाटलाचे, पाटलाच्या सुनेचे म्हणजेच महाराष्ट्राच्या साध्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहावयास सापडते. लिलावती ही अद्भूतरम्य कथा हाल राजाबद्दल आहे. त्यातही महाराष्ट्राचा प्राण जे प्रतिष्ठान नगर व तेथील गोला ऊर्फ गोदावरी नदी व तीत नहाणाऱ्या, अंगाला हळद फासणाऱ्या महाराष्ट्र सुंदरीचे वर्णन आढळते. हा कवी आपल्या भाषेला 'मरहठ्ठ देसी भाषा' असे नाव देतो. (पृ.२२३-२६)

दुर्गा भागवतांनी राजारामशास्त्री भागवतांच्या संशोधनाचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे हे त्यांनी दाखवले आहे. (पृ.२)

थोर संशोधक श्री.व्यं.केतकर, राजारामशास्त्री भागवत, वि. का.राजवाडे, इरावती कर्वे, कृ.पां.कुलकणी, दत्तो वामन पोतदार, वि.ल.भावे, रा.भि.जोशी आदींच्या उपरोक्त संशोधनाच्या अधारे महाराष्ट्री (मराठी)भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. महाराष्ट्री, मऱ्हाठी, मराठी भाषेचा हा अडीच वर्षांचा प्रवास साधार उलगडला म्हणजे मराठी भाषा ही अभिजात भाषा असल्याचे निर्विवादपणे सिद्ध होते.

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ अंकातून पुनर्मुद्रित)

# नव्या परिमाणाची अपेक्षा...

**डॉ. आनंद यादव**

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि ग्रामीण मराठी समाजाच्या इतिहासाचे एक नवे पान उलगडले गेले. ते म्हणजे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी आपल्या सहकाऱ्यांना महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून नवनवीन शिक्षणसंस्था स्थापण्यास सांगितले. त्याचा परिणाम होऊन खेड्यापाड्यांतून प्राथमिक शाळा, तालुक्यांच्या गावी हायस्कूल, जिल्ह्यांच्या ठिकाणी किंवा केंद्रस्थानी असलेल्या शहरांतून महाविद्यालये स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. याचा हळूहळू परिणाम असा झाला की, बहुजन समाजात शिक्षणविषयक जागृती निर्माण झाली आणि शिक्षणाचे प्रमाण वाढले. नवसाक्षर तरुण पिढीला विकसनशील काळ असल्यामुळे नवनव्या नोकऱ्या मिळू लागल्या आणि ग्रामीण समाजाचा कायापालट होऊ लागला.

१९७० च्या आसपास दलित साहित्याची चळवळ सुरू झाली आणि मराठी साहित्याला एक परिमाण मिळाले. जनवादी साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ख्रिस्ती साहित्य, आदिवासी साहित्य इत्यादी विविध सामाजिक घटकांतील साहित्य निर्माण होऊ लागले. त्यांची लहानमोठी नियतकालिके, अनियतकालिके निर्माण होऊ लागली.

ग्रामीण विभागात निरनिराळ्या ठिकाणी छोटीछोटी अनेक साहित्य संमलेने भरत असतात, ही स्वागतार्ह घटना आहे. त्यामुळे त्या त्या परिसरातील साहित्यिकांना त्यात सहभागी होता येते. ते आपल्या पिढीसाठी विचार मांडू शकतात. त्यांच्या साहित्याचा परिचय तेथील तरुण पिढीला होतो. त्या परिसरातीलच सामाजिक, सांस्कृतिक स्थितीगतीशी त्यांचा संबंध असल्याने त्यांना ते आपले वाटते. त्या साहित्याची आणि समाजस्थितीशी अनेक अंगे उपांगे प्रकाशात येतात आणि त्यामुळे इतर साहित्यिकांना ते अधिक परिचित होतात. त्यांना त्यातून साहित्याच्या निर्मितीची अधिकाधिक प्रेरणा मिळते.

१९८० पूर्वी एकूणच मराठी साहित्य क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नागरी (शहरी) साहित्याची विविध अंगोपांगानी मीमांसा करणारी अनेक नियतकालिके निघत; ती तर बंद झालीच; पण, तशी नियतकालिके विखुरलेल्या खेड्यापाड्यातील समाजात निर्माण होणे शक्य नव्हते. कारण एकतर आर्थिकदृष्ट्या ग्रामीण समाज दुबळा असतो शिवाय तो शहरांसारखा एका जागी नसतो त्यामुळे छोट्या-छोट्या संमेलनातून एकत्र येऊन साहित्याची विविध अंगी चर्चा होणे शक्य व आवश्यक असते. अशी चर्चा होणे नितांत गरजेचे आहे. याचे भान या छोट्या-छोट्या संमेलनाने जाणीपूर्वक ठेवले पाहिजे कारण अलीकडे या संमेलनांना जत्रेचे स्वरूप येते आहे की काय अशी भीती मला वाटते. त्यात केवळ मनोरंजानाचे कार्यक्रम आणि जल्लोश होताना विशेष प्रमाणात जाणवते. त्यामुळे एकतर वाङ्मयीन संस्कृतीची नीटपणे जोपासना होत नाही; किंवा ती उथळ स्वरूप धारण करताना दिसते.

पूर्वी ग्रामीण समाजात तुरळक साहित्य होते; पण अलिकडे त्यांची पिढी तयार झालेली दिसते. ही स्वागतार्ह घटना आहे. या पिढीने विचारपूर्वक आणि गांभीर्याने साहित्याची उपासना आणि जोपासना तसेच निर्मिती आणि समीक्षा गंभीरपणे, अभ्यासपूर्वक करण्याची गरज आहे. केवळ हौसेमौजेने कोणतीही कलानिर्मिती होऊ शकत नाही. ती एक व्रतभावनेने केलेली उपासना असते. हे तरुण ग्रामीण साहित्यिकांनी जाणीवपूर्वक मनात रुजवण्याची आणि पोषण करण्याची गरज आहे.

वास्तविक नियतकालिकांची विविध ग्रंथ प्रकाशनांची त्यासाठी नितांत गरज असते. पण आर्थिकदृष्ट्या दुबळ्या असलेल्या ग्रामीण विभागात आजतरी ते शक्य नाही असे दिसते. म्हणून छोटी छोटी संमेलनेच त्याची माध्यमे मानून, त्यांतून वाङ्मयीन चर्चा, चिकित्सा होण्याची आवश्यकता आहे. ही संमेलनेच तूर्त तरी वाङ्मयीन चर्चेची, चिकित्सेची आणि त्यांच्या प्रसाराची साधने मानली पाहिजे.

याबाबतीत शहरी विभागातील ग्रंथप्रकाशकांनी या ग्रामीण विभागातील वाङ्मयीन संक्रमणाच्या अवस्थेत आपली भूमिका ओळखून त्यांना खूप काही करता येईल असे वाटते. विशेषतः ग्रामीण तरुण साहित्यिकांचे साहित्य संस्करण करून छापले आणि प्रसिद्ध केले, तर त्यांना नवशिक्षित ग्रामीण तरुणवर्ग ग्राहक म्हणून उपलब्ध होऊ शकेल. शहरात आज मराठी ललित साहित्याचा वाचकवर्ग कमी कमी होत चालला आहे. कारण तो प्रामुख्याने इंग्रजी भाषेत शिक्षण घेऊन जागतिक पातळीवर नोकऱ्या करू लागला आहे म्हणून तेथील प्रकाशकांनी आणि ग्रंथ विक्रेत्यांनीही ग्रामीण भागातील या नव्या ग्राहक वर्गाकडे वळावे. तेथील साहित्यप्रेमींनी ग्रंथालय स्थापन करण्यास मदत केली आणि ती त्यांनी स्थापन केली तर त्यांना कायमचा ग्राहकवर्ग मिळू शकेल. तसेच तेथील संस्कृतीलाही नवे परिणाम मिळू शकेल, असे मला वाटते.

नव्या पिढीच्या ग्रामीण साहित्यिकांनी केवळ हातात पडेल तेच आणि तेवढेच साहित्य वाचण्यापेक्षा आपल्या वाचनाला 'वाचनसंस्कृती'चे स्वरूप प्राप्त करून दिले पाहिजे. साहित्यिकांची वाचनसंस्कृती म्हणजे नुसते इतरांचे साहित्य वाचून काढणे नव्हे; आपणास जर चांगला साहित्यिक व्हायचे असेल तर त्याने आपला समाज नीटपणे समजून घेण्यासाठी 'ग्रामीण समाजशास्त्र' वाचावे त्याचप्रमाणे सामाजिक मानसशास्त्र, व्यक्तीचे मानसशास्त्र, भारतीय संस्कृती, मूळ मानवधर्म, देशविदेशी भाषांतील उत्कृष्ट साहित्य इत्यादी नीटपणे वाचले पाहिजे. ते वाचले तरच आपल्या हातून चांगली साहित्यनिर्मिती होऊ शकते. पर्यायाने ग्रामीण समाजाला साहित्य संस्कृतीचे नवे परिमाण लाभू शकेल.

(लोकराज्य जानेवारी-फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# अमेरिकेतील मऱ्हाटमोळी अनुभूती

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

**दीपक करंजीकर**

मी प्रथम भारत सोडला ती संध्याकाळ माझ्या मनात कायमची घर करून आहे. कामाच्या निमित्ताने प्रवास करणे आणि देश सोडून आता काही वर्षे परतायचे नाही या भावनेने प्रवास करणे यात फार मूलभूत असा फरक आहे. विमान जसजसे वर जात होते तसतसा महाराष्ट्राचा वेडावाकडा पसरलेला किनारा, आतल्या दऱ्याखोऱ्या, ओबडधोबड पर्वतरांगा यांचे एक वेगळेच रूप दिसत होते. पुढे अनेक वेळा हेच दृश्य बघताना मनात आले किती वेडीवाकडी वळणे असणारा, दुर्गम खाचखळग्यांचा आपला प्रदेश. सरळसोट असे काही नाहीच. म्हणून तर मराठी भाषेत क्ष, ळ, ज्ञ, भ, फ, ढ, ध असली अक्षरे नसतील? इंग्रजी कशी सुटसुटीत प्रत्येक अक्षर वेगळे त्यांच्या आखीव रेखीव प्रदेशासारखे, सरधोपट. मराठीचे तसे नाही प्रत्येक अक्षर वळणदार, ते नुसते काढायचे नाही तर गिरवावे लागते. ते घोटून घोटून तयार केले तरच जमते. हाताला, जिभेला कष्टपूर्वक वळण लावावे लागते.

प्रदेश आणि भाषा यांचे हे नाते माझ्या परदेश प्रवासासोबत एक कोलाज बनून राहिले आहे. बरेच समाजशास्त्रज्ञ, भाषातज्ज्ञ भाषा ही संवादाचे सर्वोच्च साधन आहे, ती आत्मसात केली पाहिजे वगैरे गळे काढत असतात. गेली अनेक वर्षे परदेशात काढून मला भाषा बाहेरून येते असे वाटत नाही. भाषा हा आपल्या शारीरिक अवयवासारखा आपल्या जगण्याचा अपरिहार्य भाग आहे, असे मला वाटते.



मी तसा नाटकवेडा माणूस. सुरुवातीला मी अमेरिकेतील टेक्सास प्रांतातल्या डालस या गावी गेलो. ज्ञानेश्वरांवर नाटक करायचे ठरवले. मी विषय मांडला तेव्हा तिथली काही मंडळी म्हणाली, अहो कठीण विषय आहे, आम्ही गणपती उत्सवात टाईमपाससाठी नाटके करतो. मी हट्ट सोडला नाही, सात दिवस बसून नवीन नाटक लिहून काढले. ६० लोकांना घेऊन ते बसविले. अगोदर ज्ञानेश्वर काय होते हे सांगितले. फार अवघड ओव्या फेकून कोणताही ठसा न पाडता त्यांनी नेमके अलौकिक असे काय केले ते सांगितले. तिथल्या लोकांची मराठी भयानक असते, त्यांना अवघड शब्द उच्चारायला जड जातात. असेही कानावर आले होते. अमेरिकेत जन्म घेतलेल्या भारतीय मुलांना विनोदाने अइउऊअसे संबोधायची पद्धत आहे. म्हणजे अमेरिकन बॉर्न कॉन्फ्युजड देशी. (आपणच आपल्या लोकांना दोष का द्यावा?) त्यामुळे मलाही टेन्शन होतेच. पण, जशा तालमी सुरू झाल्या तसे सगळे सुरळीत होऊ लागले. आजोबाने सायकल शिकली की, नातवाला चार पायडल मारून ती लगेच चालवता यावी इतकी आपली मराठीची नाळ मजबूत आहे हे जाणवले. मराठी असणे पुरते, जन्म कुठे झाला याला फारसे महत्त्व नाही, हे लक्षात आले.

परदेशात झालेले ज्ञानेश्वरांवरचे हे पहिले नाटक. यात वय वर्षे ३ ते ६० अशा सर्व वयाची माणसे होती. तालीम करताना, नवनवीन मराठी शब्दांचे अर्थ समजून घेताना, ते उच्चारताना ती सगळी माणसे इतकी छान गुंतून गेली होती की, मला ही भाषा कधीच मरणार नाही, याची खात्री पटली. पुढे कॅलिफोर्नियाला गेल्यावर तर मराठीची ताकदच प्रत्यक्ष अनुभवता आली. सिलिकॉन व्हॅली हे त्या भागाचे सुप्रसिद्ध नाव. संगणकाची जन्मदात्री भूमी ती. तिथली भाषा C++, java अशी संगणकीय; पण, मराठीचाही तिथे बोलबाला आहेच. यावरून अजून एक मुद्दा मांडावासा वाटतो तो असा की संगणकासाठी म्हणून बायनरी भाषेची पद्धत इंग्रजीतून विकसित केली गेली, त्यामुळे इंग्रजीचे अनेक दोषही त्यात आले आहेत. संगणकाची सुरुवात जर मराठीतून झाली असती तर त्यांत उच्चार म्हणजेच ध्वनीचाही समावेश झाला असता. इंग्रजी भाषेला व्यंजन-स्वर आणि अक्षर याबरोबर ध्वनीचा समावेश करता आला नाही. मराठी भाषेचा संगणकासाठी उपयोग असा विषय अनेक वेळी परदेशातही होई, तेव्हा तो फोनेटिक भाषा, जोडाक्षरांची सुलभीकरण, मराठी की बोर्ड इतकाच.

या सगळ्यांपेक्षा मला एक मुद्दा नेहमी अंतर्मुख करायचा तो हा की, परदेशातली मराठी मुले मराठी बोलतात तेव्हा त्यांचे उच्चार वेगळेच का वाटतात? नेहमीसारखा त्यांच्या आईवडिलांना दोष देऊन मराठी संपते आहे असे गळे काढून हा मुद्दा संपविता आला असता; पण, तसे करणे हे फॅशनेबल आहे. संगणकीय भाषेचे मराठीकरण न झाल्याने जर काही मोठे नुकसान झाले असेल तर ते हे की उच्चाराधिष्ठित असणारी आपली भाषा ही पूर्णपणे त्या संगणकात येत नाही. उदाहरण पाहायचे झाले, तर 'ओम' हा शब्द घेऊ. या शब्दात तीन अक्षरे आहेत आणि त्यांचा एक घुमणारा असा नाद आहे. अ, उ, म यांचे एक जोडाक्षर आणि सोबत असणारा नाद. आता हे सर्व संगणकात बसवताना ज आणि च या दोन इंग्रजी अक्षरात हा खेळ आटोपतो. पुन्हा उच्चार येत नाही तो नाहीच. प आणि फ हे शब्द संगणकावर झ आणि ऋ असे येतात. झ आणि झक असे येत नाहीत. असे घडत गेले, तर बाराखडीपासून मोठ्या कष्टाने तयार केले गेलेले अनेक उच्चाराधिष्ठित शब्द वेगाने नाहीसे होतील.

परदेशात मला हे अनेक वेळा जाणवायचे, तिथली लहान मुले मराठी अगदी आवडीने बोलतात; पण, ते जेव्हा संगणकावर ती लिहू पाहतात, तेव्हा मात्र त्यांच्या मनात एक गोंधळ सुरू होतो.

आपण उच्चारत असणारा शब्द आणि आता करत असलेले स्पेलिंग याची तफावत त्यांना त्या शब्दाचा संगणकीय उच्चार करायला भाग पाडते आणि म्हणूनच तिथे जन्मलेल्या आपल्या बांधवांचे मराठी हे एखाद्या आज्ञावालीसारखे (प्रोग्राम) होते. भाषेचे असे आधी उच्चारण्यातून, मग लिखाणातून आणि सरतेशेवटी बोलण्यातून नष्ट होणे मराठीला घातक ठरायची भीती आहे. वारकऱ्यांनी ज्ञानोबा-तुकोबांची मराठी वर्षानुवर्षे टिकवली; कारण, ती उच्चारात सक्षमपणे जिवंत होती. पण, संगणक युगात हे उच्चारण नष्ट होण्याचा धोका आहे. मराठीतल्या मातब्बर लोकांनी, इथल्या तिथल्या श्रीमंत मराठी माणसांनी काही निधी उभा करून या पद्धतीची उच्चाराधिष्ठित मराठी संगणकावर कशी येईल हे पाहायला हवे. याला जर आवश्यक आर्थिक पाठबळ उभे राहिले आणि सॉफ्टवेअर कंपन्यांवर योग्य तो दबाव आपण टाकू शकलो तर हे काम चुटकीसरशी होऊन जाईल. हे काम करणारे नवीन युगातले भाषाप्रभूच ठरतील. यासाठी वेळ / मार्गदर्शन माझी पूर्ण तयारी आहे हे इथे नमूद करू इच्छितो.



तिथला अजून एक अनुभव. मी एलकुंचवारांचे 'वाडा चिरेबंदी' बसविले तेव्हा आला. प्रयोगाला काही वैदर्भीय मंडळी आली होती. त्यांना तो एलकुंचवारांच्या शब्दातला आणि आम्ही बसविताना प्रयत्नपूर्वक जपलेला तो लहेजा इतका व्याकूळ करून गेला की, त्यातल्या एक बाई मला म्हणाल्या, आमचे नागपूर कधीच सुटले, खूपच दूर राहिले, आता तिथे परत जाणे नाही; पण तुमच्या नाटकाची DVD मात्र आम्ही नेहमी नुसते पाहत नाही, तर ऐकतो आणि वाटते की आपण तिथेच तर आहोत. कसे एकदम ओळखीचे वाटते. भाषाच फक्त हा अनुभव देऊ शकते असे मला वाटते.

एखादे गावाचे चित्र तुम्हाला भावनिक करू शकते, एखादे मराठी गाणे तुम्हाला जुन्या दिवसांच्या सावलीत घेऊन जाते, पण हेलासकट बोललेले एखादे मराठी वाक्य तुम्हाला संपूर्ण मराठी जगण्याचा आनंद देते हे जाणवणे मला इतके स्तंभित करून गेलेय की, आज अनेक वर्षे झाली तरी त्या बाईंचे शब्द माझ्या कामात फुलांसारखे ताजे आहेत. ही ताकद भाषेची आहे. दुसरे म्हणजे गाणे ऐकणे, चित्र पाहणे हा वैयक्तिक अनुभव आहे. पण भाषेचे मात्र तसे नाही. ते संवादिक असल्याने दुसरा तिथे असावाच लागतो. तो समूहाचा अनुभव आहे. म्हणजे आपण रोजचे आयुष्य जगत असताना काही लोकांसोबत आपल्या भागातले आयुष्यही जगतोच. म्हणून भाषेची अनुभूती वैश्विक जाते हे परदेशात पोटातून जाणवते.

अमेरिकेत दर दोन वर्षांनी मराठी लोकांचे एक गेट टु गेदर असते. तिथे तर ४-५ हजार मराठी माणसे सतत चार दिवसरात्र मराठी बोलत असतात. मराठी जगत असतात. मायभूमीपासून दूर मराठी जगायचे संपूर्ण अनुभव देणारी एकमेव गोष्ट म्हणजे मराठी भाषा.

टागोर गेलेल्या आयुष्याबद्दल म्हणतात, तुम्हाला नदीच्या त्याच पाण्यात पुन्हा पाय घालून बसता येत नाही; कारण, ते पुढे निघून गेलेले असते. पण, मला परदेशात असताना वारंवार त्याच पाण्यात पाय घालून बसता आले, त्या जुन्या दिवसांत जाऊन तुकड्यांनी का होईना, पण जगता आले. याचे कारण होते तिथे जिवंत असणारी मराठी भाषा.

आता सगळे सोडून परतल्यावर जर कोणी विचारेल की, माझ्या दीर्घ परदेशी वास्तव्यातले मन मोहरून टाकणारे क्षण कोणते तर मला तिथली टापटीप, शांतता, चकचकीत गाड्या आणि झुळझुळीत रस्ते, ताशीव इमारती, प्रचंड मॉल्स हे काहीही आठवणार नाही; पण, खचितच आठवेल ते विमानात बसलेल्या त्या आखीव हालचालीत आणि कडक इस्त्रीच्या चेहऱ्यात एखादी आई चिमुरड्याला आता झोप, नाहीतर बुवा येईल, असे सांगते, एखाद्या मॉलमध्ये फिरत असताना एकदम कोणीतरी 'चैयला, हे सेल म्हणजे यात काढायचे धंदे आहेत' असे सणसणीत वाक्य म्हणतो, एखाद्या डीस्नेवर्ल्डसारख्या अम्युझमेंट पार्कमध्ये रांगेत उभे राहून कंटाळले असताना एकदम कुठून तरी 'जाम भूक लागलीय यार. साले इथे वडा का नाही विकत' असे जिभेवर लाळ सोडणारे एखादे वाक्य. माझ्या एका मैत्रिणीने तिच्या नवऱ्याला एकदम चिडून 'भ'वरून शिवी दिली आणि लगेच शेजारच्या घरातून आवाज आला, 'अरे तुम्ही पण मराठी आहात' आणि त्या आवाजाची बाई तिची जन्माची मैत्रीण होऊन बसली.

शांत आणि गंभीर अशा तिथल्या ग्रंथालयात शांततेचा भंग करणारे एखादे मराठी खो खो हसणे ऐकू येते, इतकेच कशाला तिथल्या आलिशान बसमधून एकदा प्रवास करताना एकदा मला एकदम मागून 'या चिमण्यांनो...' हे खळे यांचे गाणे ऐकू आले आणि पाठोपाठ 'आयला हा खळे बाप माणूस आहे रे' अशी हळवी दाद येते, तिथल्याच १५ ऑगस्टच्या कार्यक्रमानंतर 'ने मजसी ने' हे गाणे पाणावल्या डोळ्यांनी गुणगुणत आलिशान मर्सिडीझमध्ये बसणारा लक्षात राहिलेला तो मराठी चेहरा.... इतके सारे माझ्या स्मरणाच्या गाठोड्यातून पटकन उड्या मारत बाहेर येईल. मी एकदा तिथे असताना एक मराठी कवितांचा ऑपेरा बसवला होता आणि त्यांत शेवटी सुरेश भटांचे 'लाभले भाग्य आम्हास बोलतो मराठी' हे गाणे सुरू झाले तेव्हा समोरचा हजारांचा मराठी जनसमुदाय एखादे राष्ट्रगीत म्हणावे तसा अचानक उठून उभा राहिला तेव्हा मराठी भाषेची अनुभूती वैश्विक असण्याचा एक विलक्षण, कधीही न विसरता येणारा अनुभव माझ्या

जगणे मग ते विश्वाच्या कोणत्याही टोकाला का असेना... आपला एक मनातला गाव जपता यावा, मखमली नात्यांचा घरठाव बांधता यावा, या ओळखीच्या गल्ल्यातून आयुष्याचा पडाव टाकता यावा आणि त्या रस्त्यांवरच्या रहदारीला आतड्याचा लगाव असावा अशी आयुष्याची दंतकथा करण्याचे अदम्य सामर्थ्य मराठी भाषेत आहे हे मात्र मला परदेशात अगदी पोटातून वाणवले आहे.

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)

तिसऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनात दि. १३ व १४ ऑगस्ट २०११ रोजी सिंगापूर येथे अध्यक्ष म्हणून बोलताना **महेश एलकुंचवार** यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा संपादित अंश.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

# समूहाचा चैतन्यशाली आविष्कार

**महेश एलकुंचवार**

विश्व मराठी साहित्य संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून मला निमंत्रण आले. ते अनपेक्षित होते. साहित्य संमेलने, पुस्तक यात्रा, गर्दी यांपासून दूर राहण्याचाच माझा स्वभाव आहे हे एक व दूसरे असे की, या ठिकाणी जाऊन आपण काही महत्त्वाचे योगदान करू शकू की नाही, याची मला स्वत:लाच एवढी शंका असते की हे प्रसंग मी टाळतोच.

या वेळी मात्र श्रीमती उषा तांबे यांचा दूरध्वनी आला व त्यांनी मला आवर्जून निमंत्रण दिले ते मी आनंदाने स्वीकारले. एकतर या संमेलनासाठी निवडणूक नसते, मारामाऱ्या नसतात, तर उलट अत्यंत सन्मानपूर्वक आमंत्रण असते. दुसरे असे की, जगभर विखुरलेले मराठी भाषक मराठी साहित्याच्या प्रेमाने तीन-चार दिवस लांबचा प्रवास करून अनेक अडचणींचा सामना करून एकत्र येतात ही मला फार अद्‌भूत व आनंददायक गोष्ट वाटते. तेव्हा अशा आनंदोत्सवात सामील होण्याचे निमंत्रण मिळाल्यानंतर मला आनंद झाला व कृतज्ञताही वाटली.




जगात असंख्य भाषा आहेत व त्या बोलणारे अनेक मानवसमूह आहेत. त्यातल्या प्रत्येकालाच आपापली भाषा गोड वाटते व त्या भाषेशी त्यांचा भावनिक अनुबंध जुळलेला असतो. मराठी माणसांना मराठी भाषेची अशीच ओढ वाटते, हे स्वाभविकच आहे. कारण, भाषा हा काही फक्त देवघेवीचा व्यवहार नसतो. त्या भाषेशी आपली मने, आपले संस्कार, संचित व आपली संस्कृती जुळलेली असते. एरवीच्या जगण्यात या गोष्टी आपल्याला जाणवत नाहीत. पण, परक्या देशात आपल्या भाषेचा एखादा शब्द जरी कानावर पडला तरी आपली मनोवस्था कशी बदलते व आपल्या हळव्या जागा कशा उमलून येतात याचा अनुभव मी स्वत:च अनेकदा घेतला आहे. नुसत्या एखाद्या शब्दाने आपल्या रक्तात पेरले गेलेले शतकानुशतकांचे संस्कार व संचित जागे होते व आपल्याला आपल्या स्वायत्त अस्तित्वाची जाणीव होते.


ज्या मानवसमूहाने आपली भाषा गमावली-हरवली आहे. त्यांची संस्कृती मृतप्राय व्हायला वेळ लागत नाही. कारण, भाषा हा संस्कृतीचाच हुंकार असतो. संस्कृती व भाषा यांचा नाळेचा संबंध असतो व एकाशिवाय दुसरे जगू शकत नाही. विस्थापित झालेली, आपली मुळे सोडून दूरदेशी स्थायिक झालेली माणसे म्हणूनच आपली भाषा जिवंत राहावी म्हणून निकराची धडपड करत असताना दिसतात.

जगातल्या असंख्य भाषांमध्ये मोठे समूह बोलणाऱ्यांमध्ये मराठीचा पंधरावा क्रमांक लागतो. म्हटले तर तशी ही अभिमानाची गोष्ट आहे. पण आपण खूप लोक मराठी बोलतो म्हणून ती महत्त्वाची आहे, असे आपण समजू लागलो तर आपली दिशाभूल होते आहे किंवा 'भाषा' या वस्तुस्थितीचे भान आपल्याला नाही, असे मला खेदाने म्हणावे लागते. जागतिक भाषेच्या उतरंडीमध्ये आपला क्रमांक पंधरावा असेल पण ती महत्त्वाची भाषा आहे असे काही जागतिक मत नाही. मराठी साहित्याबद्दल जागतिक साहित्य व्यवहारात कधी काही बोलले गेले आहे किंवा मार्केझ, लोर्का, कुंदेरा यांच्या नावाचा जसा सर्वत्र दबदबा आहे तसा मराठी लेखकांच्या नावाचा दबदबा आहे, असे दिसत नाही. दबदबा तर सोडाच; पण, अशी काही भाषा आहे व तीत बरेवाईट काही लिहिले जात आहे, हेही जागतिक विचारवंतांच्या खिजगणतीत नसते.

जागतिक व्यवहारात, मला वाटते, कोणतीही भाषा महत्त्वाची ठरते ती अगदी वेगळ्या, साहित्यबाह्य कारणांनी; व तसे महत्त्व एकदा तिला प्राप्त झाले की मग त्या भाषेतल्या साहित्याबद्दल जगात कुतूहल जागे होते. एखाद्या विशिष्ट मानवसमूहाची

राजकीय सत्ता व आर्थिक सत्ता किती प्रबल आहे. जागतिक घडामोडींना या दोन गोष्टींमुळे किती आव्हान मिळते त्यावर तो मानवसमूह व मग त्याची भाषा यांचे महत्त्व ठरते. साहित्य ही तशी नगण्यच गोष्ट आहे. जागतिक राजकीय घडामोडीत चीन हे एक आक्रमक शक्तिसंपन्न राष्ट्र आहे म्हणून मँडारिनला जेवढे महत्त्व आहे किंवा अमाप धनशक्ती ज्यांच्याजवळ आहे त्या अरब राष्ट्रांची भाषा यांना जे स्थान व मान जागतिक उलाढालीत आहे, ते स्थान एकाही भारतीय भाषेला नाही आणि २६ महत्त्वांच्या भाषांमधली एक मराठी ही वस्तुस्थिती लक्षात घेतली की, आपण कुठे आहोत ते लक्षात यायला वेळ लागत नाही.

मराठी भाषेची अवनती होऊ लागली आहे, ती मरणपंथाला लागली आहे, आणखी १०० वर्षांनी ती राहीलीच तरी एक बोलीभाषा -dilect- म्हणूनच ती राहील असे अनेकदा बोलले जाते व त्यावर विचार करावा इतकी ती गंभीर गोष्ट नक्कीच आहे. पण, अशी अवस्था आपल्या भाषेला का यावी याचे वस्तुनिष्ठ वैचारिक विश्लेषण करण्याऐवजी मराठी बोलणारे सगळे लोक साधारणतः एकमेकांवर दोषारोपण करण्यातच गुंतलेले असतात. भाषा जिवंत व प्रवाही ठेवण्याची जबाबदारी जणू काही विशिष्ट वर्ग, काही व्यक्ती मुख्यतः शासन ह्यांची आहे व ही जबाबदारी हे घटक नीट पार पाडत नाहीत म्हणून ही सगळी भाषिक अवनती झालेली आहे, आपला त्यात काही संबंध नाही किंवा हातभार नाही अशी खूपच लोकांची प्रामाणिक व गंभीर समजूत असते.




मला वाटते की हे अर्धसत्य आहे; पण तेच पूर्ण आहे असे उच्चरवाने सांगून आपण संभावितपणे नामानिराळे तर राहत नाही ना, हे आपण तपासून पाहू या.

एक महत्त्वाची गोष्ट उरतेच ती अशी की मराठी भाषकांचा समूह म्हणून' आपण आपल्या भाषेसाठी काय करतो? लोकशाहीचा एक सोयीस्कर व विपरीत असा अर्थ आपल्या सोयीने आपण लावतो व सर्व गोष्टींची जबाबदारी शासनावर टाकून हात झटकून मोकळे होतो. काय करायचे ते सर्व शासनाने, मी इकडची काडी तिकडे करणार नाही, असा एक विचित्र समज आपल्याकडे आहे. मी कुठलीच जबाबदारी घेणार नाही, कुठलेच कर्तव्य पार पाडणार नाही, सगळे शासनाने करावे.

मी फक्त त्याची फळे खाणार, हा काय प्रकार आहे? शासन बिनचेहऱ्याचे असते, सत्ता मिळवणे व टिकवणे, भल्याबुऱ्या मार्गाने सगळे सगळ्या मार्गांनी आपल्याच बुभुक्षित पोटात ढकलणे यातच शासन गुंतलेले आहे की, काय अशी शंका यावी, अशी सध्या परिस्थिती आहे. शासनाचे भाषेचे व संस्कृतीचे प्रेम दिखाऊ व मंत्र्यांनी सोहळ्यांमधे मिरवण्यापुरतेच आहे. त्यामुळे भाषेसंबंधी विचार करताना मी या घटकाचा विचारच फारसा करत नाही. पण, सर्व गोष्टींची सुरवात आपल्यापासून करावी म्हणून मी स्वतःलाच काही प्रश्न विचारतो. मी मराठी भाषा निखळ शुद्ध, इंग्लिश किया इतर भाषांमधील शब्दांचा वापर न करता बोलतो का? माझ्या घरात, बाहेर बाजारात, व्यवहारांत महाराष्ट्र तरी मराठी आग्रहाने बोलतो का? मी किती मराठी पुस्तके विकत घेतो व वाचतो? माझ्या मुलांना इंग्लिश माध्यमांच्या शाळात घातले असले तरी त्याची मराठी भाषेशी नाळ तुटणार नाही, त्यांच्या अवतीभवती मराठी भाषा व पुस्तके असतील अशी खबरदारी घेतो का? माझा व्यवहार आग्रहाने मराठीत करतो का?

म्हटले तर हे कमालीचे साधे प्रश्न आहेत. पण, त्यांची उत्तरे आपण प्रामाणिकपणे दिली तर आपण अस्वस्थ होऊ अशी ती असतील. आम्ही नागर मराठी भाषाविहीन होत चाललो आहोत कारण जगण्याच्या शर्यतीमध्ये धावताना आम्ही तेवढी किंमत देऊन कणाहीन आयुष्य जगायला तयार आहोत. एक काळ असा होता की, मराठीतले उत्तुंग लोक इंग्लिश भाषेमध्ये लिहून आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळवण्याचा मोह निर्लेपपणे झटकून आग्रहाने मराठीतच लिहित राहिले; कारण, हे मी माझ्या माणसांच्या प्रबोधनासाठी घेतलेले व्रत आहे अशी त्यांची निष्ठा होती. चिपळूणकर, राजवाडे, रियासतक सरदेसाई, शेजवलकर, टिळक, केतकर, म. म. काणे अशी किती नावे घ्यावीत? पहाडासारख्या माणसांनी पहाडासारखे काम करून ठेवले आहे व आपण या वारशाला करंटेपणाने मुकलो आहोत. तेव्हा तो चालू ठेवण्यासाठी आपण काही निग्रह व निष्ठा बाळगल्या पाहिजेत एवढेही भान आम्हाला राहिलेले नाही. आम्ही इंग्लिश माध्यमांमध्ये शिकलो म्हणून आम्हाला मराठी नीट येत नाही हे समर्थन नुसते हास्यास्पद नाही, तर लाजिरवाणे आहे. आम्ही आळशी आहोत व स्वभाषेचे प्रेम आपल्याला राहिलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. शासनाच्या डोक्यावर खापर फोडल्याने ती कशी झाकली जाणार?

आपला वैचारिक घोटाळा एवढा आहे की आम्ही म्हणजे 'नागर' मराठी भाषक एवढेच काय ते भाषेच्या जडणघडणीसाठी, उद्धारासाठी किंवा अवनतीसाठी जबाबदार

आहोत असे आपण नकळत गृहित धरलेले असते.

महाराष्ट्रातल्या हजारो खेड्यांमधे बोलल्या जाणाऱ्या मराठी भाषेचा काहीही विचार गृहित धरत नाही, अगदी आजही जी मराठी बोलली जाते ती कमालीची सशक्त, चित्रमय व ऊर्जेने भरलेली आहे. खेडी आहेत तोपर्यंत तरी मराठी अनेक रूपात जिवंत राहील, ह्याची मला खात्री आहे. सुदैवाने खेड्यात राहून लेखन करणारे अनेक लेखक गेल्या दोन दशकांत उदयाला आलेले आहेत व त्यांच्या भाषेचे व साहित्याचे मूल्य वादातीत आहे. ही परिस्थिति किती काळ टिकेल याची मात्र खात्री नाही. जागतिकीकरणाच्या व शहरीकरणाच्या रेट्यात खेड्यांची वाताहात होऊ लागली ती आपण पाहतच आहोत. त्यामुळे १०० वर्षांनंतरचा काळ कसा असेल याचा अंदाज करता येणे कठीण आहे. पण, आज तरी नागर मराठी कमालीची साचेबद्ध, मर्यादित व सत्त्वहीन होत चाललेली आहे, त्याच्या अनेक कारणांपैकी एक म्हणजे आपला ग्रामीण जीवनाशी व भाषेशी असलेला संबंध विसविशीत झालेला आहे. अनेकांचा तर तो तुटलेलाच आहे. भाषा अखेर एका चैतन्यमय अभंग समूहाचे आविष्करण असते व असा समाज आपल्यापासून दूर गेलेला असला तर आपली भाषा आपोआपच सांकेतिक व मर्यादित होत जाते. अगदी ५० वर्षांपूर्वी सर्रास वापरात असलेले अनेक शब्द आताच्या पिढीला माहीतही नाहीत. बदलेल्या जीवनशैलीमुळे त्या शब्दांबरोबर असलेले अर्थसंकेत नाहीसे झालेले असतात हे तर खरेच; पण, सहजपणे इंग्रजी शब्द सुचतो तिथे आठवून कोण मराठी शब्द वापरणार असा एक बौद्धिक आळसही त्यात असतो.



मराठीच्या या अवस्थेला इंग्रजीचे आक्रमण मुख्यतः जबाबदार धरले जाते. होय, तसे असेल. पण आपण ते आक्रमण का होऊ देतो याचा विचार आपण करत नाही. उत्तम इंग्रजी आल्याने आपली मातृभाषा भेसळीची होते असे बोलणे म्हणजे स्वतःची फसवणूक आहे. माझा तर असा अनुभव आहे की, जितक्या जास्त भाषा आपल्याला येतील तितकी आपली स्वभाषा अधिकाधिक समृद्ध होत जाते. अनेक भाषांच्या अभ्यासाने बुद्धीला व मनाला जबाबदारीने वागण्याची शिस्त लागते. ही बौद्धिक शिस्त आपण शिकलेली माणसे जोपर्यंत लावून घेत नाही, तोपर्यंत मराठीच्या दुर्दशेबद्दल बोलण्याचा आपल्याला काही अधिकार नाही. मराठीच्या किंवा इतरही भारतीय भाषांच्या, बंदिस्तपणाने व त्यांच्या संकुचित होत जाण्याने आणखी एक कारण मला दिसते ते आपल्या वेगाने बदलत जाणाऱ्या जीवनशैलीशी संबंधित आहे. अगदी ५०-६० वर्षांपूर्वीही नागर जीवन ग्रामीण जीवनाशी अनेक प्रकारांनी जुळलेले होते व त्यामुळे दोन्ही जीवनशैलीमध्ये भाषेची चैतन्यमय देवाणघेवाण व चलनवलन होत होते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपले जगणे बदलत चालले, तंत्रयुगात आपण आधी पाऊल टाकले व आता तर ते पूर्णपणे आत्मसात करण्याइतपत आपली तयारी झाली आहे. याचे इतर काय व्यावहारिक फायदे झाले असतील ते असोत; पण त्यामुळे भाषिक नुकसान मात्र भरपूर झालेले आहे व त्याचे कारण म्हणजे हे तंत्रज्ञान आपण आयात केलेले आहे, ते इथल्या भूमीत जन्मून इथेच विकसित झालेले आहे, असे झालेले नाही. या आयातीबरोबरच त्या ज्ञानाबरोबर आलेले संबंधित शब्दही आपण सर्रास वापरू लागलो; कारण एकतर त्यासाठी पर्यायी मराठी शब्द उपलब्ध नव्हते व ते निर्माण करण्याचे कष्टही आपण घेतले नाहीत. चीन व जपानने ते घेतले व आपण नाही हा या देशांमधला व आपल्यामधला फरक आहे व तो या देशांनी व आपण केलेल्या प्रगतीमध्येही स्पष्टपणे दिसतो.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

आतापर्यंतच्या भाषणात मी फक्त भाषाविषयक प्रश्नांबद्दल बोललो पण मराठी साहित्याबद्दल बोललो नाही. तसे करण्याचा माझा विचारही नाही. इतर भारतीय भाषांमधील साहित्य व मराठी साहित्य, जागतिक वाङ्मय व मराठी साहित्य यांची तुलना आपण निःपक्षपातीपणे केली तर फार आनंदाचे भरते यावे, अशी काही स्थिती नाही. मराठी भाषेबद्दल बोलताना ज्ञानेश्वर, तुकाराम यांची नावे घेऊन आपण रोमांचित होतो हे ठीक आहे. पण, आजचे काय? आजचे मराठी साहित्य नक्की कुठे आहे, त्याचा पल्ला किती, त्याची लांबी-रुंदी, उंची खोली किती याची कठोर चिकित्सा कधीतरी व्हायला पाहिजे. ती केल्याशिवाय आपण नवे दरवाजे उघडणार नाही व नवे प्रदेश तुडवणार नाही. आत्मसंतुष्टतेसारखा आजार नाही. तो बाजूला करून आपली मनोभूमी अधिकाधिक संपन्न करणे ही कुठल्याही इमानदार लेखकाची प्राथमिक जबाबदारी असते. ती आपण कशी उचलतो व ती कितपत पेलवते यावरच मराठी साहित्याचे भवितव्य ठरणार आहे. हा खरेतर एक स्वतंत्र चिंतनाचा विषय आहे. त्याचे सूतोवाच इथे करून मी आपले भाषण संपवतो. धन्यवाद!

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)

# मराठीच्या संवर्धनासाठी...

राज्यकारभाराची भाषा म्हणून मराठीचा संबंध यादवकालापर्यंत पोहोचतो. यादवकालातील मराठीतील शिलालेख ताम्रपट त्याची साक्ष आहेत. याच कालावधीत संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांसारख्या संतांच्या अभंगवाणीने मराठी भाषा समृद्ध व अमर होत होती. यादवकालीन राज्यकारभारातील मराठीची परंपरा पुढे मुसलमानी आमदानीत खंडित झाली व राज्यकारभारात फारसी शब्दांचा मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेनंतर (इ.स.१६७४) राज्याभिषेक शक सुरू केला. त्यांनी अष्टप्रधान मंडळ स्थापन केले व त्यांची संस्कृत पदनामे प्रचारात आणली. तसेच रघुनाथपंत हणमंते या मंत्र्याकरवी फारसी शब्दांचे व काही मराठी शब्दांचे संस्कृत पर्याय देणारा राज्यव्यवहार कोश तयार करून घेतला. त्यामध्ये सुमारे दीड हजार शब्दांचा विचार करण्यात आला. त्याचप्रमाणे लेखनपद्धती सांगणारी पुस्तके व अधिकाऱ्यांच्या कामासंबंधातील नियम तयार करण्यात आले. शिवकालातील या स्वभाषाभिमान परंपरेतूनच पुढील काळात कार्यालयीन पत्रव्यवहाराच्या पद्धती सांगणारा 'लेखन कल्पतरू' हा ग्रंथ निर्माण झाला.

पुढे पेशवे काळात मराठीवरील फारसीचा प्रभाव कमी न होता तिला संस्कृत-फारसी संकराचे स्वरूप प्राप्त झाले. १८१८ साली पेशव्यांची सत्ता पालटवून इंग्रजी अंमल सुरू झाल्यावर संस्थानिकांनी पेशवेकालीन मराठीचे संस्कृत-फारसी संकरित स्वरूप तसेच चालू ठेवले. त्यामध्ये इंग्रजी शब्दांचा भरणा झाला. जत संस्थानात इ.स. १९३५ च्याही आधीपासून गॅझेट या अर्थी राजपत्र हा शब्द रूढ करण्यात आला होता. तो शिवकालीन राज्यव्यवहार कोशातील राजपत्रक या शब्दातून घेतला असण्याची शक्यता आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात, भारताच्या संविधान निर्मितीनंतर भाषावार राज्यनिर्मितीपूर्व भाषाविषयक धोरण राबवण्यात भारताच्या घटकराज्यांपैकी मध्यने आघाडी मारली. या घटक राज्याने हिंदी व मराठी या प्रादेशिक भाषांना राजभाषा म्हणून घोषित केले. तसेच स्वतंत्र भाषा विभाग स्थापन केला. हिंदी व मराठी भाषा तज्ज्ञांची एक समिती नेमली व राज्यकारभाराच्या परिभाषेचा अधिकृत प्रशासन शब्दकोश निर्माण केला. भाषावार राज्यनिर्मितीपूर्व - मध्य प्रदेशात १९३५ पासून सुमारे तीन वर्षाहून अधिक काळ मराठी ही राजभाषा म्हणून प्रचलित होती. मध्य प्रदेशातील भाषा विभागाने वाक्प्रयोगांचा वाक्यांशांचा संग्रह केला व प्रशासन शब्दावली या नावाने चार पुस्तिका प्रसिद्ध केल्या. तसेच कार्यालयीन टिप्पणी, मसुदे, आदेश इत्यादींच्या नमुन्यांची मार्गदर्शिका नावाची पुस्तिकाही तयार केली. बडोदे संस्थानात 'श्री सयाजीशासनशब्दकल्पतरू' हा अनेक भाषी प्रशासन कोश तयार करण्यात आला होता. त्यामध्ये इंग्रजी संज्ञांना संस्कृत, हिंदी, मराठी व गुजराती पर्याय देण्यात आले होते. राज्यकारभारातील मराठी भाषेची ही पार्श्वभूमी पुढे महाराष्ट्र राज्यात मराठीच्या विकासाला उपयोगी ठरली. (संदर्भ शासनव्यवहारात मराठी, पृ. ७८)

### भाषा संचालनालय

भाषावार प्रांत-रचनेची मागणी, अनेक राज्यांतून करण्यात येत होती. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात मराठी भाषेची मागणी प्रकर्षाने पुढे आली. भारताच्या संविधानामध्ये अनुच्छेद ३४७ अनुसार राष्ट्रपतींना एखाद्या राज्यातील लक्षणीय प्रमाणातील लोकांकडून बोलल्या जाणाऱ्या कोणत्याही भाषेला अधिकृतरीत्या राजभाषा म्हणून मान्यता देण्याची व तरतूद आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शासनाची जी महत्त्वाची धोरणे जाहीर केली त्यापैकी महाराष्ट्राच्या राज्यकारभाराची भाषा मराठी राहील, हे एक धोरण होय. त्यानुसार राजभाषा मराठीचा शासन व्यवहारात वापर करण्याबाबतचे ही शासनाचे धोरण राबवण्यासाठी शासनाने
६ जुलै १९६० अन्वये भाषा संचालनालयाची स्थापना केली. तसेच १९६६-६७ मध्ये अल्पसंख्याक भाषांना संरक्षण देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार नवी मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथे विभागीय (प्रादेशिक) कार्यालये उघडण्यात आली.

### स्थूलमानाने भाषा संचालनालयातील कामकाजाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल

१. राजभाषा मराठीविषयक शासनाचे धोरण राबवणे.
२. प्रशासनिक परिभाषा कोश व मार्गदर्शक पुस्तिका तयार



करणे.

३. महाविद्यालयीन अभ्यासासाठी शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश तयार करणे.
४. विधिविषयक अनुवाद व परिभाषा तयार करणे.
५. अर्थसंकल्पीय तसेच प्रशासनिक व विभागीय नियमपुस्तिकांचा अनुवाद करणे.
६. अमराठी कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी मराठी भाषा प्रशिक्षण व परीक्षा आयोजित करणे.
७. अ) हिंदी भाषा परीक्षा आयोजित करणे
   ब) महाराष्ट्र राज्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयात त्रिभाषा सूत्राचा वापर करणे.
८. इंग्रजी टंकलेखक व लघुलेखक यांच्या मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण आणि परीक्षा आयोजित करणे.
९. अल्पसंख्याक भाषांतून अनुवाद करणे. शासन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी या दृष्टीने कार्यालयांची तपासणी व त्यांना मार्गदर्शन करणे.

## राजभाषा धोरण

सन १९६५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ (महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४) अन्वये मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला व तिची लिपी देवनागरी असल्याचे जाहीर करण्यात आले. अशा रीतीने मराठी भाषा ही, वर्जित प्रयोजनांव्यतिरिक्त इतर प्रयोजनांसाठी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४५ मध्ये उल्लेख केलेल्या सर्व शासकीय प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्यात उपयोगात आणावयाची भाषा झाली. भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये एकूण २२ भाषांचा निर्देश असून, त्या सूचित 'मराठी' ही क्रमांक १३ वर दर्शविण्यात आली आहे. मराठी राजभाषा असल्याचे घोषित करणारा कायदा विधानमंडळात मंजूर होऊन दिनांक ११ जानेवारी १९६५ रोजी महाराष्ट्र राजपत्रातून जाहीर झाला व तद्न्वये मराठीचा राज्य कारभारात जास्तीत जास्त वापर करण्याचे ठरले. राजभाषा मराठीविषयक शासनाचे धोरण राबवताना या धोरणामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

१. आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विविध विषयावरील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा कोश तयार करणे, शासन व्यवहारासाठी आवश्यक परिभाषा घडविणे, शब्दावल्या तयार करणे.
२. केंद्रीय व राज्य अधिनियम, नियम यांचा मराठी अनुवाद करणे, तो मुद्रित स्वरूपात तसेच संकेतस्थळावर जनतेला उपलब्ध करून देणे.
३. केंद्राच्या त्रिभाषासूत्रानुसार हिंदी राष्ट्रभाषेचा प्रसार होत असल्याचे पाहणे.
४. राष्ट्रीय ऐक्यासाठी मराठी संज्ञा व हिंदी संज्ञा यांच्यात हिंदीशी एकरूपता ठेवण्याचा प्रयत्न करणे.
५. मराठी शुद्धलेखनाचा प्रसार करणे.
६. विधान भवन, उच्च न्यायालय व इतर कार्यालयांमधील अनुवादकांशी संवाद साधून संज्ञामध्ये एकरूपता राखणे.
७. भाषातज्ज्ञांच्या नामिकेमार्फत इंग्रजी व उर्दू या भाषांमध्ये मानधन तत्त्वावर अनुवाद करून देण्याची सोय करणे.
८. केंद्र सरकार, महामंडळे इत्यादीकडून आलेले अहवाल इत्यादी अनुवादाचे काम मानधन तत्त्वावर करून देणे.
९. मराठी व हिंदी भाषा परीक्षा व टंकलेखन व लघुलेखन परीक्षांसाठी आवेदनपत्रे व परीक्षांची वेळापत्रके, प्रश्नसंच संकेतस्थळावरून उपलब्ध करून देणे.



१०. टंकलेखन परीक्षा संगणकावर घेणे.
११. शासकीय कार्यालयांतून मराठीचा शंभर टक्के वापर होत असल्याची खात्री करून घेण्यासाठी कार्यालयीन तपासण्या आयोजित करणे.
१२. आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे मराठीच्या विकासासाठी विविध क्षेत्रांचा शोध घेणे व नवनवीन उपक्रम राबवणे.
१३. कोश व पुस्तिका तयार करणे.

मराठीचा शासन व्यवहाराची भाषा म्हणून विकास घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १९६० मध्ये सामान्य प्रशासन विभागांतर्गत भाषा संचालनालयाची स्थापना केल्यानंतर मराठीतील नामवंत कोशकार, भाषातज्ज्ञ, पत्रकार व समाजप्रबोधक यांचा अंतर्भाव असलेले एक भाषा सल्लागार मंडळ नेमण्यात आले. या सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली शासन व्यवहारातील मराठीची जडणघडण करण्याचे काम सुरू झाले. विविध विषयातील शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा निर्मितीसाठी महाराष्ट्रामधील प्रत्येक विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापक प्रतिनिधींचा अंतर्भाव असलेल्या उपसमित्या स्थापन करण्यात आल्या व त्यांच्या साहाय्याने परिभाषा निर्मितीचे काम करण्यात आले.

परकीय राजवटीचा अस्त झाल्यानंतरही शासकीय कामकाजातील इंग्रजी भाषेच्या वापरामुळे शासन यंत्रणा व सामान्य माणूस यांच्यामध्ये जो दुरावा निर्माण झाला होता तो नाहीसा करून आत्मीयतेची व विश्वासाची भावना निर्माण करणे अगत्याचे होते. त्यासाठी शक्य तितक्या लवकर प्रशासनात मराठीचा वापर सुरू करण्याचे शासनाचे धोरण होते. तसेच प्रादेशिक विविधता दूर करून नेहमी वापरले जाणारे इंग्रजी पारिभाषिक शब्द, पदनामे व वाक्प्रयोग यांचे पर्यायी मराठी शब्द व पदनामे आणि वाक्प्रयोग यांत एकरूपता असणेही अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी भाषा संचालनालयाने भाषा सल्लागार मंडळाच्या सल्ल्याने पदनाम कोश, प्रशासनिक वाक्प्रयोग, प्रशासनिक लेखन, वित्तीय शब्दावली आणि शासन व्यवहार कोश ही पुस्तके प्रसिद्ध केली.

पदनाम कोश प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर अनुकूल व प्रतिकूल असे अभिप्राय व्यक्त करण्यात आले. यासंबंधात व्यक्त करण्यात आलेल्या शंकांचे निरसन व्हावे म्हणून आणि शासन व्यवहाराच्या भाषेसंबंधीची शास्त्रीय व्यावहारिक भूमिका स्पष्ट करावी; तसेच परिभाषा निर्मितीच्या प्रश्नासंबंधीचे शास्त्रसंमत विचार लोकांना कळावेत आणि राज भाषेसारख्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या विषयाबाबत एक जाणते लोकमत तयार व्हावे, या विधायक दृष्टिकोनातून 'शासन व्यवहारात मराठी' हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले. पारिभाषिक संज्ञांच्या संबंधात सदैव टीका करणाऱ्या व्यक्तींनी टीका करण्याआधी हे पुस्तक वाचून परिभाषा निर्मितीची समस्या, स्वरूप व प्रक्रिया समजावून घेतली तर त्यांच्या अनेक शंकाचे आपोआप निरसन होऊ शकेल.

शासनाच्या दैनंदिन कामकाजात टिप्पणी लेखन करताना वारंवार येणारे वाक्प्रयोग 'प्रशासनिक वाक्प्रयोग' या पुस्तकात दिले आहेत तर 'प्रशासनिक लेखन' या पुस्तकात काही प्रकरणे संपूर्णपणे मराठीतून कशी हाताळता येतात हे दर्शवले आहे. त्याचबरोबर पत्रलेखनासाठी प्रमाण नमुन्यांचा मराठी अनुवादही दिला आहे. 'वित्तीय शब्दावली'मुळे अर्थसंकल्पीय प्रकाशनांच्या अनुवादात एकरूप वित्तीय संज्ञांचा वापर करण्यात बरीच मदत झाली. शासकीय कार्यालयातील अर्धसंल्पीय कामकाजाच्या दृष्टीने 'वित्तीय शब्दावली' या प्रकाशनाची उपयुक्तता थोडी वेगळ्या प्रकारची आहे. भारत सरकारने १ एप्रिल १९९१ पासून लेख्यांचे नवीन लेखांकन वर्गीकरण अंमलात आणले. परिणामी अर्थसंकल्पीय शीर्षांमध्येही फेरफार झाले. भारत सरकारने अर्थसंकल्पीय शीर्षांची नवीन सूची तयार केली. भाषा संचालनालयाने या सूचीच्या मराठीकरणाचे काम तातडीने हाती घेऊन पूर्ण केले व 'वित्तीय शब्दावली' या प्रकाशनाच्या सुधारित आवृत्तीत त्याचा समावेश करून सर्व शासकीय कार्यालयांना



अर्थसंकल्पीय कामकाज मराठीतून करण्याच्या दृष्टीने या प्रकाशनांद्वारे उपयुक्त साहित्य उपलब्ध करून दिले.

ही सर्व प्रकाशने मार्गदर्शक स्वरूपाची आहेत. त्यांच्या मदतीने मराठीतून जास्तीत जास्त कामाकाज केले जावे अशी अपेक्षा आहे. सध्या मंत्रालयीन विभागाच्या संख्येत झालेली वाढ व रचनेत झालेले बदल लक्षात घेऊन, पदनामकोशाची जुनी मांडणी बदलण्यात आली. तसेच त्यातील पदनामांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ती विभागवार न देता वर्णानुक्रमानुसार करून सुधारित आवृत्ती मार्च १९९० मध्ये प्रसिद्ध करण्यात आली.

शासन व्यवहारात मराठीचा वापर वाढत्या प्रमाणात व सुलभतेने करता यावा म्हणून या संचालनालयाने, नेहमीच्या कामकाजात ज्या इंग्रजी शब्दांचा, पदनामांचा (महामंडळे तसेच शासन अंगीकृत व्यवसायांसह) वाक्प्रयोगांचा किंवा वाक्खंडांचा वारंवार वापर करण्यात येतो, त्यांचे संकलन व अनुवाद करून

आणि त्यांची उपयुक्तता लक्षात घेऊन 'कार्यदर्शिका' ही पुस्तिका तयार केली. या पुस्तिकेत सरकारने मान्य केलेले शुद्धलेखनाचे नियमही उदाहरण देऊन स्पष्ट केले आहेत. त्याचबरोबर शब्दयोजना, वाक्यरचना यात सामान्यत: आढळून येणारे दोष व इतर संभाव्य लेखनदोषही दर्शविले आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मराठी शुद्धलेखनाच्या बाबतीत योग्य मार्गदर्शन व्हावे, या उद्देशाने भाषा संचालनालयाने डिसेंबर १९८७ मध्ये 'शुद्धलेखन नियमावली' ही पुस्तिका प्रसिद्ध केली. शासकीय कार्यालयांना या पुस्तिकेच्या ५०,००० प्रती विनामूल्य पुरवण्यात आल्या व ५०,००० प्रती प्रत्येकी एक रुपया एवढे नाममात्र मूल्य ठेवून अभ्यासक व आस्थेवाईकांसाठी विक्रीस ठेवण्यात आल्या. १९८७ मध्ये या नियमावलीचे पुनर्मुद्रण (२५,००० प्रति) करण्यात आले व तिची किंमत प्रत्येकी ३ रुपये इतकी ठेवण्यात आली. या पुस्तिकेत




मराठीतील लेखनविषयक नियम सोदाहरण स्पष्ट करून निर्दोष वाक्यरचना कशी करावी याचे मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच शासन व्यवहारात काही वेळा घाईगर्दीत सर्वसामान्यपणे अशुद्ध लिहिल्या जाणाऱ्या शब्दांची एक स्थूलसूची मार्गदर्शनार्थ शेवटी जोडली असून त्यात ते शब्द शुद्ध स्वरूपात लिहून दाखवले आहेत.

### तांत्रिक परिभाषा

१९६४ मध्ये मराठी भाषेला राजभाषा म्हणून मान्यता मिळाली. साहजिकच महाराष्ट्रातील शालेय तसेच विद्यापीठातील शिक्षणाचे माध्यम मराठी असावे व राज्यकारभाराची भाषा मराठी असावी हे सर्वमान्य झाले. परंतु यासाठी निश्चितार्थक व एकरूप मराठी परिभाषा उपलब्ध करून देणे अतिशय आवश्यक होते. अशी एकरूप परिभाषा राज्यातील सर्व विद्यापीठांच्या व मराठी विज्ञान परिषदेच्या सहाकार्याने उपलब्ध करून घ्यावी व ती शक्यतोवर सर्व भारतीय भाषांशी तसेच केंद्र शासनाने तयार केलेल्या परिभाषेशी मिळतीजुळती असावी, अशी शासनाची भूमिका होती.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

पदवीपरीक्षेपर्यंत शिकविले जाणारे शास्त्रीय व तांत्रिक विषय मातृभाषेतून 'मराठीतून' शिकवण्याचा उपक्रम नागपूर व पुणे या दोन विद्यापीठांनी यापूर्वी सुरू केला होता. त्यासाठी मराठीतून पुस्तकेही लिहिण्यात आली. मात्र या दोन्ही विद्यापीठांनी आपापली परिभाषा स्वतंत्रपणे तयार केल्यामुळे तिच्यात एकरूपता नव्हती. तसेच महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाला मराठी माध्यमातून पुस्तके लिहून घेण्यासाठी एकरूप शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा उपलब्ध करून देणे अगत्याचे होते. म्हणून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांना परिभाषा निर्मितीच्या या प्रक्रियेत सहभागी करून घेऊन शास्त्रीय व तांत्रिक विषयांच्या क्षेत्रात एकरूप सुसंघटित परिभाषा तयार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने परिभाषा निर्मितीचे काम ऑक्टोबर १९६७ पासून हाती घेतले. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंची कोल्हापूर येथे एक बैठक घेऊन त्यांच्या संमतीने व भाषा सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली एकरूप परिभाषा निर्मितीचे काम भाषा संचालनालयाकडे सोपवण्यात आले. शासनाने तयार केलेली ही परिभाषा आधारभूत मानून ग्रंथलेखकांनी मूळ मराठीतून लेखन करताना तिचा वापर करावा, त्यामुळे आपोआपच त्यांची विचार प्रक्रियाही मराठीतच होईल. त्यातून नवनवे शब्द घडावेत व मराठी भाषा आणखी समृद्ध व्हावी, असा या परिभाषा निर्मितीमागचा मुख्य उद्देश आहे.

ज्या विषयाची परिभाषा तयार करायची असेल त्या विषयातील तज्ज्ञ व्यक्तींची एक उपसमिती स्थापन करण्यात येते. परिभाषा निर्मितीसाठी भाषा सल्लागार मंडळाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची माहिती या उपसमितीमधील सदस्यांना प्रथम करून दिल्यानंतर संबंधित विषयातील आधारभूत असे ग्रंथ निवडून त्यातील इंग्रजी परिभाषिक संज्ञांची यादी केली जाते व मग या इंग्रजी संज्ञांचे सर्व संभाव्य मराठी पर्याय शोधून त्यांचीही यादी उपसमितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येते. उपसमितीच्या बैठकीत यापैकी प्रत्येक संज्ञेवर चर्चा होऊन सर्व संमतीने नेमका व निश्चितार्थक असा मराठीत पर्याय निवडला जातो. अशा संज्ञेच्या निरनिराळ्या अर्थच्छटादेखील विचारात घेऊन त्याचेही पर्याय निश्चित केले जातात. इंग्रजी संज्ञेचा मराठीमधील पर्याय निश्चित करताना एकार्थता, स्पष्टार्थता, एकरूपता, सघनता, अल्पाक्षरता, सातत्य, संगती इत्यादी गोष्टी लक्षात घेतल्या

जातात. नंतर या बैठकींची कार्यवृत्ते तयार करून मान्य झालेल्या पर्यायांची नोंद केली जाते. सरतेशेवटी बैठका संपल्यानंतर या संज्ञांवर व्याकरण, लिंगनिर्देश, विषयनिर्देश संक्षेप इत्यादी संस्कार करण्यात येऊन त्यांची कोशस्वरूपात मांडणी करण्यात येते व तो मुद्रणासाठी पाठवला जातो. मुद्रण करताना मुद्रित शोधन, आवश्यक दुरुस्ती, इत्यादी प्रक्रिया केल्या जातात.

विद्यापीठीय स्तरावरील शिक्षणाचे माध्यमही मराठी व्हावे या उद्देशाने भाषा संचालनालयाने सल्लागार मंडळाच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या शास्त्रीय व तांत्रिक विषयांतील परिभाषा पर करण्याचे काम हाती घेतले. पदवी परीक्षेला असलेल्या प्रत्येक विषयासाठी एक उपसमिती नेमण्यात आली. या उपसमितीवर प्रत्येक विद्यापीठाचे त्या त्या विषयाचे दोन व मराठी विज्ञान परिषदेचा एक असे प्रतिनिधी नेमून परिभाषा निर्मितीचे काम सुरू झाले. आजतागायत विज्ञान, कला, वाणिज्य, अभियांत्रिकी, वैद्यक, इत्यादी शास्त्रांशी संबंधित असे एकूण ३४ परिभाषा कोश प्रसिद्ध झाले आहेत. त्यामध्ये विकृतिशास्त्र, न्यायवैद्यक व विषशास्त्र, भूगोल, वृत्तपत्रविद्या, जीवशास्त्र (सुधारित), औषधशास्त्र, भाषाविज्ञान व वाङ्मयविद्या, भौतिकशास्त्र, ग्रंथालयशास्त्र, गणितशास्त्र, रसायनशास्त्र व वाणिज्यशास्त्र या कोशांचा समावेश होतो. 'शासन व्यवहार कोश' व 'वित्तीय शब्दावली' या दोन शब्दावल्याही प्रकाशित झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील पाठ्यपुस्तकांमध्ये आणि विद्यापिठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर यांच्यामार्फत प्रकाशित होणाऱ्या विद्यापीठीय स्तरावरील संदर्भ ग्रंथामध्ये या परिभाषेचा उपयोग करण्यात येतो. विविध विषयांच्या या परिभाषाकोशांना बरीच मागणी असल्याने त्यांचे पुनर्मुद्रणही करावे लागते. सध्या 'शासन व्यवहार कोश' व 'प्रशासनिक लेखन' या दोन पुस्तकांचे पुनर्मुद्रण सुरू आहे. अनेक वृत्तपत्रलेखक आपल्या लेखांमध्ये या परिभाषेचा वापर करत असतात. दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून ग्रामीण जनतेसाठी सादर करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमधूनदेखील ही परिभाषा सफाईदारपणे वापरली जात असल्याचे आपण पाहतो. ग्रामीण स्तरावर ही परिभाषा लोकांनी बरीच आत्मसात केलेली आहे. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे शेतकऱ्यांपर्यंत आपले संशोधन पोहोचवण्यासाठी आपल्या विस्तार कार्यक्रमांमध्ये या परिभाषेचा वापर करत असतात. शासनाच्या प्रशासकीय व्यवहारामध्ये पूर्णतः मराठीचा वापर केला जातो.

### विधिविषयक...

राज्य अधिनियम व केंद्रीय अधिनियम यांच्या अनुवादाचे काम या संचालनालयाच्या स्थापनेपासून करण्यात येत आहे. त्यासाठी कायद्याची अशी एक विशिष्ट लेखनशैली या संचालनालयाने विकसित केली असून 'न्याय व्यवहार कोश' हा कोश त्या दृष्टीने प्रकाशित केला आहे. तसेच आतापर्यंत सुमारे




२१२ राज्य अधिनियमांचा व १२६० राज्य नियमांचा अनुवाद करण्यात आला आहे.

न्यायदानात मराठीचा वापर करण्याच्या दृष्टीने विधिविषयक परिभाषा विकसित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली 'विधी अनुवाद व परिभाषा सल्लागार समिती'ची स्थापना केली. केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या इंग्रजी-हिंदी विधी शब्दावलीच्या धर्तीवर मराठी विधी शब्दावली तयार करणे व विधिविषयक प्रारूप लेखनाचे काम करणे, ही मुख्य उद्दिष्टे समितीपुढे होती. न्यायालयांचा व्यवहार मराठी भाषेतून व्हावा यासाठी 'महाराष्ट्र कोड'च्या धर्तीवर 'महाराष्ट्र अधिनियम संग्रहा'चा मराठीमध्ये अनुवाद करण्याचे फार मोठे काम (अदमासे पृष्ठसंख्या ११,४८०) हाती घेतलेले होते. तसेच इंडियन लॉ रिपोर्टसच्या धर्तीवर महत्त्वाच्या न्यायालयीन निर्णयांचा मराठी अनुवाद करण्याचे कामही या कार्यालयात सुरू होते. आतापर्यंत सुमारे १७१ न्याय निर्णयांचा अनुवाद करण्यात आला आहे. भारताच्या संविधानाची मराठीतील अद्ययावत अशी सहावी आवृत्ती काढण्यात आली असून, न्यायालयीन कामकाज मराठीतून करणे सुकर होण्याच्या दृष्टीने नेहमी उपयोगी पडणारे व महत्त्वाचे अनेक केंद्रीय अधिनियम उदा. भारतीय दंड संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, दिवाणी प्रक्रिया संहिता, मर्यादा अधिनियम, पुरावा अधिनियम, संविदा अधिनियम व इतर अनेक केंद्रीय अधिनियम यांचा अनुवाद करण्यात आला आहे. या अनुवादास विधी मंत्रालय, राजभाषा खंड, नवी दिल्ली यांच्याकडून मान्यता मिळवून त्यास राष्ट्रपतींची संमती घेतल्यानंतर ते मराठी भाषेतील प्राधिकृत पाठ म्हणून प्रथम राजपत्रात व त्यानंतर पुस्तकरूपाने प्रकाशित करण्यात आलेले आहेत. मराठी अनुवाद व मुद्रण या कामासाठी झालेल्या खर्चाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून मिळते. आतापर्यंत १५१ केंद्रीय अधिनियमांचा अनुवाद झालेला आहे. शासनाकडून वेळोवेळी काढण्यात येणारे अध्यादेश, विधेयके,

अधिनियम, नियम, विनियम, उपविधी व अधिसूचना यांचा मराठी व काही बाबतीत हिंदी अनुवाद या कार्यालयात केला जातो.

## अर्थसंकल्पीय नियम पुस्तिका

वित्त विभागामार्फत विधानमंडळास सादर केल्या जाणाऱ्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचा मराठी अनुवाद करण्याचे प्रचंड काम या भाषा संचालयाच्या कार्यालयाकडून अनेक वर्षे केले जात आहे. प्रत्येक व विधानमंडळाची तीन अधिवेशने होतात. या तीन अधिवेशनाकरिता सुमारे ८,००० ते १०,००० पृष्ठांचा मराठी अनुवाद अधिवेशन पूर्वकाळात अल्पमुदतीत प्राथम्याने करावा लागतो. मंत्रालयीन सर्व विभागांच्या, कार्यालयांच्या, महामंडळांच्या नियमपुस्तिका, विविध चौकशी समित्यांचे अहवाल, शासकीय कार्यालयातून वापरले जाणारे सर्व प्रकारचे साधारण, विशेष व प्रमाण नमुने, शासन निर्णय, परिपत्रके, मंत्रिमंडळ टिप्पण्या, राज्यपालांचे अभिभाषण, वित्तमंत्र्यांचे अर्थसंकल्पीय भाषण, लोकआयुक्त अहवाल, लोकसेवा आयोगाच्या प्रश्नपत्रिकांचे संच, महालेखापालांचे प्रत्येक वर्षाचे चार लेखापरीक्षा अहवाल, निवडणूक आयोगाचे काम इत्यादींचा मराठी अनुवाद या कार्यालयाकडून करण्यात येतो. सुमारे १९६ नियमपुस्तिकांचा मराठी अनुवाद करून भाषा संचालनालयाने मंत्रालयीन विभागातील दैनंदिन व्यवहारांना चांगली गती दिली.

## प्रशिक्षण व परीक्षा

शासकीय कामकाजात राजभाषा मराठीचा वापर करण्याचे धोरण अंगीकारल्यानंतर साहजिकच शासकीय सेवेत असलेल्या अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांचा प्रश्न उपस्थित झाला. या कमचाऱ्यांना मराठी भाषा थोडीफार समजत असली तरी स्वत:चे विचार मराठीतून लिहून काढणे त्यांना अवघड होते. त्यांना



मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने राज्यात ठिकठिकाणी मराठी भाषा शिकवण्यासाठी प्रशिक्षण वर्ग उघडले होते. त्यांना मराठी भाषेचा सर्वांगाने परिचय करून देण्यासाठी ‘राजभाषा परिचय’ हे पुस्तक तयार केले गेले. शासकीय सेवेत असलेल्या अमराठी भाषिक राजपत्रित अधिकाऱ्यांच्या व अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या मराठी भाषा परीक्षा एतदर्थ मंडळामार्फत वर्षातून दोन वेळा घेण्यात येतात.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

## हिंदी भाषा परीक्षा

शासकीय सेवेत असणाऱ्या सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांच्या व अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या हिंदी भाषा परीक्षा एतदर्थ मंडळामार्फत वर्षातून दोन वेळा विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी घेण्यात येतात.

## त्रिभाषा सूत्राचा वापर

केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्रातील केंद्र शासनाच्या कार्यालयांमधून/प्राधिकरणांमधून जनतेच्या माहितीसाठी नामफलक व सूचनाफलक यावर हिंदी व इंग्रजी भाषेसह मराठी भाषेचा वापर केला जातो की नाही, हे पाहण्याचे काम व वापर केला जात नसल्यास सदर कार्यालयाकडे त्याचा पाठपुरावा करण्याचे काम जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय शासनाने १७ मे १९९१ च्या परिपत्रकान्वये घेतला आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यात केंद्र शासनाची जी कार्यालये/प्राधिकरणे आहेत. त्यांमधून त्रिभाषा सूत्रानुसार मराठी भाषेचा आवश्यक तो वापर केला जातो किंवा कसे हे तत्काळ जाणून घेऊन शासनाकडे तसा अहवाल सादर करण्यासंबंधी आदेश दिले आहेत. याबाबत मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शासनाने भाषा संचालनालयावर सोपवली आहे.

## टंकलेखन व लघुलेखन

सरकारी कामकाजात मराठीचा वापर करण्यासाठी पूर्वतयारी म्हणून कर्मचाऱ्यांना मार्गदर्शक पुस्तके उपलब्ध करून देणे, अमराठी भाषिक कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, ही कामे भाषा संचालनालयाने पार पाडली. पण याहीपेक्षा महत्त्वाचे काम होते ते मराठी टंकलेखन यंत्रे उपलब्ध करून देण्याचे. अशा यंत्रांच्या अभावी मराठीच्या वापराला गती मिळणे दुरापास्तच होते. वेगवेगळ्या कंपन्यांची वेगवेगळे कळफलक असलेली १८ प्रकारची टंकलेखन यंत्रे लोकांच्या वापरात होती. परंतु इंग्रजी टंकलेखन यंत्राप्रमाणेच मराठी टंकलेखन यंत्राचा कळफलक

एकरूप असणे इष्ट होते. व्यावहारिकदृष्ट्या तसे असणे सोयीचे होते. या प्रश्नाचा विचार करण्यासाठी शासनाने मराठी लघुलेखन, टंकलेखन, एकमुद्राक्षरमुद्रण, पंक्तिमुद्रण व दूरमुद्रण समिती स्थापन केली. या समितीवरील तज्ज्ञ सदस्यांनी या प्रश्नाचा सांगोपांग विचार मराठी व हिंदी या दोन्ही भाषांना उपयुक्त ठरेल असा एकरूप कळफलक प्रसिद्ध केला, असे करताना भाषेतील अक्षरांची वारंवारता व कळफलकावरील त्यांचे अनुरूप स्थान याचा समितीने अभ्यास केला. केंद्र सरकारातही या प्रश्नाचा विचार होतच होता. महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त समितीने तयार




केलेल्या एकरूप कळफलकाला थोड्याफार फेरफारासह केंद्र सरकारने मान्यता दिली. त्या कळफलकानुसार टंकलेखन यंत्रे तयार होऊन अनेक शासकीय कार्यालयात ती वापरली जात आहेत. याच संदर्भात शासनाने देवनागरीचा एकरूप कळफलक हे पुस्तक प्रसिद्ध करून त्यामागील आपली भूमिका स्पष्ट केली. टंकलेखकांच्या उपयोगासाठी मराठी टंकलेखन प्रवेशिका हे पुस्तक प्रकाशित केले.

टंकलेखनाप्रमाणे मराठी लघुलेखनाचीही विशिष्ट पद्धती विकसित करण्यात आली. सध्या उपलब्ध असलेल्या मराठी लघुलेखकांची संख्या शासनाच्या भविष्य काळातील गरजेच्या दृष्टीने फारच कमी होती. तेव्हा प्रथम विद्यमान इंग्रजी लघुलेखकांनाच क्रमाक्रमाने मराठी लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्याचे धोरण शासनाने स्वीकारले. त्यासाठी मराठी टंकलेखन / लघुलेखन प्रशिक्षण व बक्षिस योजना अमलात आणली. लघुलेखनाच्या निरनिराळ्या पद्धती अस्तित्वात होत्या. प्रशिक्षणार्थी ज्या पद्धतीने इंग्रजी लघुलेखन शिकले असतील, तिच्याहून मराठी निदेशनाची पद्धती भिन्न असेल, तर ती पद्धत आत्मसात करणे त्यांना अवघड जाते असे आढळून आले. ही अडचण दूर करण्यासाठी निरनिराळ्या लघुलेखन पद्धतींचा अभ्यास करून शासनोपयोगी अशा चांगल्या लघुलेखन प्रणालीची निवड करणे आवश्यक होते. त्यासाठी शासनाने एक समिती नेमली. या समितीने सर्व पद्धतींचा अभ्यास करून सर्वसमावेशक अशा स्वतंत्र प्रणालीचे मराठी लघुलेखन नावाचे एक पुस्तक तयार केले. हे पुस्तक प्रसिद्ध केल्यानंतर शिक्षकांना व विद्यार्थ्यांना तसेच प्रशिक्षणार्थींना उपयुक्त ठरेल असे मराठी लघुलेखन मार्गदर्शिका हेही पुस्तक भाषा संचालनालयाने प्रकाशित केले.

शासनमान्य वाणिज्य संस्थांमार्फत इंग्रजी टंकलेखक व लघुलेखक यांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्याची योजना राबवण्यात येत आहे. मराठी टंकलेखन व लघुलेखन प्रशिक्षण योजनेला कर्मचाऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे ७९०९ टंकलेखकांना व १७०९ लघुलेखकांना मराठी टंकलेखन व लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्यात आले होते.

संगणकाने टंकलेखन-लघुलेखन क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. आजच्या संगणकयुगात काळानुरूप जुनी टंकलेखन पद्धती बदलून संगणकाचा अधिकाधिक वापर करणे वे कागदपत्रविरहित (पेपरलेस) शासन व्यवहाराकडे वाटचाल करण्याची गरज आहे. त्या पार्श्वभूमीवर एप्रिल २००९ पासून टंकलेखनाच्या परीक्षा टंकलेखन यंत्रावर न घेता संगणकावर घेण्यात येत आहेत.

## अल्पसंख्याक भाषांतील अनुवाद

महाराष्ट्र राज्यातील हिंदी, गुजराथी, उर्दू, तेलगू, कन्नड व सिंधी या भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या बरीच आहे. महसुली विभागातील एकूण लोकसंख्येपैकी १५ टक्क्यांहून अधिक लोक उपरोक्त भाषा बोलणारे असतील तर त्या भाषांना अल्पसंख्याकाची भाषा म्हणून शासनाने मान्यता दिली आहे. या भाषांना संरक्षण मिळावे आणि अल्पसंख्य भाषिकांना शासनाचे महत्वाचे आदेश, अधिसूचना, नियम इत्यादी उपलब्ध करून देता यावेत यासाठी भाषा संचालनालयाच्या मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या चार विभागीय कार्यालयात मराठी अनुवादाबरोबरच अल्पसंख्य भाषांतील अनुवादाची सोय करण्यात आली व त्यासाठी संबंधित भाषेतील तज्ज्ञ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. तथापि, उक्त अल्पसंख्याक भाषेतील अनुवादाबाबत क्वचितच मागणी आल्याने ती पदे रिक्त होतील तसतशी कमी करण्यात आली. सध्या भाषा संचालनालयाची विभागीय कार्यालये विभागीय पातळीवरील मराठीकरणाचे काम सांभाळतात. तसेच वर्षातून दोन वेळा आयोजित होणाऱ्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांच्या मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा, हिंदी भाषा परीक्षा आणि मराठी टंकलेखन व लघुलेखन परीक्षांचे कामही पार पाडतात.

## मराठीचा अधिकाधिक वापर

शासनाच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात मराठीचा वापर जास्तीत जास्त होण्याच्या दृष्टीने व तो तसा होतो आहे किंवा नाही हे प्रत्यक्ष पाहून कार्यालयांची तपासणी करून त्याचा अहवाल शासनास वेळोवेळी सादर करण्याचे काम भाषा संचालनालयाकडे सोपवण्यात आले आहे. प्रत्येक शासकीय

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

कार्यालयांची मराठीकरणाच्या दृष्टीने तपशीलवार तपासणी करून तपासणीचा अहवाल त्या कार्यालयास व संबंधित प्रशासकीय विभागास पाठवण्यात येतो. तपासणीच्या वेळी मराठीकरणाच्या संदर्भात आवश्यक ते मार्गदर्शन त्या त्या कार्यालयांना करण्यात येते.

राजभाषा मराठीच्या अभिवृद्धीसाठी भाषा संचालनालय सतत प्रयत्नशील आहे. यादृष्टीने १९७९-८० हे राजभाषा वर्ष अतिशय उपकारक ठरले. राज्यातील महत्त्वाच्या ठिकाणी परिसंवाद, चर्चा व व्याख्याने आयोजित करून शासन व्यवहार, कायदा, न्यायदान व तंत्रविद्या या सर्व क्षेत्रात मराठीचा वापर कितपत करता येईल हे सांगण्याची उत्तम संधी मिळाली. दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे या प्रसिद्धी माध्यमांनीही मराठीच्या संवर्धनासंबंधीचा विचार लोकापर्यंत पोहोचवण्याची मोलाची कामगिरी बजावली. या वर्षात नामवंत कायदेपंडितांनी, शास्त्रज्ञांनी व शिक्षणतज्ज्ञांनी मराठीच्या विकासाच्या दिशा दर्शवणारे जे विचारप्रवर्तक लेख लोकराज्यच्या राजभाषा विशेषांकात व इतरत्र लिहिले त्यांचे एक संकलन मंथन या नावाने प्रसिद्ध करण्यात आले.



शासन व्यवहारात मराठीचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने पुढील महत्त्वाच्या उपाययोजना केल्या आहेत.

१. इंग्रजी टंकलेखकांना व लघुलेखकांना मराठी टंकलेखनाचे व लघुलेखनाचे प्रशिक्षण देण्यात आले. मे १९९१ पासून हे प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे.
२. अमराठी भाषिक अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा परीक्षा डिसेंबर १९८७ पासून सक्तीची करण्यात आली असून ती उत्तीर्ण करण्यासाठी ४ वर्षांचा कालावधी देण्यात आलेला आहे.
३. शासकीय मुद्रणालयाकडून करण्यात येणारा इंग्रजी टंकलेखन यंत्राचा पुरवठा बंद करण्यात आला असून अपवादात्मक परिस्थितीतच शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परवानगीने इंग्रजी टंकलेखन यंत्राचा पुरवठा करण्यात येतो.
४. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत सयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात जे अधिकारी किंवा कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात आवश्यक ती नोंद घेण्यात यावी, अशा सूचना सर्व कार्यालयप्रमुख व विभागप्रमुखांना देण्यात आल्या आहेत. तसेच वारंवार समज देऊनही जे अधिकारी किंवा कर्मचारी राजभाषेचा वापर करण्याच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करावी, अशा सूचना विभागप्रमुखांना देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या राज्यकारभारात राजभाषा मराठीचा किती प्रमाणात वापर करण्यात येतो याची पाहणी करण्यासाठी २१ जानेवारी, १९९२ ते २५ जानेवारी १९९२ या कालावधीत डॉ. पी. यशोदा रेड्डी, अध्यक्षा, आंध्रप्रदेश राजभाषा आयोग यांनी भेट दिली असता त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यकारभारातील मराठी भाषा वापराबाबत प्रशंसोद्‌गार काढले. 'भारतीय भाषा संस्थान म्हैसूर' या संस्थेचे दोन अधिकारी - डॉ. राजश्री आणि श्री. जयरामन यांनीही महाराष्ट्र राज्यास ३ नोव्हेंबर १९९२ ते १३ नोव्हेंबर, १९९२ या कालावधीत भेट दिली होती व या भेटीत मुंबईतील काही कार्यालयांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्या वेळी त्यांनीही महाराष्ट्राच्या राज्यकारभारात मराठीच्या वापरातील प्रगतीसंबंधी प्रशंसोद्‌गार काढले होते. वैज्ञानिक तथा तकनीकी शब्दावली आयोगाचे अध्यक्ष प्रा. के. विजय कुमार यांनी या कार्यालयास भेट देऊन वैज्ञानिक व तांत्रिक परिभाषा निर्मितीवर अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच श्री. मेनिनो पेरेस, संचालक, राजभाषा संचालनालय, गोवा सरकार व डॉ. तानाजी हळर्णकर, उपाध्यक्ष, गोवा कोंकणी अकादेमी यांनी ५ व ६ डिसेंबर, २००८ रोजी भाषा संचालनालयास भेट दिली. विविध परिभाषा कोश पाहून ते प्रभावित झाले व गोव्यामध्ये मराठीचे काम करण्यासाठी या परिभाषा कोशांचा अत्यंत उपयोग होईल, असे उद्‌गार त्यांनी काढले.

राजभाषा ही जनतेची भाषा असते. लोकशाहीच्या विकासासाठी लोकभाषेचा अवलंब करणे ही काळाची गरज असते. ही खूणगाठ बाळगूनच शासनाचे भाषा संचालनालय मराठीच्या विकासाचे कार्य अविरतपणे करत आहे.

**– भाषा संचालनालय**

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)

# व्यवहारक्षेत्रांतील मराठी

**डॉ. प्रकाश परब**

साहित्येतर व्यवहारक्षेत्रांतील मराठीच्या स्थितीगतीचा विचार करण्यापूर्वी एकूणच भाषा व भाषाव्यवहार यांच्या नात्यावर दृष्टिक्षेप टाकणे आवश्यक आहे. जगात आजघडीला सुमारे सहा हजार भाषा अस्तित्वात आहेत. त्यांपैकी सुमारे ५० ते ९० टक्के भाषा चालू शतकाअखेर नामशेष होतील असे काही भाषावैज्ञानिकांचे भाकीत आहे. असेही सांगितले जाते की, जगातील ९७ टक्के लोक केवळ ४ टक्के भाषा वापरतात व उरलेले ३ टक्के लोक ९६ टक्के भाषा वापरतात. याचा अर्थ जगामध्ये मोठ्या प्रमाणात भाषिक ध्रुवीकरण झाले व होत असून अनेक भाषा आपला जनाधार गमावत आहेत. एकेका व्यवहारक्षेत्रातून त्या हद्दपार होत आहेत. सर्व भाषा सारख्याच धोक्याच्या स्थितीत नसल्या तरी ज्यांच्या भवितव्याबाबत काळजी वाटावी अशाच भाषा जगात बहुसंख्येने आहेत एवढे मात्र खरे. आपापल्या भाषा सांभाळा असे आवाहन युनेस्कोने जगातील भाषिक समूहांना यापूर्वीच केले आहे. भाषेचा ऱ्हास किंवा अंत हा सजीवांप्रमाणे तडकाफडकी किंवा अटळपणे होत नसला आणि त्यांना वाचवणे आपल्या हातात असले तरी जगातील फारच थोड्या भाषा सुरक्षित आहेत असे दिसते.

> ***आपल्या आर्थिक दर्जाच्या बाबतीत लोक नेहमीच अतिसंवेदनशील असतात. वरचा दर्जा गाठण्याकरता ते एका भाषेचा बहुदा आपल्या मातृभाषेचा त्याग करून प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या दुसऱ्या भाषेचा स्वीकार करतात. यामुळे सुद्धा भाषा मरते.***

भाषेचा 'विकास' भाषेच्या विविध क्षेत्रांतील गुणवत्तापूर्ण वापरातून होत असतो. जगातील सर्व भाषांची विकासाची अंगभूत क्षमता बहुधा सारखी असली तरी त्यांच्या वापरक्षेत्रांची व्याप्ती, गुणवत्ता व त्यांचे सामाजिक, राजकीय स्थान सारखे असत नाही. भाषेच्या विकासात तिच्या वापरक्षेत्रांची व्याप्ती व गुणवत्ता ही सर्वांत निर्णायक गोष्ट आहे. इंग्रजी ही आजची प्रगत व वर्धिष्णू भाषा आहे असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा तिचा समाजाच्या सर्व व्यवहारक्षेत्रांतील गुणवत्तापूर्ण वापर आपण विचारात घेतलेला असतो. भाषेच्या वापरामागे अनेक प्रकारच्या प्रेरणा असू शकतात. भाषा ही समाजाची ओळख असते. संप्रेषणाचे साधन



मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

असते. संस्कृतीचे माध्यम असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती सामाजिक संसाधन असते. व्यक्तीच्या व समाजाच्या भौतिक प्रगतीत भाषा महत्त्वाची भूमिका बजावत असते. त्यामुळे भाषिक अस्मितेपेक्षा भौतिक विकासाची प्रेरणा भाषेच्या सर्वक्षेत्रीय व सार्वत्रिक वापरामागील महत्त्वाची प्रेरणा म्हणता येईल.

No language survives if it doesn't provide economic value. व्यक्तीच्या भौतिक, आर्थिक विकासाला जी भाषा उपयोगी पडते ती भाषा टिकते आणि वाढते. जी भाषा समाजाच्या भौतिक प्रगतीशी जोडलेली नसते व केवळ सामाजिक, सांस्कृतिक ओळख एवढ्यापुरतीच सीमित असते ती भाषा कालांतराने आपले अस्तित्व हरवून बसते. मग, त्या भाषेला कितीही समृद्ध साहित्यिक, सांस्कृतिक वारसा असला तरी तो तिला वाचवू शकत नाही. ग्रीक, लॅटिन, संस्कृत या भाषांना इतिहास असला तरी त्यांना ना वर्तमान आहे ना भाविष्य एके काळी बहुसंख्याकांची असलेली आयरिश भाषा समाजाच्या भौतिक प्रगतीशी न जोडली गेल्यामुळे आज अल्पसंख्याकांची झाली. तिची जागा इंग्रजीने घेतली. कोणतीही भाषा भूतकालीन वैभवावर नव्हे, तर ती वापरणारांच्या पोटावर जगते. आणि याचमुळे भाषेच्या जतन व संवर्धन प्रक्रियेत साहित्यव्यवहारापेक्षा साहित्येतर व्यवहारांना अधिक महत्त्व दिले जाते. हे व्यवहार म्हणजे शिक्षण, प्रशासन, विधी व न्याय विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योग व वाणिज्य, प्रसार माध्यमे इ.

***संगीत स्वरावली ही सुद्धा भाषाच आहे. परंतु त्यात मुळाक्षरे नाहीत.***


मानवी जीवनात साहित्यव्यवहाराचे सांस्कृतिक व सौंदर्यात्मक महत्त्व कितीही असले तरी भाषेच्या जीवनमरणात मात्र साहित्येतर व्यवहारांना विशेष महत्त्व आहे. त्याची काही कारणे आहेत. साहित्यव्यवहार हा निर्मिती व आस्वादाच्या पातळीवर एक खासगी व स्वान्तःसुखाय व्यवहार आहे. मुख्य म्हणजे तो स्वयंप्रेरणेने होतो. भाषेच्या प्राथमिक अवस्थेत तो आढळतो तसाच भाषा मृतप्राय झाल्यावरही तो चालू राहू शकतो ह्या उलट साहित्येतर व्यवहार जिथे संपतात, थांबतात तिथे ती भाषाही संपली असे मानले जाते. विशेष म्हणजे साहित्येत्तर व्यवहारक्षेत्रांतील भाषेची प्रगती जाणीवपूर्वक व नियोजनपूर्वक घडवावी लागते. कारण, साहित्येत्तर व्यवहार हे समाजाच्या भौतिक प्रगतीसाठी अनिवार्य असे सार्वजनिक व्यवहार आहेत. साहित्यव्यवहार एक महत्त्वाचा सांस्कृतिक व्यवहार असला तरी व्यक्तीच्या व समाजाच्या एकंदर भौतिक प्रगतीशी त्याचा थेट संबंध असत नाही. फार थोड्या लोकांशी त्याचा व्यावसायिक संबंध येतो. त्यामुळे भाषेच्या विकासाचे जे निकष अथवा मानदंड सांगितले जातात. त्यात शिक्षणाचे माध्यम, भाषेला माहिती-तंत्रज्ञानाची जोड, भाषिक अध्ययन-अध्यापन सामग्रीची उपलब्धता, प्रगत व्यवहारक्षेत्रांतील भाषेच्या वापराची व्याप्ती व गुणवत्ता, संबंधित भाषकांची क्रयशक्ती इ.चा समावेश होतो. त्यांत साहित्यव्यवहाराच्या व्याप्तीचा व गुणवत्तेचा निकष विचारात घेतला जात नाही. उलट जी भाषा समाजाच्या भौतिक प्रगतीशी जोडली जात नाही ती भाषा कालांतराने काव्य-गीत गायनापुरती सीमित राहते असे म्हटले जाते. जगातील इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन आदी भाषा सुरक्षित व प्रगत समजल्या जातात त्या त्यांच्या साहित्येत्तर व्यवहारातील गुणवत्तापूर्ण वापरामुळे. या भाषा त्यांच्या वापरकर्त्यांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करू शकतात; कारण, त्या अर्थार्जनाच्या साधनांशी जोडलेल्या आहेत.



या पार्श्वभूमीवर आपण मराठी भाषेच्या साहित्येतर व्यवहारक्षेत्रांच्या व्याप्तीचा व गुणवत्तेचा विचार केला पाहिजे. केवळ महाराष्ट्रात आणि देशातच नव्हे, तर जगाच्या वेगवेगळ्या भागात इंग्रजी भाषेचा वापर वाढतो आहे. कोणताही समाज भाषिक पोकळीत जगत नाही. कोणती तरी भाषा ही भाषिक पोकळी भरून काढते. बहुभाषक समाजात ही भाषा व्यावहारिक संधीची भाषा असते. आजघडीला मराठीच काय पण कोणतीही भारतीय भाषा इंग्रजीच्या तुलनेत व्यावहारिक संधी उपलब्ध करून देताना दिसत नाही. परिणामी, स्वभाषेविषयी प्रेम असूनही समाज इंग्रजीला महत्त्व देत आहे. इंग्रजीला आलेले महत्त्व हे तिच्या साहित्यिक पुण्याईमुळे नसून विज्ञान, तंत्रज्ञान, उच्च व व्यावसायिक शिक्षण, उद्योग व रोजगार आदी क्षेत्रांतील तिच्या गुणवत्तापूर्ण वापरामुळे आहे. आज मराठी शिकण्या-शिकवण्यामागील प्रेरणा या सांस्कृतिक आहेत, तर इंग्रजीमागील प्रेरणा भौतिक आहेत. कोणतीही भाषा केवळ सांस्कृतिक प्रेरणांवर फार काळ

तग धरू शकत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. मराठी ही आपल्या सांस्कृतिक हितसंबंधांची भाषा तर इंग्रजी ही आर्थिक हितसंबंधाची अशा प्रकारच्या कार्यात्मक व परस्परव्यावर्तक विभागणीत इंग्रजीच्या वर्चस्वाचे व मराठीच्या पीछेहाटीचे मूळ आहे. उद्याचा समाज हा ज्ञानाधिष्ठित समाज असणार आहे. त्यामुळे शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ज्ञानभाषा नसलेल्या भाषांचा जनाधार कमी होत जाणार आहे. मराठीसाठी आणि एकूणच भारतीय भाषांसाठी ही धोक्याची घंटा समजून पावले उचलण्याची गरज आहे.

मराठीच्या साहित्येत्तर व्यवहारांपैकी प्रशासनिक व्यवहारामध्ये मराठी भाषेचा वापर बऱ्यापैकी होत आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हा मराठी ही स्वाभाविकपणे राजभाषा बनली. एक व्यावहारिक गरज म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रशासनाच्या मराठीकरणाचा निर्णय (महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४) घेतला. हा निर्णय अर्थातच भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३४५-३४८) भाषिक तरतुदींना अनुसरून होता. मराठीकरणाच्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी १ मे १९६६ पासून झाली. प्रशासनिक व्यवहाराची भाषा ही नित्याच्या व्यवहाराहून काहीशी वेगळी असल्यामुळे ती पद्धतशीरपणे घडवण्याचे आव्हान तत्कालीन शासनापुढे होते. प्रशासनिक मराठीची जडणघडण करण्यासाठी, तिचा जाणीवपूर्वक विकास करण्यासाठी भाषा संचालनालय (१९६०) स्थापन करण्यात आले. सन १९८५ पर्यंत राज्याच्या प्रशासन व्यवहारात मराठी भाषेचा १०० टक्के वापर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्या उद्दिष्टपूर्तीसाठी भाषा संचालनालयाने सर्व शासकीय कार्यालयांना 'पदनामकोश' (१९६२), 'प्रशासन वाक्प्रयोग' (१९६४), 'प्रशासनिक लेखन' (१९६६), 'शासनव्यवहार कोश' (१९७३), 'राजभाषा परिचय' (१९८८) आदी मार्गदर्शनपर साहित्य उपलब्ध करून दिले.




आज महाराष्ट्र राज्याच्या एकूण प्रशासकीय व्यवहाराकडे लक्ष टाकले तर हा व्यवहार (जनतेशी पत्रव्यवहार, कार्यालयीन टिप्पणी, परिपत्रके, शासन निर्णय, कार्यालयीन आदेश, शासकीय-अर्धशासकीय पत्रे, ज्ञापन, अधिसूचना, अहवाल, प्रपत्रे इ.) १०० टक्के नसला तरी मोठ्या प्रमाणात होतो, यात शंका नाही.

मात्र, प्रशासन व्यवहाराप्रमाणे अन्य व्यवहार क्षेत्रांत विशेषतः विज्ञान, तंत्रज्ञान, विधी व न्याय, उच्च व व्यावसायिक शिक्षण आदी व्यवहारक्षेत्रांत जाणीवपूर्वक व विशिष्ट कालमर्यादा आखून मराठीचा विकास झाला नाही हेही तितकेच खरे. मराठी भाषेत प्रशासनिक व्यवहाराची समृद्ध परंपरा नसतानाही इंग्रजीला आपण मराठीचा पर्याय निर्माण करू शकलो तसा पर्याय अन्य व्यवहारांबाबत झाला नाही. तिथे उत्तरोत्तर इंग्रजीलाच महत्त्व मिळत गेले. राज्यातील सर्व कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठीचा १०० टक्के वापर व्हावा, अशी अधिसूचना १३ वर्षांपूर्वी निघाली. संगणकावर युनिकोड मराठीचा वापर वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे ही चांगली गोष्ट आहे.

मात्र, सर्व खापर शासनावर फोडूनही चालणार नाही. साहित्येत्तर व्यवहारक्षेत्रात मराठीचा वापर वाढण्यासाठी विद्यापीठांकडूनही अपेक्षा होत्या. मराठीची ज्ञानभाषा म्हणून जडणघडण करण्याची मुख्य जबाबदारी शासनापेक्षाही राज्यातील विद्यापीठांची होती. पुणे विद्यापीठाच्या स्थापनेमागील एक प्रमुख उद्देश तर मराठी भाषेचे संवर्धन हा होता. विद्यापीठ कायद्यानुसार उच्च शिक्षणात मराठी भाषेचा वापर करण्याचे दायित्व विद्यापीठांवर आहे. परंतु, विद्यापीठांनी मागणी तसा पुरवठा हे धोरण स्वीकारून इंग्रजीला झुकते माप दिले. साहित्य, कला आदी सांस्कृतिक महत्त्वाचे पाठ्यक्रम मराठीत व काही अपवाद वगळता भौतिक प्रगतीशी संबंधित विज्ञान, तंत्रज्ञान, विधी, वाणिज्य, वैद्यकशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आदी पाठ्यक्रम इंग्रजीत ही विभागणी मराठीसाठी जीवघेणी ठरत आहे. भाषा संचालनालयाने खूप परिश्रम घेऊन तयार केलेले विविध विषयांचे परिभाषा कोश आहेत. भौतिक प्रगतीशी संबंधित सर्व उच्च शिक्षण इंग्रजीत असल्यामुळे मराठी माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची जागाही आता इंग्रजी भाषा घेत आहे. ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी आणि मराठी भाषांतील दरी वाढत चालली आहे. ही दरी केवळ भाषांतर प्रक्रियेतून भरून निघणार नाही. त्यासाठी साहित्येतर विषयांवरील मौलिक लेखन व संशोधन मराठीतून अव्याहत व स्वतंत्रपणे होण्याची गरज आहे. विद्यापीठांनी याबाबत पुढाकार घेतला पाहिजे. ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी आणि मराठीतील वाढत चाललेले अंतर कमी करायला हवे.

भाषांचे जतन व संवर्धन करायचे दोनच मार्ग आहेत. एक सक्ती व दोन संधी या दोन्ही मार्गांच्या समन्वयातून मराठीचा विकास करण्याचे आव्हान आपण स्वीकारणार आहोत का? 'साहित्याचा विकास म्हणजेच भाषेचा विकास' या भ्रमातून जितक्या लवकर आपली सुटका होईल तितकी मराठीच्या विकासाची शक्यता वाढेल.

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)

# लोकशाहीतील भाषाकारण

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

भाषिक संस्कृतीचा विकास घडून यावा व त्याद्वारे भारताच्या एकराष्ट्रीयत्त्वाची व समन्वित संस्कृतीची उभारणी व्हावी, या हेतूने देशात भाषिक राज्ये निर्माण झाली. भारताचे लोकशाही समाजवादाचे तत्त्व या राज्यांनी स्वीकारले आहे. लोकशाहीचे विशिष्ट राजकारण असते, तसेच तिचे भाषाकारणही असते. लोकशाही यशस्वी होण्यासाठी राजकारणाइतकेच त्यालाही महत्त्व आहे. हे भाषाकारण कोणते, हे नीट ओळखल्यास प्रादेशिक भाषा लोकशाहीतील आपली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडू शकतील.

## जनतेची भाषा राजभाषा

लोकशाहीत सर्व सत्ता जनतेच्या ठिकाणी वसत असते. तीच खरी सत्ताधारी असते. स्वतः निवडून दिलेल्या प्रतिनिधीमार्फत ती विधानसभेत कायदे करते व शासनावर नियंत्रण ठेवते. जनतेने केलेल्या कायद्यांनुसारच न्यायालये न्यायनिवाडे देत असतात. तिने निवडून दिलेले मंत्रिमंडळ हे शासनयंत्रणेच्या माध्यमाद्वारे राज्यकारभार चालवते. अशा रितीने राज्याच्या विधानांग, न्यायांग आणि कार्यांग या तिन्ही अंगांवर जनतेचे नियंत्रण असते; तिन्ही ठिकाणी जनतेची इच्छा सार्वभौम असते.

जनतेचा शासनाशी सर्व बाजूंनी असा घनिष्ट संबंध येत असल्यामुळे जनतेची भाषा हीच शासनव्यवहाराची भाषा असायला पाहिजे. त्या जागी एखादी परकीय भाषा असेल तर शासन व जनता यांच्यामध्ये भाषिक अडचणींची भिंत उभी राहील व दोहोंचे संबंध दुरावतील. शासनाविषयी आपलेपणा न वाटल्याने शासकीय योजनांना जनतेचा भावनिक पाठिंबा व क्रियाशील सहकार्य मिळणार नाही. इंग्रजी शासन काळात हा अनुभव लोकांना आलाच आहे. इंग्रजांनी आपली भाषा प्रशासनाचे व शिक्षणाचे माध्यम ठरवून देशातील जनतेचे दोन भाग पाडले होते. इंग्रजी शिक्षण घेतलेले मूठभर शिक्षित व सरकारी कर्मचारी यांचा एक आणि त्या भाषेचे ज्ञान नसलेल्या कोट्यवधी इतर जनतेचा दुसरा. पहिल्याला हाताशी धरून त्यांनी दुसऱ्या वर्गावर मनास येईल तशी शासनाशी जनतेचा संबंध येऊ न देण्यासाठी आणि आपली सत्ता गाजवली. टिकवून धरण्यासाठी परकीय राज्यकर्त्यांना अन्य भाषेची ही भिंत उभी करावीच लागते. स्वतंत्र




लोकशाहीत सत्ता जनतेची असल्यामुळे तिच्यात व शासकवर्गात जिव्हाळ्याचे संबंध असतात. या संबंधाचे माध्यम म्हणून जनतेच्या भाषेचा उपयोग अपरिहार्य ठरतो. लोकशाही विचारसरणीनुसार राजकीय उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी जनता व शासकवर्ग यांच्या विचारभावना एक असल्या पाहिजेत, कार्याचे रूप एक पाहिजे. समाजातील निरनिराळ्या व्यक्तींना एकत्र आणण्याचे भाषा हेच एक माध्यम होय. स्वभावतः संयोजक शक्ती असलेल्या या साधनाद्वारेच जनता आणि शासकवर्ग यांच्यात तादात्म्य निर्माण होऊ शकते; जनता व शासन यांत एक समतोल निर्माण होतो. जनतेच्या व्यक्तित्वाचा ठसा शासनावर उमटतो. यामुळे जनतेची भाषा हीच राजभाषा असावी असा लोकशाहीचा दंडक आहे. याशिवाय विशिष्ट भाषिक समाजाच्या अस्मितेचे व सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक या दृष्टीने भाषा ही त्या समाजाचे अभिमानस्थान असते. शासनात व इतर सर्व व्यवहारात तिला तिची जागा मिळाली, तर जनतेला कार्यप्रवण करणारी ती एक प्रेरक शक्ती ठरू शकते.

लोकशाहीत जनतेच्या भाषेला अनेक जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. जनता व शासन यांच्यातील एकात्मतेबरोबर जनतेतील परस्पर सहकार्यांची भावना व बंधुत्व यांचे पोषण तिला करता आले पाहिजे. लोकशिक्षणाचे महत्त्वाचे कार्यही तिलाच पार पाडायचे असते. कारण, जागृत लोकमतावरच लोकशाहीचे यश अवलंबून आहे. वेगवेगळ्या मतप्रवाहांना योग्य वळण लावण्याची व प्रसंगी जनहिताच्या धोरणासाठी मतपरिवर्तन घडवून आणण्याची पक्षपातविरहित कामगिरी तिला पार पाडता आली पाहिजे, यासाठी माध्यम म्हणून तिचा बाह्य अंगाने विकास होणे जितके जरूर आहे, तितकीच तिची आंतरिक पातळीही उंचावली पाहिजे. लोकशाहीची यथार्थ निष्ठा तिच्यात रूजली पाहिजे.

## लोकशाहीतील मराठीची जबाबदारी

इतर प्रादेशिक भाषांप्रमाणे लोकशाही महाराष्ट्रात मराठीला ही सर्व कामे पार पाडावी लागतील. मराठी भाषिक समाजाच्या निरनिराळ्या घटकांतील व वर्गातील ऐक्यभावना तिला टिकवून ठेवावी लागेल व ती वाढीस लावावी लागेल. ही ऐक्यभावना केवळ प्रादेशिक स्तरावरच वाढवून तिला भागण्यासारखे नाही. निरनिराळ्या भाषा बोलणारा अखिल भारतातील लोकशाही समाज हा एकच आहे, हे मराठीने ओळखले पाहिजे. यासाठी मराठीने व तिच्याच जोडीला इतर भाषांनी परस्परांत सामंजस्य निर्माण केले पाहिजे व एकमेकाच्या अधिक जवळ आले पाहिजे. त्यांनी आपली वैशिष्ट्ये कायम ठेवून एकात्मतेचा शोध घेतला पाहिजे. जेथे शक्य होईल तेथे देवाणघेवाण केली पाहिजे व जेथे जमेल तेथे एकरूपता साधली पाहिजे. ज्या ज्या क्षेत्रात शक्य आहे तेथे एकरूप परिभाषेचा उपयोग करणे हा प्रादेशिक भाषांना जवळ आणण्याचा एक व्यवहार्य उपाय ठरू शकतो, व त्याद्वारे आपण सर्व भारताच्या एकाच लोकशाहीचे घटक आहोत, ही धारणा वेगवेगळ्या भाषिक समाजांत निर्माण होऊ शकते.

लोकशाहीत समाजजीवनाची घटना वेगळ्या धर्तीवर होत असते. जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत व निरनिराळ्या पातळ्यावर एकत्र येऊन लोकांना व्यवहार करावा लागतो. सामाजिक व राजकीय, आर्थिक व व्यवसायिक, शैक्षणिक व प्रशासनिक अशा निरनिराळ्या व्यवहारांत भाषेचा उपयोग त्यांना करावा लागतो आणि तो व्यवहाराच्या स्तरांनुसार वेगवेगळा असतो. यामुळे लोकशाहीत भाषेच्या माध्यमाचे स्वरूप फार व्यापक झाले आहे. ते एकसाची व मर्यादित राहून चालत नाही. लोकव्यवहाराच्या सर्वच क्षेत्रांत उपयोगी पडेल इतकी विविधता भाषेत यावी लागते. या व्यवहाराच्या वाढत्या व बदलत्या गरजा पुऱ्या करायच्या तर भाषेला एका जागी थांबून चालणार नाही. तिच्या ठिकाणी गतिमानता यावी लागते. तिला विकासशील व म्हणूनच प्रयोगशील व्हावे लागते. शिक्षित-अशिक्षित, तज्ज्ञ-अतज्ज्ञ या सर्वांनाच आपापल्या पातळीवर वापरता येईल असे भाषेचे सर्वसंग्राहक स्वरूप असावे लागते. यादृष्टीने विचार केला म्हणजे लोकशाहीत मराठीच्या वापराचे क्षेत्र किती वाढणार आहे, हे लक्षात येईल. मराठी ही आता खेड्यातील निरक्षर मतदाराची भाषा राहील, तशीच राजधानीतील प्रशासकांचीही भाषा राहील. राज्यातील कायदेपंडितांना व डॉक्टरांना, वास्तुशास्त्रज्ञांना व अभियंत्यांना ती वापरावी लागेल. शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना आपापल्या कामांसाठी व संशोधनासाठी तिचा उपयोग करावा लागेल. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांशी जसा तिचा संबंध येईल, तसाच शेतकी विषयातील विशेष तज्ज्ञ लोकांशीसुद्धा येईल. गिरणीतील व कारखान्यातील कामगार जशी ही भाषा वापरील तशीच येथील यंत्रसामग्रीची सांगोपांग माहिती असणाऱ्या यंत्रज्ञालाही ती वापरावी लागेल. या सर्व प्रकारच्या उपयोगांसाठी ती पुरी पडेल, इतका आता मराठीचा आवाका वाढला पाहिजे.

## शासनव्यवहार व मराठी

शासनव्यवहारातील मराठीचा विचार केला तर लोकशाहीत अभिप्रेत असलेल्या व्यापक अर्थाइतकीच या क्षेत्रातील तिची व्याप्ती राहील. आजची प्रशासनिक भाषा ही केवळ सामान्य स्वरूपाच्या कार्यालयीन पत्रव्यवहारापुरती व टिप्पणी लेखनापुरती किंवा जनतेसाठी काढण्यात येणाऱ्या सूचना व प्रसिद्धिपत्रके यांच्यापुरती मर्यादित राहिली नाही. सरकारी दप्तराबाहेर तिचा उपयोग होणार नसल्यामुळे तिचा विकास तो काय करायचा, ही कल्पना आज चुकीची ठरेल. पूर्वी जेव्हा शासनाचे संपर्कक्षेत्र इतके व्यापक नव्हते. त्या वेळीही शासनव्यवहाराच्या भाषेचा व्याप सामान्य व्यवहारांच्या भाषेहून अधिक होता. आजच्या घटकेस लोककल्याणकारी राज्याच्या आदर्शांमुळे शासनाशी संबंधित विषयांचा आवाका इतका वाढला आहे की, लोकजीवनाचे बहुधा एकही क्षेत्र त्यातून सुटले नाही. त्यामुळे प्रशासनिक भाषेचा विकास या सर्व विषयांना आवश्यक अशा भाषेचा विकासाशी समानार्थक झाला आहे. एक साहित्याचे क्षेत्र सोडले तर इतर अनेक क्षेत्रांत मराठी भाषा आजवर मागेच पडली होती. या सर्व क्षेत्रांतील इंग्रजीच्या वापरामुळे व वर्चस्वामुळे मराठीच्या प्रगतीस पायबंद बसला होता. माध्यमिक शिक्षणाचा स्तर वगळता सारे उच्च शिक्षण इंग्रजीतून मिळत होते. प्रशासनातही तालुका व जिल्हास्तरावर थोडीबहुत मराठीचा वापर असला तरी इतर सर्व ठिकाणी इंग्रजीतूनच कामकाज होत होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर प्रशासनिक मराठीला केवढी मोठी मजल मारायची आहे याची कल्पना येईल. वर सांगितल्याप्रमाणे प्रशासनाच्या कक्षेत सर्वच विषय येत असल्यामुळे त्या प्रत्येक विषयाची परिभाषा तयार होईपर्यंत मराठी ही राज्यकारभाराची भाषा होऊन नये, असे कोणी म्हणणार नाही. प्रशासनाच्या दृष्टीने या विषयांचा जेवढा संबंध येतो तेवढ्यापुरता तरी मराठीतील शब्दसंग्रह तयार असणे जरूर आहे. राज्यव्यवहारात मराठीला लवकर स्थान मिळायचे असेल तर अशी परिभाषा त्या त्या विषयाच्या अनुरोधाने स्वाभाविक क्रमानुसार तयार होईपर्यंत अनिश्चित

काळ थांबून चालणार नाही. धडाडीने पुढे जावे लागेल. इंग्रजीसारख्या पुढारलेल्या भाषेचा विकास पाश्चात्य देशातील औद्योगिक क्रांतीच्या आणि शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीच्या बरोबरीने पावले टाकून सावकाश झाला आहे. हा विकास अनेक विषयांवरील सतत ग्रंथनिर्मितीद्वारे नैसर्गिक क्रमाने झालेला आहे. तिच्या मानाने अप्रगत असलेल्या मराठीला तिची जागा घ्यायची तर तिला गेल्या काही शतकांच्या विकासाचा टप्पा त्वरेने गाठावा लागेल. ज्या कामाला इंग्रजीत शतके लागली ते काम मराठीसारख्या विकासाची निकड असलेल्या भाषांना काही दशकांतच तडीला न्यायचे आहे. त्यासाठी शब्द भाषेतून कोशात येण्याऐवजी, तो कोशातून भाषेत आणण्याच्या भाषाशास्त्रादृष्ट्या काहीशा अस्वाभाविक प्रक्रियेचा वेग टिकवायचा असेल तर ठरावीक चाकोरी सोडून नव्या वाटा शोधाव्या लागतात, नवे प्रयोग करून पाहावे लागतात. विकासाच्या इतर क्षेत्रात आपण असे प्रयोग करीतच आहोत. शासनव्यवहारासाठी आवश्यक तो शब्दसंग्रह व परिभाषा तयार करण्याचा प्रयत्न हा असाच एक प्रयोग आहे, असा दृष्टिकोन याबाबत ठेवणे आवश्यक आहे. पण, या संक्रमण काळाचा एक विशेष असा की प्रगती इच्छिणारा समाजच प्रगतीचा वेग सांभाळू शकत नाही, तो रुढीला व परंपरांना चिकटून राहतो. भाषिक प्रयोगशीलतेच्या बाबतीत तर हे परंपरानुसारित्व विशेषच अनुभवास येते. पण, नव्या व निकडीच्या गरजा भागवण्याकरिता अशा प्रयोगशीलतेला अवसर दिला पाहिजे, आणि त्याकरता लोकांची मने अनुकूल करून घेतली पाहिजेत.

## परस्पर प्रभावाचे तत्त्व

कोशातील शब्द भाषेत आणण्याचा हा प्रयोग ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी आहे त्या त्या ठिकाणी हे शब्द वापरू देणे हाच यातला मार्ग असू शकतो. शब्द हे शेवटी संकेतच आहेत. ते रूढ की नवे, सोपे की कठीण, हा येथे प्रश्न नसून ते वापरात येतात की नाही, हे पाहिले पाहिजे, शब्दांचा अंगभूत धर्म नसून तो त्यांचा वापराचा गुण आहे. यासंबंधात सामान्य जनतेच्या पातळीचाही उल्लेख करता येतो. ही पातळी सामान्य जनतेच्या ग्रहणशक्तीची नसून व्यवहाराची आहे. लोकशाहीत जनतेची पातळी सतत वाढती असते. गेल्या दहा वर्षांत सामान्य जनतेचे ज्ञान-सामान्यज्ञान म्हणू या-कितीतरी वाढले आहे. सामान्य जनतेला साक्षर व शिक्षित करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होत आहेत व होणार आहेत. महाराष्ट्रात मराठी ही राज्यकारभाराची भाषा झाली की नवे विषय, नवी माहिती या परिचित माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत पोचणार आहेत. तिच्या 'श्रुत ज्ञानात व शब्दसंग्रहात' आपोआप भर पडणार आहे. जनतेची भाषा म्हणजे अमुक इतका शब्दसंग्रह असे आपण धरून चालतो. पण, याबाबतीत पूर्वीपेक्षा आज कितीतरी फरक पडला आहे. नवे ज्ञान, नवे शब्द ग्रहण करण्याची सामान्य जनतेची क्षमता कमी आहे, असे समजण्याचे वस्तुतः काही कारण नाही. कोशातून नवे शब्द शिकत नसली तरी व्यवहारातून शिकतेच. लोकशाहीत जनतेच्या भाषेचा शासनावर परिणाम होतो, तसाच शासनाच्या भाषेचा जनतेवरही परिणाम होतो. याला लोकशाहीतील भाषेच्या परस्पर प्रभावाचे तत्त्व म्हणता येईल.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

## भाषाविकासासाठी परिभाषा

महाराष्ट्रातील काय किंवा इतर राज्यातील काय, लोकशाही यशस्वी होण्यासाठी शासनाव्यवहाराची भाषा तेथील प्रादेशिक भाषाच असावयास पाहिजे, हे आपण पाहिले. प्रशासनाबरोबर शिक्षणाचे माध्यमही जनतेची भाषाच असणे जरूर आहे. लोकशाहीत शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे विस्ताराने सांगण्याची गरज नाही. शिक्षित व सुजाण लोकमत हे जसे लोकशाहीचे खरे जीवनतत्त्व होय, तसेच प्रशिक्षित व कार्यदक्ष कर्मचारीवर्ग म्हणजे तिची कर्तृत्वशक्ती म्हणता येईल. शिक्षणाची व प्रशासनाची माध्यमे लोकशाहीच्या दृष्टीने अशी परस्परपूरक म्हणता येतील. इंग्रजी राजवटीत या दोन्ही क्षेत्रांतून देशी भाषांचे उच्चाटन झाल्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकला नाही. इंग्रजी राज्यकर्त्यांनी एक प्रकारे जाणूनबुजून व पद्धतशीरपणे त्यांची कुचंबणा केली. या क्षेत्रांत त्यांचा पुन्हा प्रवेश झाला म्हणजे जनतेच्या व तिच्या भाषेच्या विकासाला सुयोग्य दिशा व गती मिळेल. शिक्षणाच्या व प्रशासनाच्या माध्यमांचा या दृष्टीने जोडीने विकास झाला पाहिजे. या दोन्ही ठिकाणी आतापर्यंत मराठी महत्त्वाचे व सर्वव्यापी स्थान नव्हते. त्यामुळे तिचा या अंगांनी विकास होऊ शकला नाही. शिक्षणात माध्यमिक स्तरापर्यंत व अलीकडे काही प्रमाणात महाविद्यालयीन स्तरापर्यंत मराठीला प्रवेश मिळाला आहे. पण, उच्च शिक्षणाच्या व संशोधनाच्या पातळीवर तिला स्थान नसल्यामुळे कला, विज्ञान, तंत्रशास्त्र, वैद्यक, व्यापार, कायदा इत्यादी ज्ञानाच्या विभिन्न शाखांत तिचा विकास होऊ शकला नाही. या विकासासाठी आवश्यक अशी परिपूर्ण परिभाषा आज मराठीत नाही. ही परिभाषा तयार करण्याचे प्रयत्न अधूनमधून झाले आहेत, आजही होत आहेत. पण, त्यात एकरूपता व सुसंघटितपणा नाही. जी काही थोडी परिभाषा वापरात आहे, तीही सर्वमान्य व सर्वत्र सारखी नाही.

## मराठीची प्रशासनिक परिभाषा

प्रशासनाची भाषा म्हणून मराठीचा विचार केला तर, महाराष्ट्रातील संस्थानी मुलखातील राज्यकारभाराचा अपवाद वगळता, गेल्या दीडशे वर्षांत तिचा वापर झालाच नाही. आपल्या राजवटीच्या प्रारंभी इंग्रजी राज्यकर्त्यांनी काही थोडे

दिवस तिचा अंशतः उपयोग केला, पण पेशावाईच्या काळात जी फारसीमिश्रित मराठी होती तिच कोर्टकचेऱ्यांच्या कामासाठी त्यांनी उपयोगात आणली. त्या वापरात आपुलकी नव्हती, केवळ सोय होती. त्यामुळे प्रशासनाच्या दृष्टीने काही इंग्रजी शब्दांची भर सोडल्यास, शासनप्रयुक्त मराठी पेशवेकालात ज्या स्तरावर होती तेथेच राहिली आणि काही दिवसांनंतर तिचे संपूर्णच उच्चाटन झाले. तालुका-जिल्हापातळीवर अधूनमधून तिचा आजही आढळ होत असला तरी भाषेतील सामान्य शब्दसंग्रहाने हे काम भागण्यासारखे असल्यामुळे मराठी भाषेत पुरेशा शासनविषयक नवीन शब्दांची भर पडली नाही. राज्यकारभाराविषयक परिभाषा शिवकाली राज्यव्यवहार कोश तयार करून थोडीबहुत निर्माण करण्यात आली. शिवकालापासून पेशवाईच्या अस्तापर्यंत मराठी ही शासनव्यवहाराची भाषा होती. पण तत्कालीन मराठीचे फारसीप्रधान स्वरूप आज बहुतांशी पालटले असल्यामुळे ती पुनरूज्जीवित करण्याचा खटाटोप कोणी करणार नाही, कोल्हापूर, मिरज, सांगली इत्यादी मराठी संस्थानांत राज्यकारभार मराठीतून चालत असला तरी त्या मराठीचे वळण व शब्दसंग्रह या गोष्टी पेशवेकालीन मराठीच्या फार पुढे गेल्या होत्या असे म्हणता येत नाही. वडोदे संस्थानात 'श्रीसयाजीशासनशब्दकल्पतरु' हा एक अनेकभाषी प्रशासन कोश तयार करण्यात आला होता. इंग्रजी प्रशासनिक शब्दासाठी या कोशात संस्कृत, हिंदी, मराठी व गुजराती पर्याय दिले आहेत.




अलीकडील काळात शासनव्यवस्थेचे खूपच आधुनिकीकरण झाले व तिचा व्यापारविस्तार वाढला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शासनव्यवस्थेची तिच परंपरा केंद्र व राज्य सरकारने पुढे चालवली. आपण लोकशाही प्रणालीचा स्वीकार केल्यामुळे आता लोकभाषा हीच शासनव्यवहाराची भाषा असणे आवश्यक आहे. शासनव्यवहाराच्या कक्षा आज समग्र जीवनाइतक्या विस्तारल्या आहेत. कल्याणकारी राज्याचे ध्येय आपण स्वीकारल्यामुळे व विकेंद्रीकरणामुळे सारेच विषय कमीजास्त प्रमाणात आज प्रशासनात अंतर्भूत झाले आहेत. प्रशासनाची ही अत्याधुनिक गरज भागविण्यासाठी आज दहा-वीस हजारांचा शब्द संग्रहसुद्धा अपुराच पडेल. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आजच्या गरजा ध्यानात घेऊन संविधानापुरती मराठी प्रशासनिक शब्दावली तयार करण्यात आली. ती संविधानाच्या मराठी भाषांतरात वापरली आहे. चौदा भाषांसाठी मान्य केलेल्या परिभाषिक संज्ञा तीत स्वीकारल्या असल्यामुळे सहाजिकच तिच्यात संस्कृत भाषेतील शब्दांचे प्रमाण अधिक आहे. पण, संविधानातील परिभाषेविषयीच्या निर्देशक अनुच्छेदानुसार ही शब्दावली तयार झाली असल्यामुळे तिचे विशेष महत्त्व आहे. तिचे स्वरूप विशिष्ट विषयातील शब्दावलीपुरतेच मर्यादित असल्यामुळे प्रशासन विषयक शब्दसंग्रहातील उणीव तिने अंशतः दूर केली, त्यानंतर राज्यपुनर्रचनापूर्व मध्य प्रदेश शासनाने तयार केलेल्या प्रशासन शब्दकोशात सुमारे १२ हजार प्रशासनविषयक इंग्रजी शब्दांचे मराठी पर्याय देण्यात आले होते. या कोशाची रचना हिंदी व मराठी पर्याय शक्यतोवर समान असावे, या भूमिकेतून करण्यात आली असल्यामुळे त्याचा कल काहीसा संस्कृतकडे झुकणारा असणे साहजिकच होते. त्यातील बहुतांश मराठी संज्ञा संविधानाच्या १४ भाषांना मान्य असलेल्या शब्दावलीतून घेण्यात आल्या होत्या.

हे प्रयत्न मराठीतील व्यापक आणि परिपूर्ण प्रशासनिक परिभाषा तयार करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक असले, तरी त्यामुळे आजच्या गरजा भागू शकत नाहीत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने या कामासाठी भाषा सल्लागार मंडळाची नियुक्ती केली आणि त्यांच्याकडे हे काम सोपवले.

## केंद्र सरकार व परिभाषा

भारताच्या संविधानात हिंदी ही संघभाषा आणि राष्ट्रभाषा असावी असे ठरविण्यात आल्यामुळे एका स्वतंत्र राष्ट्राची भाषा म्हणून जगातील इतर पुढारलेल्या भाषांच्या बरोबरीने तिचा विकास घडवून आणणे आवश्यक होते. जगातील अन्य नवोदित राष्ट्रांनी आपल्या भाषांचा या दृष्टीने विकास करुन घेतला होता व आजही लहानमोठी स्वतंत्र राष्ट्रे तसा प्रयत्न करत आहेत. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन इत्यादी भाषा त्या त्या देशातील शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीचा हात धरून सावकाश समृद्ध झाल्या होत्या. त्यांच्या प्रगतीच्या मागे दीर्घ परंपरा असून त्यामुळेच त्यांचे आंतरराष्ट्रीय महत्त्व सर्वमान्य आहे. जगातील सारे ज्ञानविज्ञान प्रकाशाची गवाक्षेच मानली जातात. पहिल्या महायुद्धानंतर चीन, जपान, रशिया या देशांनी प्रगतीची भरधाव मजल गाठली. या प्रगतीशी संमांतर असा आपापल्या भाषांचा विकास व्हावा म्हणून त्यांना तातडीचे व पद्धतशीर प्रयत्न करावे लागले.

जपानने तर याबाबतीत आश्चर्यकारक प्रगती करून घेतली आहे. तेथे शिक्षण खात्याच्या अंतर्गत विज्ञानविकासाच्या प्रयोजनासाठी एक मंडळ स्थापन करून त्याच्याद्वारे ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांतील परिभाषा तयार करून घेण्यात आली. जपानी भाषेतील असा नव्याने निर्माण झालेल्या शब्दसंग्रह कित्येक लक्षांचा आहे. चीननेही असेच एक राष्ट्रीय मध्यवर्ती मंडळ स्थापन करून आवश्यक ती परिभाषा तयार केली. तेथे निरनिराळ्या विषयांवरील संकल्पित ८० परिभाषा कोशांपैकी ४७ कोशांचे काम आतापर्यंत पूर्ण झाले आहे. रशियाने

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

याबाबतीत केलेली प्रगती तर अभूतपूर्व आहे. त्या देशाने वैज्ञानिक प्रगतीच्या बाबतीत फार मोठी आघाडी मारली असून तिच्याशी समांतर असा रशियन भाषेचा विकास झाला आहे. रशियन भाषा इंग्रजीच्या बरोबरीने आंतरराष्ट्रीय भाषा गणली जाते. रशियात परिभाषानिर्मितीचे काम १९३८ पासून जोरात सुरू असून आजही ते चालू आहे. सध्या त्या भाषेत तयार झालेल्या कोशांची संख्या ५६ आहे. युरोपातील डेन्मार्क, स्वीडन या छोट्या राष्ट्रांनीही १९४१ पासून परिभाषा मंडळे स्थापून याच धर्तीवर आपल्या भाषांचा विकास घडवून आणला. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या राष्टांपैकी इंडोनेशिया व इस्रायल या राष्ट्रांनी वरीलप्रमाणे भाषाविकासाच्या योजना आखल्या. या देशांना तर स्वतंत्र राष्ट्रीय भाषादेखील नव्हत्या. इस्रायलने पुरातन हिब्रू भाषेचे आधुनिकीकरण करून तीच देशाची व्यवहारभाषा व राजभाषा ठरवली, तर इंडोनेशियाने 'बहासा इंडोनिसिया' ही नवीन भाषा विकसित केली. या दोन्ही भाषांत परिभाषानिर्मितीचे प्रयत्न त्यासाठी नेमलेल्या खास मंडळाद्वारे आज चालू आहेत.

भारत सरकारने संघभाषा असलेल्या हिंदीसाठी परिपूर्ण अशी शास्त्रीय व तांत्रिक आणि तिच्याच जोडीला प्रशासनिक परिभाषा तयार करण्याच्या कामी वरील देशांचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून सुरुवातीपासून लक्ष घातले. १९५०-५१ साली केंद्र शासनाने शास्त्रीय परिभाषा मंडळ स्थापन केले. १९६० साली या मंडळाची व्याप्ती वाढवून 'शास्त्रीय व तांत्रिक परिभाषा आयोगा'त त्याचे रूपांतर करण्यात आले. या आयोगाच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय हिंदी निदेशालयामार्फत आज हिंदीसाठी प्रशासनासकट सर्व शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील परिभाषा शास्त्रीय पद्धतीने व व्यापक प्रमाणावर तयार करण्यात येत आहे. या निदेशालयाद्वारे केंद्र सरकाने अलीकडेच प्रशासनिक परिभाषेचा एक मोठा कोश दोन खंडात प्रसिद्ध केला आहे.

संविधानात हिंदीच्या विकासासंबंधी जे धोरण घालून दिले आहे. त्यानुसार केंद्र सरकारच्या कोशातील ही परिभाषा तयार करण्यात येत आहे. भारताच्या समन्वित संस्कृतीला पोषक ठरेल व सर्व भाषांना होता होईल, तो समानरूपाने वापरता येईल, अशी सर्व विषयांतील परिभाषा निर्माण करण्याचे प्रयत्न वरील आयोगातर्फे करण्यात येत आहेत. भारत सरकारने नेमलेल्या भाषा आयोगाने शास्त्रीय, तांत्रिक व प्रशासनिक परिभाषा ही सर्व भाषांना शक्यतोवर समान असावी अशी शिफारस केली होती. आयोगाच्या शिफारशींची पुन्हा पाहणी करण्यासाठी नेमलेल्या संसदीय समिनीनेही समान परिभाषेची ही शिफारस मान्य केली. संसदीय समितीच्या सुचनेनुसार राष्ट्रपतींना सर्व अनुसूचित भाषांतील शास्त्रीय, तांत्रिक व प्रशासनिक परिभाषा होता होईल तोपर्यंत एकरूप असावी असा आदेश एप्रिल १९६० मध्ये काढला. हा आदेश कार्यान्वित करण्यासाठी भारत सरकारने देशातील निरनिराळ्या प्रादेशिक भाषा तयार होत असलेल्या परिभाषांत समन्वय निर्माण करावा व एकरूपता आणावी म्हणून सर्व राज्यातील प्रतिनिधींची एक परिभाषा समन्वय समिती स्थापन केली असून, भारतातील सर्व भाषांसाठी एकरूप परिभाषा निर्माण करण्याचे काम नुकतेच या समितीने सुरू केले आहे.

महाराष्ट्र राज्यात मराठीसाठी जी प्रशासनिक परिभाषा तयार व्हावयाची आहे ती वरील धोरणानुसार भारत सरकारच्या प्रयत्नांशी विसंवादी नसावी. यापेक्षा वेगळ्या मार्गाने जाण्याचा व मराठीची संपूर्णपणे वेगळी परिभाषा तयार करण्याचा, राष्ट्रीय धोरणांशी विरोध असा आग्रह कोणी धरणार नाही. यासाठी मराठीला आपला शब्दसंग्रह अजिबात बदलावा लागेल किंवा सर्वच रूढ शब्द टाकून द्यावे लागतील, असे नव्हे. तिला आपल्या प्रकृतीशी जुळतील असेच शब्द स्वीकारायचे आहेत. प्रत्येक भाषेला तेवढे स्वातंत्र्य अर्थात आहेच. पण शक्य होईल त्या मर्यादेपर्यंत व भाषा सामावून घेऊ शकेल त्या रीतीने ही नवीन परिभाषा आत्मसात करायची आहे. हे संपूर्ण परिवर्तन नसून ते केवळ समन्वयाचे धोरण आहे. या दृष्टीने संस्कृत भाषेतून घेतलेले पर्याय मराठी आत्मसात करू शकणार नाही, असे नाही. असे कित्येक नवे संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न शब्द मराठी आज ग्रहण करत आहे व ते रुढ होत आहेत. असेच जे पारिभाषिक शब्द संघभाषा हिंदीत निश्चित करण्यात येत आहेत ते समन्वयासाठी मराठीने स्वीकारले, तर त्यात हिंदीच्या अनुकरणाची किंवा आक्रमणची भीती बागळणे अनाठायी आहे. मराठीची मूळ प्रकृती यात बिघडले असेही मानण्याचे कारण नाही. काही रुढ शब्द वापरातून गेल्याने भाषेच्या प्रकृतीला धोका पोहोचतो, असे नव्हे. जुने शब्द वापरातून जाणे व नवे शब्द रूढ होणे ही क्रिया तर भाषेच्या आवश्यकतेनुसार नित्य चालूच असते. ते भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण मानण्यात येते. रूढ शब्दांविषयी आत्मीयभाव निर्माण होतो तो वस्तुतः सवयीचा भाग असतो. शास्त्रीय परिभाषेची एक नवी घडण, एक नवा आविष्कार, भारतात आपण सहकार्याने घडवीत आहोत. अशाच दृष्टीने मराठीने या प्रयोगाकडे पाहिले पाहिजे. या नव्या बदलाशी सुसंवादी राहणे हे प्रतिगामित्व नसून पुरोगामित्वच ठरावे. कालमानानुसार नवे स्वीकारण्याची तयारी हीच पुरोगामित्वाची कसोटी नव्हे का?

(शासनव्यवहारातील मराठी 'समस्या : स्वरूप : प्रक्रिया' या भाषा संचालनालयाने १९९७ साली प्रसिद्ध केलेल्या पुस्तकातून साभार.)

**– भाषा संचालनालय**

(लोकराज्य ऑक्टोबर २०११ मधून पुनर्मुद्रित)

# उत्सव नको, कृतीची गरज

**डॉ. गंगाधर पानतावणे**

भारतात अनेक भाषांची साहित्य संमेलने भरतात; परंतु, मराठी साहित्य संमेलनाची सर त्यांना येत नाही. कालच्या मराठी साहित्य संमेलनांचे खूपसे कौटुंबिक स्वरूप होते. साहित्यिक मर्यादित होते आणि संमेलनात बडेजावापेक्षा साहित्यविषयक प्रश्नांची आस्था अधिक होती. साहित्यिकांबरोबरच, विविध क्षेत्रातील माणसे, संस्थानिकसुद्धा आत्मीय जाणिवेने सहभागी होत. मराठी भाषा आणि साहित्य यांचा संसार नेटका असावा या प्रेमापोटी भरणारी त्या वेळची साहित्य संमेलने आणि साहित्य संमेलनांचे अध्यक्ष बडेजावात गुंतून पडत असत. पण, आहिस्ते आहिस्ते संमेलनांचा विस्तार होत गेला आणि स्वातंत्र्योत्तर काळातील संमेलनांना गर्दीचे स्वरूप आले आणि या गर्दीचे रूपांतर जत्रेत केव्हा झाले हे कळलेसुद्धा नाही. लेखकांची, प्रकाशकांची आणि संमेलन संयोजकांचीही संख्या वाढली. आणि वेगवेगळी वळणेसुद्धा.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने केवळ महाराष्ट्रातच नाहीतर महाराष्ट्राबाहेर, अगदी भारताच्या राजधानीतही भरली. पण, साहित्य संमेलनांना जसजशी प्रचंड गर्दी व्हायला लागली तसतशी सतत गर्दीत वावरणारी आणि गर्दीचा सोस असणारी मराठी राजकारणी मंडळीही, या संमेलनांकडे वळू लागली. वेगवेगळया राजकीय पक्षांतील नेत्यांनी साहित्य संमेलनातील आयोजनात नको तितका रस दाखवला आणि अलीकडल्या काळात साहित्यिक किंवा साहित्यिक संस्थांपेक्षा कोणत्या कोणत्या राजकीय नेत्यानेच साहित्य संमेलन भरवण्यासाठी पराकाष्ठा केल्याचे प्रत्ययाला येते. त्यामुळे स्वाभाविकच साहित्य संमेलनाची उद्घाटने किंवा स्वागताध्यक्षपद कोणत्या तरी राजकीय पक्षाच्या नेत्याकडे गेल्याचे दिसून येते त्यामुळे एक लाभ झाला असावा. आर्थिक सोयी उपलब्ध होऊन शकल्या. श्रीमंत संमेलने घडू लागली. त्यामुळे अनेक राजकारण्यांना पक्षीय प्रतिष्ठा दुणावता आली. व्यक्तिगत दबदबाही निर्माण करता आला. आणि खूप काही.

पण साहित्य संमेलनात मराठी भाषा आणि साहित्य यासंबंधीचे काही नवे उपक्रम वा प्रकल्प निर्माण करत आहे का? मराठीत अगणित बोली आहेत. त्या बोलींच्या संदर्भात सांस्कृतिक सामाजिक दृष्टीने अभ्यास, संशोधन आणि नंतर प्रकाराने याबाबतीत काही क्रियाशील पावले टाकता आली का? केवळ शासनानेच हे केले पाहिजे, यापेक्षा साहित्य संमेलन संपल्यानंतरचा उरलेला निधी या कामी उपयोगात आणयला हवा, यासाठी मराठीतील भाषाशास्त्र संवाद आणि त्या त्या बोलींच्या जाणकारांवर ही जबाबदार सोपविता आली नसती का? पण, तसे दिसत नाही. साहित्य संमेलन संपल्यानंतर उरलेल्या निधीचे नेमके काय होते, हे तपशिलाने बाहेर येणे गरजेचे आहे. साहित्य संमेलनाची घोषणा झाली की, निवडणुका आणि लोकशाहीच्या मार्गाने गदारोळ अपरिहार्यपणे होतो. अध्यक्ष निवडीसंबंधीची चर्चा नेहमीप्रमाणे होते. हे खरेच आहे की, निवडणुकीच्या गदारोळामुळे अनेक साहित्यिक अलिप्त राहिले, हे असे का व्हावे? विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद सन्मानपूर्वक दिले जातेच ना! करंदीकर, कुरुंदकर, महानोर, इंदिरा संत, रा.चिं. ढेरे यांची आठवण आम्हाला झालीच नाही. रा. चिं. ढेरे यांच्यासारख्या महान संशोधकांचा गौरव करण्याची संधी आम्ही गमावू नये. त्यासाठी घटना बदलावी आणि एकमताने महान साहित्यिकांचा सन्मान व्हावा.

एके काळी मराठी साहित्य संमेलने एका विवक्षित होती. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक नवीन वाङ्मयीन प्रवाह आले. तळागाळातील, राना-डोंगरातील साहित्यिक व्यक्त होऊ लागला. अव्यक्त व अलक्षित अनुभव साहित्यात आले. परंतु, दलित ग्रामीण आदिवासी साहित्याची जेवढ्या प्रमाणात दखल घ्यायला हवी होती तेवढ्या प्रमाणात घेतली गेली नाही. या साहित्यनिर्मात्यांना बोटावर मोजण्याइतके अपवाद वगळता निमंत्रितही केले जात नाही. त्यांचे साहित्य मराठीच आहे हे लक्षात घ्यायलाच हवे. त्यातील अनेक लेखकांची पुस्तके भारतातील आणि जगातील अनेक भाषांत गेली आहेत, हे नाकारता येणार नाही. मग, स्वतंत्रपणे भरणाऱ्या ग्रामीण, आदिवासी साहित्य संमेलनांना नावे ठेवण्यात काय अर्थ आहे? ही संमेलने अतिशय गांभीर्याने भरविली जातात. अस्मितादर्श साहित्य संमेलन भरवले जाते. विद्रोही साहित्य संमेलन भरवले जाते. फुले-आंबेडकर साहित्य संमेलने भरवली जातात. येथे जत्रा नसतात. येथे साहित्य, समाज, संस्कृती या विषयानुरोधाने चर्चा, परिसंवाद घडवले जातात. वैचारिक मंथन होते. आशयगर्भ परिवर्तननिष्ठ कवी संमेलने होतात. मराठी साहित्याला मध्यवर्गीय कोशातून बाहेर काढण्याचे आणि नवे वाङ्मयीन बियाणे रुजवून साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे, व्यापक करण्याचे कार्य ही संमेलने करत आहे आणि विशेष म्हणजे ही साहित्य संमेलने शासकीय अनुदानाशिवाय लोकाश्रायवर होत आहेत. 'अस्मितादर्श'च्या साहित्य संमेलनात नवे-जुने साहित्यिक कोणतीही अपेक्षा न ठेवता सहभागी होतात.

अस्मितादर्श साहित्य संमेलन १९७४ सालापासून अखंडपणे भरत आहे. या संमेलनात अ.भा. मराठी साहित्य संमेलनात नसलेले दोन विशेष कार्यक्रम आयोजिले जातात. १. शोधनिबंध वाचन व चर्चा आणि २. लेखक-वाचक मुक्त संवाद.

मला वाटते की, सर्व साहित्य संमेलने पूर्णतः उत्सवी न होता त्या कार्यशाळा झाल्या पाहिजेत. साहित्यचर्चा, साहित्यसमीक्षा आणि संशोधन यावर पूर्ण नसली तरी मोठ्या प्रमाणात भर देणारी असली पाहिजेत.

(लोकराज्य जानेवारी–फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# भाषा सर्वेक्षण आणि सामंजस्य

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

**अरुण जाखडे**

१९९६ ची गोष्ट. आदिवासींविषयक समाजकार्य करतानाच त्यांच्या परंपरा, संस्कृती आणि भाषांच्या अभ्यासासाठी डॉ. गणेश देवी यांनी 'भाषा संशोधन आणि प्रकाशन केंद्र' बडोदा येथे स्थापन केले. आदिवासींच्या सामाजिक उन्नतीबरोबरच, सांस्कृतिक उन्नयनाचे एक स्वप्न डॉ. देवी यांनी पाहिले. त्यातूनच भाषा केंद्राने विविध प्रकल्प हाती घेतले. भाषांतून व्यक्त होणारी मौखिक परंपरा, कमी होत चाललेल्या भाषा आणि विविध जनजमातींच्या लुप्त होत चाललेल्या भाषा, यांची जपवणूक संरक्षण व दस्तऐवजीकरण करणे, हा एक महत्त्वाचा प्रकल्प ह्या केंद्रातून गेली काही वर्षे चालवला जात आहे.

या भाषा केंद्रातर्फे बडोदा येथे एक 'भाषा संगम' (Bhasha Confluence at Ground Zero) हा भारतीय पातळीवरचा मोठा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी भारतातील विविध भागांतून बहुभाषिक प्रतिनिधी आले होते. त्यात भाषातज्ज्ञ होते, भाषा व साहित्याचे संशोधक होते आणि अशा बुद्धिवंतांप्रमाणेच विविध विमुक्त समाजातील कार्यकर्तेही होते. ज्येष्ठ साहित्यिका महाश्वेतादेवी व थोर गांधीवादी नेते नारायणभाई देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विविध चर्चासत्रे झाली. भाषा संपते म्हणजे काय? ती मरते का मारली जाते यांपासून भाषिक प्रश्नांवर विविध तज्ज्ञांनी आपले अनुभव व विचार व्यक्त केले. दोन दिवसांच्या या 'भाषा संगम' कार्यक्रमातील भारताच्या विविध भागांतून आलेल्या ७०० प्रतिनिधींशी चर्चा करून काही निष्कर्ष काढले ते असे -

१. आमच्या भाषेवर आमचेच नियंत्रण कमी होत चालले आहे.
२. एकच भाषा वेगवेगळ्या पद्धतीने पुढे येत आहे.
३. आदिवासी भाषा ही केवळ भाषा नसून ती जीवनदर्शन आहे. यात 'प्रेम' ही गोष्ट प्रामुख्याने आहे.
४. केवळ आदिवासी नाही, तर सर्वच समाजाच्या जीवनशैलीत बदल होत आहे. त्यात आपली आपली स्वतंत्र ओळख अस्पष्ट किंवा नष्ट होत चालली आहे.
५. भाषिक प्रश्न कोणा एका समाजाचा, जाति-जमातीचा नाही, तर तो पूर्ण भारतीय समाजाचा प्रश्न आहे.
६. आपल्या भाषेत बोललो तर गाववाला, गावंढळ, असंस्कृत समजतील, या भीतीने आपल्या मूळ भाषेपासून दूर जाऊ नये.
७. आपल्या समाजविषयक व भाषाविषयक पूर्वसंस्कारापासून विचलित होऊ नये.
८. खरोखरच प्रश्न आहे का? असल्यास कुठे?
९. भाषा संपण्यापूर्वी त्याचे डॉक्युमेंटेशन- दस्तऐवजीकरण करावे, अन्यथा त्या संपल्या तर त्यांचे अस्तित्व होते हे कसे सिद्ध करणार?
१०. भय आणि संशय, यातून सर्वच भारतीय भाषिक विश्वासार्हता धोक्यात येऊ शकते.
११. आपली भाषा इतर भाषक लोकांना शिकवण्याचा प्रयत्न करणे.
१२. साहित्यिक, कवी यांनी आपली मूळ भाषा साहित्यकृतीत ठेवावी. यामुळे जितके दिवस ती साहित्यकृती टिकेल, तितके दिवस त्यातील भाषा टिकतील.
१३. छोट्या भाषांतील प्रकाशनांसाठी शासनाने पुढे यावे.
१४. लिंग्विस्टिक सर्व्हे लोकांनी करावा. लोकांनीच अनेक उपक्रम घ्यावेत.
१५. भाषिक प्रश्न सरकारऐवजी समुदायाने हाती घेतले पाहिजेत. प्रत्येक भाषा मुख्य प्रवाहात राहील ही गोष्ट आवश्यक नाही. संख्या अल्प असली तरी आत्मसन्मान असेल तर त्या विपरित काळातही भाषा टिकतील.
१६. 'सर्व शिक्षा अभियाना'चे स्वरूप 'सर्व भाषा अभियान' असे असले पाहिजे.

भाषा संगम २०१० या कार्यक्रमात विविध चर्चासत्रांतून क्षीण होत चाललेल्या भाषा टिकविण्यासाठी कोणते प्रयत्न करावेत यासंबंधी काही मुद्दे मांडण्यात आले, आणि मुख्य म्हणजे भाषा, समाज, राजकारण आणि व्यवहार यांचे परस्परसंबंध अभ्यासले जावे, यासंबंधी निष्कर्ष मांडण्यात आले.

सर्वात महत्त्वाचा निर्णय होता तो म्हणजे 'लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडियन लँग्वेजेस' हा उपक्रम. हा उपक्रम आता जवळ जवळ १०० वर्षांनंतर पुन्हा हाती घेण्याचे ठरले. यासाठी शासनाऐवजी अशासकीय सामाजिक संस्था, व्यक्ती, अभ्यासक व विविध जनजातीतील व समाजातील कार्यकर्ते यांच्या सहभागातून करण्याचे ठरले.

भाषातज्ज्ञांच्या अनेक चर्चासत्रानंतर भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाचे स्वरूप कसे असावे, त्यात त्या-त्या बोली अथवा भाषेविषयक कोणती माहिती असावी, याचे निकष नक्की केले. असे निकष नक्की झाल्यानंतर भारतातील प्रत्येक राज्यातील विविध भाषा, बोलींविषयी माहिती गोळा करण्याचे ठरले. त्यासाठी प्रत्येक राज्यात प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. काही भाषा या विशिष्ट जनजातीच्या असून, त्यासंबंधीची माहिती प्राध्यापक किंवा भाषांचे अभ्यासक

यांचेकडून मिळणे अशक्य होते. हे काम त्या त्या भाषांतील कार्यकर्त्यांकडून करून घेण्याचे ठरले.

अशा पद्धतीने गेल्या दोन वर्षांतील कार्याची फलश्रुती म्हणजे सर्व राज्यांत भारतीय भाषांच्या लोकसर्वेक्षणाचे चाललेले काम व मुख्य म्हणजे यापैकी १५ राज्यांतील भाषिक सर्वेक्षणाचे काम जवळजवळ पूर्ण झाले. ७ व ८ जानेवारी २०१२ या दिवशी 'भाषा वसुधा २०१२' या भाषा केंद्र बडोदाने आयोजित केलेल्या 'आंतरराष्ट्रीय भाषा भेट' कार्यक्रमात महाराष्ट्राच्या भार्षिक सर्वेक्षणाच्या खंडाचे प्रकाशन कुमार केतकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी व्यासपीठावर के. के. चक्रवर्ती, डी. पी. पटनायक, नारायणभाई देसाई, डॉ. गणेश देवी आदी महनीय व्यक्ती तसेच महाराष्ट्राच्या या खंडाचे समन्वयक व प्रकाशक अरुण जाखडे हे होते.

'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा प्रकल्प काय आहे?

१. PLSI (People's Linguistic Survey of India) किंवा भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण ही संपूर्ण अशासकीय म्हणजे लोकांच्या सहभागातून चाललेली व भाषिक हक्क, संवर्धन, तिच्यातील मौखिक परंपरा व दस्तऐवजीकरण करण्यासाठी कटिबद्ध आहे. त्या कामासाठी ही एक चळवळ आहे. हे कार्य विविध राज्यांतील व भाषांतील बुद्धिवंत, विचारवंत, लेखक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या सहभागातून होत आहे.

२. भारतातील सध्या अस्तित्वात असणाऱ्या म्हणजे २०१० ते २०१२ मधील भाषांची सद्य:स्थिती पाहणे आणि त्यांची मांडणी करणे.

३. भाषिक वैविध्यतेप्रमाणेच भारतातील सामाजिक, सांस्कृतिक व इतर परंपरा यांचे वैविध्य लक्षात घेऊन त्यांचा विकास व संवर्धन करण्यासाठी सतर्क असणारी कार्यकर्त्यांची एकसंघशक्ती किंवा फळी तयार करून भाषिक सर्वेक्षणासाठी त्यांना कार्यरत करणे. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येणारी भाषिक, सांस्कृतिक व जैविक वैविध्यता नष्ट होत चालली आहे, ते थांबवणे.

४. वेगवेगळ्या भाषिक समाजघटकांमध्ये जवळीक निर्माण करून बहुभाषिक, बहुसंस्कृतीय असा जो भारतीय समाजाचा मूळ पाया आहे, तो पक्का करणे.

५. सरकार व भाषिक जमाती यांच्यात जवळीक निर्माण करून परिस्थिती आणि परंपरेचे वैविध्य जपत, सरकारचा विकास आराखडा जाणून घेणे, आत्मसात करणे व आचरणात आणणे.

६. मातृभाषेमधून शिक्षण घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे, त्यासाठी आवश्यक ती शिक्षण साधने उपलब्ध करून देणे.

७. भारतात पुढील होणाऱ्या सर्वेक्षणाचा पाया बांधणे.

८. भाषिक वैविध्य जपतानाच, माणसाची सुरक्षितता टिकवणे.

९. ब्रिटिश काळात ग्रिअर्सन यांनी केलेल्या सर्वेक्षणाची ही नक्कल नाही. त्याचे पुनर्सादरीकरण नाही किंवा ग्रिअर्सन यांच्या सर्वेक्षणाला पर्याय नाही. तो आजच्या स्थितीतील भारताच्या भाषिक अस्तित्वाच्या व सामाजिक, सांस्कृतिक बदलाची नोंद घेणारा आहे. तो त्या-त्या भाषांचा अतिशय सखोल अभ्यास वा सर्वेक्षण नाही.

१०. भाषा सर्वेक्षण म्हणजे लोकांच्या मदतीने व लोकांच्या सहकार्यातून कमी वेळात करावयाचा उपक्रम आहे. शासनाच्या मदतीशिवाय याचा अर्थ शासनाला समांतर असा नाही, तर आता अनेक उपक्रम समाजानेच स्वयंप्रेरणेने व स्वयंस्फूर्तीने करावेत व आपली सांस्कृतिक जबाबदारी पूर्ण करावी, हा खरा उद्देश आहे.

### लोकसर्वेक्षणाचे नेमके स्वरूप

भाषांचे लोकसर्वेक्षण करताना ज्या गोष्टी लक्षात घेतल्या त्यापैकी काही महत्त्वाच्या खालीलप्रमाणे :-

१. ज्या नावाने भाषा ओळखली जाते ते नाव. त्या नावाला असणारे पर्यायी नाव व ज्या भागात बोलली जाते, त्या भागाच्या नकाशात तो भाग दाखवणे.
२. भाषेचा संक्षिप्त इतिहास.
३. चार ते पाच गीते, लोकगीते किंवा कविता. त्या भाषेतील देतानाच त्यांचा मराठी अनुवादही दिला जाणार आहे. ही गाणी किंवा लोकगीते कोठून व कशी उपलब्ध झाली, याच्या संदर्भ टिपा.
४. त्या भाषेतील कथा-लोककथा-गद्य नमुना आणि त्याचा मराठी अनुवाद आणि ते कोठून उपलब्ध झाले त्याचीही ससंदर्भ टीप.
५. नातेसंबंधांची नावे - (उदा. भाऊ, वडील, आई, मुलगा, जावई इत्यादी.)
६. रंगनामे - (उदा. तांबडा, हिरवा इत्यादी आणि त्याचे मराठी रूपांतर)
७. वेळ, काळ, ऋतू दिवसातील विविध बदल - पहाट, सकाळ, माध्यान्ह, संध्याकाळ, कातरवेळ, रात्र यांना त्या भाषेतील शब्द व त्यांचा मराठी अनुवाद.
८. त्या भाषांत अंतर (उदा. कोस, मैल, फर्लांग, कि.मी.) नामे, सर्वनामे, क्रियापदे, मापे (किलो, शेर, आठवा इत्यादी), महिने.

अशा अनेक पद्धतीने त्या भाषेचा परिचय होणार आहे. हे निकष भारतभरातील विविध भाषांतील भाषावैज्ञानिकांच्या अनेक चर्चा- सभा झाल्यानंतर ठरवले आहेत.

सर्व राज्यातील सर्वेक्षणांचे, त्या-त्या राज्यातील भाषांतून

२८ खंड प्रसिद्ध होतील व त्या सर्व खंडांचे हिंदी व इंग्रजी अनुवादाचे स्वतंत्र खंड तयार होतील. हे काम पूर्ण झाल्यानंतर ह्या २८ खंडांतून २० महाखंड तयार होतील. त्याचे स्वरूप विस्तारभयास्तव येथे देत नाही; पण या खंडांत सर्व राज्यांतील भाषांचे एकत्रित सर्वेक्षण असणार आहे,

महाराष्ट्राच्या भाषिक सर्वेक्षणाचा खंड एकूण चार भागांत आहे. तो असा :-

१. **मराठी आणि मराठीची रूपे :** यात ११ भाषांचा समावेश आहे.
२. **आदिवासींच्या भाषा :** आदिवासींच्या जवळजवळ १६ भाषा यात समाविष्ट झाल्या आहेत.
३. **भटक्या-विमुक्तांच्या भाषा :** या विभागात १८ ते २० भाषा मिळाल्या. आणखी काही मिळण्याची शक्यता आहे.
४. **अन्य भाषा :** यात दख्खनी किंवा नॉ लींगसारख्या भाषा समाविष्ट केल्या आहेत.

भाषांची ही स्थिती आजची आहे. २०१० ते २०१२ या काळात उपलब्ध झालेल्या व बोलल्या जाणाऱ्या या भाषा आहेत.

महाराष्ट्रातील जनजातींच्या या अन्य भाषांवर मराठीचे आक्रमण झाले आहे. इंग्रजीचे मराठीवर जसे आक्रमण होत आहे व मराठीचे नुकसान होत आहे. तसेच मराठीमुळे या भाषा क्षीण होत चालल्या आहेत. मोठा मासा छोट्या माशाला मारतो हा नियम भाषांनाही लागू आहे. आज ज्या काही भाषा हाती लागल्या त्या भाषा हे सर्वेक्षण अजून पाच वर्षांनी झाले असते तर त्यातील बऱ्याच भाषा मिळाल्या नसत्या. एका अर्थाने उशिरा का होईना, पण एक उत्तम भाषिक प्रकल्प महाराष्ट्रात होत आहे.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

अखिल भारतीय पातळीवर चालणाऱ्या या भाषिक व सांस्कृतिक प्रकल्पात महाराष्ट्राचा समन्वयक, प्रकाशक होण्याची संधी मला मिळाली ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे. या कामामुळे माझे व मुख्य म्हणजे माझ्या प्रकाशन संस्थेचे नाव भारतात व जगभरच, दीर्घकाळ लक्षात राहील, असा मला आत्मविश्वास वाटतो. भाषा केंद्र बडोदा व डॉ. देवी यांनी दाखवलेल्या विश्वासास मी पात्र ठरलो, ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे.

**सारांश :** भाषेच्या माध्यमातून शांती आणि सामंजस्य. भाषेच्या पुनरुत्थानासाठी आदानप्रदान, भाषेचे धोरण ठरवणे, अल्पसंख्य समाजाच्या भाषाविषयक प्रकल्पांची गुणात्मकता पाहणे. सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्यतेचा अभ्यास, शिक्षण, प्रशिक्षण यासंबंधीची साधनसामग्री उपलब्ध करून देणे अशी भाषाविषयक महत्त्वपूर्ण कामे म्हणजे PLSI - भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण हा महाप्रकल्प होय.

(लोकराज्य जानेवारी-फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# अद्भुत आणि अद्वितीय

**डॉ. चारुशीला ओक**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे नाव विश्वकोशाशी कायमचे जोडले गेले आहे इतकी ग्रंथसंपदा त्यांनी विश्वकोशासाठी निर्माण केली. एक नव्हे, दोन नव्हे, तब्बल १४ खंड त्यांनी संपादित केले. तद्नंतर मे. पुं. रेगे यांच्या काळात खंड १५, तर रा. ग. जाधव यांच्या काळात खंड १९ चे संपादन झाले. या दोघांच्या काळात निर्माण होत असलेला कुमार विश्वकोश परिचय ग्रंथ डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या काळात प्रकाशित झाला, तसेच मराठीतून स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या युवक-युवतींसाठी जिचकारांनी विश्वकोश वार्षिकी काढली. डॉ. विजया वाड यांच्या काळात खंड १७, खंड १८, खंड १९ त्यांनी संपादित केले. तसेच होमी भाभा विज्ञान शिक्षण संस्थेच्या वतीने कुमार विश्वकोश- जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग-१ हा समन्वयक डॉ. हेमचंद्र प्रधान व संपादक विजया वाड या द्वयीने महाराष्ट्रातील शास्त्रज्ञांच्यासह तयार केला. ही सारी मराठी भाषेच्या विकासासाठीच चाललेली त्यांची धडपड आहे. मराठीतून ज्यांना ज्यांना शिकायचे आहे, त्यांच्या गरजा या ग्रंथांनी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. पत्रकार मित्रही या ग्रंथांचा पुष्कळ उपयोग करून घेतात. विश्वकोश हा माहितीचा खजिना असून त्याची विश्वासार्हता सर्व संपादकांनी जपली आहे. नोंद तयार करणे हे काम त्या त्या विषयातील ज्ञानी लोक करतात. त्यानंतर त्याची समीक्षाही महाराष्ट्रातील ज्ञानवंत करतात. मग संपादन होते; त्यामुळे मराठी भाषेतील हे ग्रंथ अधिकाधिक सधन होतात. आता इंटरनेटचे माध्यम आले आहे आणि त्याचा अचूक उपयोग विश्वकोश मंडळाने करून घेतला आहे.

### विश्वकोशाची सीडी

विश्वकोशाचे एक क्रांतिकारी पाऊल विश्वकोश मंडळाच्या

तत्कालीन अध्यक्षा डॉ. विजया वाड यांच्या काळात उचलले गेले. विश्वकोशाची सीडी करावी असा ठराव त्यांनी मंडळापुढे ठेवला. २०,१८२ पृष्ठे समाविष्ट असलेला ६ सीडींचा १ ते १७ खंडांचा सीडी संच केवळ ७५० रुपयांना संगणकतज्ज्ञ माधव शिरवळकर यांच्या तांत्रिक सहकार्याने उपलब्ध झाला. शासनाची भूमिका मराठीच्या विकासासाठी उपकारक असल्याने व त्यातून नफा कमावणे हे शासनाचे उद्दिष्ट नसल्यानेच हा संच केवळ ७५० रुपयांत जनतेस उपलब्ध झाला. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सीडी संचाचे उद्घाटन केले. सुरुवातीचे २ महिने तो ५०० रुपयांस जनतेला द्या व मराठी वाचनाची वृद्धी करा, असे त्यांनी सूचित केले.




### विश्वकोशराज स्पर्धा

विश्वकोश कोशात न राहता विश्वात यावा, युवक-युवती, किशोर-किशोरी, भगिनी, वाचक, ज्येष्ठ नागरिक या सर्वापर्यंत पोचवण्याची मनीषा बाळगून सारे सदस्य अध्यक्षांबरोबर महाराष्ट्रभर फिरले. २२ जिल्हे पिंजून काढले. विलास खोले, सदानंद मोरे, दादा गोरे, जयकुमार मगर, माधव शिरवळकर, सुधा काळदाते, वर्षा शिरगावकर, चारुशीला ओक, शरयू बबनराव तायवाडे, शोभा शिंदे, हेमचंद्र प्रधान, दत्ता भगत, डॉ. सु. र. देशपांडे अशी कितीतरी मंडळी वेळोवेळी विजयाबाईंबरोबर होती आणि ग्रंथवाचनाची गोडी त्यातून अनेकांना निर्माण झाल्याची पत्रे विश्वकोश कार्यालयात प्राप्त झाली आहेत. लोकांनी ग्रंथ विकत घेऊन या स्पर्धेत भाग घेतला हे विशेष. औरंगाबादेत तर हरसूल जेलमध्येही ही स्पर्धा झाली. तेव्हा बंदिवानांचे डोळे सजल झाले होते. अपंगांसाठी, अधांसाठी ही स्पर्धा होणे हा विश्वकोशाच्या पर्वातील कळसाध्याय होय. कामगारांनीही या स्पर्धात भाग घेऊन 'हम भी कुछ कम नहीं' हे दाखवून दिले. कोल्हापूर, सोलापूर, रायगड, सिंधदुर्ग, ठाणे, पुणे, मुंबई, नवी मुंबई, औरंगाबाद, गडचिरोली, नागपूर, तुळजापूर... किती म्हणून नावे घ्यावी.

वाचनाची गोडी लागली तर विचारही परिपक्व होतात हे या स्पर्धांनी आम्हांस शिकविले, हे उद्गार आहेत महाविजेता अजिंक्य आफळे वा युवकाचे. तो कोल्हापूरचा आहे. हा तर मराठी भाषेचा बोलका विकासच म्हणू या.

### महाराष्ट्र कन्या

महिला सबलीकरणाच्या गोष्टी समाजात होत असतात आणि प्रत्येकच संस्था आपापल्यापरीने त्यास हातभार लावीत असते. विश्वकोश मंडळाने २२ तासांचा ३ सीडींचा संच असलेली भेट जगास अर्पण केली आहे. याची सर्जन संकल्पना विजया वाड यांची तर समन्वयक आहेत माधवी कुंटे, मी, चारुशीला ओक. या कामात आम्ही अगदी प्रथमपासून रस घेतला. आतिश सोसे, हेमांगी कडू, मनीषा कदम, क्रांती केळकर या तरुण मुलांनी अपार मेहनत घेतली. ज्येष्ठ निवेदक प्रदीप भिडे, शिबानी जोशी, नितीश भारद्वाज, नीला सत्यनारायण, गौरी देशमुख अशांनी वाचन केले आहे. याचे शीर्षकगीत गौरी कुलकर्णी यांचे असून ते देवकी पंडित गायल्या आहेत. २७५ महिलांची स्फूर्तिदायक चरित्रे ही उमलत्या वयाच्या किशोरींसाठी ही मराठी भाषेला विश्वकोशाने दिलेली एक प्रेमभेट आहे.

### आपला विश्वकोश

'आपला विश्वकोश' हा आहे एक नितांत सुंदर लघुपट. यात विश्वकोश गीत आहे. भाष्यकार जयंत नारळीकर यांनी विश्वकोशाचा इतिहास उलगडला आहे. रिमा या प्रसिद्ध अभिनेत्रीचे निवेदन आहे. विश्वकोश कार्य विजयाबाईंनी वर्णिले आहे. हा लघुपट जनमानसात विश्वकोशाबद्दल आणि तद्नुषंगाने मराठी भाषेबद्दल निश्चित प्रेम निर्माण करेल, असा विश्वास वाटतो.

(लोकराज्य फेब्रुवारी २०१३ मधून पुनर्मुद्रित)

# उत्सवाकडून देखाव्याकडे....

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

**दिनकर गांगल**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर दरवर्षी दोन-पाच कोटी रुपये खर्च होतो. त्यास तीन दिवसांत १५ ते २५ हजार रसिक हजेरी लावतात. सुमारे १५० कवी-लेखक-समीक्षक समाजचिंतक वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. ज्या गावी संमेलन होते तेथे तीन दिवस धूम माजते. मुंबई-ठाणे- पुणे याबाहेर संमेलन झाले, तर गावभर उत्साह संचारला असल्याचा विशेष प्रत्यय येतो. गमतीदार व उद्‌बोधकही विसंगती अशी, की एवढ्या मोठ्या सांस्कृतिक घटनेचा प्रभाव नंतर जराही जाणवत नाही. फक्त ज्या संस्थेमार्फत संमेलन भरते तेथील पदाधिकाऱ्यांची लगबग हिशोब मिटवणे, कार्यक्रमांचा आढावा घेणे वगैरेसाठी काही महिने चालू राहते. नगरच्या १९९७ च्या संमेलनापासून तीन दिवस झालेल्या कार्यक्रमांचे जसेच्या तसे वृत्तान्त छापणे व ते ग्रंथरूपाने प्रसिद्ध करणे अशी डॉक्युमेंटेशनची पद्धत सुरू झाली. गेल्या १५ वर्षांत चार-पाच संमेलनांचेच असे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. 'असं घडलं संमेलन' हा मा. य. गोखले यांनी संपादित केलेला ठाणे संमेलनाचा ग्रंथ अलीकडेच प्रकाशित झाला आहे. त्या संमेलनाची ती एका अर्थाने सांगता होय. दरम्यान, नव्या संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके हे निवडलेही गेले आहेत.

साहित्य संमेलनाचे पूर्वीचे नाव 'ग्रंथकार संमेलन'. तसे पहिले संमेलन भरून १३४ वर्षे उलटून गेली आहेत, परंतु प्रत्यक्षात संमेलने झाली फक्त ८४. खरेतर, तो छोटा साहित्यिकांचा व साहित्यरसिकांचा मेळावा असायला हवा. जसा डॉक्टरांचा, इंजिनिअरांचा, अगदी इतिहास संशोधकांचा भरतो तसा. त्यात साहित्यविषयक प्रश्न चर्चिले जायला हवे. पूर्वी काही प्रमाणात तसे घडतही असे. परंतु साहित्य संमेलनाचे स्वरूप १९७४ पासून बदलले. त्या वर्षी पु. ल. देशपांडे संमेलनाचे अध्यक्ष होते. संमेलन इचलकरंजीला झाले. त्या वेळी प्रथम संमेलनाला
१० हजारांच्या आसपास लोक जमले. त्या वर्षी प्रथमच दूरदर्शनने अध्यक्षांच्या भाषणापासून सर्व कार्यक्रम सविस्तर दाखवले. संमेलनात 'कॅमेरा सेटअप' वगैरे मोठे ग्लॅमर होते आणि पुलंची त्यावर अचूक नजर होती. ते रास्तही होते.

इचलकरंजीच्या पाठोपाठ कऱ्हाड येथे १९७५ साली संमेलन भरले. तेथे दुर्गा भागवत अध्यक्ष होत्या. मुख्य म्हणजे देशात आणीबाणी होती. भागवत यांनी आणीबाणीविरुद्ध प्रखर भूमिका घेतली होती. त्यामुळे संमेलनाबद्दल वेगळे औत्सुक्य तयार झाले होते. त्या वेळी साहित्याबरोबर अन्य क्षेत्रांतील मान्यवर मंडळी संमेलनास उपस्थित होती. माझ्या शेजारी चित्रपट दिग्दर्शक गोविंद निहलानी येऊन बसल्याचे आठवते.

या दोन्ही संमेलनाचे प्रत्यक्षतः वा पर्यायाने आश्रयदाते यशवंतराव चव्हाण होते. परंतु, त्यांच्या थोरवीला तुल्यबळ ठरतील आणि साहित्यप्रेमापुरते बोलायचे तर सरस ठरतील, असे वि. स. खाडेकरांपासून ना. धों. महानोरांपर्यंतचे साहित्यिक त्या वेळी अस्तित्वात होते. महानोर प्रकाशात आले तेच इचलकरंजीच्या संमेलनात व लगेच उच्च वर्तुळात विराजमान झाले. अशा मान्यवर बऱ्याच साहित्यिकांच्या उपस्थितीमुळे चव्हाण व त्यांचा गोतावळा कोणाला फार खटकला नाही. चव्हाण स्वतःदेखील उत्तम वाचक व साहित्यप्रेमी होते आणि त्यांची ऊठबस साहित्यिक मंडळीत असे. कराडला चव्हाण यांचा आणीबाणीसंदर्भात प्रतीकात्मक निषेध झाला. ती छाया संमेलनावर सतत राहिली.

किंबहुना, त्यानंतर काही वर्षे साहित्य संमेलेनातील



राजकारण्यांची उपस्थिती हा मुद्दा वादाचा होत राहिला. पण, त्यांच्याविना संमेलन भरवण्याची धमकदेखील दाखवली जात नाही. त्यामुळे काहीतरी पळवाटा काढून राजकारण्यांना संमेलनात आणले जाते. साहित्य वाचन मुख्यतः मध्यमवर्गात होई. त्या मध्यमवर्गात राजकारण या विषयाबद्दल चर्चा बहुत असली तरी राजकारण्यांबद्दल नफरत असते. आणीबाणी, जनता पार्टीचा प्रयोग यामुळे मध्यवर्गीयांमधील राजकारणविषयक तिरस्काराला वैफल्याचे रूप आले. त्यामधून साहित्यिक-कलावंत विरुद्ध राजकारणी असे द्वंद्व सतत उभे केले गेले. त्यामध्ये राजकारणातील अनाचार वाढत आहे असे जेव्हा पराकोटीने वाटू लागले तेव्हा १९८१ साली एकदाच समांतर साहित्य संमेलन भरवले गेले. पण, माधव गडकरी यांच्यासारखे लोकाभिमुख नेतृत्व असूनदेखील हे संमेलन जेमतेम दीड दिवस आणि तेदेखील कॉलेजच्या छोट्या मैदानात घडून आले. 'चतुरंग', 'ग्रंथाली' या संस्थांचे वार्षिक मेळावे एवढे भरतच असतात. साहित्यिकांनी कोणतीही गोष्ट स्वतःच्या पूर्ण ताकदीनिशी करायची म्हटली तर ती जास्तीत जास्त मोठी समांतर साहित्य संमलेनाएवढी होऊ शकेल असा मापदंड तयार झाला!

इकडे, मुख्य साहित्य संमेलने वर्षानुवर्षे विस्तारत गेली. संमेलनास गर्दी होणे ही सामाजिक प्रक्रिया बनली, कारण साक्षर समुदाय वाढत होता. मग, गर्दी जमवण्यामध्ये गावोगावी अहमहमिका सुरू झाली. लेखक-कवींनादेखील ती गर्दी आवडत होती. जिल्ह्याजिल्ह्यांत राजकीय पुढारी निर्माण झाले होते, त्यांच्यापुढे आदर्श यशवंतराव चव्हाण, शरद पवार यांचा होता. त्यांना विविध साहित्य कलांना आपला आश्रय असावा असे रास्तपणे वाटू लागले. आणि नकळतपणे साहित्य संमेलनाची सूत्रे तथाकथित साहित्यबाह्य व्यक्तींकडे गेली. संमेलने ज्यांच्यामार्फत भरवली जातात, त्या साहित्य महामंडळाला केवळ मानाचे स्थान राहिले आहे. त्यांनाही राजकारणी अथवा अमिताभसारखे नट यांच्याबरोबर थोडा लोकप्रियतेच्या चर्चेत असण्याचा वाटा मिळतो.

साहित्य संमेलनाचे आजचे स्वरूप दिसायला, त्यामध्ये वावरायला लोभस असते. संमेलनातील दोन-अडीच दिवस सामाजिकदृष्ट्या साक्षात्कारी असू शकतात. त्यामध्ये साहित्य चर्चेचा वाटादेखील योग्य प्रमाणात असतो. एरवी, छोटा कुंभमेळा वाटावा अशी अरूप गर्दी संबंध संमेलन परिसरात जाणवते. साहित्यविषयक कार्यक्रमांना, पुस्तक व चित्रप्रदर्शनांना लोक ओढीने भेट देत असतात.




कराडच्या संमेलनात (२००३) श्री. पु. भागवत यांची मुलाखत ऐकायला मंडपात दोन ते तीन हजार लोक बसलेले पाहून मी थक्क झालो होतो. पण हे सारे विलोभनीय असते.

साहित्य संमेलनातील कार्यक्रमांचे स्वरूप गेल्या ३०-४० वर्षांत ठरून गेले आहे. कार्यक्रमांमध्ये चर्चा विषय व वक्ते यांच्या नावांमध्ये बरीच विविधता असते. प्रादेशिक तोल नीट सांभाळला जातो, पण कल्पकतेच्या व आशयाच्या दृष्टीने फार काही हाती लागत नाही. तसेच, त्यांच्या सादरीकरणाच्या पद्धतीत नवीनता आणली जात नाही. नव्या माध्यमांचा फारसा उपयोग होत नाही. ठाण्याच्या संमेलनात एक दिवस चित्रपट संमेलन भरवावे, असे त्या क्षेत्रातील मंडळी सुचवत होती. अक्षराच्या जागी चित्रांची भाषा येणार आहे तिची वेळीच दखल घेऊ असे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या सततच्या आग्रहाला प्रतिसाद म्हणून संमेलनात दोन चित्रपट दाखवले गेले आणि एक चर्चा घडवून आणली गेली. कार्यक्रमांना कर्मकांडाचे स्वरूप संयोजक व वक्ते यांच्याकडून दिले जात आहे.

पुलं जिथे जात तिथे सर्व गोष्टींवर त्याची हुकूमत चाले. त्यांनी इचलकरंजीच्या संमेलनात कार्यक्रमाचा उत्तम पॅटर्न ठरवून दिला होता. मुख्य मंडपात कथाकथन, काव्यवाचन व मनोरंजनाचे मोठे कार्यक्रम होत, त्या वेळी बंदिस्त खोल्यांमध्ये साहित्यविषयक प्रश्नांवर गटवार चर्चा चालू असत. त्यामुळे त्या संमेलनात अनेक चांगले मुद्दे वेगवेगळ्या पातळ्यांवर उपस्थित केले गेले. अर्थात, काळही अशा चर्चांना अनुकूल होता.

कार्यक्रम संयोजनाची ही ठेवण नंतर कधी जमली नाही, त्यामुळे संमेलनाचे स्वरूप उत्सवी राहिले. त्यापलीकडे साहित्य व्यवहार या दृष्टीने संमेलनाचे फलित काय? तर 'जवळ जवळ काही नाही' असेच उत्तर येते. स्वाभाविकच मग एवढा खर्च कशासाठी करायचा, असा प्रश्न उपस्थित होतो. त्याचेही उत्तर 'गणेशोत्सव कसा केला जातो' यासारख्या प्रश्नांशी देऊन भिडते. गणेशोत्सव घरात असेल तर कुटुंबीयांची देवावरील निष्ठा व त्यांची खर्च करण्याची ऐपत' असे उत्तर येईल आणि गणेशोत्सव सार्वजनिक असेल तर 'कार्यकर्त्यांची हौस' असे

उत्तर येईल साहित्य संमेलन सार्वजनिकरीत्या भरवले जाते. संयोजकांपैकी महामंडळाकडे नियमावली व त्याच्या पदाधिकाऱ्यांचे मानपान यापलीकडे काहीच औत्सुक्य नसते. जी स्थानिक संस्था संमेलन भरवते तिच्याकडे हौसेचे कार्यकर्ते असले की संमेलन धडाक्यात पार पडते.

महामंडळातील ताण महाबळेश्वरच्या संमेलनापासून प्रकर्षाने ध्यानी आले. त्याआधी सांगलीला छोटा स्फोट घडून आला. संमेलनाचे माजी अध्यक्ष अरुण साधू पदाची सूत्रे न देता निघून गेले. राष्ट्रपतींच्या उपस्थितीत तो वाद झाकला गेला.

महाबळेश्वरला नियोजित अध्यक्ष आनंद यादव यांच्याशिवाय संमेलन पार पडले! या दोन्ही प्रसंगांचे खापर महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष ठाले पाटील यांच्यावर फोडले जाते. ते काही प्रमाणात सत्य असले तरी महामंडळाची विदर्भ शाखा तेव्हापासून असंतुष्ट आहे व त्यांची समजूत केंद्र समिती घालू शकलेली नाही. महामंडळात ती धुसफूस सतत चालू असते. तथापि, वाद तडीला न्यावे अशी ईर्षा व ऊर्जादेखील महामंडळात राहिलेली नाही. महामंडळ, त्याच्या घटक संस्था आणि संमेलन भरवणारी स्थानिक संस्था हे जे नातेसंबंध आहेत ते केव्हातरी कोलमडून पडतील, अशी भीती वाटते.

ते टिकण्याचे खरे कारण आहे, की जोपर्यंत अर्थपुरवठा होत आहे तोपर्यंत या तिन्ही संस्थाची मंडळी आपापले हितसंबंध साधत एकत्र नांदत असतात. अर्थपुरवठ्यामधील मोठा वाटा सरकारचा असतो. त्या बीजावर बाकी भांडवल उभे राहते.

यामध्ये संमेलनाध्यक्षाचा हितसंबंध फार गमतीदार आहेत. त्याने फक्त संमेलनात येऊन मिरवायचे असते आणि त्याच्या आगेमागे वर्षभर महाराष्ट्रात सर्व फिरून सत्कारच्या शाली गोळा करायच्या असतात. नारायण सुर्वे १९९५ साली परभणीला संमेलनाध्यक्ष होते. त्यांचा संपर्क आधीपासूनच साऱ्या महाराष्ट्रभर. त्या वर्षात ते फिरफिर फिरले. त्यांनी म्हणे २०० शाली गोळा केल्या व त्या गरिबांना वाटून टाकल्या. त्यांनी त्या काळात व त्याच्या आधीदेखील ठिकठिकाणी नवोदित लेखकांना छान मार्गदर्शन केले. त्याबद्दल नंतर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांतील मनोगतांमध्ये व अर्पणपत्रिकांमध्ये दखल घेतल्याचे दिसून येते. संमेलनाध्यक्षाला त्या पदी निवडून जाण्यात रस असतो तो संमेलनाच्या एवढ्या मोठ्या व्यासपीठावरून आपली भूमिका मांडता येते म्हणून. अलीकडे झालेल्या अध्यक्षांमध्ये अरुण साधू, आनंद यादव, द. भि. कुळकर्णी, उत्तम कांबळे आणि चंद्रपूरच्या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष वसंत आबाजी डहाके हे साहित्य विषयक पक्की भूमिका असलेले साहित्यिक आहेत ही समाधानाची बाब होय. त्यामुळे संमेलनाच्या उत्सवात काहीतरी प्राण दिसून आला. ज्यांना भूमिका नसते असे लेखक अध्यक्षपदी मिरवण्यात रमतात.

संमेलनाचे अर्थकारण हा नेहमी वादाचा मुद्दा येतो. अलीकडच्या काळात नागपूर येथील संमेलन त्यातल्या त्यात काटकसरीने पंच्याहत्तर लाख रुपयांत घडून आल्याचे ऐकले. एरवी संमेलनाचा खर्च दोन कोटी रुपयांपर्यंत जातो. तो संमेलनाचे स्वरूप पाहता समर्थनीय आहे. मात्र, साहित्यविश्व आपल्या हिमतीवर रक्कम उभी करू शकत नाही. साहित्यविश्वाने तसा प्रयत्न १९८१ साली केला आणि समांतर संमेलन भरवले. त्या संमेलनामधून साहित्यकांचा सन्मान तीस वर्षांनंतर बिंदूरूपाने देखील राहिलेला दिसत नाही. संमेलने स्वायत्त व्हावी म्हणून वसुंधरा पेंडसे नाईक यांनी दुर्गा भागवत यांच्या प्रेरणेने मोठा निधी उभा करण्याचा संकल्प सोडला. तो निधी अर्धवट पडून आहे. वार्षिक मराठी साहित्य संमेलन बांडगुळाप्रमाणे प्रस्थापित विश्वावर अवलंबून आहे. लेखक वर्ग स्वतःचा मान स्वतः सांभाळू शकत नाहीत हे स्पष्ट झाले आहे. उत्सव ही कार्यकत्यांची हौस आहे. त्यामुळे संमेलने हौस आहे. तोपर्यंत होत राहतील. लेखकांनी त्यांच्या प्रतिभा सामर्थ्यातून निर्माण होणारा हा जो साहित्योत्सव आहे तो कुतूहलाने पाहावा, जमल्यास त्यात तीन दिवस रमावे आणि साहित्यसंस्था हा उत्सव घडवून आपल्याच प्रतिभा सामर्थ्याचा गौरव करत आहेत, याबद्दल कृतज्ञ असावं.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

कधी कधी, कार्यकत्यांकडून थोडी अधिक अपेक्षा बाळगावी असे वाटते, कारण हे कार्यकर्ते आम समाजातील नसतात. साहित्यप्रेमी असतात, सुसंस्कृत असतात, एका मोठ्या परंपरा असलेला साहित्यसंस्थेशी जोडले गेलेले असतात. साहित्य संमेलन सामाजिक प्रक्रिया म्हणून सर्वसमावेशक होत असताना संमेलनातील संस्कृतिमूल्य जपले जाईल याची काळजी कार्यकत्यांनी घ्यायला हवी. संमेलनाला गेल्या कित्येक वर्षांपासून हेतुशून्यता येत आहे. एवढ्या मोठ्या सांस्कृतिक घटनेत निरर्थकता शिरली, तर मग आपल्या सुसंस्कृततेला अर्थ काय याचा विचार महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि संमेलन संयोजक साहित्यसंस्थेच्या कार्यकत्यांनी करायला हवा. विशेषतः तंत्रज्ञान प्रभावाच्या सद्यः काळात साहित्याची गरज व साहित्याचा संस्कार या संबंधात मूलभूत मांडणी होण्याची आवश्यकता वाटते. याच वेळी अध्यक्षाला त्याची भूमिका मांडण्यापलीकडे संमेलनाचे व्यासपीठ साहित्यविषयक मूलभूत विचारमंथनासाठी कसे उपयोगात आणता येईल, याचा विचार व्हायला हवा. तरच संमेलनास सार्थकता लाभेल अन्यथा संमेलनास सध्याच उत्सवाचे स्वरूप आले आहे, ते आणखी मर्यादित होऊन देखाव्यापुरते राहील!

(लोकराज्य जानेवारी-फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# तेव्हा आणि आता...

**डॉ. श्रीपाद जोशी**

साहित्य संमेलन या शब्दप्रयोगाने अजूनही बोध होतो तो मुळात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचाच अजूनही म्हणण्याचे कारण असे की, मराठीमध्ये वेगवेगळ्या साहित्य संमेलनांची आज एक स्वतंत्र अशी उपसंस्कृतीच निर्माण झाली असूनही व कितीतरी प्रवाहांची, कितीतरी प्रकारांची, कितीतरी ठिकाणी, जवळजवळ रोजच सरासरी एखादे तरी संमेलन असावे अशा रीतीने कित्येक वर्षे वेगवेगळी साहित्य संमेलने विविध ठिकाणी आयोजित केली जात असूनही 'साहित्य संमेलन' म्हटले म्हणजे फक्त अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनच आपल्या डोळ्यांपुढे उभे राहते.

असे का होते? याचे एक कारण या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन' नामक आयोजनाला सुमारे शतकोत्तर पाव शतकाहून अधिक काळची परंपरा लाभली आहे. पण मुळात ही संमेलने ही 'संमेलने' नसून अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ते 'अधिवेशन' आहे ही वस्तुस्थिती आता महामंडळाच्या केवळ घटनेत तसे उल्लेखित असण्यापुरतीच व शेवटच्या दिवशीच्या ठराव वाचनाच्या व टाळ्या वाजवण्याच्या नैमित्तिक उपचारापुरतीच मर्यादित उरली आहे. दुसरे कारण या संमेलनाच्या व्यासपीठावर, प्रायोजकत्व व स्वागताध्यक्षत्वात विविध पक्षोपक्षाच्या, विशेषतः सत्तारूढ पक्षोपक्षाच्या नेतृत्वाचा वाढलेला वावर धनसत्ता व राजसत्तेचा लाभलेला आश्रय, त्यामुळे प्राप्त होत चाललेले ऐश्वर्य, उत्सवी सोहळ्याचे स्वरूप, प्रवास-निवास भोजनाच्या अगदी दिमाखदार सोयींसह वर लाभणारी मानधनाची दक्षिणा हेही आहे. आयोजकांमधील सामान्य कार्यकर्त्यांना पडणारे कष्ट सोडल्यास सारे काही आपल्या खिशात हात न घालता परस्परच होत असल्यामुळे एका अर्थाने ही काही लोकांची सन्माननीय वार्षिक चंगळही झालेली आहे.




महाराष्ट्र हे भाषिक राज्य पुनर्रचनेच्या तत्त्वावर संघर्ष करून, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचा त्यासाठी लढा लढून व त्यातही त्या लढ्यांची मुहूर्तमेढ ही जुन्या मध्यप्रांताच्या असेंब्लीत नागपुरात १९३८ साली तसा ठराव करून रोवली गेल्याचे जसे आता विस्मृतीत गेले आहे. त्यामुळे हा 'महाराष्ट्र' नुसता 'महाराष्ट्र' नसून तो 'संयुक्त' झालेला महाराष्ट्र आहे हे देखील जसे विस्मृतीत टाकले गेले आहे तसेच काहीसे हे साहित्य संमेलन हे मुळात या 'संयुक्त महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांच्या स्वायत्त अशा प्रादेशिक साहित्य संस्थांच्या मिळून निर्माण केल्या गेलेल्या साहित्य महामंडळाचे ते अधिवेशन' असते व पुढे त्यात महाराष्ट्राबाहेरील भारतातील समाविष्ट व संलग्न केल्या गेलेल्या अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे ते अधिवेशन असते हे खुद्द त्या संस्था व त्या महामंडळाच्यादेखील जणू विस्मृतीतच गेले आहे. असे म्हणण्यापेक्षाही गर्दीच्या, धनसत्तेच्या व राजसतेच्या त्याला लाभत गेलेल्या आश्रयामुळे त्याचे जे व्यावहारिक, आनुषंगिक लाभ विविध हितसंबंधितांसाठी त्यातून निर्माण झाले आहेत. त्यामुळे त्याचे ते अधिवेशनाचे मूळ स्वरूपच जाणीवपूर्वकच विस्मृतीत टाकले गेले आहे.

केवळ हेच संमेलन नव्हे, तर हे संमेलन तेवढे भरवण्याचे जवळजवळ एकमेवच काम करणाऱ्या या महामंडळाच्या ज्या विभागीय घटक व अन्य समाविष्ट, संलग्न संस्था आहेत त्यांची विभागीय संमेलनेदेखील मुळात त्यांची अधिवेशनेच आहेत. मात्र, या संमेलनांच्या व्यासपीठांना गेल्या सुमारे दोन-तीन दशकांपासून लाभलेली गर्दी, राजाश्रय व प्रायोजकाश्रयामुळे आपल्या सोईसाठी आपण विनयाने नव्हे, तर' धूर्तपणे त्या गर्दीला 'रसिक' म्हणून संबोधण्याचे जे आनुषंगिक व्यावहारिक लाभ आयोजक व संबंधितांना असतात त्या पोटी तिला 'रसिक' म्हणून लागलो आहोत. त्यामुळे या विभागीय संमेलन संस्कृतीचेही स्वरूप शेवटच्या दिवशीचा केवळ टाळ्यांच्या गजरात कोणत्याही चर्चेविना ठराव वाचनाचा उपचार सोडला तर मुळात अधिवेशनाचे उरलेलेच नाही. गेल्या अनेक दशकातील अशा शेकडो ठरावांचे पुढे काय करायचे याच्याशी कोणालाच फारसे कर्तव्यही उरत नाही. त्याचा कोणी पाठपुरावाही करत नाही. एवढेच कशाला ते सारे ठराव जे करतात, त्यांच्याकडे उपलब्धदेखील पुनः होत नाहीत. साहित्य विश्वाच्या मागण्या, सूचना, अपेक्षांचे पुढे वर्षानुवर्षे काहीच झाले नाही तरी त्याकडे लक्ष पुरवणे, त्यांचा पाठपुरावा करणे हे जणू आपले कामच

नाही अशा थाटात खाऊन-पिऊन, हात पुसून, एक 'संमेलन' संपले की पुनः दुसरे 'संमेलन' आणि त्यात पुनः नवीन ठराव एवढे व्यावसायिक क्रिकेटसारखे चक्र मात्र अव्याहत सुरू असते.

थोडक्यात, या संस्थांच्या मूळ संस्थात्मक उद्दिष्ट कार्यापेक्षा केवळ व्यासपीठीय, गर्दीच्या, पैसा व निधी जमवून तो स्थायी स्वरूपात ठेवण्याऐवजी व संस्थांच्या मूळ उद्दिष्टांवर खर्च करण्याऐवजी अनाठायी खर्च करण्याच्या व त्यासाठी धनसत्ता, राजसत्ता व गर्दीच्या लांगुलचालनाचे तेवढे मुख्य कार्य करणाऱ्या प्रमुख संस्थांमध्ये या 'संमेलन' नामक उत्सव भरवणाऱ्या संस्थांचे रूपांतर झाले आहे. एका अर्थाने आपल्या मूळ उद्दिष्टांनुरूप आवश्यक ते कार्यच करण्याचे टाळणाऱ्या या संस्थांची गरजच संपुष्टात आल्यासारखी ही स्थिती आहे.

आपल्या संस्था मुळात कशाकरता निर्माण केल्या गेल्या होत्या, त्यांची घटनात्मक उद्दिष्टे काय आहेत व त्यांची पूर्ती करण्याचा आग्रह आपण का, कसा व कशाकरिता धरून ठेवला पाहिजे याचा विचार करणे जवळजवळ आपल्या असल्या संस्थांनी आता सोडूनच दिले आहे इतकेच काय तर त्याचे स्मरण करून देणारे हे जणू त्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना अडचणीत आणण्यासाठीच तसे स्मरण करून देण्याचा उपदव्याप करतात, असे चक्क सांगितलेही जाऊ लागले आहे. त्यामुळे या संस्थांच्या मूळ उद्दिष्टपूर्तीचा आग्रह धरणारे हे जणू शत्रू असावेत, अशी वागणूक त्यांना दिली जाते आहे. घटनात्मक उद्दिष्टांना बांधील राहण्याऐवजी केवळ व्यासपीठीय लोकप्रिय लोकानुनयी होऊन आणि ज्याला राजकीय नेतृत्वाचा खासगी धनसत्तेचा प्रायोजकांचा व तथाकथित सांस्कृतिक नेत्यांचा आश्रय लाभू शकेल, शासनाची भरघोस अनुदाने आणि शासन सत्तेचा वरदहस्त तेवढा लाभू शकेल अशा रीतीने आपली मूळ संस्थात्क उद्दिष्ट स्थगित ठेवून केवळ असल्या व्यावहारिक व आनुषंगिक लाभांपुरत्या या संस्था व त्यांचे कार्य मर्यादित करण्याची एक नवीच संस्कृती गेल्या सुमारे दोन-तीन दशकांपासून या संस्थांमधून सुस्थिर केली जात आहे. त्याचे कारण या अधिवेशनांची तथाकथित 'संमेलने' करणाऱ्या या संस्था, ज्या पूर्वी खऱ्या अर्थाने सक्षम व समर्थ प्रतिभावंत लेखक - कलावंत - विचारवंत - बुद्धिवंत प्रज्ञावंत अशांच्या संस्था होत्या. त्यातून आज त्यांचेच लोकशाहीच्या नावावर, निवडणुकांच्या राजकारणातून उच्चाटन केले जाते. त्यांचे नियंत्रणच संपुष्टात आणले गेले आहे. त्या आता प्रतिभावंतांच्या लेखकांच्या साहित्यिकांच्या संस्था उरलेल्याच नाहीत, तर स्वतः ला 'वाङ्मयप्रेमी' म्हणवणाऱ्यांनी साहित्याच्या नावावर त्या क्षेत्रासाठी असणारा निधी उपलब्ध करवून घेण्यापुरत्या तेवढ्या त्या 'साहित्य-संस्था' राखल्या आहेत. त्यांचे नेतृत्व व पदाधिकारी हे आज प्रामुख्याने मान्यवर लेखक प्रतिभावंत साहित्यिकांच्या हाती उरलेलेच नाही. त्यामुळे साहित्यक्षेत्राच्या गरजा जाणणारे द्रष्टे नेतृत्वही उरलेले नाही. प्रतिभावंत लेखकांनाही या संस्थांचे नेतृत्व स्वतः करण्याऐवजी त्यांचे आयते मान-सन्मान घडवून आणणाऱ्या कार्याकर्त्यांच्याच हाती त्या असाव्यात व त्यांनी फक्त आपले हितसंबंध तेवढे सांभाळावे एवढेच आज वाटते आहे. या संस्था चालवणे हे आपले कामच नव्हे ही त्यांची पक्की भूमिका झाली आहे. याचा अर्थ अगोदरच्या ज्या पिढ्यातील प्रतिभावंत लेखकांनी आपला वेळ, श्रम, घाम पैसा खर्च करून या संस्था उभारल्या व टिकवून धरल्या ते एकतर आजच्या प्रतिभावंताइतके 'शहाणे', 'धूर्त', 'चाणाक्ष', तरी नव्हते अथवा त्यांना फारच रिकामा वेळ होता व तो कसा घालवायचा म्हणून तसले गंभीर उद्योग ते करत असावेत. असाच करावा लागेल. मात्र, तरीही या संस्थांना आज 'साहित्य-संस्थाच समजले जाते. साहित्यिकांच्या या संस्था साहित्यिकांनी नव्हे, तर गैर साहित्यिकांनी स्वत:ला साहित्य प्रेमी संबोधून घेऊन चालवाव्या, यालाही एकेकाळी लेखक कलावंत जो तीव्र विरोध करत असत तशी गरज आजच्या प्रतिभावंतांनाच वाटत नाही. या संस्थांच्या नेतृत्वाला आज स्वतंत्रपणे या संस्थांसाठी त्यांच्या गर्दीच्या नसणाऱ्या, राजाश्रय सत्ताश्रय लाभू न शकणाऱ्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी लागणारा लोकनिधी उभारण्याची क्षमता, सामर्थ्य व विश्वासार्हता असल्याचा आत्मविश्वासच उरला नसल्याने त्या केवळ शासनावलंबी, विविध राजकीय पक्षोपक्षांच्या नेतृत्वाशी जवळीक साधून त्यांच्याकडून प्राप्त निधी व अनुदानाश्रेयी संस्था तेवढ्या होत गेल्या आहेत. त्या पोटी आपली स्वायत्तता देखील गहाण टाकणाऱ्या अटीसुद्धा त्या स्वीकारून लागल्या आहेत. अशा अटींना विरोध करणाऱ्या भूमिका घेणाऱ्यांशी आपल्या 'संस्थेचा संबंध नाही, ती त्यांची व्यक्तिगत भूमिका' असल्याचे खुलासे करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

परिणामी, या संस्थांच्या अधिवेशनांची व्यासपीठीय गर्दी खेचणारी 'संमेलने' करून त्या भोवती 'गर्दी' व 'बघे' जमवण्याच्या शक्यतांनुरूप आवश्यक तसे व तेवढेच कार्य, कार्यक्रम व त्याचे सवंग आणि सपाट स्वरूप निश्चित करून तेवढ्यापुरत्या त्या मर्यादित होत होत प्रायोजकाश्रयी, शासनाश्रयी व गर्दीश्रयी होत आपल्या मूळ उद्दिष्टांपासून कितीतरी दूरच नेल्या गेलेल्या आहेत. हे सारे खरे तर फारच गंभीर आहे. पण ते गांभीर्याने जाणून घेण्यात कोणालाच रस उरलेला नाही. एकीकडे आपली घटनात्मक उद्दिष्टे व त्यांच्या पूर्तीची दिशा आणि त्यासाठी आवश्यक साधनसामग्री उभारण्याची क्षमता घालवून बसलेल्या या संस्था दुसरीकडे आपणच मुख्य प्रवाही साहित्य व्यवहाराच्या व ११ कोटी

मराठी जनतेच्या प्रातिनिधिक संस्था असल्याचे सांगायला मात्र विसरत नाहीत. जणू ११ कोटी मराठी जनतेने यांना एकमुखाने निवडून दिले असावे अशा थाटात ते हे सांगत असतात. परिणामी, या काही विशिष्टच संस्थांच्या पलीकडच्या मोठ्या परिघात व अवकाशात चालणारा साहित्य व्यवहार, जो वेगवेगळे प्रवाह, जाति-जमाती, अल्पसंख्य वैचारिकता, तात्त्विकता, बांधिलकी, संकल्पना यांचे प्रतिनिधित्व करतो, तो खऱ्या अर्थाने बहुसंख्य सुसंस्कृत कोट्यवधी मराठी जनतेचा कोणत्याही अर्थाने प्रातिनिधिक वाङ्मयीन व्यवहार ठरवलाच जात नाही. त्याला त्याच्या न्याय्य हक्कांचा शासनाश्रय, निधीचा वाटा व सांस्कृतिक प्रतिष्ठाही उपलब्ध करून दिली जात नाही. त्याच्या संमेलनांना अद्यापही 'समांतर', 'विद्रोही', 'व्यवस्था-विरोधी' मानून 'मुख्य प्रवाही' नसलेल्याच साहित्य-संस्कृती व्यवहाराचाच, दुय्यम दर्जा दिला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राम मनोहर लोहियांच्याच भाषेत या प्रक्रियेचे विवेचन करायचे झाल्यास हा भारतीय जातिव्यवस्थेतून झिरपणाऱ्या स्वतःला तेवढे 'मुख्य प्रवाही', 'सांस्कृतिक', 'वाङ्मयीन' समजण्याच्या वर्णवर्चस्ववादी अहंकारी मनोवृत्तीतून आपला समाज अद्यापही मुक्त न केल्या गेल्याचा परिणाम आहे.



ज्या साहित्य संमेलनाचा चेहरा 'साहित्य संमेलन' म्हटल्यावर आपल्यासमोर येतो व ज्याचे अध्यक्षपद लाभल्याशिवाय आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता झाल्याचे विविध प्रवाहांमधील प्रतिष्ठित लेखकांनाही वाटत नाही त्याचे मूळ स्वरूप हे असे आहे. त्याही मागे जाऊन बघायचे झाल्यास न्यायमूर्ती रानडे यांच्या पुढाकाराने १८७८ पासून सुरू झालेल्या 'ग्रंथकार संमेलन' या संमेलनाची मूळ परंपरा लाभलेले हे संमेलन आहे. एका छोटेखानी सभागृहात ग्रंथ, ग्रंथकार, ग्रंथसंस्कृती, ग्रंथव्यवहार, लेखक, प्रतिभावंत व त्या विश्वासी संबंधित समकालीन विषय यासंबंधात व समाजनिष्ठ समाजोपायोगी अशा गांभीर्याने होणाऱ्या चर्चा, विचारमंथन, वाद-विवादाची असणारी ही गंगोत्री आज गर्दी व बघे जमवण्यासाठी भरवल्या जात असलेल्या संमेलन स्वरूपामुळे आपण कितीही पवित्र अशी लोकगंगा झाली असल्याचा कितीही आव आणला तरी त्याची वस्तुस्थिती मात्र प्रचंड प्रमाणावर प्रदूषित असणाऱ्या गंगेसारखीच आहे. आपल्या मनातील नितळ, स्वच्छ, पवित्र, पारदर्शी व शुद्ध अशा हेतूंच्या गंगेची ती निश्चितच उरलेली नाही.

विशेष म्हणजे न्यायमूर्ती रानड्यांना 'शेतकऱ्यांचा आसूड' उगारणाऱ्या सत्यशोधक महात्मा फुल्यांनी त्या ग्रंथकार संमेलनानिमित्ताने लिहिलेल्या त्या ऐतिहासिक पत्रात ज्या अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या होत्या त्यातील त्यांच्या शेतकऱ्यांच्या मुलांनी अशी संमेलने भरवू शकण्याच्या शक्यता आज नुसत्या फलद्रूपच झालेल्या नाहीत, तर या संमेलनांना सत्तेचा राजाश्रय व पैसा आणि प्रायोजकांचा धनाश्रय उपलब्ध करवून देणारी व बहुतांश संमेलने प्रायोजित करणारी मंडळी ही आज शेतकऱ्यांचीच मुलं आहेत. मात्र महात्मा फुल्यांच्या कल्पनेतली त्यातील 'सत्यधर्मी' व 'सत्यशोधक' किती व कोणकोण आहेत हे आपण कधी तपासणार आहोत की नाही?

ग्रंथकार संमेलनातून प्रवाहित होत राहिलेला हा प्रवाह पुढे पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेने आपल्या अधिवेशनांच्या स्वरूपात जोपासलेला, ही संमेलने तोवर आजच्या स्वरूपातही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलने नव्हती. ती पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची' अधिवेशने होती.

मराठवाडा तेव्हा निजामाच्या ताब्यात होता तर विदर्भ हा मध्य प्रांताचा भाग होता. खानदेश- जळगावपर्यंत तर विदर्भ साहित्य संघाचेच तेव्हा कार्यक्षेत्र विस्तारलेले होते.

१९६० साली संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि नागपूर येथे मुख्यालये असणाऱ्या विभागीय साहित्य संस्थांनी मराठी भाषिक एकतेसाठी एकत्र येऊन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना केली. त्यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेची ही अधिवेशने त्या अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची माणून १९६५ पासून भरवली जाऊ लागली. चंद्रपूरचे नियोजित अ. भा. म. साहित्य संमेलन हे अशा अर्थाने खरेतर ८५वे 'अधिवेशन' आहे ते प्रत्यक्षात अ. भा. मराठी साहित्य महामंडळाचे ८५वे साहित्य संमेलन' नाही. पहिली पाच संमेलने म्हणजे १८७८ (पुणे), १८८५ (पुणे), १९०५ (सातारा), १९०६ (पुणे), १९०७ (पुणे), या संमेलनांपर्यंत 'स्वागताध्यक्ष' ही संकल्पना देखील अस्तित्वात आली नव्हती. १८०८ सालच्या पुण्यातल्या ६व्या संमेलनापासून पहिल्यांदा 'स्वागताध्यक्ष' ही कल्पना अस्तित्वात आली. 'मराठी शब्दरत्नाकर' कार वा. गो. आपटे हे पहिले स्वागताध्यक्ष. पहिल्या महिला स्वागताध्यक्ष १९३६ सालच्या जळगावच्या संमेलनाला आनंदीबाई शिर्केच्या रूपाने लाभल्या, तर दुसऱ्या शशिकला काकोडकर १९९४ च्या पणजी येथील संमेलनानिमित्ताने लाभल्या तिसऱ्या महिला स्वागताध्यक्षा सुमित्रा महाजन, इंदूरच्या २००१ च्या संमेलनाला लाभल्या. ८० स्वागताध्यक्षांपैकी फक्त ३ स्वागताध्यक्ष महिला आहेत. यावरून आणि संमेलनाच्या अध्यक्षपदीही महिला अध्यक्षांची अत्यल्प संख्या बघता हा सारा व्यवहार अद्यापही किती पुरुषप्रधान संस्कृतीचाच कसा भाग आहे हे लक्षात येईल.

ही संमेलने धरून पुढील १९०९ च्या बडोदा संमेलनासहीत अध्यक्षांची भाषणे देखील छापील स्वरूपात कधी नव्हती. त्यामुळे ती प्रत्यक्ष हजर राहून ऐकण्याला महत्त्व होते.

या संमेलनाच्या इतिहासात दोनदा अध्यक्ष पद लाभलेले डॉ. आनंद यादव यांना एकदाही या अध्यक्षपदी मात्र बसता न आल्याचा जसा इतिहास आहे तसाच अध्यक्षाशिवाय संमेलन उरकून घेतले गेल्याचा व लेखक साहित्यिक अध्यक्षाविनाच साहित्य संमेलन भरवण्याचा अवांछित व अवाङ्मयीन विक्रमही २००९ च्या महाबळेश्वर संमेलनाने अगदी उजळ माथ्याने केला आहे.

८५ संमेलनापैकी ११ संमेलने एकाच गावी भरवली गेलेले गाव म्हणून 'पुणे' या गावानेही विक्रम नोंदवला आहे. ८५ संमेलनापैकी म्हणजे एक चतुर्थांशापेक्षा अधिक पुणे-मुंबई-सातारा-कराड-सांगली-मिरज या पश्चिम महाराष्ट्रातील गावांच्या वाट्याला तर फक्त ९ संमेलने विदर्भाच्या वाट्याला आलेली आहेत. सर्वाधिक कमी म्हणजे केवळ ६ संमेलने मराठवाड्याने भरविली आहेत. दक्षिण महाराष्ट्रात ४, तर खानदेश विभागात ५ संमेलने, कोकण विभागात सर्वांत कमी म्हणजे केवळ ३ संमेलने, त्यातही दोन रत्नागिरीलाच, वाट्याला आली आहेत.

बहुसंख्य मराठी भाषिक ज्या ग्रामीण भागात असतो अशा भागांना, तर ८५ संमेलने होऊनही या समेलनांनी अद्याप स्पर्शच केलेला नाही. कारण, तिथे वार्षिक चंगळीच्या हव्या असणाऱ्या महानगरी सोयी-साधने उपलब्ध नसतात. विश्वाला दरवर्षी फुकटात गवसणी घालण्यासाठी घटना व नियमबाह्य असूनही संमेलने भरवायला दक्ष असणारी मंडळी ग्रामीण तळपातळीवर संमेलन भरवायला किती अनुत्सुक असतात हे वेगळे सांगायलाच नको.

भारताच्या राजधानीत देखील आजवर केवळ एकमेव संमेलन ते देखील १९५४ या वर्षी म्हणजे ५७ वर्षांपूर्वी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्याचे उद्‌घाटन तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी भर पावसातही केले होते. मराठी खासदारांची एवढी मोठी संख्या असूनही व त्यातले अनेक दिल्लीवासी व राजकीदृष्ट्या प्रबळ असूनही भारताच्या राजधानीवर मराठीची मुद्रा या संमेलनानिमित्ताने उमटवण्याची त्यांची इच्छाशक्ती किती क्षीण आहे आणि त्यांना तसे करायला भाग पाडण्यास हे संमेलन भरवण्याची जबाबदारी असणारे महामंडळही किती उदासीन आहे याचेच ते द्योतक आहे. दिल्लीत उपलब्ध विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या, ज्यात विविध पक्षांच्या प्रभावी नेत्यांचाही समावेश आहे व आपले काहींशी तर व्यक्तिगत स्नेहाचेही संबंध आहेत त्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेखकानेच मराठी भाषिकांची दिल्लीत राज्यव्यापी साहित्य संस्था उभारून मागील दोन-तीन संमेलनांपैकी एखादे तरी भारताच्या राजधानीत भरवण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न व्यक्तिगत पातळीवर करून बघितले व महामंडळाच्या अध्यक्षांनी त्या प्रयत्नांना संस्थात्मक औपचारिक बळ प्राप्त करून द्यावे म्हणूनही जे प्रयत्न केले त्यालाही फारसा प्रतिसाद देण्याच उत्साहही दाखवला न गेल्याने ते प्रयत्न तिथेच थांबवावे लागले आहेत.

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

८५ संमेलनापैकी महाराष्ट्राबाहेर झालेल्या संमेलनांची संख्या तुलनेने अधिक बरी म्हणजे १८ आहे. मात्र, गेल्या दशकभरात महाराष्ट्राबाहेर एकही संमेलन आमंत्रण व गरज असूनही भरवले गेले नाही.

या संमेलनाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे सुरुवातीच्या सुमारे ४५ संमेलनापर्यंत म्हणजे १९६५ पर्यंत तरी संमेलनांवर राजसत्ता व धनसत्तेची, ऐश्वर्य व बडेजावाची, अनाठायी खर्च या सोहळेबाज आयोजनांची सावली पडलेली नव्हती. त्यामुळे प्रामुख्याने केवळ राजकारण्यांना संमेलनाचे स्वागताध्यक्षपद बहाल करण्याचीही तोपर्यंत फारशी गरज पडली नव्हती. स्वागताध्यक्ष हे देखील साहित्यिक वा साहित्यक्षेत्राशी संबंधित प्रमुख व्यक्तीच असत. १९६५ नंतर मात्र त्यात बदल होत जाऊन अशा व्यक्ती पुढे अपवादानेच स्वागताध्यक्ष केल्या गेलेल्या दिसतात.

या संमेलनांचे स्वागताध्यक्ष आणि अध्यक्ष दोन्ही राहिलेल्या व्यक्तींची संख्या ७ असून त्यात वि. मा. महाजन, चि. वि. वैद्य, न. चि. केळकर, द. वा. पोतदार, वि. स. खांडेकर, भा. वि. वरेरकर व उत्तम कांबळे अशा महत्त्वाच्या लेखकांचा समावेश आहे.

पति-पत्नी दोघांनाही संमेलनाध्यक्ष पद लाभलेले एकमेव साहित्यिक जोडपे कवी अनिल आणि कुसुमावती देशपांडे होते.

या संमेलनाचे १४ अध्यक्ष हयात आहेत. नागपूर येथे भरलेल्या ८० व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनापूर्वी ७३ वर्षे इथेच म्हणजे १९३३ साली जे अधिवेशन नागपुरात भरले होते त्याचा सविस्तर वृत्तांत ग्रंथरूपाने उपलब्ध आहे. तो बघितल्यास या संमेलनाचे तत्कालीन स्वरूप हे लेखन प्रकार, भाषा, बोली, प्रमाण भाषा, व्याकरण, वाङ्मय, साहित्य, समीक्षा, लेखन, सिद्धांत, लेखक व संस्कृतिसंबद्ध विविध समकालीन विषयांची किती सखोल, व्यापक व विद्वता आणि अभ्यासपूर्ण चिकित्सा आणि मीमांसा करण्याऱ्या अधिवेशनाचे कसे होते आणि कोणत्याही केवळ गावगप्पांना 'चिंतन' आणि गर्दीला 'रसिक' म्हणून लोकानुनय करण्याची गरज व परंपरा या व्यासपीठाला तेव्हा कशी नव्हती हे त्यावरून दिसते.

या अधिवेशनाचे स्वरूपच मुळी संबंधित समकालीन विषयांवर प्रत्यक्ष निश्चित असे मांडले गेलेले ठोस ठराव, भोंगळ अथवा संदिग्ध नव्हे, त्या त्या विषयाची त्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण सर्वांगीण चिकित्सा, मीमांसा, तपासणी करणारी,

बाजू व भूमिका मांडणारी निवेदने, भाषणे, वाद, प्रतिवाद, सूचना, उपसूचना व त्यावरील सखोल चर्चा, ज्याचा आज साऱ्यांना केवळ कंटाळा आहे व गरजच नाही असे वाटते, असेच शिस्तशीर व वाङ्मयीन, साहित्यिक, वैचारिक गांभीर्याला बांधील होते. केवळ दहा-पाच मिनिटांत तेव्हा कोणी 'अभ्यासपूर्ण' बोलणे शक्य नव्हते त्यानुसार संमत होणाऱ्या ठरावानुसार पुढच्या अधिवेशनापर्यंत कार्य करणे, ठराव करून ते विस्मरणात न टाकता कार्य करणे, त्यांचा पाठपुरावा करून नंतरच्या अधिवेशनात कार्याचा अहवाल सादर करणे ही कार्यपद्धत होती.

गर्दीची त्यामुळे गरजच नसणारे हे खऱ्या अर्थाने ग्रंथकारांचे, लेखकांचे, साहित्यिकांचे, प्रतिभावंतांचे क्षेत्र होते. आजही महामंडळ व त्यांच्या घटक संस्थांच्याही संमेलनात 'अधिवेशन' हा शब्द असला तरी तो शब्द हा केवळ त्या काळाच्या स्मारकाच्या स्वरूपातच तेवढा शिल्लक आहे. त्या अधिवेशनांमधील अभ्यासपूर्ण, विद्वत्तापूर्णतेची, व्यासंगाची जागा आज पसरट, घसरट, निसरड्या, गुळगुळीत वेळ मारून नेणाऱ्या व बऱ्याचशा विषयबाह्य अशा वरवरच्या उडत्या मांडणीने घेतली असून निश्चित विषयांवरील ठरावांची जागा भोंगळ व सपाट, फक्त गर्दीला चालणाऱ्या, भावणाऱ्या व त्यांच्या केवळ शाब्दिक चलाखीच्या मनोरंजनाच्या गरजा भागवणाऱ्या परिसंवाद-मुलाखती, रंजक कार्यक्रम अशा स्वरूपाच्या कार्यक्रमांनी घेतली आहे. त्यात सहभागी असणाऱ्या कोणावरच कोणाचेच अभ्यासपूर्ण व तयारी करून बोलण्याचे कोणतेच बंधन नाही. आठ-दहा-बारा अथवा पंधरा मिनिटांतच माणसे 'उरकून' घ्यायची असताना अशी बंधने घालणार कोण आणि पाळणार कोण? अधिकाधिक विभागांना अधिकाधिक प्रतिनिधित्व दिल्याचे तथाकथित लोकशाही 'कर्तव्य' केवळ उरकण्याच्या भावनेने वक्त्यांच्या, कवींच्या रांगा त्यातून या व्यासपीठावर लावल्या आहेत. ऐश्वर्य, वैभव, बडेजाव, जाणीवपूर्वक ओढवून घेतलेला धनसत्तेचा, प्रायोजकांचा प्रभाव त्या प्रभावाखाली संमेलने कायम राखण्यासाठीच वाढवला गेला आहे. आणि तरीही त्याला 'उरूस', 'जत्रा', 'उत्सव', 'बडेजाव', 'ऐश्वर्याचे प्रदर्शन' म्हणू नका आणि म्हणणार असल्यास, 'त्याचीही समाजाला कशी गरज असते' आणि 'श्रीमंत होणे कसा गुन्हा नाही,' अशी चलाखीची विधाने करून आम्ही पुन्हा हे कसे योग्य आहे तेच पटवून देणार. ते कितीही व कितीही वेळा पटवून दिले तरी केवळ चलाखी, धूर्तपणा आणि 'उरूस', 'उत्सव', 'जत्रा', 'ऐश्वर्य', 'श्रीमंती' 'बडेजावाचे प्रदर्शन', 'चंगळ', एवढ्याच काही समाजाच्या गरजा नसतात, तर त्या सारा समाजच नियंत्रित करण्याचे सामर्थ्य, शक्ती आणि यंत्रणा उपलब्ध असणाऱ्यांना तो आपला आश्रित व आपल्यापेक्षाही खुळा व कमी उंचीचा हवा असतो, त्यातून त्या निर्माण केल्या गेलेल्या असतात. या साहित्य संमेलनांचे व साहित्यसंस्थांचे आज प्रत्यक्षात असे झाले आहे.

यशवंतराव चव्हाण व्यासपीठावर नव्हे तर समोर बसले या आणीबाणी काळात यशवंतराव चव्हाणांसारख्या जाणत्या मुख्यमंत्र्याला असणाऱ्या विवेकाचा गौरव करून वारंवार ते उदाहरण देणारे हे संमेलन पुढच्या राज्यकर्त्यांकडून मात्र कधी १०, तर कधी २५ आणि आता ५० लक्ष रुपयांच्या निधीसाठी व त्या मूळ भरवशावर पुढचे प्रायोजक-आयोजक लाभणारे संमेलन झाले आहे. कोणाला मिरवण्याच्या तर कोणाला फिरवण्याचे, कोणाला जिरवण्याचे तर कोणाला कमावण्याचे ते साधन वाटू लागले आहे.

अशा वृत्ती-प्रवृत्तीविरुद्ध एकेकाळी 'समांतर' संमेलन भरविणारी सुबुद्ध व समर्थ्य सक्षम मंडळी आज एक तर हयात तरी नाहीत वा जी आहेत ती गारठली तरी आहेत वा 'व्यवस्था शरण' तरी झाली आहेत. खुद्द महामंडळाचेदेखील या संमेलनावरील नियंत्रण पूर्णपणे सुटलेले आहे. कोणी किती रक्कम या संमेलनासाठी जमवावी वा उरवावी यावर संमेलन भरविणाऱ्या महामंडळाचेच नियंत्रण नाही. ते घालण्याची इच्छाही नाही. उरलेल्या रकमेचा विनियोग कोणी कसा कशासाठी करावा याचे नियम असले तरीही ते बाजूला सारून त्यावर वाद होऊ लागले आहेत. स्वतःच्या बळावर हे संमेलन कधीकाळी भरवण्याच्या हेतूने गाजावाजा करत स्थापलेल्या संमेलन महाकोषासाठी निधी उभारल्याची स्वतंत्र मोहिम स्वतंत्र मोहीम चालवण्याची गरज, इच्छा व सामर्थ्य कोणताच उरलेले नाही. केवळ राजकारणी आणि शासन यांना त्यांच्या हस्तक्षेपासाठी दोष देण्याचा काळ कधीच संपला आहे. कारण तो त्यांनी करावा ही आता राहिली नसून ती संमेलने भरवणाऱ्यांचीच गरज झाली आहे. तो हस्तक्षेप आता 'आमंत्रित' करत आहेत. आता त्यांचा हा हस्तक्षेप प्रायोजकांचा व धनदांडग्यांचा हस्तक्षेप कायमचा व अपरिहार्यच राहावा असेच स्वरूप या संमेलनाना खुद्द ती घडवणाऱ्यांनीच दिले असून ते त्यांना तसेच कायम टिकवायला हवे आहे.

थोडक्यात, या संमेलनामागचे संकेत, परंपरा, घटना, नियम, उद्दिष्टपुरतीचे हेतू अभ्यास, विद्वता, व्यासंग, चिंतन, मीमांसा, चिकित्सा, विश्लेषण, वाद-प्रतिवाद यातून साकारणारी विवेकी व सहिष्णू वाङ्मयीन संस्कृती यांचे हे संमेलन कमी आणि भरघोस ग्रंथविक्रीचा भरघोस व्यवसाय धनसत्ता व राजसत्तेची भरघोस कृपा साधण्याची त्यांच्याशी जवळीक साधण्याची व पुढच्या काही लाभांचे दरवाजे उघडून घेण्याची अनेकांच्या अनेक प्रकारच्या संधी शोधण्याची उत्सवी मानसिकता आणि वरवरची सपाट, संदिग्ध व वेळा काढू 'काय वाटते' या प्रकारची भाष्ये यात बरेचसे या परंपरेचे रूपांतर झाले आहे.

या साऱ्या अवांछिताला वांछित वळण देऊ इच्छिणाऱ्यांचा संस्थात्मक प्रभाव शक्य तेवढा क्षीण करत तो नामशेष करण्याची इच्छा व आहे हे असेच चालू राखण्यात हितसंबंध दडलेल्यांची या व्यवस्थेवरची पकड यामुळे नजीकच्या भविष्यकाळात तरी आहे, त्या स्थितीत फार बदलही संभवत नाही.

(लोकराज्य जानेवारी–फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# विश्व मराठी साहित्य संमेलन

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

**कौतिकराव ठाले-पाटील**

अमेरिकेत पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन होण्यापूर्वी या संदर्भात वेगळ्या स्वरूपात काही उल्लेख, काही अपेक्षा, काही प्रयत्न झालेले आढळून येतात. त्यात विश्व मराठी साहित्य संमेलन ही संकल्पना नसली तरी परदेशात मराठी साहित्य संमेलन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त झालेली आहे. प्रा. श्री. म. माटे हे १९५० च्या सुमारास पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष असताना त्यांनी मराठी वाङ्मयाचा दहा खंडात्मक इतिहास लिहिण्याचा संकल्प सोडला होता आणि धडाक्याने काम सुरू केले होते. माट्यांच्या कामाचा धडाका पाहून साहित्य परिषदेतील इतर दिग्गज अस्वस्थ झाले होते. माट्यांचा हा संकल्प पुरा झाला तर त्याचे श्रेयही माट्यांनाच मिळणार होते. म्हणून या दिग्गजांनी यांना माट्यांना अडवून नामोहरम करण्यासाठी एका बैठकीत माट्यांवर प्रश्नांची सरबती सुरू केली. त्या प्रश्नांमध्ये नकारात्मक स्वरूपात विचारलेला एक प्रश्न परदेशात संमेलन घेण्यासंबंधीही होता. दशखंडीय इतिहासाच्या धडाकेबाज कामाकडे निर्देश करत, 'अशा रीतीने उद्या तुम्ही मराठी साहित्य संमेलन परदेशातही घ्याल' असा प्रश्न खोडसाळपणे विचारला होता. प्रा. माटे मनमानी करतात, कोणाचे ऐकत नाहीत असा या प्रश्नाचा रोख होता. पण, माट्यांनी प्रश्न येताच न डगमगता ताडकन उत्तर दिले होते, 'अर्थातच बोलावणे आले तर जरूर येईन. बोलावणे म्हणजे आजच्या भाषेत निमंत्रण, त्यावर प्रश्नकर्त्यांने छद्मिपणाने विचारले होते, पण जाणार कसे? 'समुद्रात शिडे उभी करून', असे उत्तर माट्यांनी त्या वेळी दिले होते. बोलावणे आले तर जाऊ आणि संमेलन घेऊ हा परदेशात मराठी साहित्य संमेलन घेण्यासंबंधीचा पहिला उद्गार होता. त्या वेळी आजचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, 'मराठी साहित्य संमेलन' या नावाने पुण्याची महाराष्ट्र साहित्य परिषद घेत असे. साहित्य महामंडळाचा तोपर्यंत जन्मही झाला नव्हता. तो पुढे १९६१ साली झाला व १९६५ साली हे संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेकडून साहित्य महामंडळाकडे आले आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणून भरविले जाऊ लागले.

प्रा.श्री. म. माटे यांच्या या उद्गारानंतर महामंडळाच्या पहिल्या व एकूणात ४६व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी साहित्य संमेलने परदेशातही व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली. हे संमेलन १९६५ मध्ये हैदराबादला भरले होते. प्रा. माट्यांचे उद्गार व प्रा. वा. ल. कुलकर्णी यांची अपेक्षा माझ्या वाचनात होतीच. याशिवाय मराठी समीक्षेत नवीनतेची कल्पना मांडणारे समीक्षक आणि आपल्या कविता लेखनाने मराठी कवितेत नये युग सुरू करणारे कवी बाळ सीताराम मर्ढेकर यांची खंतही माझ्या मनात होती. आपल्या 'वाङ्मयीन महत्ता' या पुस्तकात, मराठी वाङ्मयाला जागतिक संस्कृतिक्षेत्रात मानाचे नाही तर निदान नामाचे स्थान अजून का प्राप्त होत नाही.' असा प्रश्न मर्ढेकरांनी उपस्थित केला होता. मर्ढेकरांचा हा प्रश्न, माट्यांचा तो उद्गार आणि वा. ल. कुलकर्णी यांनी व्यक्त केलेली अपेक्षा या गोष्टी मला अस्वस्थ करत होत्या.

याचा अर्थ आमच्या १८ वर्षे वयाच्या पोराने, संत ज्ञानेश्वराने लिहिलेला तत्त्वज्ञान आणि काव्य यांचा अपूर्व संगम असलेला ज्ञानेश्वरीसारखा श्रेष्ठ ग्रंथ काय किंवा अडाणी समाजातून आलेला, समाज जीवनातील विसंगतीचा आणि मानवी जगण्यातील ढोंगांचा सूक्ष्मपणे वेध घेऊन परखडपणे आपल्या अनोख्या भाषाशैलीत मांडणारा महाकवी संत तुकाराम काय यांचीही नोंद जागतिक सांस्कतिक क्षेत्रात करण्यात आम्ही अपयशी ठरलो होतो. मराठीतील हे दोन महान कवीही जगापर्यंत आम्हाला पोहोचवता आले नव्हते. मर्ढेकरांची ही खंत, ही व्यथा महाराष्ट्राबाहेर जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी छोट्या-छोट्या समूहाने राहणारा आणि मराठी भाषेशी व संस्कृतीशी आपले नाते टिकवण्यासाठी धडपडणारा भारताबाहेरचा हा मराठी माणूसच दूर करू शकेल आणि हे स्थान मराठी वाङ्मयाला आणि भाषेला मिळवून साहाय्यभूत ठरेल, असे मला वाटत होते.

जगभरातला इतिहास असं सांगतो की, बऱ्याचदा आपल्या मूळ संस्कृतीपासून तुटत चाललेले, दुरावत चाललेले लोकच आपल्या मूळ संस्कृतीचे व आपल्या मूळ भाषेचे जतन करत असतात. जगभरातून इस्रायलमध्ये संघटित झालेला आणि केवळ आपली नष्ट होत चाललेली भाषाच नव्हे, तर प्राणपणाने लढून आपला देशही निर्माण करणारा आणि हिब्रू संस्कृतीची पुनर्स्थापना करणारा यहुदी समाज हे अलीकडच्या काळातील याचे ढळढळीत उदाहरण सांगता येईल. आपल्या मूळ भाषेपासून दूर गेलेल्या व मूळ संस्कृतीपासून तुटलेल्या लोकांना 'डायस्पोरा' असं म्हटलं जातं. जगातील भिन्न-भिन्न संस्कृतीचा व भाषांचा अभ्यास केला, तर या डायस्पोरांनीच आपली मूळ भाषा व मूळ संस्कृती कट्टरपणे जतन करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे आपणास दिसून येईल. अमेरिकेतील मराठी माणसांनी २००८ मध्ये जेव्हा मराठी साहित्य संमेलन मागितले तेव्हा कोणतीही खळखळ न करता ते मी त्यांना दिले, तेव्हा माझ्यासमोर ही उदाहरणे होती. महाराष्ट्रात व महाराष्ट्रालगतच्या सीमाभागात

दरवर्षी लहानमोठी किमान ५० साहित्य संमेलने होतात. त्यात त्या त्या परिसरातील लेखक-कवी अभ्यासक व रसिक पुन्हा-पुन्हा सहभागी होत असतात. त्यांना वारंवार संमेलनाची ही संधी मिळत असते. याउलट परदेशातील मराठी माणसांना अशी संधी मिळत नाही ही मराठी आहेत; तेही मराठी आहेत, तेही रसिक असू शकतात याचा विचार ज्येष्ठ म्हणवणाऱ्यांपैकी कोणालाही करावासा वाटला नाही. त्यांच्या रसिकतेचा सोयिस्करपणे या सर्वांना विसर पडला होता. परदेशात संमेलन दिल्यामुळे महाराष्ट्रातील रसिकांवर जणू आकाश कोसळले, महाराष्ट्रात जणू उत्पात घडला असे वातावरण निर्माण करण्यात आले.

ज्येष्ठ लेखक, पत्रकार, प्रकाशक यांच्याबरोबरच आणखी एक वर्ग या टीकेत सहभागी होता. लेखक, पत्रकार, प्रकाशक हे महामंडळाच्या बाहेरचे होते. परंतु महामंडळाच्या प्रतिनिधींचा एक वर्गही खरे म्हणजे महामंडळाच्या घटक असलेल्या दोन साहित्य संस्थाही या टीकेत हिरिरीने सहभागी झाल्या होत्या. मुंबई मराठी साहित्य संघ आणि विदर्भ साहित्य संघ या दोन संस्थांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी साहित्य महामंडळाच्या या निर्णयाला विरोध करत होते. वस्तुतः बैठकीतला विरोध वेगळा आणि बाहेरून केलेला विरोध वेगळा. या दोन्ही संस्था महामंडळाच्या घटक असल्यामुळे त्यांना महामंडळाच्या बैठकीत या संमेलनाच्या प्रस्तावाला विरोध करता येत होता, तसा तो त्यांनी केलाही. महामंडळाच्या बैठकीत परदेशात म्हणजे अमेरिकेत संमेलन घ्यायचे की नाही या निर्णयप्रक्रियेत या दोन्ही संस्था, त्यांचे प्रतिनिधी सहभागी होते. बैठकीत सकारात्मक, नकारात्मक, काय असेल ती भूमिका त्यांनी मांडली होती. लोकशाही व्यवस्थेने दिलेला अधिकार त्यांनी वापरला होता. सर्वांची मते ऐकून घेतल्यावर हात वर करून खुले मतदान करण्यात आले होते आणि आठ विरुद्ध दहा अशा मतांनी, अमेरिकेत साहित्य संमेलन घेण्यात यावे या बाजूने ठराव पारित झाला होता. लोकशाही संकेतानुसार बहुमताने झालेला हा निर्णय सर्व प्रतिनिधी व ज्या संस्थांचे ते प्रतिनिधित्व करत होते, त्या संस्था यांच्यावर बंधनकारक होता. या ठरावानुसार मुंबई मराठी साहित्य संघाने आधी योग्य भूमिका घेऊन लोकशाही संकेताचा आदर केला होता. आमचा विरोध आहे पण बहुमताने निर्णय झाला तर तो आम्हाला मान्य राहील, आम्ही संमेलनात सहभागी होऊ, असे त्यांचे म्हणणे होते व पहिल्या विश्व मराठी साहित्य संमेलनात ते सहभागी झालेही.

पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणून परदेशात संमेलन घेण्याऐवजी इतर भारतीय भाषा घेतात तसे आपणही विश्व मराठी साहित्य संमेलन म्हणून घ्यावे असे ठरले आणि अध्यक्ष म्हणून प्रा. गंगाधर पानतावणे यांची निवड झाली. दुसऱ्या वर्षी दुबई येथे दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन झाले. अमेरिकेतील पहिले संमेलन नुसते पारच पडले असे नाही, तर महाराष्ट्रातही होत नाही इतके नेटके, आटोपशीर व चांगले झाले. यशस्वी हा शब्द त्याला थिटा पडला. परदेशस्थ मराठी माणसांची रसिकता, आपल्या भाषेबद्दल त्यांना वाटणारी आस्था आणि वाङ्मयाबद्दलची ओढ त्यांच्या भरगच्च उपस्थितीने आणि आत्मीय प्रतिसादाने त्यांनी जगाला दाखवून दिली. मुंबई मराठी साहित्य संघाचे तिन्ही प्रतिनिधी, द. मा. मिरासदार, रा. रं. बोराडे, शंकर वैद्य, अजित दळवी, रामनाथ चव्हाण, नागनाथ कोत्तापले, वामन होवाळ, सुधाकर गायधनी, अरुणा ढेरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक-कवी; प्रवीण बर्दापूरकर, राही भिडे, प्रकाश बाळ यांच्यासारखे ज्येष्ठ पत्रकार हे सर्वजण ह्याला साक्षी आहेत. परदेशातल्या मराठी साहित्य संमेलनाबाबत माझी भूमिका पक्की होती. ती महामंडळाला मी समजावूनही सांगितली होती. परदेशात कशासाठी मराठी साहित्य संमेलन घ्यायचे याचा विचार मी केलेला होता. भारताबाहेर गेलेल्या मराठी माणसांना अफाट प्रमाणात ज्ञानाची व अनुभवांची क्षेत्रे उपलब्ध आहेत. ते ज्ञान, ते अनुभव आत्मसात करून, त्या ज्ञानाचा व अनुभवांचा उपयोग त्यांच्याकडून महाराष्ट्रातील मराठी माणसांना व्हावा, त्यांनी ते ज्ञान मराठीत आणावे व भाषासमृद्धीतील आपला वाटा उचलावा. नुसते मराठी सणवार साजरे करून भाषा व संस्कृती टिकत व वाढत नसते हे ध्यानात घ्यावे. उलट बाजूने परदेशातील मराठी माणसांची मराठी भाषेशी असलेली नाळ घट्ट करण्यासाठी आणि त्यांची मराठी भाषा वापरण्याची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्रातील मराठी माणसांनी व मराठी संस्थांनी त्यांना साहाय्य करावे. त्यांना भाषिक बळ पुरविण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील मराठी संस्थांची आहे. हे संस्थांनीही विसरू नये. त्यांच्या कर्तृत्वाचा सार्थ अभिमान बाळगून त्यांच्याकडे आपलेपणाने पाहावे, त्यांच्याशी आपलेपणाने व्यवहार करावेत.

परदेशातील मराठी साहित्य संमेलन हे यासाठी आदान-प्रदानाचे काम करू शकेल, निदान यासाठी साहित्य संमेलनाचा उपयोग होईल अशी माझी धारणा होती व आजही आहे. मराठी साहित्य संमेलन हे एकमेकांजवळ पोहोचण्याचे एकमेव साधन आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे अपुरी पडत असलेली महाराष्ट्राची भूमी सोडून तिच्यावरचा भार काही प्रमाणात का होईना पण परदेशस्थ मराठी माणसांनी हलका केला आहे. त्यांच्या आपल्या एकमेकांच्या परस्पर संबंधातून महाराष्ट्राचे व मराठी भाषेचे भवितव्य घडवता येणे, उज्ज्वल करणे शक्य आहे. ते आपण करू, घडवू असा विश्वास अशा संमेलनांमुळे आपण एकमेकांना देऊ शकतो, असे माझे मन मला सांगत होते. त्यासाठी ते फक्त नीट व सुरळीतपणे झाले पाहिजे यासाठी माझा आटापीटा होता.

भारतात आपण सोडून इतर सर्व भाषक लोक आपल्या भाषेबद्दल केवळ जागरूकच नव्हे, तर अतिसंवेदनशील आहेत. आपल्या भाषेच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी ते सर्व जसा आग्रह धरतात, चळवळी करतात तसा आग्रह, तशा चळवळी मराठी भाषेसाठी कराव्यात आपल्यापैकी कोणालाही वाटत नाही, साहित्य महामंडळासारखी एखादी संस्था आपल्या भाषेसाठी काही करू पाहात असेल तर त्याला विरोध होतो. एक मराठी लेखक दुसऱ्या मराठी लेखकाला आतून सुप्तपणे विरोध करतो. त्यात श्रेष्ठ मराठी लेखकाचे व मराठी भाषेचे नुकसान होते हे तो ध्यानात घेत नाही. नेमाडे, चित्रे, तेंडुलकर, जी. ए. यांच्या

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

साहित्याचे अनुवाद झाले असते तर जागतिक स्तरावर मराठी वाङ्मय व भाषा पोहोचायला मदत झाली असती. मराठी लेखकांच्या आपसातील शीतयुद्धामुळे, श्रेष्ठ लेखकांच्या श्रेष्ठ कलाकृतीचे अनुवाद होणे जवळपास अशक्य आहे. या संमेलनाचा उपयोग अमेरिकेतील मराठी जाणकारांना अशा अनुवादाला प्रवृत्त करण्यासाठी होऊ शकतो. अमेरिकन इंग्रजीत झालेल्या अनुवादाच्या या कार्यातून श्रेष्ठ मराठी वाङ्मय जागतिक स्तरावर पोहोचवायला मदत होऊ शकेल. जगाच्या पाठीवर भारतातील महाराष्ट्र या नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका प्रांतामध्ये १० कोटी लोक मराठी नावाची एक भाषा बोलतात. या भाषेला किमान एक हजार वर्षांचा इतिहास आहे. भाषेच्या बाल्यावस्थेपासूनच समृद्ध वाङ्मयीन परंपरा आहे. या अनुवादातून जगापर्यंत पोहोचवता येईल.

अमेरिकेत पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन घेण्याचा निर्णय मी जेव्हा जाहीर केला, तेव्हा जी टीका करण्यात आली. या टीकेत अमेरिकेतील मराठी माणसांची वाङ्मयीन जाण ही १९६० च्या पुढे गेलेली नाही असाही एक मुद्दा काही जणांनी उपस्थित केला होता. ही टीका करताना त्यांच्यासमोर फक्त १९६० च्या दशकात अमेरिकेत गेलेला मराठी माणसाचा वर्ग होता. पण, त्यानंतर काळ बदलला. जग लहान झाले. मराठी माणसे जगभर पसरली. ती तिथल्या संस्कृतीला विरोध न करता आपली मुळे व महाराष्ट्राशी असलेले आपले नाते टिकवू पाहताहेत. महाराष्ट्राशी असलेल्या आपल्या नात्याला तोडू इच्छित नाहीत. मराठी भाषा हा त्यांच्या नात्याचा मुख्य आधार आहे. त्याला हे घट्ट धरून ठेवू पाहताहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचीही काही जबाबदारी आहे. ती जबाबदारी ओळखून महाराष्ट्राने त्यांना प्रतिसाद दिला पाहिजे. हा फक्त आता एकट्या अमेरिकेतील मराठी माणसांचाच प्रश्न राहिलेला नाही, तर विविध देशातील सर्व मराठी समूहांचा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या जशा त्यांच्याकडून काही अपेक्षा आहेत तशाच त्यांच्याही महाराष्ट्राकडून काही अपेक्षा आहेत. साहित्य संमेलन ही त्यातली फक्त एक अपेक्षा झाली. अशा संमेलनांमधूनच त्यांच्या वाङ्मयीन आकलनाचा प्रश्न दूर करण्यासाठी प्रयत्न करता येणार आहेत. नुसत्या शाब्दिक टीकेने तो दूर होणार नाही. त्यांची ही जाण, आकलन वाढवण्यासाठी आपणच प्रयत्न करण्याची गरज आहे. १९६० नंतर बदलत गेलेले मराठी वाङ्मयाचे रूप, मराठी वाङ्मात आलेले नवीन वाङ्मयीन प्रवाह, समाजाच्या सर्व स्तरांतून आलेला लेखक-कवींचा मोठा वर्ग या सर्व गोष्टी त्यांच्यासमोर ठेवून त्यांना अद्ययावत करण्यासाठी कोणीतरी पुढाकार घेण्याची, ही जबाबदारी उचलण्याची गरज होती. मराठी साहित्य महामंडळाने आपली जबाबदारी ओळखून ती उचलली आणि आपल्या उद्दिष्टपूर्तीचे एक पाऊल पुढे टाकले. हे पाऊल टाकताना माझ्यासमोर उभे केलेले अडथळे ओलांडून मला पुढे जाता आले त्याचे समाधान पुरेसे आहे.

अमेरिकेतील साहित्य संमेलन ठरवताना माझ्या मनात आणखी एक विचार होता. अलीकडच्या १०-१५ वर्षांत इतर भारतीय भाषांची साहित्य संमेलने परदेशात व्हायला लागलेली आहेत. या संमेलनामधून त्या भाषांचे अस्तित्व जागतिक स्तरावर प्रकट होत आहे. तेलुगू, गुजराती, हिंदी, बंगाली, मल्याळम या भाषांची साहित्य संमेलने परदेशांत ठिकठिकाणी झाली आहेत. त्या त्या भाषांतील ज्येष्ठ लेखकांनी अशी साहित्य संमेलने परदेशात व्हावीत म्हणून प्रयत्न केलेले आहेत. त्या त्या भाषांतील प्रसारमाध्यमांनी अशी साहित्य संमेलने झाली तेव्हा विरोधाची व टीकेची मोहीम उघडली नव्हती, तर त्यांना आवश्यक तेवढी सकारात्मक प्रसिद्धी दिली होती. गुजराती भाषेच्या न्यूयार्क येथील साहित्य संमेलनाला तर गुजराती बरोबरच मराठी वर्तमानपत्रांनीही प्रसिद्धीचा हातभार लावला होता. अमेरिकेतील विश्व मराठी साहित्य संमेलनावर मराठी प्रसारमाध्यमे ज्या वेळी टीकेचा भडिमार करीत होती, त्याच वेळी अमेरिकेत न्यूयार्क येथे गुजराती विश्व साहित्य संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांनी गांधीनगरमधून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारा केले. अशा कौतुकभरल्या बातम्या त्या वेळी मराठी वर्तमानपत्रामधून प्रसिद्ध झाल्या होत्या. मराठी भाषेचंही परदेशात असे साहित्य संमेलन व्हावे आणि परदेशातील इतर भाषक रसिकांना या संमेलनांचा जसा लाभ मिळतो, तसा तो परदेशातील मराठी रसिकांनाही मिळावा असा हे संमेलन ठरवताना माझा दृष्टिकोन होता.

जिथे जिथे भाषिक समूह आहेत तिथे तिथे भाषिक संधी निर्माण करणे व करून देणे आवश्यक असते. परदेशातील भाषिक समूहांना अशा संधी निर्माण करून दिल्या, तर त्यांच्या ठिकाणी भाषिक जागरूकता निर्माण होऊ शकते. अशा संधीमुळे परदेशस्थ मराठी माणसांच्या मनात आपल्या भाषेबद्दल आस्था वाढवायला मदत होऊ शकते. त्याचा परिणाम इतर भारतीय भाषांच्या स्पर्धेत आपली भाषा जगाच्या पातळीवर उतरण्यात होऊ शकतो. जगभर आपल्या भाषेच्या प्रसाराला वाव मिळू शकतो. हे भान मुख्य समूहाने ठेवण्याची गरज असते. मुख्य समूह हे भान दाखवत नसेल तर त्या समूहाच्या भाषेसाठी काम करणारे सरकार, त्या भाषेतील साहित्य संस्था आणि निखळ भाषेचे काम करणाऱ्या सरकारी आणि बिगरसरकारी संस्था यांची जबाबदारी वाढते. ही जबाबदारी ओळखून सर्व संस्थांनी आपली कामे केली पाहिजेत. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने आपली जबाबदारी ओळखली आणि विश्व मराठी साहित्य संमेलन घेऊन ती पार पाडली.

(लोकराज्य जानेवारी–फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)

# साहित्य संमेलनाचे औचित्य

**प्रा. रा. ग. जाधव**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अलीकडे परदेशांतही प्रतिवर्षी योजिले जात आहे. साहित्य महामंडळाच्या पुणे, मुंबई, औरंगाबाद, नागपूर व इतर घटकसंस्था आपापली संमेलने आयोजित करीत असतातच. शिवाय महाराष्ट्रातील अनेक साहित्य संस्था, साहित्यप्रेमी मंडळे, कविमंडळे तथा उद्योजक, कामगार-वर्ग, ग्रामीण जन, आदिवासी, स्त्रीवादी संमेलनेही होत असतात. एवढेच नव्हे, तर ख्रिस्ती, मुस्लीम, जैन यांसारख्या धर्मांचे मराठी साहित्यप्रेमी कार्यकर्ते संमेलने भरवत असतात. गुराख्यांचेही संमेलन होते. या संमेलनव्यूहाचे वास्तव लक्षात घेतलें, तर संमेलनाचे औचित्य हा विषय काहींना काहीसा अप्रस्तुत वाटण्याची शक्यता आहे. मला या तथाकथित अप्रस्तुत विषयांसंबंधीच काही विचार मांडावयाचे आहेत.

कोणत्याही प्रगत समाजाला सण-उत्सवांची, सार्वजनिक समारोहांची नैसर्गिक गरज असते. समाज केवळ पोटापाण्याच्या आकांक्षेवर जगत नाही. समाजाला काहीएक सामाजिक उत्सवपीठ हवे असते, समाजातील खूप लोक ज्याभोवती जमा होतील, एकत्र येतील, असे काहीएक निमित्त हवे असते. त्यामुळे समानबंधत्वाचे नातेच केवळ दृढ होते आहे नाही, तर समाजजीवनातील अनेक प्रकारचा वेगवेगळेपणा दूर होऊन एकमेकांशी असलेला सारखेपणा लोकांच्या प्रत्ययास येतो. ही समाजमनाची अंगभूत गरज असते, सामाजिक नात्याची एकता पटणे-पटवणे इष्ट असते. समाज केवळ भाकरीवर जगत नाही, समाजाला जगण्यासाठी व्यक्तीप्रमाणेच समूहजीवनाच्या प्रचितीची गरज असते. अशी गरज संमेलने, उत्सव, जत्रा, इत्यादींमुळे भागली जाते. अगदी समाजशास्त्र घेतले, तरीही त्यात समाजाच्या संघटित स्वरूपाचे विश्लेषण करताना सामाजिक मनोरंजनाचा, मेळाव्यांचा घटक अपरिहार्यपणे लक्षात घ्यावा लागतो.

अर्वाचीनपूर्व काळात म्हणजे मध्ययुगात धर्माच्या तीर्थांच्या, साधुसंतांच्या, पुराणकथांच्या आधारे उत्सव साजरे होत. देवादिकांच्या जयंत्या पार पाडल्या जात. आपल्या समाजात कुलदेवतांचे उत्सवही साजरे होत व होतात, संमेलन-उत्सवांचे हे मध्ययुगीन लोग आधुनिक काळातही चालू आहे. फक्त मध्ययुगीन समाजस्थिति आता चालू नाही. आधुनिक काळ बदलला, नवा समाज घडू लागला, या समाजाच्या विरंगुळ्याच्या, उत्सवाच्या आकांक्षा वाढू लागल्या. मध्ययुगाला देवादिकांचे, साधुसंतांचे उत्सव साजरे करण्याचा अधिकार होता, कारण देवदेवता व साधुसंत हे समाजातूनच समाजाने निर्माण केले होते. जे स्वतः निर्माण केले आहे, ते गरजेनुसार साजरे करण्याचा समाजाला जणू जन्मसिद्ध हक्क आहे, असे म्हटले पाहिजे व या हक्काला कोणीही आक्षेप घेऊ शकत नाही. अगदी समाजविज्ञानाने घेतली, तरी त्यांनाही समाजाची सार्वजनिक समारंभाची गरज व हक्क नाकारता येत नाही.



आता मध्ययुग संपून आधुनिक युग सुरू झाले आहे. या युगालाही स्वतःची समारंभ उत्सवाची निमित्ते शोधावी लागली, निर्माण करावी लागली. आधुनिक युगात महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव आला, शिवजयंतीचा उत्सव सुरू झाला, साहित्य संमेलने आली, दिवाळी अंकांचे सोहळे आले व त्यांनी मध्ययुगीन देवादिकांच्या, साधुसंतांच्या जोडीने नवे असे उत्सवांचे, समारंभाचे मार्ग शोधून काढले. अगदी धार्मिक स्वरूपाच्या उत्सवांनाही धर्मनिरपेक्ष असे व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला. तथापि, आधुनिक समाज हा प्राधान्याने इहवादी समाज आहे. त्याचा भर ऐहिक जीवनावर आहे, ऐहिक अभ्युदयावर आहे. त्यामुळे जे जे खास मनुष्यनिर्मित आहे, त्याचे

मराठी तितुका मेळवावा
विश्व मराठी संमेलन २०२३

उत्सव करण्याचा प्रयत्न समाज करत आहे. सर्जनशील व्यक्ती ही समाजाचे अपत्य आहे. समाजशून्य पर्यावरणात ललित कला, साहित्य वगैरे सर्जनशील कला निर्माण होणे कठीणच! कला वाङ्मयीन निर्मितीमध्ये समाजाचे अस्तित्व, वाटा व अधिकार यांना कळत-नकळत मूकसंमती दिलेलीच असते. म्हणून आधुनिक सर्जनशील फलावाङ्मय निर्मिती ही खरेतर, समाजाची, समाजासाठी आणि समाजातून होत असते.

हे जर खरे आहे, तर आपले कला वाङ्मयीन संचित उत्सवाचा, संमेलनाचा, साजरे करण्याचा विषय आहे व तसा तो करणे हा समाजाचा जन्मसिद्ध हक्क आहे. सेलिब्रेशनचे नवे आधुनिक विषय म्हणजे ललित कला व साहित्य आणि म्हणून साहित्य संमेलनाचा उत्सवही !

मराठी संमेलन आता शतक पूर्ण करून पुढे गेले आहे. लेखकांचे संमेलन हेच काही वर्षे वगळून साहित्य संमेलनात रूपांतरित झाले आहे. या साहित्य संमेलनाचे स्वरूप विकसनशील राहून काळाशी सुसंगत असे बदलतही गेले आहे. आद्य लेखक संमेलन ते आजचे विश्व मराठी साहित्य संमेलन हा उत्क्रांतीचा टप्पा मोठा विस्मयकारकही आहे. साहित्य हे समाजाच्या संस्कृतीत मुरले आहे आणि खरेतर, समाजच साहित्याच्या संस्कृतीत मुरलेला आहे. काही प्रामाणिक व गंभीर प्रकृतीचे साहित्यप्रेमी हे संमेलनाच्या उत्सवी स्वरूपाबाबत या जत्रेबद्दल नाराजी व्यक्त करतात. त्यात गांभीर्य हवे असे त्यांना वाटते. साहित्यनिर्मिती ही एकांतीची असते व म्हणूनही संमेलनाची जत्रा किंवा उरूस होऊ नये, असे त्यांना वाटते. साहित्यविषयक गंभीर, अभ्यासपूर्ण चर्चा संमेलनातून व्हावी, अशी त्यांची अपेक्षा असते. असे काही प्रत्यक्षात होताना दिसत नाही, अशी त्यांची तक्रार आहे.

हा आक्षेप खरा आहे; पण, पूर्णपणे योग्य नाही. आपले साहित्यसंचित 'सेलेब्रेट' करण्यास समाजाचा अधिकार मानला, तर हे जाणवते. उत्सवासाठी का होईना, पण त्यापायी मोठा समाज एकत्र येतो व समाजाला एकत्र आणणे हे त्याचे कर्तव्यही आहे. शिवाय साहित्यनिर्मिती एकांतात होते, समीक्षा एकांतात होते हे पूर्णतः खरे नाही. साहित्य व समीक्षा या दोहोंना एकांतातून लोकांताकडे व परत लोकांताकडून एकांताकडे यावे लागते. एकान्त व लोकान्त हा साहित्यनिर्मितीचा जणू मंत्रच आहे. ताटी लावून बसावे हे योग्यच; पण ताटी उघडा हे सांगणारेही मुक्तावचन योग्य आहे. मराठीवरचा गंभीर आक्षेप तर हाच आहे की आपले साहित्य ताटी बंद करूनच बाहेर येत नाही,, असो.

आधुनिक मराठी वाङ्मय समृद्ध आहेच. शिवाय मध्ययुगीन वाङ्मयही गुणवत्तापूर्ण आहे. या सर्वांची डोळाभेट वर्षातून एकदा जनसामान्यांना घडते, ती साहित्य संमेलनातून! समाजात कुठे, केव्हा व कसा एखादा प्रतिभावंत उदयास येईल हे सांगता येत नाही. संमेलन हे सामान्यजनांचे एक वाङ्मयीन प्रेरणास्थान होऊ शकते. हस्तिदंती मनोऱ्यात राहणाऱ्या साहित्यिकांना कोण काय सांगणार? पण, चांगले साहित्य तथाकथित अडाणी माणसालाही कळू शकते. त्याची चिकित्सा नाही करता येणार त्याला हे खरे! चांगली कविता ऐकून ग्रामीण जनताही उत्स्फूर्त दाद देते. त्या जनतेत एखादा ज्ञानदेव, एखादा केशवसुत, एखादा मर्ढेकर असू शकतो ना? ही संधी संमेलनाच्या जत्रेतून लाभते.

संमेलनाच्या जत्रा स्वरूपापासून त्याला आता अलग करणे कठीण तर आहेच; पण, योग्यही नाही. जनताजनार्दनाच्या हक्काचे सांस्कृतिक संचित तुम्ही त्यापासून बळजबरीने हिसकावून घेता असा त्याचा अर्थ होईल.

तुम्हाला साहित्याची गंभीर चर्चा हवी ना, अभ्यासक हवेत ना, त्यासाठी चर्चासत्रे आहेत, महाविद्यालये आहेत, विद्यापीठे आहेत, साहित्यसंस्था आहेत, साहित्यप्रेमी मंडळे आहेत, हे सर्व जण गंभीर वाङ्मयीन चर्चेचे कर्तव्य कितपत पार पाडतात? ज्यांना वाङ्मयाबद्दल गंभीर व्हायचे, तेच उदासीन होत आहेत. त्यांना कोण सांगणार आणि कोण ऐकणार? ज्यांनी गंभीर वाङ्मयीन चर्चा करावयाची, ते करत काहीच नाहीत आणि ज्या संमेलनाचे उद्दिष्टच समाजाशी असलेला साहित्यबंध अधिकाधिक दृढ करावयाचा, त्याला अभ्यासू गंभीर चर्चेचे स्वरूप हवे, हे म्हणणे अवास्तव होईल असे वाटते.

मला वाटते, गंभीर असा खरा प्रश्न एकूणच जीवनविषयक गांभीर्याचा आहे. गांभीर्य कुठे आहे आज? समाज तंत्रवेडा, रंजनवेडा, पलायनवादी होत आहे. चार घटका करमणूक शोधत आहे. गांभीर्य कुठे आहे? राजकारणात की अर्थकारणात, की समाजकारणात, की धर्मकारणात, की तंत्रविज्ञानात, की मानव्य विद्यांत? जे आडातच नाही ते पोहऱ्यात येणारच कुठून? प्रत्येक जण 'मी' सोडून गांभीर्य कुठेच नाही असा दावा करत आहे. चित्रलिपी जणू समाजाची! हे अवमानवीकरण (dehumanization) आहे की अस्तित्ववादी परात्मता? माणूस माणूसपण हरवत चालला आहे. कधीकधी वाटते, साहित्य कलांची समाजातील भूमिका काय? त्यांची ध्येये काय? हेच पुन्हा चर्चाविषय करावा. पण पुन्हा वाटते, कुणासाठी?

साहित्य संमेलनाचे उत्सवी स्वरूप हे एका मोठ्या सामाजिक आजाराचा एक घटक आहे. त्याचे विश्लेषण करावयाचे तर आरोपीच्या पिंजऱ्यात फक्त संमेलनालाच उभे करून चालणार नाही, असे वाटते.

गंभीरपणे आपण आपले काम करत राहावे, केव्हातरी उजाडेलच उजाडेल, या श्रद्धेने एवढेच!

(लोकराज्य जानेवारी-फेब्रुवारी २०१२ मधून पुनर्मुद्रित)




**पश्चिम महाराष्ट्रात जसे कोयना प्रकल्पाचे महत्त्व आहे. तसेच समृद्धीचे महत्त्व विदर्भ मराठवाड्यासाठी आहे. हा प्रकल्प केवळ एक महामार्ग नाही, तर ही महाराष्ट्राची भाग्यरेषा आहे. पायाभूत सुविधांना मानवी चेहरा दिल्यामुळे वंचितांच्या विकासाचा अग्रक्रम यातून साधला जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रस्त्याच्या लोकार्पणातून विकासाचा महामार्ग मोकळा केला आहे.**

# महाराष्ट्राची ‘समृद्धी’

**प्रवीण टाके**

११ डिसेंबरचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा नागपूर दौरा बहुआयामी, लक्ष्यवेधी, लक्ष्यभेदी होता. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिवशी ११ प्रकल्पांना गती आणि लोकमान्यता मिळाली. या वेळी प्रधानमंत्र्यांनी नागपूरमध्ये साडेतीन तासांमध्ये ७५ किलोमीटर प्रवास केला. या प्रकल्पांमधून रोजगार, आरोग्य, कौशल्य आणि त्यातून विकास साधण्याचा लक्ष्यभेद होणार आहे.

### ५५ हजार कोटींची समृद्धी

संपर्क, सातत्य व संवाद हा विकासाचा मूलमंत्र असतो. महाराष्ट्राची राजधानी मुंबई देशाची आर्थिक राजधानी. मात्र या आर्थिक राजधानीचे विदर्भापासूनचे अंतर हजारो किलोमीटरचे. अशा वेळी राजधानी आणि विदर्भ यांच्यातील समतोल विकास कसा होणार? त्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर या भागातच मर्यादित झालेल्या विकासाला गती देण्यासाठी समृद्धीचे पंख महाराष्ट्राला मिळाले आहे.

### 'समृद्धी'ची वैशिष्ट्ये

- एकूण ७०१ किलोमीटर लांबी व १२० मीटर रुंदीचा सहा पदरी द्रुतगती मार्ग.
- १० जिल्हे, २६ तालुके आणि आसपासच्या ३९२ गावांना जोडणार.
- नागपूर ते मुंबई हे अंतर फक्त ८ तासांत पार करणे शक्य.
- प्रस्तावित वाहन वेग (डिझाईन स्पीड) ताशी १५० किमी.
- राज्य शासनाने प्रवासासाठी निश्चित केलेला ताशी वेग १२० किमी.
- महामार्गालगत होणार १९ कृषी समृद्धी केंद्रांची निर्मिती.
- ग्रीनफिल्ड समृद्धी महामार्गाच्या दोन्ही बाजूने ११ लाख ३१ हजार वृक्षांची लागवड.
- महामार्गाच्या प्रत्येकी पाच किमी अंतरावर असणार सीसीटीव्ही कॅमेरे.
- विनामूल्य दूरध्वनी सेवा.
- महामार्गावरील बोगद्यात विद्युत रोषणाई, पूल सुशोभीकरण, पथदिवे आणि डिजिटल संकेत (सिग्नल).
- ठरावीक ठिकाणी विजेवर चालणाऱ्या वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन्स.
- १३८.४७ मेगावॅट ऊर्जा निर्मिती करणारे सौर ऊर्जा प्रकल्प.

या रस्त्याची लांबी ७०१ किलोमीटर आहे. या मार्गाचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक किलोमीटर रस्ता थेट सरळ आहे. वळणाची संख्या कमी आहे. जणू कागदावर लांब स्केल टाकून सरळ रेघ ओढली आहे. ७०१ किलोमीटर लांबीच्या या रस्त्यापैकी ५२० किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामे एक वर्षात पूर्ण होणार आहे. या रस्त्यावर तीन लेन सर्वत्र आहे. वाहने एकमेकांवर आदळणे नाहीच. जनावरे, पशू, जंगली श्वापदे रस्त्यावर येण्याची शक्यता नाही. कुठेही स्पीड ब्रेकर नाही, वळणरस्ता नाही, चौक नाही, सिग्नल नाही. त्यामुळे प्रवास सुरक्षित, गतिशील आणि मोजक्या वेळेत पूर्ण होणार आहे. या रस्त्यावर वाहने चालवण्यासाठी १२० प्रतितासी किलोमीटर वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. महामार्गावर अपघात किंवा बिघाड झाल्यास १५ रुग्णवाहिका, १५ शीघ्र प्रतिसाद वाहने, १२२ सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले आहेत.

## निर्गमन पथकर

समृद्धी महामार्गावर टोल मोठ्या प्रमाणात लागेल असे अनेकांना वाटते. मात्र, तसे नाही. जितका तुम्ही प्रवास कराल तितकाच टोल आकारला जाणार आहे. याला निर्गमन पथकर (एक्झिट टोल) म्हणतात. निर्गमन पथकर म्हणजे काय?, तर बाहेर पडताना देता येणारा कर... याचाच अर्थ तुम्ही जितके अंतर या मार्गावरून कापले, तितकेच पैसे तुम्हाला द्यावे लागतील. समृद्धी महामार्गाने नागपूर ते मलकापूर असा प्रवास केला, तर मलकापूरपर्यंत जितके अंतर होईल, तितकाच पथकर तुम्हाला द्यावा लागेल, तुमच्याकडून मुंबईपर्यंतच्या प्रवासाचा पथकर वसूल केला जाणार नाही.

## इच्छाशक्तीची पूर्तता

हा केवळ रस्ता नाही ही स्वप्नपूर्तीची सुरुवात आहे. तशी ही कथा दोन दिग्गज नेतृत्वाच्या इच्छाशक्तीची आहे. राज्याचे आताचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार असताना २० वर्षांपूर्वी मुंबई आणि नागपूर हे अंतर कमी करण्याचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे २०१४ मध्ये राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी या बहुआयामी प्रकल्पासाठी झोकून दिले. ३० नोव्हेंबर २०१५ रोजी पायाभूत सुविधांच्या बैठकीमध्ये नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्गाच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून घोषित करण्यात आले. तेव्हा होते तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे. त्यामुळे या दोघांच्या इच्छाशक्तीची लक्षपूर्ती अवघ्या ७ वर्षांत प्रत्यक्ष साकार झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या रस्त्याबद्दल बोलताना म्हणतात की, 'हे आमचे भाग्य आहे, ज्याचे भूमिपूजन केले त्या ५५ हजार कोटींच्या स्वप्नाचे लोकार्पण करताना आम्ही उपस्थित आहोत. आणखी एक समाधान त्यांना आहे की, या महामार्गाला 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' असे नाव देण्यात आले आहे.'

## बहुआयामी समृद्धी मार्ग

समृद्धी महामार्ग बहुआयामी का आहे, हे सांगताना स्पष्ट केले की, या महामार्गाच्या माध्यमातून अप्रत्यक्षरीत्या पुढील दोन वर्षात ५० हजार कोटी प्राप्त होतील. त्यातून इतर पायाभूत सुविधांची कामे होऊ शकतील. या महामार्गाच्या मल्टियुटीलिटी कॉरिडॉरच्या माध्यमातून गॅस पाईपलाइन, पेट्रोलियम प्रॉडक्ट पाईपलाइन, अंडर सी केबल सोबतच द्रुतगती रेल्वे मार्गाची तरतूद अशा विविध बाबी जोडल्या जात आहेत. या रस्त्याच्या बाजूला हायस्पीड रेल्वे जोडण्याचा सरकारचा मानस आहे. यामुळे सकाळी मुंबईला जाऊन रात्री उशिरा नागपुरात परतण्याचे स्वप्न



प्रत्यक्षात साकारणारा असेल. गॅस पाईपलाइनद्वारे बंदरातून थेट नागपूरमध्ये पोहोचणार आहे. येताना अनेक जिल्ह्यांनादेखील त्याचा लाभ होणार आहे. औद्योगिक विकासासाठी याचा वापर पुढील काळात होणार आहे. या संपूर्ण रस्त्यावर मोठ्या प्रमाणात सौरऊर्जेची निर्मिती केली जाणार आहे. राज्यातील जिल्हे प्रमुख बंदरांशी जोडताना महाराष्ट्राचा 'पोर्टलेड' विकासासह विविधांगी दृष्टिकोनातून विकास करण्यात येत आहे. मुंबईच्या समुद्राशी समृद्धीच्या माध्यमातून दुर्गम अशा भंडारा गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यांना जगाशी जोडण्याची ही संकल्पना आहे. त्यामुळेच या प्रकल्पाला गेमचेंजर प्रकल्पदेखील म्हटले.



## विकासाच्या नभांगणातील ११ तारे

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात विकासाच्या नभांगणातील ११ तारे असा नागपुरातील विविध लोकार्पण व उद्घाटन करताना कार्यक्रमांचा उल्लेख केला. प्रधानमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण, भूमिपूजन व शुभारंभ झालेले ७५ हजार कोटी रुपयांचे हे तारे असे आहेत.

१) **हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग -** ५५ हजार कोटींच्या सहापदरी महामार्गाच्या नागपूर ते शिर्डी या ५२० किलोमीटर लांबीच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन.

२) **नागपूर मेट्रो फेज १ -** नागपूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करणाऱ्या ४० किलोमीटर अंतराच्या ९ हजार ३०० कोटी खर्चाच्या प्रकल्पाचे लोकार्पण.

३) **नागपूर मेट्रो फेज २ -** नागपुरातील मेट्रो जाळे हिंगणा, कन्हाण बुटीबोरीपर्यंत विस्तारित करणाऱ्या ४४ किलोमीटर अंतराच्या आणि ६७ हजार कोटी खर्चाच्या प्रकल्पाची पायाभरणी.



४) **वंदे भारत एक्सप्रेस -** नागपूर ते बिलासपूर या दोन शहरांमधील प्रवासी वाहतुकीला गतिमानतेचा आयाम देणाऱ्या ताशी १३० कि.मी. वेगाने धावणाऱ्या रेल्वे गाडीचा प्रारंभ.

५) **नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प -** नागपूर शहरातील नाग नदीला नवे जीवन देणाऱ्या ४१ कि.मी. लांबीचा आणि १९२७ कोटी खर्चाच्या प्रकल्पाची पायाभरणी.

६) **अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था नागपूर -** राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात नवे पर्व ठरलेल्या आणि १५० एकर क्षेत्रातील 'एम्स' राष्ट्राला समर्पित.

७) **नागपूर आणि अजनी रेल्वे स्टेशन पुनर्विकास प्रकल्प -** नागपूर रेल्वे स्थानक पुनर्विकास प्रकल्पासाठी ५८९ कोटी आणि अजनी रेल्वेस्थानक पुनर्विकास प्रकल्पासाठी ३६० कोटी खर्चाच्या प्रकल्पाचा पायाभरणी समारंभ.

८) **चंद्रपूर येथील सिपेट -** सेंटर फॉर स्किलिंग अँण्ड टेक्निकल सपोर्ट (सीएसटीएस) चंद्रपूरचे लोकार्पण करण्यात आले. राज्य शासनाने या संस्थेला १५ एकर जागा उपलब्ध करून दिली आहे.

९) **नागपूर इटारसी तिसरी मार्गिका कोहळी -** नरखेड खंड राष्ट्राला समर्पित.

१०) **अजनी येथे लोकोमोटिव्ह डेपो -** अजनी येथील अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा १२ हजार हॉर्सपॉवरच्या लोकोमोटिव्ह डेपोचे लोकार्पण.

११) **नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ -** नागपुरातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ या संस्थेची पायाभरणी करण्यात आली. चंद्रपूर येथील सेंटर फॉर रिसर्च मॅनेजमेंट अँण्ड कंट्रोल ऑफ हिमोग्लोबिनो पॅथिस या संस्थेचे लोकार्पण करण्यात आले.

**जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर**

**२५ जानेवारीला ‘राष्ट्रीय मतदार दिन’ आहे. राज्यातील प्रत्येक मतदाराने हा दिवस अभिमानाने आठवावा, असा हा दिवस. वंचित समाजातील तृतीयपंथी, शरीर व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, कुमारी माता, बेघर यांच्या मतदार नोंदणीसाठी कागदपत्रासंदर्भात निवडणूक आयोगाने प्रयत्न करत आहे. अशा नागरिकांना त्यांचा मूलभूत मताधिकार मिळणे फार आवश्यक आहे. नागरिकांना लोकशाहीच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्न करत आहे. असे केले तरच आपली लोकशाही खऱ्या अर्थाने जिवंत राहणार आहे.**

# राष्ट्रीय मतदार दिन

**श्रीकांत देशपांडे**

‘एकही मतदार वंचित राहता कामा नये’ हे भारत निवडणूक आयोगाचे ब्रीद आहे. त्यासाठी आयोगाने खास सवलती दिलेल्या आहेत. मतदार नोंदणीसाठी निवासाची आणि जन्मतारखेची कागदपत्रे आवश्यक असतात. मात्र शहरामध्ये अनेक व्यक्ती पुलाखाली, रस्त्यावर राहतात. अशा व्यक्तींकडे निवासाचा कोणताही पुरावा नसतो. त्यामुळे त्याची नोंदणी करताना आमचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी त्यांनी अर्जावर दिलेल्या पत्त्यावर जाऊन पडताळणी करतात की, सदर व्यक्ती त्याच ठिकाणी राहते का? अधिकाऱ्यांची तशी खात्री पटली की त्यांचे नाव मतदार यादीत नोंदवले जाते.

## तृतीयपंथीय, वंचित मतदार नोंदणी

आजही भटक्या व विमुक्त जातीतील बऱ्याच लोकांकडे निवासाची व जन्मतारखेची कागदपत्रे उपलब्ध नसतात. सततच्या स्थलांतरामुळे त्यांची कोणत्याच गावात नोंद झालेली नसते. अशा परिस्थितीत या समाजाचे लोक जिथे कुठे माळावर पाल टाकून राहतात, तिथे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन त्यांची मतदार नोंदणी करावी, अशी तरतूद करण्यात आली. यासाठी आमच्या कार्यालयाला भटक्या व विमुक्त समाजासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचीही मोठी मदत झाली आहे. स्वयंसेवी संस्थांची मदत तृतीयपंथी व शरीर व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांच्या मतदार नोंदणीसाठी मदत झाली. वर्षभरापूर्वी तृतीयपंथी व्यक्तींची मतदार यादीतील संख्या दोन हजारांच्या आसपास होती. हा आकडा वाढवण्यासाठी आम्ही अनेक तृतीयपंथी व्यक्तींना, त्यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या प्रतिनिधींना भेटलो. भायखळा, मुंबई येथील तृतीयपंथीयांच्या दयारांना म्हणजे त्यांच्या घराण्यातल्या गुरूंच्या आम्ही भेटी घेतल्या. त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून आम्हाला त्यांच्या अडचणी कळत गेल्या. सामान्यतः वयात येण्याच्या काळात मुलामुलींमध्ये लैंगिक जाणिवा तयार होतात. विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीविषयी आकर्षण वाटू वागते. मात्र व्यक्तीला जन्मतः प्राप्त होणारी शरीर लैंगिकता आणि वयात आल्यावर येणारी लैंगिकतेची जाणीव या वेगळ्या आहेत, याविषयी आपल्या समाजात मोठ्या प्रमाणात अज्ञान आहे. त्यामुळे आपला मुलगा मुलीप्रमाणे वागतो, बोलतो किंवा मुलगी मुलाप्रमाणे वागते, बोलते हे पालकांना खटकू लागते. त्यांच्या या वेगळ्या लैंगिक जाणिवांचा पालकांकडून सहज स्वीकार केला जात नाही. अशा परिस्थितीत ही मुले बऱ्याचदा राहत्या कपड्यानिशी घराबाहेर पडतात आणि पुढेही त्यांचा घरातल्यांशी फार संबंध राहत नाही. त्यामुळे त्यांच्याकडे जन्मतारखेचा पुरावा नसतो. ही मुले मग तृतीयपंथीयांच्या घराण्यामध्ये सामील होतात, तिथे त्यांचा एक गुरू असतो. तृतीयपंथी असे समूहाने मोठ्या प्रमाणात राहतात. मात्र बरेचदा गुरू आपल्या घरावर कुणी दावा सांगेल या भीतीने आपल्या चेल्यांना मतदार नोंदणीसाठी निवासाचा पुरावा देत नाहीत. तृतीयपंथी व्यक्तींच्या कागदपत्रांच्या



या अडचणी लक्षात आल्यावर आम्ही त्यांची मतदार नोंदणी केवळ स्वप्रतिज्ञापत्राच्या आधारे करून घ्यावी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याने त्यांच्या निवासाची पडताळणी करावी, अशी तरतूद करून घेतली.

## हिताचे निर्णय

तृतीयपंथी व्यक्तींशी केलेल्या चर्चेतून आमच्या हे लक्षात येत गेले की, त्यांच्या समस्या केवळ मतदार नोंदणीपुरत्या मर्यादित नाहीत, तर खरा प्रश्न आहे तो समाजाने त्यांना स्वीकारण्याचा, त्यांच्या कुटुंबाने स्वीकारण्याचा. मग आम्ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'तृतीयपंथीयांचा लोकशाहीतील सहभाग' या विषयावर दोन दिवसीय परिषद आयोजित केली. या परिषदेत आम्ही शिक्षक, पोलीस, संशोधन, व्यवसाय, राजकारण अशा विविध क्षेत्रांत कार्यरत तृतीयपंथी व्यक्तींना वक्ते म्हणून आमंत्रित केलं. या परिषदेतील एक सत्र आपल्या तृतीयपंथी पाल्याचा स्वीकार करणाऱ्या पालकांचे होते. तसेच तृतीयपंथी व्यक्तींचे शिक्षण, रोजगार, निवास, आरोग्य याबाबतच्या प्रश्नांवर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय घेतले जावेत. हाच परिषदेचा मुख्य उद्देश होता.



## पद्धतशीर शिक्षण व निवडणूक प्रक्रिया

भारत निवडणूक आयोग स्वीप (SVEEP - Systematic Voters' Education and Electoral Participation) म्हणजे 'मतदारांचे पद्धतशीर शिक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील सहभाग' या कार्यक्रमांतर्गत वर्षभर मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम आयोजित केले जातात. निवडणूक आयोगाच्या अधीनस्थ कार्यरत असणारे महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय मतदार जागृतीसाठी लोकशाही गप्पा, विविध स्पर्धा आयोजित करत असतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर 'लेखक आणि लोकशाही मूल्ये', 'लेखक, भाषा आणि लोकशाही' हे विषय घेऊन 'लोकशाही गप्पा' या उपक्रमांतर्गत परिसंवाद आयोजित केले जातात. फेब्रुवारी २०२३ मध्ये वर्धा येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातही 'वंचिताचे साहित्य आणि लोकशाही' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात तृतीयपंथी समूहाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कवयित्री दिशा पिंकी शेख सहभागी होणार आहेत. दिव्यांग समूहाचे प्रतिनिधी म्हणून हर्षद जाधव आहेत. भटक्या आणि विमुक्त समाजासाठी कार्य करणारे ज्येष्ठ कार्यकर्ते बाळकृष्ण रेणके आहेत. तसेच मुस्लीम समाजाविषयी लेखन करणारे मुफिद मुजावर हे इतिहासाचे प्राध्यापक सहभागी होणार आहेत. मुस्लीम स्त्रिया, तृतीयपंथी, शरीर व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया यांच्यासाठी कार्यरत असणाऱ्या रझिया सुलताना आहेत.

## तरुणांचा सहभाग वाढावा

लोकशाही मूल्ये रुजवण्या संदर्भातील शिक्षकांची भूमिका, रोजच्या जगण्यातलं संविधान अशा विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ या शैक्षणिक संकुलातही आयोजित केले. देशाच्या भावी मतदारांपर्यंत लोकशाही मूल्ये पोहोचावीत, त्यांनी आपला लोकप्रतिनिधी सुजाणपणे निवडावा. महत्त्वाचे म्हणजे, तरुणांनी लोकशाही व्यवस्थेत सहभागी होण्याची पहिली पायरी - मतदार नोंदणी - पूर्ण करावी. २० ते २९ या वयोगटातील लोकसंख्येतील प्रमाण १८ टक्के आहे, पण मतदार यादीत त्यांचे प्रमाण १३ टक्केही नाही. देशाचे भविष्य ज्या तरुणांच्या हातात आहे, ती पिढी मतदान, निवडणुका याबाबत एवढी उदासीन असेल, तर आपल्याला आपल्या शिक्षणव्यवस्थेचा नीट विचार करायला हवा. याबाबतची जागृती घडवण्यासाठी आम्ही उपक्रमांमध्ये शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांना सहभागी करून घेत असतो. त्याचाच भाग म्हणून निवडक शाळा, महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळांची स्थापना करून त्याअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजवणारा प्रायोगिक प्रकल्प राबवायला सुरुवात केली आहे.

## विविध स्पर्धांचे आयोजन

मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय गेल्या दोन वर्षांपासून 'माझा गणेशोत्सव माझा मताधिकार' ही गणेशोत्सव देखावा-सजावट स्पर्धा आयोजित केली जाते. ही स्पर्धा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि घरगुती गणेशोत्सव अशा दोन्ही गटांसाठी असते. तसेच महाराष्ट्राला लोकगीतांची समृद्ध परंपरा आहे. या अनुषंगाने 'लोकशाही भोंडला', 'लोकगीतांतून लोकशाहीचा जागर' यासारख्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. मतदारांनी प्रत्येक निवडणुकीत मतदान करावे आणि आपल्या गावाचा, राज्याचा, देशाचा विकास करणारा लोकप्रतिनिधी निवडावा, हे आहे. या कामासाठी मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठीच 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा केला जातो. २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली. या दिनानिमित्ताने मी आपणांस आवाहन करू इच्छितो की, आपल्या घरात, नातेवाइकांमध्ये, शेजारीपाजारी, कार्यालयांत मतदार नोंदणी न केलेल्या व्यक्ती असल्यास त्यांना नोंदणी करायला सांगा. मतदान न करणाऱ्या व्यक्ती असल्यास त्यांना मतदानाचे महत्त्व पटवून द्यावे. देशाचा विकास घडवून आणण्यासाठी पहिली पायरी मतदार नोंदणी, मतदान करणे ही आहे, याचा आपल्याला विसर पडता कामा नये.

सुजाण नागरिकाची कर्तव्ये आपल्या अंगी रुजावीत म्हणून सर्वांना राष्ट्रीय मतदार दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

(लेखक हे अपर मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी आहेत.)

राज्य मंत्रिमंडळाच्या २९ नोव्हेंबर आणि १३ डिसेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत सामान्य प्रशासन, सामाजिक न्याय, गृह, महसूल, जलसंपदा, वन, मृद् व जलसंधारण, आदिवासी, रोजगार हमी योजना, सहकार, पर्यटन, विधी व न्याय, उच्च व तंत्रशिक्षण, शालेय शिक्षण, फलोत्पादन आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...



# मंत्रिमंडळात ठरले !

## पदभरती प्रक्रियेला गती

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात ७५ हजार पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. पदभरती संदर्भात १४ विभागांचे सादरीकरण करण्यात आले. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया गतिमान करण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळाने १४ विभागांचा सखोल आढावा घेऊन सूचना दिल्या.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यभरातील लिपिक-टंकलेखक या पदांसाठी पदभरती होणार आहे. या संदर्भातील जाहिरात जानेवारी २०२३ मध्ये पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होणार आहे. या अनुषंगाने १५ डिसेंबरपर्यंत सर्व विभागांनी आपली मागणीपत्र आयोगाकडे पाठवलीच पाहिजेत, असे निर्देश ही मुख्यमंत्र्यांनी दिले.

रिक्त पदांची भरती प्रक्रिया गतिमान करण्यासाठी यापूर्वीच काही निर्णय घेण्यात आले आहेत. आकृतिबंध अंतिम झालेल्या विभागांना सरळसेवा कोट्यातील १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली असून आकृतिबंध अंतिम नसलेल्या विभागांना सरळसेवा कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अराजपत्रित गट-ब, गट- क व गट-ड मधील पदे टीसीएस व आयबीपीएस या कंपन्यांमार्फत परीक्षा घेऊन भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सध्या सर्व प्रशासकीय विभागांना पदभरती लवकर करण्याच्या अनुषंगाने निर्देश आले असून आढावाही घेण्यात येत आहे. बिंदुनामावली प्रमाणित नसल्याने होणारा विलंब टाळण्यासाठी सर्व विभागीय कार्यालये, मागासवर्ग कक्ष यांना व्हीसीद्वारे बिंदूनामावली तात्काळ तपासून देण्यास सांगितले आहे.

## स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग

दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा विभाग ३ डिसेंबरपासून कार्यान्वित होईल. सध्याच्या सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत दिव्यांग कल्याणाची दोन कार्यासने वेगळी करून हा स्वतंत्र विभाग निर्माण होईल. यामध्ये दिव्यांग वित्त विकास महामंडळ व त्यांची कार्यालये यांचादेखील समावेश असेल. या विभागासाठी स्वतंत्र सचिव व अधिकारी-कर्मचारी मिळून २०६३ पदे नव्याने निर्माण करण्यात येतील. यामध्ये सचिव स्तरापासून ते शिपायांपर्यंतच्या पदांचा समावेश आहे. यासाठी सुमारे ११८ कोटी खर्चासही मंजुरी देण्यात आली.

सध्या महाराष्ट्रात ३० लाखांपेक्षा जास्त दिव्यांग व्यक्ती असून दिव्यांगांचे शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसनाच्या योजना या सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली दिव्यांग कल्याण आयुक्त राबवतात. जिल्हास्तरावर देखील जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे काम पाहतात. या स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभागामार्फत दिव्यांगांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. याशिवाय केंद्र आणि राज्य शासनाकडून राबवण्यात येणारे अधिनियम आणि योजना राबवण्यात येतील. यामध्ये विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, स्वयंरोजगारासाठी बीजभांडवल, विविध पारितोषिके, क्रीडा स्पर्धा, व्यवसायासाठी अर्थसाहाय्य, दिव्यांग दिन साजरा करणे, मतिमंदाकरिता बालगृहे, दिव्यांग व्यक्तीच्या विवाहास प्रोत्साहन यांसारख्या बाबींचा समावेश आहे.

## अधिसंख्य कर्मचाऱ्यांना सेवाविषयक लाभ

अधिसंख्य पदावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवाविषयक तसेच सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्याचा त्याचप्रमाणे मानवतावादी दृष्टिकोनातून तांत्रिक सेवा खंड देऊन पुन्हा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता त्यांच्या सेवा सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. अनुसूचित जमातीची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही देखील तत्काळ सुरू करण्यात यावी, असे निर्देश या वेळी मुख्यमंत्र्यांनी विभागाला दिले.

अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे ३ हजार ८९८ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आले आहे. या निर्णयामुळे अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या शासनाच्या प्रचलित धोरण व नियमानुसार लाभ मिळतील. या अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना पदोन्नती, वेतनवाढ मिळणार नाही. तसेच अनुकंपा धोरण लागू राहणार नाही.

## रेल्वे मार्गासाठी निधी

सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद हा नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग फास्ट ट्रॅकवर आणण्यासाठी राज्य शासनाने आपल्या वाट्याचे ४५२ कोटी ४६ लाख रुपये आर्थिक सहभाग देण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पासाठी ९०४ कोटी ९२ लाख इतका खर्च येणार असून ५० टक्के सहभाग राज्य शासनाचा आहे.



उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर येथे स्थानिक व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणावर भाविक येतात. मात्र रेल्वेची सुविधा नसल्याने त्यांची गैरसोय होते म्हणून विविध लोकप्रतिनिधींनी अनेक वर्षांपासून मागणी केलेली होती. या रेल्वेमार्गाची लांबी ८४.४४ किमी असून, यावर १० रेल्वे स्थानके असतील. तसेच ४ वर्षांत हा रेल्वे मार्ग पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

## सदनिकांसाठी मुद्रांकशुल्क घटवले

प्रधानमंत्री आवास योजनेतील भाडेपट्ट्याच्या दस्तांना १ हजार रुपये इतके कमी मुद्रांकशुल्क आकारण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गट लाभार्थींना होणार फायदा होणार आहे.



महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ मधील कलम-९च्या खंड-अ मधील अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे. निवासी सदनिकांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तांना अटी व शर्थींच्या अधीन राहून हे मुद्रांकशुल्क निश्चित केलेले आहे.

## मनोऱ्यांकरिता मोफत जागा

गावोगावी इंटरनेटच्या सुविधा वाढवण्यासाठी प्रधानमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या डिजिटल इंडिया मोहिमेस वेग देण्याकरिता राज्यातील २३८६ गावांमध्ये बीएसएनएलला मनोरे उभारण्यासाठी २०० चौ.मी. जागा मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला.

केंद्र शासनातर्फे सर्व गावांमध्ये ४-जी सेवा उपलब्ध करण्यासाठी ९ डिसेंबर २०२३ चे उद्दिष्ट असून त्याअनुषंगाने बीएसएनएलने प्रस्ताव दिल्यावरून हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये निवडक गावांमध्ये २०० चौ.मी खुली जागा अथवा गायरान जमीन विनामुल्य देण्यात येईल. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे आलेल्या प्रस्तावाला मनोरा उभारणीस १५ दिवसांत मंजुरी देणे आवश्यक आहे. या ठिकाणी महावितरण कंपनीने दोन ते तीन महिन्यांच्या कालावधीत वीजपुरवठा व जोडणी देणे आवश्यक आहे. केबल टाकण्यासाठी या ठिकाणच्या रस्त्याचा वापर विनामूल्य करण्यास मान्यता देण्यात येत असून, या ऑप्टिकल फायबर केबलसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून कुठलेही भाडे आकारण्यात येणार नाही.

## जलसंपदा प्रकल्पाच्या कामांना वेग

अमरावती तसेच नंदुरबार जिल्ह्यातील दोन जलसंपदा प्रकल्पांना सुधारित मान्यता देऊन त्यांच्या कामांना वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला. अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील वासनी मध्यम प्रकल्पाच्या ८२६ कोटींच्या खर्चास सुधारित मान्यता देण्यात आली. त्यामुळे ४,३१७ हेक्टर क्षेत्राला लाभ मिळणार असून अचलपूर तालुक्यातील १६, दर्यापूर तालुक्यातील ४ व अंजनगाव तालुक्यातील ३ गावांना सिंचनाचा फायदा होणार आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील कोरडीनाला प्रकल्पाच्या १६९.१४ कोटी खर्चास सुधारित मान्यता देण्यात आली आहे. कोरडीनाला हा मध्यम प्रकल्प हा कोरडी नदीवर असून



११.४९ द.ल.घ.मी. क्षमतेचे माती धरण बांधण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे आदिवासी क्षेत्रातील २ हजार ६१३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार आहे.

## आगाऊ वेतनवाढीचा लाभ

पात्र शासकीय कर्मचाऱ्यांना २००६ ते २००८ या वर्षातील अत्युत्कृष्ट कामासाठीच्या आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

आगाऊ वेतनवाढ ही भविष्यात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून देण्यात येते. ६ व्या वेतन आयोगाचा कालावधी १ डिसेंबर २०१५ रोजी संपला होता. त्यामुळे प्रस्तावित आगाऊ वेतनवाढ धोरण पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे शक्य नव्हते. या कालावधीकरिता आगाऊ वेतनवाढ धोरणाचा हेतू कालबाह्य झाल्याने ६व्या वेतन आयोगानुसार आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येऊ नये, असा निर्णय ऑगस्ट २०१७ मध्ये घेण्यात आला होता. या निर्णयामुळे ज्या कर्मचाऱ्यांना ५ व्या वेतन आयोगानुसार ऑक्टोबर २००६, ऑक्टोबर २००७ आणि ऑक्टोबर २००८ साठीचे आगाऊ वेतनवाढीचे लाभ देण्यात आले होते. त्या लाभाची रक्कम वसूली केली गेली या विरुद्ध कर्मचाऱ्यांनी याचिका दाखल केल्या होत्या.

या संदर्भात औरंगाबाद खंडपीठाने निर्णय दिला असून आता वसुल झालेली आगाऊ वेतन वाढीची रक्कम संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना ठोक स्वरूपात परत देण्यात येईल. त्याचप्रमाणे आगाऊ वेतनवाढी मंजूर झालेल्या आहेत. मात्र २०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष लाभ देण्यात आलेले नाहीत, त्यांनादेखील ही लागू असलेली रक्कम ठोक स्वरूपात देण्यात येईल.



मात्र, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या १ जानेवारी २००६ पासूनची ६व्या वेतन आयोगानुसार केलेल्या सुधारित वेतनश्रेणीतील वेतननिश्चितीत कोणताही बदल होणार नाही.

## मंत्रिमंडळ उपसमिती

महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना ७व्या वेतन आयोगानुसार वेतनाची थकबाकी देण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्याच्या संदर्भात मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपसमितीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड यांचा समावेश आहे.

## जलयुक्त शिवार अभियान २.०

जलयुक्त शिवार अभियान २.० सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी जलयुक्त शिवार अभियान २०१५-२०१९ या कालावधीत राबवण्यात आले होते व ३९ लाख हेक्टर शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा निर्माण झाल्या होत्या. आता नव्याने सुरू होणाऱ्या या अभियानात येत्या ३ वर्षांत सुमारे ५ हजार गावे नव्याने समाविष्ट केली जातील.

जलयुक्त शिवार अभियान २२ हजार ५९३ गावात राबवण्यात आले व यामध्ये ६ लाख ३२ हजार ८९६ कामे पूर्ण झाली. तसेच २० हजार ५४४ गावे जल परिपूर्ण झाली. या कामांमुळे २७ लाख टीसीएम पाणीसाठा क्षमता निर्माण झाली. तसेच कृषीचे विशेषत: रब्बीतील उत्पादनही वाढले. जलयुक्त शिवार अभियान टप्पा-२ मध्ये प्रथम टप्प्यातील पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबवलेल्या पात्र गावांमध्ये मृद् व जलसंधारणाची कामे घेण्यात येतील. त्याचप्रमाणे ज्या गावांमध्ये जलयुक्त शिवार अभियानाचा पहिला टप्पा राबवला गेला आहे; पण अद्याप गावांमध्ये पाण्याची गरज आहे, तेथे देखील ही कामे लोकसहभागातून करण्यात येतील.

या अभियानासाठी जलयुक्त शिवार अभियान पहिला टप्पा, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प व आदर्श गाव तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकासाची कामे पूर्ण झालेली गावे वगळता उर्वरित गावे निवडण्यात येतील. गाव आराखडा तयार करताना पाणलोट क्षेत्र हा नियोजनाचा घटक राहील. अंतिम आराखड्याला ग्रामसभेची मान्यता झाल्यानंतर तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. गाव आराखड्यानुसार कामे झाल्यानंतर गावाचा जल परिपूर्णता अहवाल तयार करण्यात येईल.

पूर्ण झालेल्या योजनांसाठी देखभाल दुरुस्ती परिरक्षणदेखील करण्यात येईल. गावांमधील ग्रामस्थांची जलसाक्षरता अभियानाद्वारे जनजागृतीदेखील करण्यात येईल. पिकाच्या उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणणे त्याचप्रमाणे सामूहिक सिंचन सुविधा निर्माण करणे या व इतर बाबींचा आराखड्यामध्ये समावेश असेल.

जलयुक्त शिवार अभियानाच्या संनियंत्रणासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर उपविभागीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या असतील. कामे गुणवत्तापूर्ण होण्यासाठी ३ लाखांपेक्षा अधिकचे काम ई-निविदेमार्फत करण्यात येईल. सर्व मृद् व जलसंधारण कामाचे मॅपिंग करून नकाशे अद्ययावत करून जिओ पोर्टलवर टाकण्यात येतील.

## उपसा सिंचन योजनेस मान्यता

जळगाव जिल्ह्यातील कुऱ्हा-वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजनेला गती देण्याचा आणि त्यासाठी २,२२६ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. इस्लामपूर धरणातून जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील २१ गावे तसेच बुलडाणा जिल्ह्यातील जळगाव-जामोद तालुक्यातील ५३ गावे; तसेच संग्रामपूर तालुक्यातील ३० गावे अशी एकूण १०४ गावांतील २५ हजार ८९८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. जळगाव जिल्ह्यातील ८ हजार २४९ हेक्टर आणि बुलडाणा जिल्ह्यातील १७ हजार ६४९ हेक्टर क्षेत्र सिंचित होणार आहे.

या प्रकल्पासाठी ५९७ हेक्टर जागेपैकी ४५८ हेक्टर भूसंपादन झाले आहे. माती धरणाचे काम ६८ टक्के पूर्ण झाले असून कमांड एरियामध्ये ५ हजार १६२ शेततळीदेखील घेण्यात येणार आहेत.

## सलोखा योजना

शेतजमिनीच्या ताब्यावरून वाद मिटवणाऱ्या सलोखा योजनेस मान्यता देण्यात आली. यासाठी सवलतीत मुद्रांकशुल्क नाममात्र १,००० रुपये व नोंदणी फी १०० रुपये आकारण्यात येईल. शेतजमिनीच्या ताबा व वहिवाटीबाबत शेतकऱ्यांमध्ये आपापसात वाद होतात. ते मिटवण्यासाठी व समाजामध्ये सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी ही योजना आणण्यात आली आहे.

या योजनेत एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे व दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमीन धारकांच्या अदलाबदल दस्तासाठी नोंदणी फी व मुद्रांकशुल्कामध्ये सवलत देण्यात येईल.

या योजनेमुळे शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक मानसिकता निर्माण होईल. तसेच विविध न्यायालयातील प्रकरणे निकाली निघतील. भूमाफियांचा अनावश्यक हस्तक्षेपसुद्धा होणार नाही. महाराष्ट्रात एकूण जमीनधारकांची खातेसंख्या ३ कोटी ३७ लाख ८८ हजार २५३ एवढी असून एकूण वहिवाटदार शेतकरी १ कोटी ५२ लाख इतकी आहे. शेतजमिनीच्या ताब्यासंदर्भात एकूण बाधित शेतकऱ्यांची संख्या सुमारे १३ लाख २८ हजार ३४० इतकी आहे. सलोखा योजनेत अर्ज

केल्यानंतर तलाठी आणि मंडळ अधिकारी यांनी १५ दिवसांत पंचनामा करणे आवश्यक आहे.

## कर्मचाऱ्यांना नियमित करणार

राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील १,५८५ रोजंदारी व तासिका कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या होत्या. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२२ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी या कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबर २०२२ पासून नियमित करण्याचा



निर्णय घेण्यात आला. सेवा नियमित करण्याच्या दिनांकापासून सर्व प्रत्यक्ष लाभ त्यांना मिळतील. नियमित करण्यात येणाऱ्या प्राथमिक शिक्षक कर्मचाऱ्यांनी ५ वर्षांच्या कालावधीत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

## सुविधा संपन्न कुटुंब मिशन

खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मनरेगा आणि इतर विविध विभागांची सांगड घालून राज्यातील ग्रामीण कुटुंबांना सक्षम करणारे सुविधा संपन्न कुटुंब मिशन राबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

निती आयोगाने सप्टेंबर-२०२१ मध्ये बहुआयामी गरिबी निर्देशांक प्रकाशित केला आहे. त्यात आरोग्य, शिक्षण व राहणीमान निकषांनुसार कुटुंबे वंचित असल्यास सर्व निकषांचा एकत्रितरीत्या विचार करून गरिबीची तीव्रता आणि गरिबीखाली जगत असलेल्या कुटुंबांची संख्या आणि टक्केवारी काढली आहे. त्यानुसार राज्यात अजूनही १४.९ टक्के लोक कोणत्याही एक किंवा अनेक प्रकारच्या वंचिततेनुसार गरीब असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या प्रत्येक विभागाची योजना ही कुटुंबांच्या कोणत्यातरी एक किवा अनेक प्रकारच्या वंचिततेवर मात करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आहेत. या योजनांची मनरेगा योजनेशी सांगड घातल्यास केंद्र शासनामार्फत अधिकचा निधी मिळून एकूणच योजनांचे उद्दिष्ट आणि व्याप्ती यामध्ये वाढ होईल. यासाठी हा प्रस्ताव ठेवण्यात आला.

यामध्ये प्रत्येक विभागातील स्वयंप्रेरित व उत्कृष्ट असे कार्य करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांनी दत्तक घ्यावयाच्या गावांना नंदादीप गावे तसेच काही तालुक्यांना 'नंदादीप तालुके' संबोधण्यात येईल.

या योजनेसाठी महिला व बालविकास, शालेय शिक्षण, आदिवासी विकास, सामाजिक न्याय, इतर मागास, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन, कृषी, ग्रामीण विकास, मृद् व जलसंधारण, महसूल, कौशल्य विकास, उच्च व तंत्रशिक्षण, मनरेगा, जलसंपदा तसेच पणन विभागाशी संबंधित कुटुंबे निवडण्यात येतील. या योजनेच्या संनियंत्रणासाठी राज्यस्तरावर विशेष कक्ष स्थापन करण्यात येईल.

## थकहमीपोटी बँकेस रक्कम अदा

सहकारी संस्थांना दिलेल्या कर्जाच्या शासकीय थकहमीपोटी शासनाने बँकेस रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला. एकूण १३ सहकारी संस्थांच्या बाबतीत हा निर्णय घेण्यात आला. यापोटी ९६.५३ कोटी रुपये रक्कम बँकेस देण्यात येईल. आजारी सहकारी साखर कारखाने, संस्था यांच्याकडून कर्ज वसुलीसाठी त्यांच्या मालमत्तांची पुनर्रचना करून संवर्धन किंवा उचित विल्हेवाट लावण्यासाठीचे प्रस्ताव महा एआरसी लि. या कंपनीपुढे सादर करण्यात येईल. भविष्यात शासन थकहमीपोटी कोणत्याही सहकारी साखर कारखान्याला शासकीय हमी देण्यात येणार नाही.

उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक-३.०३ कोटी, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म.नांदेड-२५.०३ कोटी, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक-६८.४७ कोटी अशा या संस्था आहेत.

तत्कालीन प्रधान सचिव राजगोपाल देवरा यांच्या अध्यक्षतेखालील एक समिती गठित करण्यात आली होती. या समितीने दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला. देवरा समितीने शिफारस केल्यानुसार खालील अटी व शर्ती विचारात घेण्यात येतील.

संबंधित बँकेने हमीपोटीची रक्कम मिळणेसंदर्भात या कर्जाच्या वसुलीसाठी शासनाच्या विरोधात विविध न्यायालयांमध्ये दाखल केलेले दावे/याचिका मागे घेण्यात याव्या, भविष्यात याबाबत कोणताही वाद उपस्थित करणार नाही, अशा आशयाचे हमीपत्र शासनास सादर करावे. शासनाकडून हमीपोटी रक्कम प्राप्त झाल्यावर हमीवरील कर्जाचे सर्व खाते निरंक करून तसा दाखला शासनास सादर करावा. भविष्यात या कारखान्यांच्या भाड्यापोटी किंवा विक्रीपोटी जी रक्कम



बँकेस प्राप्त होईल, त्यातून बँकेचे कर्ज वसूल झाल्यानंतर जर बँकेस काही रक्कम प्राप्त झाली तर, ही रक्कम शासनास हमी कर्जापोटी परत करावी. समितीने शिफारस केलेल्या रकमा बँकेस देताना वित्त विभागाने रक्कम उपलब्धतेनुसार अदा करणेबाबत निर्णय घ्यावा.

## 'शिवसृष्टी' प्रकल्पास निधी

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील आंबेगाव बु. येथे साकारण्यात येणाऱ्या 'शिवसृष्टी' प्रकल्पास ५० कोटी रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून अनुदान देण्याच्या निर्णयास मान्यता देण्यात आली. आंबेगाव येथे महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्यावतीने शिवसृष्टी प्रकल्प निर्माण करण्यात येत आहे. या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग

व घटना आणि महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा परिचय करून देणारी मांडणी करण्यात येणार आहे.

या प्रकल्पात प्रतापगडावरील भवानीमाता स्मारक, माची, रायगडावरील बाजारपेठ, रायगड किल्ल्याचा देखावा राजगडावरील राजसभा, पाली दरवाजा प्रतिकृती, खांदेरी व पन्हाळा लढाई देखावा, याशिवाय ॲम्फिथियटर, प्रशासकीय इमारत-सरकारवाडा इ. आनुषांगिक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. मूळ प्रकल्प ४३८ कोटी ६८ लाख रुपयांचा आहे. यातून ३०० हून अधिक जणांना रोजगार मिळेल.

## ग्राम न्यायालयास मान्यता

कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा व सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील संख येथे ग्राम न्यायालये स्थापन करण्यास व त्यासाठीची आवश्यक पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली. गगनबावडा व संख येथील या दोन्ही ग्राम न्यायालयांसाठी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायाधिकारी), लघुलेखक ग्रेड-३, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, बेलिफ कम शिपाई अशा प्रत्येकी पाच नियमित पदांच्या निर्मितीसाठी मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

## फौजदारी शिक्षेच्या तरतुदींमध्ये सुधारणा

राज्यात व्यवसायानुकूल वातावरण



निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम आणि महाराष्ट्र सिनेमा अधिनियमात शिक्षेच्या सुधारित तरतुदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे काही कारावासाच्या शिक्षांचे निर्गुन्हेगारीकरण करण्यात येईल.

देशामध्ये गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि रोजगार निर्माण करण्याच्या उद्देशाने अनुकूल व्यावसायिक वातावरण निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. त्यानुषंगाने राज्यातही ही सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

राज्य सरकारच्या विविध कायदे आणि नियमांच्या तरतुदींमध्ये आवश्यकतेनुसार विहित केलेल्या कारावासाच्या शिक्षेचे निर्गुन्हेगारीकरण करण्यासाठी अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने गुन्हेगारी शिक्षेच्या तरतुदींचा आढावा घेण्याचे; तसेच ही शिक्षा कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार गृह विभागाशी संबंधित असलेल्या अधिनियमातील दंड आणि कारावासाच्या तरतुदींचा आढावा घेण्यात आला.

## ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ करून वाचनसंस्कृतीला बळ देण्याचा निर्णय घेण्यात आला. या वाढीमुळे ६६ कोटी ४९ लाख इतका वित्तीय भार पडेल. जिल्हा व तालुकास्तरावरील अ, ब, क आणि ड ग्रंथालयांना याचा लाभ मिळेल. वाढणारी महागाई आणि वाचन साहित्याच्या वाढत्या किमती यामुळे ग्रंथालयांकडून या संदर्भात वाढती मागणी होती.

## स्वयं अर्थसाहाय्य विद्यापीठांना मान्यता

पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, पुणे आणि युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, कर्जत या स्वयं अर्थसाहाय्य विद्यापीठांना मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

वर्ष २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून पिंपरी-चिंचवड विद्यापीठ, तर २०२२-२३



शैक्षणिक वर्षापासून युनिव्हर्सल एआय विद्यापीठ यांना मान्यता असेल.

## शाळांना अनुदानासाठी मान्यता

राज्यातील शाळांना अनुदान देण्याचा व त्यासाठी १,१०० कोटी रुपये मान्यता देण्यास मान्यता देण्यात आली. ६ हजार १० प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना, तसेच १४ हजार ८६२ तुकड्यांना अनुदान मिळेल. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ६३,३३८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना होणार आहे.

त्रुटींच्या पूर्ततेनंतर २० टक्के अनुदानासाठी ३६७ शाळा पात्र असून ४० टक्के अनुदानासाठी २८४ शाळा पात्र



आहेत. २० टक्के अनुदान घेत असलेल्या २२८ शाळांना ४० टक्के अनुदान देण्यात येईल, तर ४० टक्के अनुदान घेत असलेल्या २००९ शाळांना ६० टक्के अनुदान देण्यात येईल. मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र परंतु शासनाच्या स्तरावर अद्याप घोषित न केलेल्या ३,१२२ शाळांना २० टक्के अनुदान देण्यात येईल. अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अटी व शर्ती लागू राहतील. त्याचप्रमाणे त्रुटींची पूर्तता करण्यासाठी शेवटची संधी म्हणून एक महिन्याची मुदत देण्यात येत आहे. अन्यथा, पुढील एक महिन्यात अशा शाळा व तुकड्यांना स्वयं अर्थसाहाय्यित म्हणून मान्यता देण्यात येईल. ज्या शाळा यासाठी तयार होणार नाहीत, त्यांची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

## कामगार कायद्यांमध्ये सुधारणा

कामगार कायद्यांमध्ये सुधारणा

## काजू फळपिक विकास योजना





राज्यात काजू फळपीक विकास योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. काजूच्या लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन ही योजना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही योजना पुढील ५ वर्षासाठी राबवण्यात येईल आणि त्यासाठी १,३२५ कोटी रुपये खर्च येईल. काजू बोर्ड भागभांडवल २०० कोटी रुपये करण्यासही मान्यता देण्यात आली. आंब्यासाठी स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्यासही तत्त्वत: मान्यता देण्यात आली.

या योजनेत काजू लागवडीसाठी कलमे उपलब्ध करण्यासाठी रोपवाटिका निर्माण करण्यात येतील. काजूची उत्पादकता वाढविणे, काजू बोंडावरील प्रकियेला चालना देणे, काजू उत्पादक शेतकरी आणि काजू प्रकल्प धारकाला अर्थसाहाय्य करणे, लागवडीपासून प्रक्रिया व मार्केटिंगचे मार्गदर्शन करणे, तसेच रोजगार निर्मिती हे काम करण्यात येईल. संपूर्ण कोकण विभाग व कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या भागात ही योजना राबवली जाईल. यामध्ये रोपवाटिका स्थापन करणे, काजू कलमे योजना, शेततळ्यांची योजना, सिंचनाकरिता विहिरींकरिता अनुदान, कीड नियंत्रणासाठी पीक संरक्षण अनुदान, काजू तंत्रज्ञानावर प्रशिक्षण, काजू प्रक्रिया उद्योगाचे आधुनिकीकरण, काजू बोंडूवरील प्रक्रियेकरिता लघुउद्योग, ओले काजूगर काढणे अशी विविध कामे कृषी व फलोत्पादन विभागामार्फत करण्यात येतील. तसेच कोकणातील जीआय काजूचा ब्रँड विकसित करणे, मध्यवर्ती सुविधा केंद्र उभारणे, ५ हजार मेट्रिक टन क्षमतेचे गोडावून प्रत्येक तालुक्यात उभारणे, काजू बी प्रक्रियेकरिता घेतलेल्या कर्जावर ५० टक्के व्याज अनुदान आदी जबाबदारी सहकार व पणन क्षेत्रावर टाकण्यात आली आहे.

करण्याचा व कालबाह्य तरतुदी काढण्याचा निर्णय घेण्यात आला. वाढीव दंडाची तरतूद यात करण्यात आली आहे. देशात रोजगार निर्मितीसाठी उद्योगांकरिता अनुकूल वातावरण आवश्यक आहे. याकरिता केंद्र सरकारने कायदे व नियम सुलभ व्हावेत यासाठी याकरिता पावले टाकली आहेत. व्यवसायाचे सुलभीकरण हा त्याचाच एक भाग आहे. या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत व्यवसायावरील नियामक अनुपालनाचे ओझे कमी करण्यावर व दंडाची रक्कम वाढवण्यावर चर्चा झाली. राज्य शासनाने अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली सचिवांची एक समिती या संदर्भात नेमली होती.



यानुसार पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम १९४६ मधील कलम-१०४ व १०६ (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र कामगारांचा किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ मधील कलम-१० (१) व १० (२) मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजिवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ च्या कलम-३(३), कलम-२७ मध्ये सुधारणा करण्यास तसेच कलम २७-१अ नव्याने समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली. याचबरोबर, महाराष्ट्र खासगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम-३(३), कलम-२७ मध्ये सुधारणा करण्यास व कलम-२७ अ नव्याने समाविष्ट करण्यास आणि महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ मधील कलम-१७ अ व ब मध्ये सुधारणा करण्यास तसेच कलम १७ क नव्याने समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली.

**– टीम लोकराज्य**

# मायबोली

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनांत दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरांत स्पंदते मराठी
आमुच्या नसानसांत नाचते मराठी

आमुच्या पिलापिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलांमुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरांत वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलांत हासते मराठी
येथल्या दिशादिशांत दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून डोलते मराठी
येथल्या चराचरांत राहते मराठी

– सुरेश भट

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# लोकराज्य

## अधिकृत–विश्वासार्ह–वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**
संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी–८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई – ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : जयश्री भोज